# The Gospels in Varhadi
# शुभवर्तमान  वऱ्हाडी भाषेत

**Matthew, Mark, Luke, John**

(मत्तय, मार्क, लूक  , योहान)

**Version-1**

# THE
# NEW TESTAMENT
# OF OUR
# LORD AND SAVIOUR
# JESUS CHRIST

हमारे

उद्धारकर्ता प्रभु

# यीशु मसीह

का

# नया नियम

# The Gospels in Varhadi

## Varhadi

Community Version -1 (Draft-3) 2016

Made available under :
**Creative Commons Attribution-ShareAlike 4.0 License**
https://creativecommons.org/licenses/by-sa/4.0/

For limited circulation only

**Published By :**

Varhadi Community

Download Android App, Read Online, Download PDF

**www.FreeBiblesIndia.com**

# MATTHEW

# मत्ती

1

1 अब्राहामाच्या पोरगा, दाविद ह्याचा
पोरगा, येशू ख्रिस्ताची वंशावली.
2 अब्राहामानं इसहाकाले जन्म देला अन्
इसहाकानं याकोबाले जन्म देला अन्
याकोबानं यहूदा अन् त्याच्यावाल्या
भावांना जन्म देला. 3 अन् यहूदानं पेसेस
व जेरह यांयलें तामारेच्या पासून जन्म
देला,अन् पेरेसानं हेस्रोनाले जन्म देला,व
हेस्रोनानं अशमाले जन्म देला. 4 अन्
अरामानं अम्मीनादाबाले जन्म देला,व
अम्मीनादाबानं नहशोनालें जन्म देला,अन्
नहशोनानं सल्मोनाले जन्म देला, 5 अन्
सल्मोनाने राहाबे पासून बवाजाले जन्म
देला, अन् बवाजानं रुथपासून ओबेदाला
जन्म देला,अन् ओबेदानं इशाय यालें जन्म
देला. 6 अन् इशायाले दावीद राज्याले जन्म
देला, अन् दाविदानं जे पयले उरीयाची
बायको होती तिच्यापासून शलमोनाला
जन्म देला. 7 अन् शलमोनानें रह्बामाला
जन्म देला,अन् रह्बामाने अबियाले जन्म
देला,अन् अबियाने आसा यालें जन्म
देला. 8 अन् आसानें यहोशाफातलें जन्म
देला,अन् यहोशाफातनें योरामाला जन्म
देला,अन् योरामानं उज्जीया यालें जन्म देला,
9 अन् उज्जीयानं योतामाला जन्म देला,व
योतामानं आहाजाल यालें जन्म देला,अन्
आहाजाने हिज्कीया यालें जन्म देला. 10 अन्
हिज्कीयाने मनश्शे यालें जन्म देला,अन्
मनश्शेने आमोनाला जन्म देला,व आमोनाने
योशीया यालें जन्म देला. 11 अन् बंदी
होऊन बाबेलास जायाच्या वाक्ती,योशियानें
यखंन्या,अन् याच्यावाल्या भावांना जन्म
देला. 12 अन् बंदी होऊन बाबेलास पोहचल्या
नंतर यखंन्यानें शालतीराला जन्म देला,अन्
शालतीराने जरुब्बाबेलाला जन्म देला.
13 अन् जरुब्बाबेलाने अबिहुदाला जन्म
देला,व अबिहूदानें इल्याकिम यालें जन्म
देला,अन् इल्यकिमानें अज्जुराला जन्म देला.
14 अन् अज्जुरानें सादोकाला जन्म देला,अन्
सादोकानें याखीमाला जन्म देला, अन्
याखीमाने इलीहुदाला जन्म देला. 15 अन्
इलीहुदाने इलीयाज्राला जन्म देला,अन्
इलीयाज्राने मत्तानालें जन्म देला,अन्
मत्तनानें याकोबाला जन्म देला. 16 अन्
योकोबाने योसेफाला जन्म देला,जो मरीयेचा
नवरा होता,अन् त्याच्या पासून येशू ख्रिस्त
म्हणतात तो जन्मला. 17 अब्राहामापासून तर
दाविदा पर्यत सर्व्या चवदा पिढ्या झाल्या,अन्
दाविदा पासून बाबेलास बंदी होऊन जाया
पर्यत चवदा पिढ्या,अन् बाबेलात बंदी होऊन
पहुच्याच्या वाक्ती लग येशू ख्रिस्ता पर्यत
चवदा पिढ्या झाल्या. 18 अन् येशू ख्रिस्ताच्या
जन्म ह्या प्रकारे झाला,त्याच्यावाली
'मायआईइची सोयरिक योसेफाच्या संग
झाली,तवा एकत्र येण्याच्या पयले ती पवित्र
आत्म्यापासून गरोधर झालेली दिसून आली.
19 तिच्यावाला नवरा योसेफ जो धर्मी माणूस
होता,त्याच्यावाली इच्छा तिले बदनाम
करण्याची नोती, पण तिले गुप्तपणे टाकून
देण्याचे असे त्यानं मनांत आणलं. 20 जवा तो

ह्या गोष्टीचा विचारांत होता,तवा प्रभूचा एक
देवदूत त्याले सपनात दिसून म्हणू लागला,हे
योसेफा दाविदाच्या पोरां, तू आपल्या
बायको मरीयेले अंगीकार करण्यासाठी भेऊ
नको,कावून कि जे तिच्या गर्भात हाय,ते
पवित्र आत्म्याकडून हाय. 21 अन् तिले पोरगा
होईन,अन् त्याचं नावं येशू ठेवजोकं कावून कि
तो आपल्या लोकांना त्यायच्या पापांपासून
तारिल." 22 अन् हे सगळ ह्या साठी झालं,कि
प्रभूनं जे काई भविष्यवक्त्यांच्या द्वारे सांगतल
होतं,ते पूर्ण व्हावं. 23 ते असे कि "पाहा" एक
कुमारी गरोधर होईन,अन् एका पोराला जन्म
देईन,अन् त्याच्यावालं नांव "इम्मानुएल"
ठेवण्यात येईन,त्याच्या अर्थ हा हाय कि
'देव बरोबर हाय'. 24 तवा योसेफ झोपितून
उठल्यावर त्यानं प्रभूच्या दूतांन जसी
आज्ञा देली होती,तसेंच केलें अन् आपल्या
बायकोच्या अंगीकार केला. 25 अन् ते पोराला
जन्म देई पर्यत,तो तिच्यावाल्या पासी नाई
गेला,अन् त्यानं त्याचं नावं येशू ठेवलं.

2 1 अन् हेरोद राज्याच्या
दिवसाईत,यहुदियाच्या बेथलहेमात
येशूचा जन्म झाला,तवा"पाहा"पूर्वेकडून
ज्योतिषी लोकं यरुशलेमात येऊन विचारपूस
करू लागलें. 2 "कि यहुदिह्याचा राज्या
ज्याचां जन्म झाला हाय,तो कुठसाकं हाय?
कावून कि आमी पूर्वे दिशेस त्याचा तारा
पाऊन त्यालें नमन करण्यास आलो हावो.
3 हे आयकून हेरोद राज्या अन् त्याच्या
संग सगडा यरुशलेम घाबरून गेला होता.
4 मंग त्यानं लोकांचे मुख्य याजक व शास्त्री
यायलें एकत्र करून त्यायलें विचारपूस
करू लागला,कि ख्रिस्ताच्या जन्म कुठसाकं
व्हावा. 5 तवा ते त्यालें म्हणलें यहुदीयाच्या
बेथलहेमांत कावून कि भविष्यवक्त्याच्या
इकून असं लीवलेल हाय कि. 6 हे बेथलहेमा,
जो यहुद्याच्या देशात तू कोणत्याहि रीतीने
यहूदाच्या अधिकाऱ्यामध्ये सर्वात लाहान
हायसं असं नाई,कावून कि तुह्यातून एक
अधिपती निगीन,जो माह्याली इस्राएल
प्रजेची रखवाली करीन. 7 तवा हेरोदाने
ज्योतिषी लोकांना गुप्तपणे बलाऊन त्यायलें
विचारू लागला,कि तारा ठीक कोणत्या
वाक्ती दिसून आला. 8 अन् त्यानं हे सांगून
त्यांयलें बेथलहेमात पाठवलं,कि जाऊन त्या
बालकाच्या बद्दल ठीक ठीक विचारपूस
करा,अन् जवा तुमी त्यालें शोधालं तवा
मले येऊन कळवा म्हणजें मी हि त्यासं
येऊन नमन करीन. 9 ते राज्याची गोष्ट
आयकून चाल्लें गेलें,अन् पाहा,जो तारा
त्यांयनं पूर्वेस पायला होता,तो त्यायच्या
समोरा समोरा चाल्ला होता, अन् जतीसाकं
बालक होता त्या जागेच्या वरती येऊन
थांबला. 10 अन् तो तारा पाऊन त्यांयलें लय
आनंद झाला. 11 अन् त्या घरांत जाऊन त्या
बालकाला त्याच्यावाली माय मरीयेच्या
पासी पायलं,अन् खाली झुकून त्याला
नमन केलें,अन् आपली आपली थयली
खोलून,त्याला सोनं अन् ऊद अन् गंधरस
हे दान भेट देली. 12 अन् त्यांयनं परत
हेरोदा पासी नाई जावं,असी स्वप्नांत सूचना
झाल्यामुळे तवा ते दुसऱ्या रस्त्यानें आपल्या
देशात वापस गेलें. 13 मंग ते गेल्यावर
"पाहा"प्रभूचा एक दुत स्वप्नांत योसेफाला
दिसला अन् म्हणला,ऊठ अन् त्या लेकराला
अन् त्याच्यावाल्या मायलेआई घेऊन मिस्र
देशात पडून जाय,अन् जतलग मी तुले म्हणत
नाई तथलग:ततीसाकचं रायजो,कावून कि या
बालकाच्या घात करायले हेरोद त्याच्या शोध
करत हाय. 14 तवा तो रातीचं उठून लेकराला
अन् त्याच्यावाल्या मायले घेऊन मिसर
देशात घेऊन निगुन गेला. 15 अन् हेरोदाच्या

मरणापर्यंत तो ततीसाकं रायला,प्रभुने
भविष्यवक्त्याच्या व्दारे जे सांगतलं होतं,"कि
मी आपल्या "पोराला"मिसर देशातून
बलावले हाय ते पूर्ण व्हावें म्हणून असे
झाले. [16] तवा ज्योतिषी लोकांनी आपल्याला
फसवले हाय,हे पाऊन हेरोद लयचं रागावला
अन् त्यानं माणसे पाठवली अन् जे वेळ
त्यांयनं ज्योतिषी लोकाच्या पासून नीट
विचारून घेतली होती त्या वेळेप्रमाणे
बेथललेमात व त्याच्या साऱ्या सीमांत जे
बालक दोन वर्षाचे अन् त्याहून कमी वयाचे
होते त्या सर्वांना जीवाने मारविलें. [17] जवा
जे वचन यिमर्या भविष्यवक्त्याच्या व्दारे
सांगितले होतें,ते परीपूर्ण झालें. [18] त्यानं
म्हणलं होतं कि "रामा येथे एक वाणी
आयकाला आली,रडणे व मोठा आकांत झाला
राहेल आपल्या लेकरांकरिता रडत हाय,ते
नाईत म्हणून ते सांत्वना पावेना. [19] मंग
पाहा,हेरोद मेल्यावर प्रभूचा दूत मिसर
देशात योसेफाला स्वप्नांत दिसून म्हणला.
[20] कि उठ"बालकाला अन् त्याच्यावाल्या
मायला घेऊन इस्राएलाच्या देशांत जा
कावून कि जे बालकाला जीवाने मारण्या
साठी पायत होतें ते मेलें हायत. [21] तो
उठला अन् त्या लेकरांला अन् त्याच्यावाल्या
मायला संग घेऊन इस्राएलाच्या देशांत
आला. [22] परंतु हे आयकून कि अरखीलाउस
आपला बाप हेरोद ह्याच्या जागी यहुदीयावर
राज्य करत हाय,म्हणून ततीसाकं जायाले
भेला,अन् स्वप्नांत त्यालें दुताकडून सूचना
झाल्यामुळे तो गालीलाच्या प्रांतात निगुन
गेला. [23] अन् तो नासरेथ नांवाच्यानगरीत
येऊन रायला त्याला,नासोरी म्हणतीन असे
जे भविष्यवक्त्याच्या व्दारे सांगतले होते ते
पूर्ण व्हावे म्हणून असे झालें.

3 [1] अन् त्या दिवसांमध्ये बाप्तिस्मा
करणारा योहान यहुदियाच्या
जंगलात हा उपदेश करू लागला,कि [2] मन
फिरवा,कावून कि स्वर्गाचं राज्य जवळ
आलं हाय. [3] कावून कि,ज्याची चर्चा यशया
भविष्यवक्त्याच्या व्दारा केली गेली होती,कि
जंगलात एका ओरडण्याऱ्याचा वाणी होऊ
रायली,कि प्रभूचा मार्ग तयार करा,अन्
त्याचें रस्ते नीट करा. [4] अन् योहानाचे
कपडे उंटांच्या केसाचें होतें,अन् कातड्याचा
कमरबंध त्याच्यावाल्या कंबरिले होता,अन्
टोळ व रानंमधु हे त्याचें खाणे होतें.
[5] तवा यरुशलेम व सर्व्या यहुदीयातले अन्
यार्देनेच्या आजबाजूच्या सगळ्या भागातून
त्याच्यावाल्या पासी निगुन आले. [6] अन्
त्यांयनं आपल्या आपल्या पापांना मानून
यार्देनेत बाप्तिस्मा घेतला. [7] पण जवा त्यानं
बरेससे परुशी अन् सदुकी यांना बाप्तिस्मा
घेयाले आपल्या पासी येतांना पायलं, तवा
त्यांयलें म्हणलं हे सर्पाचे पिलहो तूमाले
कोण सुचवलं हाय कि येणाऱ्या क्रोधापासून
पडा. [8] तर पश्चातापाच्या योग्य असें फळ
ध्या. [9] अन् आपल्या आपल्या मनांत हे
नोका सोचू, कि आपला बाप अब्राहाम
हाय,कावून कि मी तुमाले सांगतो,कि देव
या गोट्यातून अब्राहामाच्या साठी लेकरें
करायला समर्थ हाय. [10] अन् आता झाडाच्या
बुडापासी कुऱ्हाड ठेवली हाय,म्हणून जें
जें झाडं चांगले फय देत नाई तें तें तोडून
आगीत ठाकण्यात येईन [11] मी तर पाण्याने
मन फिरव्याचा बाप्तिस्मा देतो,परंतु जो
माह्याल्या मागून येऊ रायला,तो माह्याल्या
हून शक्ती शाली हाय,मी तर त्याच्यावाली
चंपल उचल्याच्या योग्य नाई,तो तुमाले
पवित्र आत्म्याच्या आगीने बाप्तिस्मा देईन.
[12] त्याचं सुफ त्याच्या हातांत हाय,अन् तो

आपले खडे चांगल्या प्रकारे सपा करीन,अन्
आपल्या गव्हाले तर कोठारीत साठविण पण
भुसा न विझणाऱ्या इस्तवात जाळुन टाकीन.
13 तवा त्या वाक्ती येशू ख्रिस्त गालीलातून
यार्देनेच्या किणाऱ्यावर योहानाच्या पासी
बाप्तिस्मा घीयाले आला. 14 परंतु योहान
त्याला हे म्हणून मना करू लागला,मले
तर तुह्याल्या हातुन् बाप्तिस्मा घीयाची
आवश्यकता हाय,अन् तू माह्याल्या पासी
आला हाय, 15 तवा येशूनं त्यालें हे उत्तर देलं,
आता तर असचं होऊ दे,कावून कि आपल्याले
अशाचं प्रकारे साऱ्या धार्मिकतेला पूर्ण कर्ण
उचित हाय,तवा त्यानं त्यांची गोष्ट मानली.
16 अन् येशूने बाप्तिस्मा घेतल्यावर आला,अन्
पाहा,त्याच्या साठी अभाय खुलं झालं,अन्
त्यानं देवाच्या आत्म्याले कबुतरा सारखं,अन्
आपल्या वरते येतांना पायलं. 17 अन् पाहा,हे
भविष्यवाणी झाली,कि हा माह्याला प्रिय
पोरगा हाय,ज्याच्यावर मी लय प्रसन्न आहो.

# 4

1 तवा त्या वाक्ती आत्मा येशुले जंगलात
घेऊन गेला, ह्यासाठी कि सैतानापासून
त्याची परीक्षा हो. 2 अन् तो चाळीस दिवस
अन् चाळीस रात उपासी रायला,आखरी ले
त्यालें भूख लागली. 3 तवा परखनारा त्याच्या
पासी येऊन म्हणू लागला,जर तू देवाचा
पोरगा हायसं,तर बोलं कि या गोट्याला
भाकरी हो. 4 तवा त्यानं उत्तर देलं,लीवलेलं
हाय,कि माणूस फक्त भाकरीने नाई, तर
देवाचं वचन जे त्याच्या मुखातून निंगते
त्यानें जिवंत राईन. 5 मंग सैतानाने त्याला
पवित्र नगरांत नेलें मंदिराच्या कंगुऱ्यावर
उभें केलें. 6 अन् त्यानं म्हणलं,जर तू देवाचा
पोरगा हायसं,तर खाली उडी टाकं,कावून
कि असें लीवलेलें हाय,कि तो आपल्या
स्वर्गदूतांना आग्या करीन,अन् ते तुह्याले
पाय गोट्यावर आपटू नये म्हणून आपल्या
हातांवर झेलू धरतील. 7 तवा येशूने त्यालें
म्हणलं,हे पण लीवलेलं हाय,कि तू आपल्या
प्रभू देवाची परीक्षा नको पाऊ. 8 मंग सैतान
त्याला एका मोठ्या उंची पहाडावर घेऊन
गेला,अन् सर्व्या जगाचे राज्य अन् वैभव
दाखऊन. 9 त्याला म्हणाला,जर तू झुकून मले
प्रणाम करसीन,तर मी हे सगळे तुले देऊन
देईन. 10 तवा येशुनें त्यालें म्हणलं,हे सैतान
दूर हून जा,कावून कि लीवलेलं हाय,कि
तू प्रभू आपल्या देवालेचं प्रणाम कर,अन्
फक्त त्याचीचं उपासना करजोक. 11 तवा
सैतान त्याच्या पासून चाल्ला गेला,अन्
पाहा,स्वर्गदूत येऊन त्यांची सेवा करू लागलें.
12 जवा त्यानं हे आयकलं कि योहानाला
पकडून जेलात टाकलं हाय,तवा तो गालीलात
चालला गेला. 13 अन् नासरेथाले सोडून
कफरनुहात जे सरोवराच्या किनाऱ्यावर
जबलुन अन् नप्तालीच्या देशांत हाय,जाऊन
रावू लागला. 14 ह्या साठी कि जे वचन
यशया भविष्यवक्त्याच्या व्दारे म्हणल्या
गेलं होतं,ते पूर्ण व्हावं. 15 जबलुनाचा अन्
नप्तालीचा देशात सरोवराच्या मार्गाने
यार्देनेच्या पासी अन्याजातीयांचा गालील
प्रांत होता. 16 जे लोकं अंधकारात बसले
होतें,त्यांयनं ज्योती पायली,अन् जे मरणाच्या
देशात अन् छायेत बसलें होतें,त्याच्या वर
ज्योती चमकली. 17 तवा पासून येशू उपदेश
करूं लागला,अन् म्हणू लागला,मन फिरवा
कावून कि स्वर्गाच राज्य जवळ हाय. 18 मंग
तो गालील सरोवराच्या किनाऱ्यावरून
चालला होता,तवा त्यानं पेत्र अन् शिमोन
व त्याच्यावाला भाऊ आंद्रिया या दोघं
भावांस यांयलें सरोवरात जायं टाकतांना
पायलं,कावून कि ते मासोया पकडणारे होतें.
19 तवा त्यांना त्यांयलें म्हणलं,माह्याल्या
मांग या,म्हणजें मी तुमाले माणसांना

पकडणारे बनविण. 20 मंग ते लगेचं,जायांना
सोडून त्याच्यावाल्या मांग झालें. 21 अन्
ततून पुढे गेल्यावर,त्यानं अजुक दुसरे दोघें
भावांना म्हणजे,जब्दीचा पोरगा याकोब अन्
त्याच्या भाऊ योहान यांयलें आपला बाप
जब्दी संग डोंग्यावर जायांना सुधरवतांना
पायलं,तवा त्यांयलें पण बलावलं. 22 तवा
ते लगेचं डोंग्याले अन् आपल्या बापाला
सोडून त्याच्यावाल्या मांग झालें. 23 तवा येशू
सगळया गालीलांत त्यांयच्या सभास्थानांत
उपदेश करत अन् राज्याचे शुभवर्तमान प्रचार
करत,अन् लोकांच्या सर्व प्रकारचे दुखणे बरें
करत फिरला. 24 अन् सर्व्या सुरिया देशात
मध्ये त्याच्यावाली कीर्ती पसरली अन् जे
बिमार लोकं होतें, ज्यांयच्यात भूतग्रस्त व
मिर्गीवाले अन् वातरोगी होतें त्या सर्वांना
त्यांयनं त्याच्यावाल्या पासी आणतं अन् तो
त्यांयलें बरं करत जाय. 25 अन् गालील व
दकापलीस अन् यरुशलेम अन् यहुदीया यातून
अन् यार्देनेच्या पलीकडून लोकांचा मोठं मोठा
समुदाय त्याच्यावाल्या मांगे चालला.

5 1 तवा तो त्या लोकांना पाऊन,पहाडावर
चढला अन् जवा बसला,तवा
त्याच्यावाले शिष्य त्याच्या पाशी आलें.
2 अन् तो आपलें तोंड उघडून त्यांयलें उपदेश
करू लागला. 3 धन्य हायत,जे मनाने दीन
हायत,कावून कि स्वर्गाच राज्य त्यांयचं
हाय. 4 धन्य हायत,जे शोक करतात कावून
कि ते शांती प्राप्त करतीन. 5 धन्य हायत,जे
नम्र हायत,कावून कि ते पृथ्वीचे अधिकारी
होतीन. 6 धन्य हायत,जे धर्माचे भूकलेले
अन् ताहानलेलें हायत,कावून कि ते तृप्त
केलें जातीन 7 धन्य हायत,जे दयावान
हायत,कावून कि त्यांयच्यावर दया केली
जाईन. 8 धन्य हायत,जे ज्यायचें मन शुद्ध
हायत,कावून कि ते देवाले पायतीन. 9 धन्य
हायत,जे मेलमिलाप करणारे हायत,कावून
कि ते देवाचे मुलं म्हणल्या जातीन.
10 धन्य हायत,जे धर्माच्याने सतावल्या
जातात,कावून कि स्वर्गाच राज्य त्यांयचं
हाय. 11 धन्य हा तुमी,जवा माणसं माह्याल्या
बद्दल खोटं बोलून बोलून तुमच्या विरोधात
सगळया प्रकाराच्या बेकार गोष्टी करतीन
तवा 12 आनंदित अन् मगन होजाक,कावून कि
तुमच्या साठी स्वर्गात मोठं फळ हाय,यासाठी
कि त्यांयनं त्या भविष्यवक्त्यांना जे तुमच्या
पयले होतें असाचं प्रकारे सतावल होतं.
13 तुमी पृथ्वीचे मीठ आहा,पण जर मिठाची
चवं बिगडनार,तर ते मंग कोणत्या वस्तूने
नमकीन केलं जाईन?मंग ते कोणत्याहि कामी
येणार नाई, फक्त बायर फेकल्या जाईन अन्
माणसाच्या पायाने तुडवले जाईन. 14 तुमी
जगाच्या दिवा हा,जो नगरावर अन् पहाडावर
वसलेलें हा जे लपू शकत नाई. 15 अन् लोकं
दिवा लावून मापाखाली ठेवीत नाईत तर
दिवठनिवर ठेवतात,तवा त्या घरातल्या सर्व्या
लोकांना उजिड पोहचतो. 16 तसाच तुमचा
हि उजिड माणसाच्या समोर चमकावा,कि
ते तुमच्या चांगल्या कामांना पाऊन,तुमचा
बाप जो स्वर्गात हाय,त्याच्यावाली स्तुती
करतीन. 17 हे नका समजूं कि मी,नियमशास्त्र
किंवा भविष्यवक्त्यांच्या पुस्तकांना रद्द
करण्यासाठी आलो हाय,पण रद्द नाई पूर्ण
कऱ्यासाठी आलो आहो. 18 कावून कि
मी तुमालें खरंखोर सांगतो,कि जतलग
"अभाय अन् पृथ्वी मिठ्णार नाई,तथलग
नियमशास्त्रातला एक भाग पण पूर्ण होयाच्या
पयले मिठ्णार नाई. 19 म्हणून जो कोणी या
लायण्यातल्या लायनी आज्ञेले तोडणार,अन्
तसाचं लोकांना शिकणार,तो स्वर्गाच्या
राज्यांमध्ये सगळयाईत लायना मानला
जाईन,पण जो कोणी त्या आज्ञेचे पालन

करीन,तो ते शिकवीन,तोचं स्वर्गाच्या
राज्यांत महान म्हणल्या जाईन. 20 कावून
कि मी तुमाले सांगतो,जर तुमची धार्मिकता
शास्त्राच्या अन् परुशाच्या धार्मिकतेपेक्षा
अधिक नाई,तर तुमी स्वर्गाच्या राजांत प्रवेश
करूं शकाल नाई. 21 तुमी आयकले हाय
कि,पूर्वीच्या काळातल्या लोकांना सांगतले,कि
खून करू नका,अन् जो कोणी खून करीन
त्यालें कोर्टात त्यालें दंड देलें जाईन. 22 परंतु
मी तुमाले सांगतो,कि जो कोणी आपल्या
भावांवर क्रोध करीन,तो कोर्टात दंडाच्या
योग्य होईन,अन् जो कोणी आपल्या भावाले
तुच्छ मनीन,तर तो महासभेत दंडाच्या योग्य
होईन,अन् जो कोणी म्हणीन,"अरे मुर्खा" तो
नरकाच्या आगीच्या दंडाच्या योग्य होईन.
23 म्हणून जर तू आपले दान वेदीजवळ,अर्पित
हायस,तवा जर तुले ततीसाकं आठवते कि
माह्याल्या मनांत आपल्या भावांच्या बद्दल
काई विरोध हाय,तवा ततीचं आपलं दान
वेदीच्या जवळ सोडून दे. 24 अन् जाऊन पयले
आपल्या भावाच्या संग मेलमीलाप कर,मंग
येऊन आपले दान चढवं. 25 अन् जतलग
तू आपल्या मुद्दई यांच्या बरोबर रस्त्याने
हायसं, तवा लवकर मेलमिलाप करून घे
असं नाई व्हावं कि मुद्दई तुले सुभेदाराच्या
हाती देवो,अन् तु जेलात टाकला जावां.
26 मी तुमाले खरंखोर सांगतो,कि जतपर्यत
तू कवडी कवडी भरून देशीन नाई तथलग
ततून सुठ्शीन नाई. 27 तू व्यभिचार करूं
नको,असे सांगितलें होते हें तुमी आयकले
होतें. 28 परंतु मी तुमाले म्हणतों,कि जो
कोणी कोण्या बाईवर बेकार नजर टाकिन,तो
आपल्या मनांत तिच्या बद्दल व्यभिचार करू
रायला. 29 अन् जर तुह्याला उजवा डोया
तुले अडखळवीत हाय,तर तो उपटून फेकून
दे,कावून कि तुह्यासाठी हेचं चांगलं हाय,कि
तुह्याल्या शरीरातला एक अंग जरी नाश
झाला, तरी तुह्यालं सर्व शरीर नरकात टाकलं
नाई जाईन. 30 अन् जर तुह्याला उजवा
हात तुले अडखळवीत हाय,तर त्याले कापून
आपल्या पासून फेकून दे,कावून कि तुह्यासाठी
हेचं चांगलं हाय,कि तुह्याल्या शरीरातून
एक अंग जरी नाश झालं, तरी तुह्यालं सर्व
शरीर नरकात टाकलं नाई जाईन. 31 हे पण
सांगितल्या गेलं, कि जो कोणी आपल्या
बायकोले सोडीन, त्यानें तीलें फारकती
ध्यावी. 32 परंतु मी तुमाले सांगतो,जो
कोणी आपल्या बायकोला व्यभिचाराच्या
कारणावांचून टाकून देतो,तर तो तिले
व्यभिचार करायले लावतों,अन् जो त्या
दुसरपणी संग लग्न करतो,तो व्यभिचार करते.
33 मंग तुमी आयकले हाय, कि पूर्वकाळाच्या
लोकांना म्हणलेलं होतं,खोटी शपत खाऊ
नको पण देवाच्या साठी आपली शपत पूर्ण
करजोक. 34 परंतु मी तुमाले सांगतो,कि
कधी हि शपत खाऊ नका,नाहि स्वर्गाची,
कावून कि ते देवाचं राजासन हाय. 35 अन्
नाहि पृथ्वीची,कावून कि ते त्याच्या पायाचें
पादासन हाय,अन् नाहि यरुशलेम ची,
कावून कि ते महाराजा चे नगर हाय.
36 अन् नाहि आपल्या मस्तकाची शपत
खा,कावून कि तू एकाहि केसांना पाढरें काळे
करूं शकतों. 37 परंतु तुमचे बोलणे होचे
हो,या नाईचे नाई,कावून कि जे काई याहून
अधिक होतें ते वाईटापासून हाय. 38 हे तुमी
आयकले हाय,कि डोया बद्दल डोया अन्
दाताच्या बदलात दात. 39 परंतु मी तुमाले
सांगतो,कि दुष्टचा सामना नका करूं,परंतु
जो कोणी तुह्याल्या उजव्या गालावर थापड
मारेन,त्याच्या पुढे दुसरा पण गालदे. 40 अन्
जो तुह्यावर फिर्याद करून तुह्याला मनिला
घ्यायला पायतो,तवा त्यालें पांघरूहि घेऊ दे.

41 अन् जो कोणी तुले एक कोस जाणून बुजून
नेईन तवा त्याच्या संग दोन कोस चालला
जाय. 42 अन् जो कोणी तुले मांगते, त्यालें
दे,अन् जो कोणी तुले उधार मागण्यासाठी
आला तवा पाठफिरू नको. 43 तुमी आयकले
हाय,कि आपल्या शेजाऱ्यावर प्रेम अन्
वैऱ्यावर वैर. 44 परंतु मी तुमाले सांगतो,तुमी
आपल्या वैऱ्यावर प्रेम करा अन् जे सतावतात
त्यांयच्या साठी प्रार्थना करा. 45 अशासाठी
कि तुमी जो स्वर्गातला जो बाप हाय,
त्याच्यावाले लेंकर व्हालं,कावून कि तो
वाईटावर अन् धर्मीयानवर दोघांवर पण
आपला सूर्य उगवतो,अन् धर्मी अन् अधर्मी
यांवर दोघांवर पाणी पाडतो. 46 कावून कि
जर तुमी आपल्या प्रेम करणाऱ्याना प्रेम
करसान,तर तुमच्या साठी काय लाभ?काय
जकातदार असे करत नाई काय? 47 अन् जर
तुमी आपल्या भावांना नमस्कार करसान,तर
कोणत मोठं काम करता?काय अन्यजातीचें
लोकं असे नाई करत काय? 48 म्हणून तुमी
जसा तुमचा स्वर्गीय बाप पूर्ण हाय तसे पूर्ण
व्हा.

# 6

1 सावधान राहा,तुमी माणसांना
दाखवण्यासाठी आपल्या धर्माचे
काम करूं नका,नाईतर आपल्या स्वर्गीय
बापापासून काईहि फळ प्राप्त करसानं नाई.
2 म्हणून जवा तू दान करसीन,तवा आपल्या
समोर तुरहीपुंगी नको वाजवू,जसे कपटी
सभेत अन् गल्ल्याईत करतात,ह्या साठी कि
लोकं त्यांयची वाह वाह करे, मी तुमाले
खरखोर सांगतो, कि ते आपले प्रतीफ़ळ
पाऊन बसलें. 3 पण जवा तू दान करसीन,
तवा तुह्याला उजवा हाताने केलें ते डाव्या
हातांला कळू नये. 4 यासाठी कि तुह्यालें दान
गुप्त राहावे,अन् तवा तुह्याला बाप जो गुप्त
मध्ये पायते,तो तुले प्रतीफ़ळ देईन. 5 जवां
तू प्रार्थना करसीन,तवा कपटीच्या सारखां
ना हो,कावून कि लोकांना दाखवण्यासाठी
सभास्थानात अन् रस्तावरसडकीच्या
कोपऱ्यावर प्रार्थना करण त्यांयलें चांगलं
वाटते,मी तुमाले सांगतो कि त्यांना त्यांयचं
प्रतीफ़ळ भेटलं हाय. 6 पण जवां तू प्रार्थना
करसीन,तवा आपल्या खोपडीत जा,अन्
दरवाज्या बंद करून आपल्या बापसंग जो
गुप्त मध्ये हाय,प्रार्थना कर तवा तुह्याला
बाप जो गुप्त मध्ये तुले पायते तवा तुला
प्रतीफळ देईन. 7 प्रार्थना करण्याच्या वाक्ती
अन्यजातीया सारखे बकंबकं नको करू,कावून
कि त्यांयले वाटते कि ते बोलल्याने त्यांयचं
आयकलं जाईन. 8 म्हणून तुमी त्यांयच्या
सारखे नको होऊ,कावून कि तुमचा बाप
तुमच्या मांगण्यापयले हि ओळखते कि तुमची
काय आवशक्यता हाय. 9 आता तुमी अशा
प्रकारे प्रार्थना करत जा,हे आमच्या बापा, तू
जो स्वर्गात हायस,तुह्यालं नांव पवित्र मानलं
जावं. 10 तुह्यालं राज्य येवो,तुह्याली इच्छा
जसी स्वर्गात पूर्ण होते,तसीच पृर्थ्वीवर पण
हो. 11 आमची दिवसभऱ्याची भाकर रोज
आमाले दे. 12 अन् ज्या प्रकारे आमी आमच्या
अपराध्यांना क्षमा केलें हाय,तसेंच तू आमचे
अपराध क्षमा कर. 13 अन् आमाले परीक्षेत
नको पाडू,पण वाईटापासून सोडवं,कावून
कि राज्य अन् पराक्रम अन् महिमा सर्वदा
तुह्याली असो आमीन. 14 म्हणून जर तुमी
माणसांचे अपराध क्षमा करसान तर तुमचा
स्वर्गीय बाप पण तुमाले क्षमा करीन. 15 अन्
जर तूमी माणसाचे अपराध क्षमा नाई
करालं,तवा तुमचा बाप तुमचे अपराध क्षमा
नाई करणार. 16 जवा तुमी उपास करालं,तवा
कपटीयाच्या सारखी तुमच्या तोंडावर उदाशी
नसावं,कावून कि ते तोंड विरूप करतात
ह्यासाठी लोकं त्यांयलें उपवासी समजावे,मी

तुमाले खरखोर सांगतो कि, त्यांयनं त्यायचं
प्रतीफळ भरून पावले हायत. 17 पण जवा तू
उपवास करसीन तवा आपल्या मुंण्डक्यावर
तेल लावं,अन् तोंड धून घे. 18 यासाठी कि
लोकं नाई, पण जो तुह्याला बाप जो गुप्त मध्ये
हाय,तुले उपवासी समजे,यादशेमध्ये तुह्याला
बाप जो गुप्त मध्ये पायते,तुले प्रतीफळ देईन.
19 आपल्या साठी पृर्थ्वीवर धन एकत्र नको
करू,जतीसाकं कीड़ा अन् काई बिगडवतात
अन् जती चोर सेन्द्र पाडतात अन् चोरतात.
20 परंतु आपल्या साठी स्वर्गात धन एकत्र
करा,तती कसर व जंग खावून नाश करत
नाईत अन् नाहि चोरं सेद्र पाडतात,अन् नाहि
चोरू शकतात. 21 कावून कि जती तुह्यालं
धन हाय,ततीसाकं तुह्यालं मन लागीन.
22 शरीराचा दिवा तर डोया हाय, म्हणून
जर तुह्याला डोया शुद्ध हाय,तर तुह्यालं सर्व
शरीर पण उजिडमय होईन. 23 पण जर
तुह्याला डोया जर बेकार पायते,तर तुह्यालं
सर्व शरीर पण अंधकार मय होईन,ह्यास्तव
तुह्यातील उजिड जो तुह्यात हाय,जर ते
अंधकार हाय तर तो केवढा मोठा अंधार हाय.
24 कोणी माणूस दोन मालकांची सेवा करूं
शकत नाई,कावून कि तो एका संग वैर अन्
दुसऱ्या संग प्रेम करीन, अन् एका संग मीळून
राईन अन् दुसऱ्याला तुच्छ समजीन,तुमी देव
अन् धनाची दोनाची सेवा करूं शकत नाई.
25 म्हणून मी तुमाले सांगतो,आपल्या जीवा
साठी हे चिंता करूं नका कि आपण काय
खावावं अन् काय पीवावं,अन् नाहि आपल्या
शरीरासाठी कि काय घालावं, काय जेवणाहून
अधिक अन् शरीर कपड्याहून बढकर नाई.
26 अभायातल्या पाखरायले पाहा, नाहि ते
पेरतात अन् नाहि कापतात अन् कोठाऱ्यात
एकत्र करत नाईत,तरी पण तुमचा स्वर्गीय
बाप त्यांना खाऊ घालतो,काय तुमचं त्याहून
अधिक मूल्य नाई काय? 27 तुमच्याईत कोण
हाय,जो चिंता करून आपल्या वयात एक
घडी वाढू शकते. 28 अन् कपड्या साठी कावून
चिंता करता?जंगलातल्या सोसनावर ध्यान
करा कि ते कसे वाढतात,ते नाहि मेहनत
अन् परिश्रम करतात अन् नाहि कातरतात.
29 तरी पण मी सांगतो,सुलेमान पण आपल्या
सर्व्या वैभवातून त्यांयच्या तून कोणाच्या हि
सारखे कपडे घातलेला नोता. 30 म्हणू जर देव
मैदानाच्या गवतालें जे आज हाय अन् उध्या
आगीत टाकल्या जाईन,असे कपडे घालतो
तर हे अल्पविश्वासी हो,मंग तो तुमाले का
नाई घालीन. 31 म्हणून तुमी चिंता करून
हे नका म्हणू,कि आपण काय खावावं,अन्
काय पीवावं या काय घालावं. 32 कावून
कि अन्यजाती हि या खोजात रायतात,पण
तुमचा स्वर्गीय बाप ओळखते कि तुमाले या
वस्तू ची गरज हाय. 33 म्हणून तुमी पयले
देवाच्या राज्याची अन् धर्माची खोज करा
तवा हे वस्तू तुमाले भेटून जातीन. 34 आता
उद्याची चिंता नका करूं, कावून कि उद्याचा
दिवस स्वत:आपली चिंता स्वत:करणार
आजच्या दिवसा साठी आजचं दु:ख लय हाय.

7
1 दोष नका लावू म्हणजें, तुमच्यावर
पण दोष लावला जाईन. 2 कावून कि
ज्या प्रकारे तुमी दोष लावता,त्याचं प्रकारे
तुमच्यावर पण दोष लावला जाईन,अन् ज्या
मापाने तुमी मापसान त्याचं मापाने तुमच्या
साठी मापलं जाईन. 3 तू कावून आपल्या
भावाच्या डोयातलं कचर पायतो,आपल्या
डोयातलं कुसय तुले दिसत नाई काय? 4 जवा
तुह्याल्या डोयात कचर हाय,तवा तू आपल्या
भावाले कसा म्हणू शकतो,आण मी तुह्याल्या
डोया तला तिनखा काढतो. 5 हे कपटी
पयले आपल्या डोयातला लट्ठा काढ,तवा
तू आपल्या भावाच्या डोयातला तिनखा

मोठ्या हक्कान पाऊन काढसीन. 6 पवित्र वस्तुं
कुत्राय्लें देऊ नका,अन् आपले अनमोल मोती
डुकरांच्या समोर टाकू नका,असं नाई व्हावं
कि त्यांयलें पायाखाली तुडवून,अन् मागें
फिरून तुमाले फाडून टाकतीन. 7 मागालं
म्हणजें तुमाले मिळेल,अन् शोधालं तर
तुमाले साफडीन,ठोकसानं म्हणजें तुमच्या
साठी उघडलं जाईन. 8 कावून कि जो
कोणी मांगते त्यालें मिळेल,अन् जो कोणी
शोधते त्यालें सांपडते,अन् जो कोणी ठोकतो
त्याच्यासाठी उघडलें जाईन. 9 तुमच्याईत
असा कोणता माणूस हाय,जर त्याच्यावाला
पोरगा,त्यालें भाकर मांगीण तर तो त्यालें
गोटादगड देईन. 10 या मासोई मांगणार
तर सर्फ देईन. 11 जर तुमी बेकार असून
हि तुमी तुमच्या लेकरांना चांगली वस्तुं
देन जाणता तवा तुमच्या स्वर्गीय बाप
आपल्या मांगणाऱ्याला चांगली वस्तुं का
नाई देईन. 12 म्हणून जे काई तुमाले वाटते
कि माणसांनी तुमच्या साठी करावे,तुमी
पण त्यांयच्या साठी तसचं करा,कावून कि
नियमशास्त्र अन् भविष्यवक्त्यांची शिकवणूक
हेचं हाय. 13 कटीण दरवाज्यांने प्रवेश
करा,कावून कि नाशाकडे जाणारा दरवाज्या
मोठा हाय,त्याच्या मार्ग विनाशाच्या इकडे
पहुचतें,अन् बरेचं सारे हायत,जे त्यातून
प्रवेश करतात. 14 कावून कि तो दरवाज्या
कटीण हाय,अन् मार्ग जो जीवनाले पोहचते,ते
थोडंसेंक जे त्यालें प्राप्त करतात. 15 खोट्या
भविष्यवक्त्यांपासून सावधान राहा,जे
मेंढराच्या वेशात तुमच्या पासी येतात, पण
ते आखरी कुर लांडगे असतात. 16 त्यांयच्या
फळांतून तुमी त्यांयलें ओळखसान,काय?
झुड्पासून अंगूर या रिंगणीच्या झाडापासून
अंजीर तोडतात काय. 17 अशाच प्रकारे हर
एक खरं झाडं,खरं फळ आणतें,अन् निक्कम
झाडं बेकार फळ आणते. 18 चांगलं झाडं
बेकार फळ नाई देत,अन् निक्कम झाडं चांगलं
फळ नाई देत. 19 जें जें झाडं चांगलं फळ
नाई देत,ते कापलं जाईन अन् आगीत फेकलं
जाईन. 20 अशा प्रकारे तुमी त्याच्यावाल्या
फळांवरून त्यांयलें ओळखसानं. 21 जो मले हे
प्रभू हे प्रभू म्हणतों,त्याच्यातून प्रत्येक झण
स्वर्गाच्या राज्यांत प्रवेश नाई करणार,पण
तोचं जो स्वर्गीय बापाच्या इच्छा वर चालतो.
22 त्याचं दिवसी बरेचं सें लोकं मलें म्हणतीन,
"हे प्रभू हे प्रभू"काय आमी तुह्याल्या नावाने
भविष्यवाणी केली नाई, अन् तुह्याल्या
नावाने दृष्टआत्म्यांना काढले नाई काय?अन्
तुह्यावाल्या नावाने कितीतरी आश्चर्य कर्म
केले नाईत काय? 23 तवा मी त्यांयलें उघड
म्हणीन,मी तुमाले ओळखत नाई,अन् हे
कुकर्मकरणाऱ्यानो माह्याल्या पासून निघून
जा. 24 म्हणून जो कोणी माह्याली गोष्ट
आयकुन मानते,तो त्या बुद्धीमान माणसा
सारखा हाय,ज्यानं आपलं घर पहाडावर
बांधलं हाय. 25 अन् पाऊस पडला,अन् पुरं
आला वारेही सुटले अन् त्या घराले लागले
तरी,ते पडले नाई कावून कि त्याच्या पाया
गोट्यावर होता. 26 पण जो कोणी माह्याली
गोष्ट आयकते पण त्यांवर नाई चालत,तो
त्या निर्बुधी माणसा सारखा हाय, ज्यानं
आपलं घर रेतीवर बांधलं हाय. 27 अन्
पाऊस पडला,अन् पुरं आले वारेही सुटले,अन्
त्या घराला लागलें अन् ते पडून अगदी
सत्यानाश झालें. 28 जवा येशू ह्या गोष्टी
सांगतल्यावर,तवा असं झालं लोकांची भीड़
त्याच्या उपदेशाने चकित झाली. 29 कावून
कि तो त्यांयलें शास्त्रांच्या समान नाई,पण
अधिकाऱ्याच्या समान उपदेश देत होता.

8 1 जवा तो पहाडावरून उतरला,तवा एक
मोठी गर्दी त्याच्यावाल्या मांग चालली.

2अन् पाहा,एक कुष्ठरोगी त्याच्या जवळ
येऊन त्याला प्रणाम केला,अन् म्हणला,हे प्रभू
तुह्याली इच्छा असीन तर तू मले शुध्द करू
शकतो. 3तवा येशूने आपले हात पुढे करून
त्याला स्पर्श केला, अन् म्हणलं,मले वाटते
कि तू शुद्ध हून जाय,अन् तो लगेचं त्याच्या
कुष्ठरोगाने शुद्ध झाला. 4तवा येशूने त्यालें
म्हणलं,पाह्य,कोणाले नको सांगू,पण जाऊन
आपल्या सोताले याजका पासी दाखवं,अन्
जे दान मोशेने द्यायला सांगतले होते ते
अर्पण कर. 5अन् जवा तो कफरणुहात मध्ये
आला होता, तवा सुभेदाराने त्याच्यावाल्या
पासी येऊन त्याला विनंती केली. 6हे प्रभू
माह्याला सेवक लकव्याच्या रोगाने घरी लय
बिमार हाय,अन् दु:खी हाय. 7तवा त्यानं
त्यालें म्हणलं,मी येऊन त्यालें बरं करणार.
8सुभेदारानं उत्तर देलं,हे प्रभू मी या योग्य
नाई,कि तू माह्याल्या कवला खाली यावं
पण तोंडाने मन तो माह्याला सेवक बरा
होऊन जाईन. 9कावून कि मी पण अपराधीन
माणूस हाय,अन् शिफाई माह्याल्या आधीन
हायत,जवा मी म्हणतो एकाला जाय तवा
तो जाते,अन् दुसऱ्याले म्हणतो ये तवा तो
येतें,अन् जवा म्हणतो आपल्या दासाला
हे कर तवा तो करते. 10हे आयकुन येशू
अचम्भा झाला,अन् त्याच्या मागे येऊ रायले
होते,त्यांयलें म्हणलं मी तुमाले खरंखोर
सांगतो मी इस्त्राएल मध्ये असा विश्वास
पायला नाई. 11अन् मी तुमाले सांगतो,कि
पूर्व अन् पश्चिम मध्ये लोकं येऊन अब्राहाम
अन् इसहाक अन् याकोब ह्या संग स्वर्गाच्या
राज्यांत बसणार. 12परंतु राज्यांत ले संतान
बायर,अंधकारात टाकले जातीन,ततीसाकं
रडनं अन् दातांना पिसणे होईन. 13तवा येशूने
सुभेदाराला म्हणलं,जो जसा विश्वास तुह्याला
हाय,तसचं तुह्याल्या साठी हो ,त्याच्यावाला
सेवक त्याचं वाक्ती बरा झाला. 14अन् येशू
जवा पेत्राच्या घरी आला,तवा त्याच्या
सासूला तापिने पडलेलं ग्रसीत पायलं. 15तवा
त्यानं तिच्या हाताला स्पर्श केला,अन् तिचा
ताप उतरला अन् ते उठून त्याच्यावाली सेवा
करू लागली. 16जवा संध्याकाळ झाली तवा
ते त्याच्या पासी बऱ्याशा लोकांना आणू
लागले ज्यायच्यात दृष्टआत्मा होत्या,त्यानं
त्या दृष्टआत्म्यायाला आपल्या वचना द्वारे
काढून टाकले अन् सगळ्या बिमार लोकांना
बरे केलें. 17ह्यासाठी कि जे वचन यशया
भविष्यवक्त्यांच्या व्दारे म्हणल्या गेलं होतंते
पुरं झालं,त्यानं स्वत:आमची दुर्बला मध्ये
घेऊन घेतलं,अन् आमच्या बिमारीले घेऊन
घेतलं. 18जवा येशूने आपल्या चवंभवंताल
एक मोठ्या गर्दी ले पायलं,तवा सरोवराच्या
तिकड्या बाजूला जाण्याची आज्ञा डेली.
19तवा एका शास्त्राने त्याच्यावाल्या
पासी येऊन म्हणलं,"हे गुरु" जती कुठे तू
जाशीन तती मी तुह्याल्या संग हून जाईन.
20येशूने त्यालें म्हणलं,लोमडीचे बिडे अन्
अभायातल्या पाखरांना कोटी हायत,परंतु
माणसाच्या पोराला आपले डोके ठेकायला
ठिकाण नाई. 21एका शिष्याने त्यालें
म्हणलं,"हे प्रभू मले पयले जाऊ दे अन् मी
आपल्या बापाला गाढून दपनयेतो 22येशूने
त्यालें म्हणलं तू माह्याल्या मांग हो,अन्
मुर्दांना आपले मुर्दे गाढू दे. 23जवा तो
डोंग्यावर चढला तवा त्याचें शिष्य त्याच्या
मांग झाले. 24अन् पाहा, सरोवरात एक
मोठं, वारवायद्र आलं अन् डोंगा लाटामध्यें
झाकू लागलें,अन् तवा तो झोपला होता.
25तवा शिष्यांनी त्याच्या पासी येऊन त्यालें
जागवलं,अन् म्हणलं,हे प्रभू आमाले वाचवं
आपुन नष्ट हून रायलो हाय. 26त्यानं त्यांयलें
म्हणलं,हे अल्पविश्वासी हो कावून भेतां?

तवा त्यानं उठून वारवायद्राले अन् पाण्याले
दटावलं अन् सगळ शांत केलं. 27 अन् ते
अचम्भा करून म्हणू लागलें,हा कसा माणूस
हाय,वारवायद्राले अन् पाण्याले आज्ञा करते
अन् ते मानतात. 28 जवा तो तिकड्या
बाजुले गरसेकरांच्या देशांत पोह्चला, तवा
दोन माणसं ज्यांयच्यात दृष्टआत्मा होती
कबरे मधून निघून त्यालें भेटलें,ते एवढे
होते,कि कोणी त्या रस्ताने जाऊ शकत नोते.
29 त्यांयनं कल्ला करून म्हणलं,"हे देवाच्या
पोरां"आमचं तुह्या संग काय काम?नेमलेल्या
वेळेपूर्वी तूं आमाले दु:ख देण्यासाठी अति
आला काय.? 30 तवा त्यांयच्या पासून काईचं
अंतरावर बऱ्याशा डुकरांचा कडप चरुं रायला
होता. 31 दृष्टआत्म्यांनी त्यांलें हे म्हणून
विनंती केली,जर तुले आमाले काढ्याचं
हाय,तवा आमाले डुकरांच्या कड्पात पाठवं.
32 त्यानं त्यांयलें म्हणलं,जा तवा ते निगाले
डूकारांच्या अंदर शिरले,अन् पाहा,सर्वा
डुकरांचा कळप कड्यावरून झपाट्याने
पाण्यात पडला अन् डुबून मेला. 33 अन् मंग
चारणारे पयाले,त्यांयनं नगरांत जाऊन सर्व
काई सांगितले अन् ज्यायच्यात दृष्टआत्म्या
होत्या त्यांयच्या बद्दल सगळे सांगीतले.
34 अन् पाहा,सर्व्या नगरातले लोकं येशूची
भेट घेयासाठी निगाले अन् त्यालें विनंती केली
कि आमच्या हद्दीतून जाय असे सांगितले.

# 9

1 मंग तो डोंग्यात चढून तिकडल्या
बाजूने गेला,अन् आपल्या नगरात आला.
2 अन् पाहा,कईक लोकायन एका लकव्याच्या
रोग्याले बाजीवर ठेवून त्याच्यावाल्या पासी
आणलं,येशुनें त्यांयच्या विश्वास पावून त्या
लकव्याच्या रोग्यालें म्हणलं,हे पोरा हिम्मत
धर तुह्याले पाप क्षमा झालें. 3 यावर कईक
शास्त्र्यान सोचलं कि हा देवाची निंदा करू
रायला हाय. 4 येशुनं त्यांयच्या मनांतल्या
गोष्ठी जाणून म्हणलं,तुमी लोकं आपल्या
आपल्या मनांत बेकार विचार कावून करता.
5 सहज काय हाय?हे सांगजो,कि तुह्याले
पाप क्षमा झाले,या हे म्हणन "उठ अन्
चल फिरं 6 परंतु या साठी तुमी जाणून
घ्या,माणसाच्या पोराले पृथ्वीवरचे पाप
क्षमा करण्याच्या अधिकार हाय,तवा त्यानं
त्या लकव्याच्या रोग्यालें म्हणलं,कि उठ
अन् आपली बाज उचल,अन् आपल्या घरी
चालला जाय. 7 तो उठून आपल्या घरी
चाल्ला गेला. 8 लोकं हे पावून "भेऊ" लागलें
अन् देवाची महिमा करू लागलें ज्यानें
माणसालें असा अधिकार देला हाय. 9 ततून
समोर जाऊन येशूने मत्तय नावाच्या एका
माणसाला महसूलच्या चौकी वर बसलेला
पायला,अन् त्यालें म्हणलं,माह्याल्या मांग
हून जाय,तो उठून त्याच्या मांग झाला.
10 जवा तो घरी जेव्याले बसला,तवा बरेस
से महसूल घेणारे अन् पापी येऊन येशू
अन् त्याच्यावाल्या शिष्यासंग जेव्याले
बसलें. 11 हे पावून परुशांनी त्याच्यावाल्या
शिष्यांना म्हणलं,तुमचा गुरु महसूल घेणारे
अन् पापी लोकांचा संग कावून जेवते.
12 हे आयकून येशुनें त्यायलें म्हणलं,वैद्य
भले बरे करण्यासाठी नाई पण बिमार
लोकांचा साठी जरुरी हायत. 13 म्हणून तुमी
जाऊन याचां अर्थ सिखा,बलिदान नाई
पण दया हवी कावून कि धर्मी लोकांना
नाई पण पापी लोकांना वाचव्यासाठी
आलो हाय. 14 तवा योहानाच्या शिष्यांनी
त्याच्यावाल्या पासी जाऊन म्हणलं,काय
कारण हाय,आमी अन् परुशी एवडा उपास
करतो,पण तुह्याले शिष्य उपवास करत
नाईत. 15 तवा येशूने त्यायलें म्हणलं,काय
वऱ्हाडासंग जतलग नवरदेव त्यायच्या संग
हाय,त्यांयच्याने शोक करवेल काय?पण ते

दिवस येतीन,कि नवरदेव त्यांयच्या पासून
अलग केला जाईन,त्या वाक्ती ते उपवास
करतीन. 16 कोऱ्या कपड्याचं थीगय जुन्या
कपड्याला कोणी नाई लावत,कावून कि
कावून कि धड करण्याकरिता लावलेले थीगय
त्या कपड्याला फाडते अन् शेद्र मोठे होतें.
17 अन् तसेंच नवीन द्राक्षारस कोणी जुन्या
बुधल्यात नाई भरत,भरले तर बुधले फुटून
द्राक्षारस सांडतो अन् बुधले बिघडतात तर
नवा द्राक्षारस नव्या बुधल्यात भरला तर ते
दोनी हि चांगले रायतात. 18 तवा तो ह्या
गोष्ठी सांगूनचं रायला होता,कि पाहा,एका
सुभेदाराने त्याच्या पासी येऊन प्रणाम केला
अन् म्हणलं,माह्याली पोरगी आताचं मेली
हाय,परंतु तरी आपण येऊन आपला हात
तिच्या डोक्यावर ठेवावा म्हणजें ते जिवंत
होईन. 19 तवा येशू उठला अन् त्याच्यावाल्या
मांग शिष्याच्या संग जाऊ लागला. 20 मंग
पाहा,बारा वर्षा पासून रक्तस्त्रावाने पिडलेली
बाई त्याच्यावाल्या मांग येऊन त्याच्यावाल्या
कपड्याच्या गोंड्याला स्पर्श केला. 21 कावून
कि ते आपल्या मनात म्हणत होती,जर मी
त्याच्यावाल्या कपड्याला पण स्पर्श केला,तर
मी बरी हून जाईन. 22 येशूनं मांग फिरून तिले
पायलं,अन् म्हणलं,पोरी हिम्मत धर,तुह्याल्या
विश्वासाने तुले बरे केले हाय,तवा ते बाई
त्याचं वाक्ती बरी झाली. 23 जवा येशू त्या
सुभेदाराच्या घरी पोहचला,अन् बासरी
वाजवणारे अन् लोकांना हुल्लड करतांनी
पायलं. 24 तवा म्हणलं,बाजुले व्हा,पोरगी
मेली नाई पण झोपली हाय,यावर ते त्याला
हासूं लागले. 25 पण जवां गर्दी बायर
काढली,तवा त्यानं आत जाऊन त्या पोरीचा
हात पकडला,अन् ते जिवंत झाली. 26 अन्
त्या गोष्ठी ची चर्चा त्या साऱ्या अवध्या देशात
पसरली. 27 जवां येशू ततून समोर गेला,तवा
दोन फुटके त्याच्यावाल्या मांग 'हे म्हणत
होते,कि हे दाविदाच्या पोरां,आमच्यावर
दया कर. 28 जवा तो घरी पोहचला,तवा
ते फुटके त्याच्यावाल्या पासी आले,तवा
येशूने त्यायलें म्हणलं,काय तुमाले विश्वास
हाय,कि मी हे करू शकतो?त्यांयनं म्हणलं
"हो प्रभू". 29 तवा त्यानं त्यायच्या डोयाला
स्पर्श करून म्हणलं,तुमच्या विश्वासाच्या
अनुसार तुमच्या साठी हो. 30 अन् त्यांयचें
डोये उघडले,अन् येशूने त्यांयलें चेतावून
सांगतल,सावधान,कोणाले पण हे गोष्ट
मालूम नसावं. 31 पण त्यांयनं जाऊन साऱ्या
देशात कीर्ती गाजविली. 32 जवा ते बायर
जाऊ रायले होते,तवा पाहा,एका मुक्याले
ज्याच्यात दृष्टआत्मा होती त्यालें त्याच्या
पासी आणलं. 33 अन् जवां दृष्टआत्मा काढल्या
गेली,तवा मुका बोलू लागला,अन् लोकांनी
आश्‍चर्य करून म्हणलं,इस्राएलात असं कधी
पायण्यात आलं नाई. 34 परंतु परुशांनी
म्हणलं, हा तर दृष्टआत्म्याच्या साह्याने
दृष्टआत्म्याले काढतो. 35 अन् येशू सगळ्या
नगरात अन् गावांत फिरत रायला,अन्
त्यांयच्या सभेत उपदेश करत अन् राज्यांचा
सुसमाचार प्रचार करत,अन् हर प्रकारच्या
बिमारी अन् दुखणे बरे करत गेला. 36 जवां
त्यानं मोठ्या गर्दी ले पायलं,तवा त्यालें
लोकायवर दयातरस आली कावून कि ते
त्या मेंढराच्या समान होते,ज्यांयच्या कोणी
मेंढपाळ नाई, अन् व्याकुळ अन् भटकलेल्या
सारखे होते. 37 तवा त्यानं आपल्या शिष्याय्लें
म्हणलं,"पिक लय आले" पण मजूर थोडंसेंक
हायत. 38 म्हणून वावरावाल्या मालकाले
विनंती करा,कि तो आपल्या वावरातले पिकं
कापण्यासाठी मजुरांना पाठवावे.

10 1 मंग त्यानं आपल्या बारा शिष्यांना
आपल्या पासी बलावलं,अन् त्यांयलें

अशुद्ध आत्म्यावर सत्ता देली ,कि त्यांयले
काढण्यासाठी अन् सर्व्या प्रकारच्या बिमारीले
अन् दुखणे बरे करण्याच्या अधिकार देला.
2 अन् या बारा शिष्याचे नाव हे हायत,पयला
जो शिमोन,जो पेत्र म्हणल्या जाते,अन्
त्याच्यावाला भाऊ अन्द्रीयास,अन् जबदीचा
पोरगा याकुब अन् त्याच्यावाला भाऊ
योहान. 3 फिल्लीपूस,अन् बरत्तूम्मे,थोमा अन्
करवसुली करणारा मत्तय हलफाईच्या पोरगा
याकुब अन् तद्दय. 4 शिमोन कनानी,यहूदा
इस्करियोंती ज्यांन येशुले पकडून देलें. 5 या
बारांना येशूने हे आज्ञा देऊन पाठवलं,कि
अन्यजातीयाच्या मार्गाने नोका जाऊ,अन्
शोमरोन्यांच्या कोणत्याही नगरात प्रवेश करू
नका. 6 परंतु इस्त्राएलाच्या घराण्यांतल्या
हारोपलेल्या मेंढरांच्या पासी जाजाकं. 7 अन्
चालता चालता हा प्रचार करा,कि स्वर्गाचं
राज्य जवळ आलेले हाय. 8 बिमारांना बरे
करा,मेलेल्यांना जिवंत करा,अन् कुष्ठरोग्यांना
शुद्ध करा,दृष्टआत्म्यांना काढा,तुमाले फुकट
देलें हाय,तुमी फुकट द्या. 9 आपल्या बटव्यात
नाहि सोनं अन् नाहि रुपये अन् नाहि तांबे
घेऊ नका. 10 मार्गा साठी झोयणा,अन् नाहि
दोन मनिले अन् नाहि वायना अन् नाहि
काठी घेऊ नका कावून कि मजूराले त्याची
मजुरी मिळ्याले पायजे. 11 ज्या कोण्या
गावांत या नगरात जासानं,तवा हा पत्ता
काढाकि ततीसाकं कोण योग्य हाय?अन्
जतलग ततून नाई निंगसान,ततीचं त्याच्या
अति रायजाकं. 12 अन् घरात गेल्यावर
त्यायच्या वर आशीर्वाद देजाकं. 13 जर
त्या घरचे लोकं योग्य असतीन,तर तुमचं
कल्याण त्यांयच्यावर जाईन,पण जर ते योग्य
नाईत तर तुमचं कल्याण तुमच्या पासी
वापस येईन. 14 जो कोणी तुमाले ग्रहण
नाई करत,अन् तुमची गोष्ट नाई आयकतं
त्या घरून त्या नगरातून निघण्याच्या वाक्ती
आपल्या पायाचा धूळ झटकून टाका. 15 मी
तुमाले खरंखोर सांगतो,कि न्यायाच्या
दिवसी त्या नगराची दशा सदोम अन्
अमोरा देशाच्या दशापेक्षाहि सोपे जाईन.
16 पाहा,मी तुमाले मेंढरा सारखे लांडग्यामध्ये
पाठवतो,म्हणून तुमी सर्पाच्या सारखे चतुर
अन् कबुतरा सारखे भोले बना. 17 पण
लोकांच्या पासून सावधान राहा,कावून कि
ते तुमाले महासभेमध्ये स्वाधीन करतीन
अन् आपल्या पंचायत मध्ये तुमाले झोडपे
देतीन. 18 तुमी माह्याल्या साठी देशाचे
अधिकारी अन् राज्यांच्या समोर नेण्यात
याल,अन् तुमी अन्याजातीयांच्या साठी साक्ष
होण्यासाठी पोहुचल्या जासानं. 19 जवां ते
तुमाले पकडतीन,तवा चिंता नोका करू
कि आमी काय बोलावं,कावून कि जे काई
तुमाले बोल्याचं हाय,ते त्याचं घडी तुमाले
सांगतल्या जाईन. 20 कावून कि बोलणारे
तुमी नाई हा तुमच्या बापाचा आत्मा
तुमच्यात बोलते. 21 भाऊ भावाले अन् बाप
पोराले जीवे मारण्यासाठी धरून देतीन,लेकरं
माय बापाच्या विरोधात उठून त्यांयलें
मारून टाकतीन. 22 माह्याल्या नावाने सगडे
लोकं,तुमच्या वैर करतीन,पण जो आखरी
पर्यंत धीरज धरून राईन,त्याच्याच तारण
होईन. 23 जवां ते तुमाले एका नगरांत
सतावतीन,तवा दुसऱ्या नगरात पडून
जाजाकं,मी तुमाले खरंखोर सांगतो,तुमी
इस्त्राएलाच्या नगरातले फिरून होणार नाई
तोवर माणसाचा पोरगा येऊन जाईन.
24 शिष्य आपल्या गुरु हून मोठा नाई,नाहि
दास आपल्या मालका पेक्षा. 25 शिष्याचं
गुरु सोबत अन् दासाचं मालका सारखं
व्हावे बराबर होणं हे खूप हाय,जवा त्यांयनं
घराच्या मालकाला सैतान म्हणलं,तर त्याच्या

घर वाल्यांना का नाई म्हणणार?. 26 म्हणून
त्यांना भेऊ नका,उघडे होणार नाई असे काहि
झाकलेले नाई,अन् कळणार नाई असे काहि
गुप्त नाई. 27 जे मी तुमाले अंधारात सांगतो,ते
उजीडात बोला,अन् जे कानांत सांगितले तुमी
आयकता,ते धाब्यांवरून घोषित करा. 28 जे
शरीरालें घात करतात,त्यांयलें नका भेऊ
पण त्यांयलें भ्यां जे आत्म्याले अन् शरीराले
दोघांना नरकात नष्ट करू शकते. 29 पयशा
मध्ये दोन चिमण्या इकल्या जात नाईत
काय? तरी पण तुमच्या बापाच्या इच्छेच्या
शिवाय त्यांयच्या मधून एकही भूमीवर
पडणार नाई. 30 तुमच्या डोक्यावरचे सरे
केसं पण मोजलेले हायत. 31 म्हणून भेऊ
नका, चिमण्याहून तुमचे मोल हाय. 32 जो
कोणी मले माणसा समोर मानीन,त्याला
मी पण स्वर्गीय बापाच्या समोर मानीन.
33 पण जो कोणी माणसा समोर,माह्याला
इन्कार करीन त्याले मी पण आपल्या स्वर्गीय
बापाच्या समोर इन्कार करीन. 34 हे नका
समजू कि मी पृथ्वीवर मिलाप करण्यासाठी
आलो,मी मिलाप करण्यासाठी नाई,पण
तलवार चालवण्यास आलो.हाय. 35 मी तर
आलो, मनुष्याला त्याच्या बापा पासून अन्
पोरीला माय पासून अन् सुनेला तिच्या सासू
पासून अलग करण्यासाठी आलो. 36 अन्
माणसाच्या घरचेच लोकं त्याचे वैरी होतीन.
37 जो माय-बापाले माह्याहून अधिक प्रिय
समजते, तो माह्याल्या योग्य नाई, अन् जो
पोरगा या पोरगी माह्याहून अधिक प्रिय
समजते,तो माह्याल्या योग्य नाई. 38 अन्
जो आपला वधस्तभं घेऊन माह्याल्या मांग
नाई चालत,तो माह्याल्या योग्य नाई. 39 जो
आपल्या जिवाले वाचवायला पायतो,तो
त्याला गमाविन,अन् माह्याल्या बद्दल
आपल्या जिवाले गमाविन,तो त्याला राखीन.
40 जो तुमाले ग्रहण करतो,तो मले ग्रहण
करतो,अन् जो तुमाले ग्रहण करत नाई,
तो माह्याल्या पाठवण्याऱ्यालें ग्रहण करत
नाई. 41 जो भविष्यवक्त्यांना भविष्यवक्ता
म्हणून ग्रहण करणार,त्यालें भविष्यवक्त्यांच
प्रतीफळ मिळेल,अन् जो धर्मीले धर्मी समजून
ग्रहण करणार त्याला त्याचं प्रतीफळ मिळेल.
42 जो कोणी या लहानातल्या एकाले
माह्याला शिष्य समजून फक्त एक प्याला
थंड पाणी पाजीन, मी तुमाले सांगतो तो
कोणत्याहि प्रकारे आपलं प्रतीफळ मुकणार
नाई.

# 11

1 जवा येशूनं आपल्या बारा
शिष्यांना आज्ञा देल्यावर,तो तवा
नगरात उपदेश अन् प्रचार करण्यासाठी ततून
चाल्ला गेला. 2 योहानाने जेलात ख्रिस्ताच्या
कामाच्या समाचार आयकून,आपल्या
शिष्यांना,त्याला हे विचाऱ्यासाठी पाठवलं.
3 कि येणारा तुचं हायसं,कि आमी दुसऱ्याची
वाट पाहावी. 4 येशूने उत्तर देलं,कि जे
काई तुमी आयकता,अन् पायता,हे सगळे
योहानाला जाऊन सांगा. 5 कि आंधळे
पायतात अन् लंगडे चालतात फिरतात
अन् कुष्ठरोगी शुद्ध केले जातात,अन् बयरे
आयकतात,अन् मेलेलें जिते होतात,अन्
गोरगरिबांना सुवार्थेची घोषणा केली जाते.
6 अन् धन्य हायत ते,जे माह्याल्याच्यानें
ठोकर नाई खातात. 7 जवां ते ततून चालले
गेलें,तवा येशू योहानाच्या विषयात लोकाईले
म्हणू रायले,कि तुमी जंगलात काय पाह्याले
गेलतें?काय हवेने हाललेल्या बोरुं ला.
8 मंग तुमी काय पाह्यले गेलतें?काय जे
कोमल कपडे घाललेल्या माणसाल जे
राजभवनात रायतात. 9 तर मंग कावून
गेलतें? काय कोण्या भविष्यवक्त्याला
पाह्याले गेलतें? हो मी तुमाले सांगतो,कि

भविष्यवक्त्याहूनहि मोठ्याले. 10तो हाचं
हाय,ज्याच्या विषयात लीवलेलं हाय
कि,"पाह्य मी आपल्या दूतांना तुह्याल्या पयले
पाठवतो,जो तुह्याल्या पुढे तुह्या रस्ता तयार
करणार. 11मी तुमाले खरंखोर सांगतो कि,
जो बाईपासून जन्मला हाय,त्यांयच्च्यातून
योहान बाप्तिस्मा देणाऱ्याहून कोणी मोठा
नाई.पण जो स्वर्गाच्या राज्यात लायण्यातून
लायना असीन तो त्याच्या हून मोठा हाय.
12योहान बाप्तिस्मा देणाऱ्याच्या दिवसाईत
स्वर्गाच्या राज्याच्या साठी शक्तीन प्रवेश
होत जाये अन् बलवान त्यालें हिसकावून घेत
जायत. 13योहाना परंत सारे भविष्यवक्ता
भविष्यवाणी करत रायलें. 14अन् इच्छा
ठेवा कि मांगा,कि एलिया जो येणारा
हाय,तो हांच हाय. 15ज्यालें आयक्याले कान
हायत,त्यानं आयकावं. 16मी या पिढीच्या
लोकांची उपमा कसाने दु?ते त्या लेकरां
सारखे हायत,जे बजारात बसून एका मेकांना
आवाज देतात. 17कि आमी तुमच्या साठी
बासरी वाजवली,अन् तुमी नाई नाचलें,आमी
पश्चाताप केला,पण तुमी शाती नाई ठोकली.
18कावून कि योहान न खात आला अन्
नाहि पेला,अन् ते म्हणतात कि त्यांयच्या
दृष्टआत्मा हाय. 19माणसाच्या पोरगा खात
पेत आला,अन् ते म्हणतात कि पाहा,खादोडे
अन् पेणारे माणूस अन् महसूल घेणारे अन्
पापियाच्या दोस्त,ज्ञान आपल्या कामाले
खरं ठरवते. 20तवा तो त्या गावातल्यांना
समजावून सांगू रायला होता,कि ज्यायच्यात
त्यानं लय चमत्काराचे काम केलें होतें,कावून
कि त्यांयनं आपलं मन नाई फिरवलं होतं.
21हाय,खुराजीन हाय,बेतसदा जे सामर्थ्याचे
काम तुह्यात केले गेलें,ते जर सूर अन् सयदा
मध्ये केलें असते तर त्यांनी मागीच तरट
व राखोंडी आंगावर टाकून पश्चाताप केला
असता. 22पण मी तुमाले सांगतो,न्यायाच्या
दिवसी तुमच्या दशे हून सूर अन् सयदा
दशा हून अधीन सहण्याच्या योग्य हाय.
23हे कफरनुहम, काय? स्वर्गा पर्यंत व्रते
केला जाशीन?तू तर अधोलोकापर्यंत खाली
केला जाशीन,जे सामर्थ्याचे काम त्या केलें
हायत,जर सदोमात केलें असते तर तो
आज पर्यंत बनून रायला असता. 24पण
मी तुमाले म्हणतो,कि न्यायेच्या दिवसी
तुह्या दशेपेक्षा सदोमाच्या देशाची दशा
अधिक सहणारी होणार. 25त्याचं वाक्ती
येशूने म्हणलें,हे बापा स्वर्ग अन् पृथ्वी च्या
प्रभू मी तुह्याला धन्यवाद करतो,कि तू ह्या
गोष्टी ज्ञानी अन् समजदापासून लपवून
ठेवल्या,अन् लेकरांवर प्रशिद्ध केल्या हायत.
26हो माह्याल्या बापा,तुले हेचं चांगल वाटलं.
27माह्याल्या बापाने मले सगळ काई सोपून
देलं,अन् कोणी पोराले वयखत नाई ,फक्त
बाप,अन् कोणी बापाले वयखत नाई,फक्त
पोरगा,अन् तो ज्याच्यावर पोरगा त्याच्यावर
करण्याची इच्छा असीन. 28हे सगडे
कष्टपरीश्रमकरणाऱ्यानों,अन् बोज्याने दबलेले
लोकोहो,माह्याल्या पासी या,मी तुमाले
विश्राम देईन. 29माह्यालं जूं आपल्यावर
उचला,अन् माह्यापासून सिखा,कावून कि मी
नम्रशांतअन् मनांन गरीब हावो,अन् तुमी
आपल्या मनात विश्राम पायसान. 30कावून
कि माह्यालं जूं सोयीचे व माह्यालं वजं हलकं
हाय.

12 1त्या वाक्ती येशू शब्बाथाच्या
दिवसी वावरातून चालला
होता,अन् त्याचें शिष्यांना भूख लागली,तवा
ते कणसं तोडून खाऊ रायले होतें. 2परुशांनी
हे पावून त्यालें म्हणलं,कि पाह्य,तुह्याले शिष्य
हे काम करून रायले जे शब्बाथाच्या दिवसी
केलं नाई पायजे. 3त्यानं त्यांयलें म्हणलं,

तुमी वाचलं नाई काय?कि दाविदाने जवा
तो अन् त्याच्यावाले साथी उपासी होते
तवा काय केलं.? 4 तो कसा देवाच्या घरला
गेला,अन् चढवलेल्या भाकरी खाल्या,त्याईलें
खाल्या न त त्यालें अन् न त्याच्या शिष्यांना
फक्त याजकाय्लें चांगलं होतं? 5 या तुमी
नियमशास्त्र नाई वाचलं काय?कि याजकाला
शब्बाथाच्या दिवसी मंदिरात शब्बाथाच्या
दिवसाची विधी तोडली तरी निर्दोष
ठहरतात. 6 पण मी तुमाले म्हणतों,कि
जर ते मंदिराहून मोठं हाय. 7 जर तुमाले
याच्या अर्थ मालूम असता हाय , कि तर
मी दया ने प्रसन्न हावो,बलिदानाने नाई
तवा तुमी निर्दोषाला दोषी नाई ठहरवते.
8 माणसाच्या पोरगा शब्बाथाच्या दिवसाच्या
पण प्रभू हाय. 9 ततून जावून तो त्यांयच्या
सभास्थानात आला. 10 तती एक माणूस
होता,ज्याच्या हात सोखलेल्या होता,त्यायनं
येशूवर दोष लावण्यासाठी विचारलं,काय?
शब्बाथाच्या दिवसी चांगलं कर्ण उचित हाय
काय? 11 त्यानं त्यांयलें म्हणलं,तुमच्यातून
असा कोण हाय,ज्याचं एक मेंढरू,अन् तो
शब्बाथाच्या दिवसी गड्यात पडलं,तर तो
त्यालें धरून काढणार नाई. 12 चांगल्या
माणसाची किंमत त्या मेंढरा किती मोठी
हाय,म्हणून शब्बाथाच्या दिवसी चांगल
करण योग्य हाय,तवा त्यानं त्या माणसाला
म्हणलं आपला हात समोर कर. 13 त्यानं पुढे
केला,अन् त्याच्या हात दुसऱ्या हातासारखाचं
चांगला झाला. 14 तवा परुशांनी बायर
जावून त्याच्यावाल्या विरोधात शळयंत्र
प्यानंकेला,कि त्यालें कशा प्रकारे नाश करावं.
15 हे जाणून येशू ततून चालला गेला,अन् लय
लोकं त्याच्या मागें झाले,त्यानं सगळयाईले
चांगलं केलं 16 अन् त्यांयलें दटावलंचीतायाकि
मले प्रगट करूं नका. 17 कावून कि जे वचन
यशया भविष्यवक्त्याच्या पासून म्हटल्या गेलं
होतं ते पूर्ण व्हावं 18 अन् पाहा,हा माह्याल्या
सेवक हाय,ज्यालें म्या निवडलं, माह्या
प्रिय,ज्याच्यावर माह्यालं मन प्रसन्न हाय,मी
माह्याला आत्मा त्याच्यावर ठेवीन,अन्
अन्यजातीयांना न्यायाचा संदेश देईन. 19 तो
भांडण करणार नाई अन् नाहि ओरडणार
नाई,अन् बाजारात त्याच्या शब्द कोणाला
आयकू येणार नाई. 20 अन् तो तुडवलेल्या
सरकंट्याले नाई तोडीन,मिणमिणती वात
तो विझवणार नाई.तो न्यायाचा विजय
देईन तोपर्यंत असे होईन. 21 अन् अन्यजाती
त्याच्या नावावर आशा ठेवीन. 22 तवा लोकं
एका फुटक्याले मुक्याले ज्यांच्यात दृष्टआत्मा
होती,त्याच्यावाल्या पासी आणले,अन् त्यानं
त्यांलें चांगल केलं,अन् तो मुका बोलू अन्
पाहू लागला. 23 यावर सगडे लोकं चकित
हून म्हणूं लागले,हा काय दाविदाची पोरगा
हाय कि काय. 24 पण परुशांनी हे आयकून
म्हणलं,हा तर दृष्टआत्म्याच्या सरदार
सैतानाच्या साह्याने हा दृष्टआत्म्यांना काढतो.
25 त्यानं त्यांयच्या मनातली गोष्ट ओळखून
त्यांयलें म्हणलं,ज्या कोण्या राज्यात फुट पडते
ते ओसाड होते,अन् कोणत गावं या घर
ज्याच्यात फुट पडते,ते टिकून नाई रायणार.
26 जर सैतानाने सैतानाला काढलं,तर तो
स्वता:चा विरोधी होते,मंग त्याचं कावून
टिकून राईन. 27 अन् मी जर सैतानाच्या
साह्याने दृष्टआत्म्यांना काढतो,तर तुमचे वंश
कोणाच्या साह्याने काढतात?म्हणून तेचं
तुमचे न्यायाधीश होतीन. 28 पण जर मी
देवाच्या आत्म्याच्या साह्याने दृष्टआत्म्यांना
काढतो,तर देवाचं राज्य तुमच्या पासी आल
हाय. 29 या कसा कोणी माणूस,कोण्या एका
बलवान माणसाच्या घरी घुसून त्याच्या
पयसा लुटू शकते,जवां तो त्या बलवानाला

बांधणार? तवा तो त्याचं घर लुटून नेईन.
30 जो माह्याल्या संग नाई, तो माह्याल्या
विरोधात हाय,अन् जो माह्याल्या संग गोळा
करत नाई तो विखरवतो. 31 म्हणून मी
तुमाले सांगतो, माणसाचे सर्व्या प्रकारचे
पाप अन् निंदा क्षमा केली जाईन,पण
आत्म्याची निंदा क्षमा केली जाणार नाई.
32 जो कोणी माणसाच्या पोराच्या विरोधात
गोष्ट करीन,त्याच्या तो अपराध क्षमा केला
जाईन,परंतु जो कोणी पवित्र आत्म्याच्या
विरोधात काई म्हणीन,त्याच्या अपराध नाहि
या लोकात अन् नाहि परलोकात क्षमा केला
जाईन. 33 जर झाडाले चांगल म्हणता,तर
त्याच्या फळाले पण चांगल म्हणा,जर झाडाले
बेकार म्हणता,तर त्याच्या फळाले पण बेकार
म्हणा,कावून कि झाडं आपल्या फळावरून
ओळखु येते. 34 हे सर्पाचे पिलहो,तुमी बेकार
असून कसा चांगल्या गोष्ठी करता?कावून कि
जे मनात हाय तेचं तोंडात येते. 35 चांगला
माणूस मनाच्या भंडारातून चांगल्या गोष्ठी
काढतो,अन् बेकार माणूस बेकार भंडारातून
बेकार गोष्ठी काढते. 36 अन् मी तुमाले
सांगतो,कि जे जे बेकार गोष्ठी माणसं
करतीन,न्यायाच्या दिवसी हर एक गोष्ठीचा
लेका जोखा देतीन. 37 कावून कि तू आपल्या
गोष्ठी मुळे निर्दोष अन् आपल्या गोष्टीच्यान
दोषी ठरणार. 38 यावर कईक शास्त्री अन्
परुशांनी त्याला म्हणलं,हे गुरु,आमाले
तुह्यापासून एक चिन्ह पाह्याची इच्छा हाय.
39 त्यानं त्यांयलें उत्तर देलं,या काळाचे बेकार
अन् व्यभिचारी लोकं चिन्ह पायतात,परंतु
योना भविष्यवक्त्यांच्या चिन्हांवाचून दुसरे
चिन्ह दिले जाणार नाई. 40 अन् जसा योना
तीन दिवस तीन राता,मोठ्या मासोईच्या
पोटात होता,तसाचं माणसाचा पोरगा तीन
दिवस व तीन राता पृथ्वीच्या पोटात राईन.
41 नीनवेचे लोकं न्यायाच्या दिवसी या
युगाच्या लोकाय संग उठून त्यांयलें दोषी
ठरवतीन,कावून कि त्यांयनं योनाच्या प्रचार
आयकून,मन फिरवलं,अन् पाहा,अति जो हाय
तो योनाहून मोठा हाय. 42 दक्षिणची राणी
न्यायाच्या दिवसी या युगाच्या लोकायसंग
उठून त्यांयलें दोषी ठरवीन,कावून कि ते
सुलेमानचं ज्ञान आयक्यासाठी पृथ्वीच्या
आखरी पासून आली,अन् पाहा,अती जो
हाय तो सुलेमान हून मोठा हाय. 43 जवा
अशुद्ध आत्मा माणसातून निघून जाते,तवा
ते सुख्या जागेत आराम पायाले फिरते पण
भेटत नाई. 44 तवा म्हणतें कि मी आपल्याचं
त्याचं घरी जतून निघाली होती,चालली
जाईन,अन् वापस येतांना,म्हणलं,कि झाडलं
पेरलं अन् सजवलेले पायते. 45 तवा ते जावून
आपल्याउन बेकार सात आत्म्यांना आपल्या
संग घेऊन जाते,अन् मी त्याच्यात बसून
तती रायते ते त्या माणसाची दशा मांगच्या
दशेपेक्षा हि बेकार होते या युगाच्या बेकार
लोकायची दशा पण अशीच होईन. 46 जवा
तो लोकाईच्या संग गोष्ठी करूनच रायला
होता,तवा त्याची माय अन् भाऊ बायर उभे
होते,अन् त्याच्या संग गोष्ठी कऱ्याला पाहत
होते. 47 कोणतरी त्यालें म्हणलं,पाह्य,तुई
माय अन् तुह्या भाऊ बायर उभे हायत,अन्
त्यांयले तुह्यासंग गोष्ठी करण्याची इच्छा
हाय. 48 हे आयकून त्यानं,म्हणणाऱ्याना उत्तर
देलं,कोण हाय माह्याली माय? 49 अन् कोण
हाय माह्याला भाऊ?अन् आपल्या शिष्याच्या
इकडे हात पुढे करून म्हणलं,पाहा,माह्याली
माय अन् माह्याला भाऊ हे हायत. 50 कावून
कि जो कोणी माह्याल्या स्वर्गीय बापाच्या
इच्छा वर चालतो,तोचं माह्याला भाऊ अन्
बईन अन् माय हाय.

13 1त्याचं दिवसी येशू घरातून
निघाल्यावर नदीच्या काटावर
जाऊन बसला. 2त्याच्या पासी असे लोकं
जमा झालें,कि त्याला डोंग्यावर चढावं
लागलं,अन् सगळी गर्दी काटावर उभी
रायली. 3अन् त्यानं त्यांयलें कथेतून
बऱ्याशा गोष्ठी सांगतल्या,कि पाहा,एक
पेरणारा बी पेऱ्याले निघाला. 4पेरतांना
काई बी रस्त्यांच्या काटावर पडले,अन्
पाखरांनी येऊन ते खाऊन टाकलें. 5काई बी
गोट्याईच्या जागेत पडले,जती त्यांयलें लय
माती नोती,अन् खोलवर माती नसल्याने ते
लवकरच उगून आले. 6पण सूर्य निघाल्यावर
ते जवून गेले,अन् मूय नाई पकडल्याने ते
सोखुन गेलें. 7काही बी झुडपाईत पडले,अन्
झुडपं वाढले त्यालें दाबून टाकले. 8पण
काई बी चांगल्या जमिनीवर पडले,अन्
फळ आले,कोणी शंभर पट,कोणी साठ
पट,कोणी तीस पट. 9ज्यालें कान हायत,त्यानं
आयकावं. 10शिष्यायन जवळ येऊन त्यालें
म्हणलं,कि तू त्यांयच्या संग कथेतून का
बोलतो. 11त्यानं उत्तर देलं, कि तुमाले
स्वर्गाच्या राज्यांचा भेदाची समज देली
हाय,पण त्यांयलें नाई. 12कावून कि ज्याच्या
पासी हाय,त्यालेंचं देलं जाईन,अन् ज्याच्या
पासी लय हून जाईन,पण ज्याच्या पासी
काई नाई हाय,त्याच्या पासून जे काई हाय,ते
पण घेतल्या जाईन. 13मी त्यांयच्या संग
कथेतून यासाठी बोलतो,कावून कि ते पायत
असतांना पण पायत नाईत आयकतं असतांना
पण आयकतं नाईत. 14त्यांयच्या विषयात
यशया भविष्यवक्त्यांची भविष्यवाणी पूर्ण
होते.तुमी कानाने आयकसान पण समजीन
नाई,अन् डोया ने तर पायसानं,पण तुमाले
कधीच दिसणार नाई. 15कावून कि या
लोकांचे मन मोठे झालें हाय,अन् ते कानाने
मंद आयकतात,अन् त्यांयनं त्यांयचे डोयाईले
झापड आली कधी अस नाई झालं पायजे कि ते
डोयाने पायतीन अन् कानाने आयकतीन,अन्
मनात समजतीन,अन् वापस जातीन अन् मी
त्यांयलें चांगल करीण. 16धन्य हायत,तुमचे
डोये,पाह्यतात,अन् तुमचे कान जे आयकतात.
17कावून कि मी तुमाले खरं खोर सांगतो,लय
भविष्यवक्त्यांनी अन् धर्मियांनी इच्छा
ठेवली,की ज्या गोष्टी तुमी पायता,पायल्यावर
नाई पायली,अन् ज्या गोष्टी तुमी
आयकता,पण आयकता नाई 18पण तुमी
पेरणाऱ्याची कथा आयका. 19जो कोणी
राज्याचं वचन आयकून नाई समजत,त्याच्या
मनात जे काई पेरलं होतं,त्याले तो दृष्ट येऊन
हिसकावून नेतो,हे तेच हाय जे रस्त्याचा
काटावर पेरले होते. 20अन् जे गोट्याईच्या
जमिनी वर पेरले होते,ते हे हाय,जे वचन
आयकून लवकरच आनंदाने मानतात. 21पण
त्याच्यात मुय नाई असल्याच्यान काहीचं
दिवस रायते,अन् जवा वचनाच्याने संकट
आले किंवा पाठलाग झाला,तवा ते लवकरच
ठोकर खातात. 22जे झाडाझुडपांईत पेरले
हायत,ते हे हाय,जे वचनाला आयकतात,पण
या संसाराची चिंता,अन् धनाचा लोभ
वचनाला दाबते,अन् ते फळ नाईत आणतं.
23जे चांगल्या जमिनीवर पेरल्या गेलं,ते हे
हाय,जे वचनाले आयकून समजतात अन्
फळांना आणतात,कोणी शंभर पट,कोणी
साठ पट,कोणी तीस पट. 24येशूने त्यांयलें
आजूक एक गोष्ट सांगतली,कि स्वर्गाच
राज्य त्या माणसाच्या सारखे हाय,ज्यांन
आपल्या वावरात चांगले बी पेरले. 25पण
जवा लोकं झोपले होते,तवा त्याच्या वैरी
येऊन गवाच्या मध्ये जंगली बिया पेरून
चालला गेला. 26अन् जवा बी निघालं
थोडं वाढलं,तवा जंगली दाण्याचे झाड पण

दिसले. 27 मंग मालकाचे कामकरी येऊन
त्यालें म्हणले,हे स्वामी काय त्या आपल्या
वावरात चांगल बी नाई पेरलं काय?मंग
जंगली बियाचे झाड त्यात कसे निघाले?
28 त्यानं त्यायलें म्हणलं,हे कोण्या वैऱ्याचं
काम हाय,कामकऱ्यानी त्याला म्हणलं,काय
तुह्याली इच्छा हाय,कि आमी जाऊन त्याईलें
वाटून घेऊ. 29 त्यानं म्हणलं कि,नाई असं नाय
झाल पायजे, कि जंगली दाण्याच्या झाळाय
संग गहू पण उपडल्या जावां. 30 सोंग्यापर्यंत
त्यांयलें एकदा वावू द्या,अन् काप्याच्या
वाक्ती मी सोंगनाऱ्याईले सांगीन कि पयले
जंगली दाण्याचे झाळ जमा करून जाव्या
साठी त्याचे गठ्ठे बांधा,अन् गवाले माह्या
वावरात जमा करा. 31 त्यानं त्यांयलें एक
अजून गोष्ट सांगतली,स्वर्गाच राज्य,राईच्या
दाण्याच्या सारखे हाय,ज्या कोण्या माणसाने
घेऊन आपल्या वावरात पेरलं. 32 ते सगळ्या
बियातून लाहान तर हाय,पण जवा मोठं
होते,तवा ते भाजी पाल्याहून मोठं होते,अन्
असं झाळ होते कि आभायातले पाखरं येऊन
त्यायच्या डागांवर बसतात. 33 त्यानं अजून
एक गोष्ट सांगतली,स्वर्गाच राज्य,खमीरा
सारखे हाय,ज्यालें कोण्या बाईने घेऊन तीन
पदरी पीटात मिळवलं,अन् ते सगळे खमीर
झाले. 34 ह्या सगळ्या गोष्टी येशूनं कथेतून
लोकांना सांगतल्या,अन् कथेच्या वाचून
तो त्यांयलें सांगत नोता. 35 कि जे वचन
भविष्यवक्त्यांच्या व्दारे सांगतलं,होतं ते पूर्ण
व्हावं मी कथा सांग्याले आपलं तोंड उघडीन
मी त्या गोष्टींचाजे जगाच्या उत्पती पासून
गुप्तलपवलेल्याहोत्या प्रगट करणार. 36 तवा
तो गर्दीले सोडून घरी आला,अन् त्याच्या
शिष्यायनं त्याचा पासी येऊन म्हणलं,कि
वावराच्या जंगली दाण्याची कथा आमाले
समजावून सांग. 37 त्यानं त्यायलें उत्तर
देलं,कि चांगल्या बियाले ,पेरणारा माणसाचा
पोरगा हाय. 38 वावर संसार हाय,चांगल
बी राज्याची लेकरं,अन् जंगली बी दृष्टाचे
लेकरं. 39 ज्या शत्रून त्यालें पेरलं तो सैतान
हाय,कापणी जगाच्या अंत हाय,अन् कापणारे
स्वर्गदूत हायत. 40 अन् जसे जंगली दाणे
जमा केलें जातात अन् जायल्या जातात,तसचं
जगाच्या आखरी मध्ये होईन. 41 माणसाच्या
पोरगा स्वर्गदूतांय्लें पाठवीन अन् ते त्याच्या
राज्यातून सगळे ठोकराच कारण अन् कुकर्म
करणाऱ्याना इकट्ठा करतीन. 42 अन् त्यांयले
आगीच्या भट्टीत टाकतीन,जतीसाकं रडण अन्
दात खानं असीन. 43 त्या वाक्ती धर्मी आपल्या
बापाच्या राज्यांत सूर्या सारखे चमकतीन,
ज्यांयले कान हायत,त्यानं आयकावं.
44 स्वर्गाच राज्य वावरात लपवंलेल्या धना
सारखं हाय,जसं कोण्या माणसाले भेटलं,अन्
लपवलं अन् आनंदान जाऊन आपलं सगळे
काई इकून टाकलं,अन् त्या वावराले ईकत
घेतलं 45 मंग स्वर्गाच राज्य एका व्यापाऱ्या
सारखं हाय,जो चांगल्या मोतीच्या खोजात
होता. 46 जवा त्याले एक बहुमुल्य मोती
सापडला तवा त्यानं आपलं सगळे काई ईकून
टाकलं,अन् तो मोती घेऊन घेतला. 47 मंग
स्वर्गाच राज्य एक त्या मोठ्या जाळ्या सारखं
हाय,जे समुद्रात टाकल्या गेलं,अन् सगळ्या
प्रकारच्या मासोयांना जमा करून आणलं.
48 अन् जवा जाळं भरलं,तवा मासोया
पकडणारे त्यालें काटावर होडून आणलं,अन्
बसून चांगल्या चांगल्या भांडयाईत जमा
केल्या,अन् बेकार बेकार फेकून देल्या.
49 जगाच्या आखरीले असचं होईन,स्वर्गदूत
येऊन बेकारांना धर्मी पासून अलग करतीन.
50 अन् त्यांयलें आगीच्या भट्टीत टाकून
देतीन,जती रडण अन् दात खानं असीन
51 काय तुमी ह्या गोष्टी समजल्या? ते त्याला

म्हणले व्हवं. 52 त्यानं त्यांयलें म्हणलं,हर एक
शास्त्री जो स्वर्गाच्या राज्याचा शिष्य हाय,तो
गृहस्तभंडारीच्या सारखा हाय,जो आपल्या
भंडारातून नवीन अन् जुन्या वस्तुं काढते.
53 जवा येशू ह्या सगळया कथा सांगतल्यावर
तो ततून चालला गेला, 54 अन् आपल्या
गावात येऊन त्यांईच्या सभास्थानात असा
उपदेश देऊ रायला,कि ते हापचकं हून म्हणत
कि त्यालें हे ज्ञान अन् सामर्थ्याचे काम कुठून
भेटले. 55 काय हा वाड्याचा पोरगा तर
नाई?अन् त्याच्या मायचं नाव मरिया अन्
त्याच्या भावाचं नाव याकोब अन् योसेफ अन्
शिमोन यहूदा तर नाई. 56 काय त्याच्या
सगळया बईनी,आमच्या नाई रायत मंग
यालें हे सगळ कुठून. 57 अशा प्रकारे त्यांयनं
त्याच्याच्यानं ठोकर खाल्ली,पण येशूने
त्यांयलें म्हणलं,भविष्यवक्ता आपला देश अन्
आपलं घराले सोडून अजून कुठेही अपमान
नाई झाला. 58 अन् त्यानं तती त्यांयच्या
अविश्वासाच्यान लय सामर्थ्याचे काम नाई
केलें.

14 1 त्या दिवसाईत हेरोद राज्याने
येशूची कीर्ती आयकली. 2 अन्
आपल्या सेवकाय्लें म्हणलं,कि हा योहान
बाप्तिस्मा देणारा हाय,जो मेलेल्यातून
जिवंत झाला हाय,म्हणून त्याच्याच्याने
सामर्थ्याचे काम प्रगट होतात. 3 कावून
कि हेरोदाने आपला भाऊ फिलीप्पूसची
बायको,हेरोदीयास च्या कारण योहानले
पकडून बांधल अन् जेलात टाकून देलं.
4 कावून कि योहानाने त्यालें म्हणलं होतं,कि
ईले ठेवण तुले चांगल नाई. 5 म्हणून त्यालें
मारून टाकण्याचा कट केला,पण लोकांना
भेत होता,कावून कि ते त्यालें भविष्यवक्ता
मानता होते. 6 पण जवा हेरोदाचा जन्म
दिवस आला,तवा हेरोदियासची पोरगी
प्रोग्राम केला नाचून हेरोद ला खुश केलं.
7 म्हणून त्यानं शपत खाऊन वचन देलं,कि जे
काई तू मांगसीन,ते मी तुले देईन. 8 ते तिच्या
मायने तिला शिकवून पुढे केलें होते,योहान
बाप्तिस्मा करणाऱ्याचं मुंण्डक ताटात
आणून दे. 9 राज्या दुखी झाला,पण आपल्या
शपतच्यानें अन् बसलेल्याच्यान आज्ञा देली,
देऊन द्या. 10 अन् त्यानं जेलात लोकांना
पाठवून,योहानाचे मुंडके कापून टाकले.
11 अन् त्याचं मुंण्डक ताटात आणलं,अन्
त्याच्या पोरीले देऊन देलं,ते तिच्या मायच्या
पासी घेऊन गेली. 12 तवा योहानाचे शिष्य
आले,अन् त्याच्या शरीराला घेऊन जाऊन
गाढून टाकलं,अन् जाऊन येशूला सांगतलं.
13 जवा येशूने हे आयकले,तवा डोंग्यात चढून
ततून तो शांत जागेत एकांतात चालला गेला
लोकं हे आयकून गावा गावातून त्याच्या मांग
निघाले. 14 त्यानं निघून एक मोठी गर्दी
पायली,अन् त्यायच्या वर तरस आला.अन्
त्यानं त्यांयच्या बिमारी ले चांगल केलं.
15 जवा संध्याकाय झाली,तवा त्याच्या
शिष्यांयन,त्याच्या पासी येऊन म्हणलं,कि हे
सूनसान जागा हाय,अन् उशीर हून रायला
हाय,लोकांना जाऊ द्या,कि ते गावात जाऊन
आपल्या साठी जेवण ईकत घेतीन. 16 पण
येशूनं त्यांयलें म्हणलं कि,त्यांईचं जाणं,जरुरी
नाई तुमीचं,त्यांईलें जेव्याले द्या. 17 त्यांयनं
त्यालें म्हणलं कि,अती आमच्या पासी पाच
भाकरी अन् दोन मासोया शिवाय अजून काई
नाई. 18 त्यानं म्हणलं,माह्यावाल्या पासी
घेऊन या. 19 तवा त्यानं लोकाईलें गवतात
बसण्यालें सांगतल,अन् त्या पाच भाकरी
अन् दोन मासोया घेतल्या,अन् स्वर्गाच्या
इकडे पावून धन्यवाद केला,अन् भाकरी
तोडून तोडून शिष्यांना देल्या,अन् शिष्यांनी
लोकांना. 20 जवा ते खाऊन तृप्त झालें तवा

शिष्यायन उरलेल्या तुकड्याईचे भरलेल्या
बारा टोपल्या उचलल्या. 21 अन् जेवणारे
बाया अन् लेकरं सोडून पाच हजार माणसं
जवळपास होतें 22 तवा त्यानं लवकरचं
आपल्या शिष्यायले डोंग्यात चढण्या साठी
सांगतल,कि त्याच्या पयले तिकून गेलें जवा
ते लोकांईले पाटून द्या. 23 त्यानं लोकाईलें
पाठवून देल्यावर प्रार्थना कऱ्याले यकांतात
पाहाडावर गेला,अन् संध्याकायच्या तो एकटा
होता. 24 त्या वाक्ती डोंगा सरोवराच्या मधात
हालून रायला होता,कावून कि हवा त्यांयच्या
समोरून होती. 25 अन् येशू रात्रीच्या चवथ्या
वाक्ती,पाण्यावर चालत,त्याईच्या पासी गेला.
26 शिष्य त्यालें पाण्यावर चालत असतांना
पाऊन घाबरून गेलें,अन् म्हणू लागले,कि हा
भूत हाय,अन् भेवाच्या माऱ्यान कल्ला करून
रायले होतें. 27 तवा येशूने लवकरच त्याईच्या
संग गोष्टी केल्या, अन् म्हणलं,हिम्मत धरा मी
हाय भेऊ नका. 28 पेत्राने त्याले उत्तर देलं कि
,हे प्रभू जर तू हास तर मले आपल्या पासी
पाण्यावर चाल्याची आज्ञा दे. 29 त्यानं म्हणलं
ये,तवा पेत्र डोंग्यातून उतरून येशूच्या पासी
जाण्यासाठी चालू लागला. 30 पण हवेला
पाऊन भेला,अन् तो डुबून रायला होता
तवा त्यानं जोऱ्याने आवाज देऊन म्हणलं
कि हे प्रभू मले वाचवं. 31 येशूने लवकर
हात पुढे करून त्याचा हात पकडला,अन्
त्यालें म्हणलं कि हे अल्पविश्वासी त्या
कायले शंका केला. 32 अन् जवा ते डोंग्यावर
चढून ते गेलें तवा हवा थांबली. 33 यावर
जे डोंग्यात होते,त्यांयनं प्रणाम करून
म्हणलं,खरंखोर तू देवाचा पोरगा हायसं 34 ते
तिकून उतरल्यावर गन्नेसरत देशात पोहचले.
35 ततल्या लोकांनी त्यालें वयखलं,अन् आजू
बाजूच्या सगळ्या देशात समाचार देला अन्
सगळ्या बिमाऱ्याईलें त्याच्या पासी आणलं.
36 अन् त्यालें निवेदन करून करू लागले,कि
तो त्यांईलें आपल्या कपड्यालांच स्पर्श करू
द्यावे,अन् जेवड्याय्न त्यालें स्पर्श केला ते
सगळे चांगले झालें.

15 1 तवा यरुशलेमारून काही परुशी
अन् शास्त्री येशूच्या पासी येऊन
म्हणूं रायले. 2 तुह्याले शिष्य पूर्वजाच्या
परंपराले कावून नाकारतात,कि हात न
धुता जेवण करतात. 3 त्यानं त्याईलें उत्तर
देलं,तुमी पण आपल्या परंपराच्या कारणाने
कावून देवाची आज्ञा मानत नाईत. 4 कावून
कि देवानं म्हणलं,आपल्या बाप अन् मायचा
आदर कर अन् जो कोणी बाप या मायले
बेकार म्हणतें तर त्यालें मारून टाकल्या
जाईन. 5 पण तुमी म्हणता कि,जर कोणी
आपल्या बापाले अन् मायले म्हणीन,कि जे
काई तुले माह्याल्या पासून फायदा पोहचणार
ते देवाले भेट चढवल्या गेली. 6 तो आपल्या
बापाच्या अन् मायच्या आदर नाई करीन,तर
तुमी आपल्या परमपंरेच्या कारणाने देवाचं
वचन टाकून देलं. 7 हे कपट्यानो यशयाची
तुमच्या विषयात हे भविष्यवाणी ठीक हाय.
8 कि हे लोकं होटांनी तर माह्याल्या आदर
करतात,पण त्यांईच मन माह्यापासून दूर
रायते. 9 अन् ते व्यर्थ माह्याली उपासना
करतात,कावून कि माणसाच्या विधीले
धर्मउपदेश म्हणून शिकवतात. 10 तवा
त्यानं लोकाईलें आपल्या पासी बलाउन
म्हणलं कि,आयका अन् समजा. 11 जे तोंडात
जाते,ते माणसाले अशुद्ध नाई करत,पण
जे तोंडातून निगते,तेच माणसाले अशुद्ध
करते. 12 तवा शिष्यायन येऊन त्याले म्हणलं
कि,काय तुले मालूम हाय,कि परुशांनी जे
वचन आयकलं ठोकर खाल्ली. 13 त्यानं
उत्तर देलं,हर एक झाड जे माह्या स्वर्गीय
बापाने नाई लावले,उपटून टाकल्या जाईन.

14 त्यांईले जाऊ द्या,ते आंधळे मार्ग दाखवं
नारे हायत,अन् फुटका जर फुटक्याले रस्ता
दाखवीन,तर ते दोघही गड्यात पडतीन.
15 हे आयकून पेत्राण त्यांईलें म्हणलं,कि
दृष्टातकथा आमाले समजावून सांग. 16 त्यानं
म्हणलं कि काय?तुमी पण आजलग ना समज
होते? 17 काय तुमाले मालूम नाई,कि जे काई
तोंडात जाते ते पोटात पडते, अन् संडासातून
निघून जाते. 18 पण जे काई तोंडातून
निघते ते मनातून निघते अन् तेच माणसाले
अशुद्ध करते. 19 कावून कि बेकार विचार
हत्या,परस्त्रीगमन व्यभिचार,चोरी खोटी
साक्ष,अन् निंदा मनातूनच निघते. 20 हेचं
हाय जे माणसाले अशुद्ध करते,पण हात नाई
धुतले,अन् जेवण कर्ण, माणसाले अशुद्ध नाई
करत. 21 येशू ततून निघाल्यावर सूर अन्
सैदाच्या प्रदेशाच्या इकडे चालला गेला.
22 अन् पाहा,त्याचं प्रदेशातून एक कनानी
बाई निघाली,अन् मोठ्या मोठ्या ने म्हणूं
लागली,हे प्रभू दाविदाच्या पोरा माह्यावर
दया कर,माह्याल्या पोरीला दृष्टआत्मा लय
तारास देऊ लागला. 23 पण त्यानं तिले
काईचं उत्तर देलं नाई,तवा त्याच्या शिष्यांनी
येऊन विनंती करून म्हणलं,इले जाऊ
दे,कावून कि ते आपल्या मागे कल्ला करत
येते. 24 त्यानं उत्तर देलं कि, इस्राएलाच्या
घरण्याच्या हारोपलेल्या मेंढराले सोडून मी
कोणा पासी नाई पाठवंल्या गेलो. 25 पण
ते आली,अन् येशूला प्रणाम करून म्हणू
लागली,हे प्रभू माह्याली साहायता कर.
26 त्यानं उत्तर देलं,लेकरांची भाकर घेऊन
कुत्र्याच्या समोर टाकणं चांगल नाई. 27 तवा
ती म्हणाली, खरं हाय प्रभू,पण कुत्रे पण
चुराकण कण खातात,जे त्यांईच्या स्वामीच्या
मेजावरून खाली पडते. 28 याच्यावर येशूने
तिले उत्तर देलं कि,हे बाई तुह्या विश्वास
मोठा हाय,जस तू म्हणत,तुह्यासाठी तसचं
व्हावं,अन् तिची पोरगी त्याचं वाक्ती चांगली
चंगी झाली. 29 येशू ततून गालीलाच्या
सरोवराच्या पासी आला,अन् पहाडावर
चढला अन् बसला. 30 तवा गर्दीच्या
गर्दी ,लंगडे, फुटके,मुके,दुंडे,अन् बरेचं
साऱ्यांना घेऊन त्याच्या पासी आले,अन्
त्याईले त्याच्या पाया पासी आणले,अन्
त्यानें त्यांईले बरे केले. 31 जवा लोकांनी
पायलं,कि मुके बोलतात,दुंडे चांगले
होतात,लंगडे चालतात,फुटक्यांना दिसते,तवा
आश्चर्यचकित होऊन इस्राएलाच्या देवाची
महिमा करूं लागले. 32 येशूने आपल्या
शिष्यांना बलावलं,अन् म्हणलं कि,मले या
गर्दी वर दया येते,कावून कि ते तीन दिवसा
पासून माह्या संग हायत,अन् त्यांयच्या
पासी जेव्याले काईच नाई,मी त्यांईले
उपासी जाऊ नाई देलं,असं नाई व्हावं, कि
ते रस्त्याने थकून जावं. 33 शिष्यायन त्यालें
म्हणलं कि,आपल्याले या जंगलातून कुठून
जेवण भेटीन कि आपण येवढ्या मोठ्या
लोकांना खाऊ घालू. 34 येशूने त्यांयलें
विचारलं,तुमच्या पासी कितीक भाकरी
हायत?त्यांयनं म्हणल,सात अन् थोडंशाक
मासोया हायत. 35 तवा त्यानं लोकाईले
जमिनीवर बशाची आज्ञा डेली. 36 अन् त्या
सात भाकरी अन् मासोया घेतल्या धन्यवाद
देऊन तोडल्या अन् आपल्या शिष्यांना देल्या
अन् शिष्यांनी लोकाईले देल्या. 37 अशा
प्रकारे सगळे झण खाऊन तृप्त झाले,अन्
शिष्यांनी उरलेल्या तुकड्याच्या सात टोपल्या
उचलल्या. 38 अन् जेवणाऱ्या पैकी बायांना
सोडून अन् लेकरांना सोडून चार हजार
माणसं होते. 39 तवा त्यानें लोकांना विदा
करून,डोंग्यावर चढला,अन् मगदन देशांच्या
सीमेत आला

16 1परुशी अन् सदुकीयांनी जवळ
येऊन त्याची परीक्षा पायण्यासाठी
त्यांयनं म्हणलं,कि आमाले स्वर्गातल
कोणत चिन्हं दाखवं. 2त्यानं त्यांईलें उत्तर
देलं,संध्याकाळी तुमी मनता,वातावरण
चांगल राईन कावून कि अभाय लाल हाय.
3अन् सकाळी म्हणता,कि आज पाणी वादळ
येईल कावून कि अभाय लाल अन् धुंदल
हाय,तुमी अभायाचे लक्षण पाऊन भेद
सांगू शकता,पण वेळ अन् चिन्हा का भेद
कावून नाई सांगू शकत. 4या युगाचे बेकार
अन् व्यभिचारी लोकं चिन्हं पायतात अन्
योनाच्या चिन्हांले सोडून त्यांयले कोणत
आणखी चिन्ह देल्या नाई जाणार,अन् तो
त्यांना सोडून चालला गेला. 5अन् शिष्य
सरोवराच्या तिकड्ल्या बाजूने जाह्याच्या
वात्ती भाकरी घायला भुलले. 6येशूने त्यालें
म्हणलं कि,पाहा,परुशी अन् सदुकिच्या
खमीरा पासून सावधान राहा. 7ते आपसात
विचार करू लागले,कि आमी तर भाकर
नाई आणली,म्हणून असं म्हणतें. 8हे जाणून
येशूने त्यांयलें म्हणलं,हे अल्पविश्वासीहो
तुमी आपसात कावून विचार करता,कि
आपल्या पासी भाकर नाई? 9काय आता
पर्यंत नाई,समजले काय तुमाले त्या पाच
हजार भाकरी स्मरण नाईत काय ,अन् हे पण
कि किती टोपल्या उचलल्या होत्या आठवत
नाई काय? 10अन् त्या चार हजारांना सात
भाकरी अन् हे कि किती टोपल्या उचलल्या
होत्या. 11तुमी कावून नाई समजतं,कि म्या
तुमाले भाकरीच्या विषयात नाई म्हणलं,पण
हे कि तुमी परुशी अन् सदुकिच्या खमीरा
पासून सावध रायण्याले म्हणलं. 12तवा
त्यांइच्या लक्षात आलं कि,त्यानं भाकरीच्या
खमीरापासून नाई पण परुशी अन् सदुकीच्या
शिक्षा पासून सावध रायण्याले म्हणलं.
13येशू केसरिया अन् फिलीपियाच्या देशात
आला,अन् आपल्या शिष्याय्लें विचारू रायला
कि लोकं माणसाच्या पोराले काय म्हणतात.
14त्यांयनं म्हणलं कि,कोणी तर योहान
बाप्तिस्मा देणारा म्हणतात,काही एलिया अन्
काही यीर्मया नाईतर भविष्यवक्त्यामधून
कोणी एक म्हणतात. 15त्यानं त्यांयलें
म्हणलं,पण तुमी मले काय म्हणता?
16शिमोन पेत्राने उत्तर देलं, तू जिवंत देवाचा
पोरगा ख्रिस्त हास. 17येशू ख्रिस्ताने त्यालें
उत्तर देलं,हे शिमोना योनाच्या पोरा तू धन्य
हास कावून कि तू मांस अन् रक्ताने नाई,परंतु
माह्या बापाने जो स्वर्गात हाय,हे गोष्ट
माह्यावर प्रगट केली हाय. 18अन् मी तुले
सांगतो कि,तू पेत्र हास,अन् मी आपली मंडली
या गोट्यावर बाधीन,अन् अधोलोकाचे फाटक
त्याच्या वर प्रबल नाई होणार. 19मी तुले
स्वर्गाच्या राज्याची चाब्याकिल्ली देईन,अन्
जे काई तू पृथ्वीवर उदाडसीन ते स्वर्गात
उघडीन 20तवा त्यानं शिष्यायलें जतावल
कि कोणाले नोका सांगू कि मी ख्रिस्त हावो
म्हणून. 21त्या वात्ती पासून येशू आपल्या
शिष्यांना सांगू लागला,कि मले नकीचं वाटते
कि यरूशलेमातून जाऊन पुर्नियो अन् प्रधान
याजक अन् शास्त्रीयच्या हातातून लय दु:ख
उचलीन अन् मारून टाकल्या जाईन अन्
तिसऱ्या दिवसी जिवंत होईन. 22त्यावर
पेत्राने एकातांत जाऊन झटक्यान म्हणलं,कि
हे प्रभू देव न करीन कि तुह्या संग असं
कधी नाई होणार. 23त्यानं फिरून पेत्राले
म्हणलं,कि हे सैतान माह्याल्या पासून दूर
व्ह्य,तू माह्या साठी ठोकराच कारण हायस
कावून कि तू देवाच्या गोष्टीले नाई जाणत,पण
माणसाईच्या गोष्टीवर मन लावत. 24येशूने
आपल्या शिष्यांना म्हणलं,कि जर कोणाले
माह्या मांग यांयचं हाय स्वताचा त्याग करीन

अन् आपला वधस्तभ उचलीन,अन् माह्या
मागे येईन. 25कावून कि जो कोणी आपला
जीवं वाचण्यायची कोशिश करीन तो त्याले
गमाउन देईन,अन् जो कोणी माह्या साठी
आपला जीवं देणार तो त्याले भेटीन. 26जर
माणूस साऱ्या ज्गाले प्राप्त करीन अन् आपला
जीवं दु;ख उचलीन तर त्यालें काय लाभ
होईन?माणूस आपल्या जीवाच्या बदल्यात
काय देणार. 27माणसाचा पोरगा आपल्या
स्वर्ग दूताच्या संग आपल्या बापाच्या गौरवात
येऊन अन् त्या वाक्ती तो एका एकाले त्याच्या
कामाच्या अनुसार प्रतीफळ देणार. 28मी
तुमाले खरंखोर सांगतो,कि जे अती उभे
हायत,त्याच्यातून काही असे हायत,के ते जवा
पर्यंत माणसाच्या पोराले त्याच्या राज्यात
येताना नाई पायत तवा पर्यंत मरणाची चवं
नाई घेणार.

17 1साहा दिवस झाल्यावर येशून पेत्र
अन् याकुब अन् त्याच्यावाला भाऊ
योहाणाले संग घेतलं,अन् त्यांईले एकातांत
कोण्या एका पहाडावर घेऊन गेला. 2तती
त्यांयच्या समोर त्याचं रुपांतर झालं,अन्
त्याचं तोंड सूर्या सारखं,चमकलं,अन् त्याचें
कपडे ज्योती सारखे उजडले. 3मोसे अन्
एलिया त्याच्या संग गोष्टी करत असतांना
त्यांईलें दिसले. 4यावर पेत्राने येशुले म्हणलं
कि,हे प्रभू ,आपलं अतीसाकं रायनं चांगल
हाय,जर तुई इच्छा असीन तर आमी अती
तीन मंडप बनवतो,एक तुह्यासाठी,एक मोसे
साठी,अन् एक एलिया साठी. 5तो बोलूच
रायला होता,तवा पाहा,एका उजिडमय
ढगान त्यांयलें झाकून घेतलं,अन् त्या ढगातून
हा आवाज निगाला,कि हा माह्याला प्रिय
पोरगा हाय,ज्याच्यावर मी प्रसन्न व्हावो,याचं
आयका. 6शिष्य हे आयकून तोंडावर
पडले,अन् खूपचं भेलें. 7येशू ख्रिस्ताने जवळ
येऊन त्यांईलें हात लावला,अन् म्हणलं,उठा
भेऊ नका. 8तवा त्यांईन आपले डोये वर
करून येशूच्या शिवाय आणखी कोणाला नाई
पाहिले. 9जवा ते पहाडावरून उतरू रायले
होतें,तवा येशीने त्यांयलें हे आज्ञा देली,कि
जतलग माणसाच्या पोरगा मरणातून जिवंत
नाई होतं तोपर्यंत कोणाले सांगू नका.
10यावर त्याच्या शिष्यांनी त्यालें पुसलं,मंग
शास्त्री का म्हणतात,कि एलियाचें पहिले येणे
आवश्य हाय.? 11त्यानं उत्तर देलं,एलिया
तर येणारच,अन् सगळ काई सुधारीन.
12पण मी तुमाले सांगतो,कि एलिया
आला हाय, अन् त्यांयनं त्यालें वयखल
नाई,पण जसं पायजे तसचं केलं,अशाचं
प्रकारे माणसाच्या पोरगा पण त्यांयच्या
हातातून दु:ख भोगीन. 13तवा शिष्यांना
समजलं,कि त्यानं आमाले योहान बाप्तिस्मा
देणाऱ्याच्या बद्दल म्हणलं होतं. 14जवा
ते लोकांयच्या गर्दी पासी गेलें,तवा एक
माणूस त्याच्या पासी आला,अन् टोंगें टेकून
म्हणूं रायला. 15हे प्रभू,माह्याल्या पोरावर
दया कर,कावून कि,त्यालें मिर्गी येतें,अन्
तो लय,दु:ख उचलते,अन् लय वेळा आगीत
जाते अन् बार बार पाण्यात पडते. 16अन् मी
त्यालें तुह्याल्या शिष्यापासी नेलें होतें,पण
ते त्यालें बरे करू शकले नाई. 17येशून उत्तर
देलं,कि हे अविश्वासी हटीले लोकोहो,मी
कुठपर्यंत तुमच्या संग रायणार?अन् कुठपर्यंत
तुमचं सहन करणार? त्यालें अती माह्या
पासी आणा. 18तवा येशूने दृष्टआत्म्याला
झ्यापलं,अन् ते त्याच्यातून ते निघून गेल्या
अन् पोरगा त्याचं वाक्ती चांगला झाला.
19तवा शिष्यायन एकट्यात येशूच्या पासी
येऊन म्हणलं,कि आमी त्यालें कावून नाई काढू
शकलो?. 20त्यानं त्यांईलें म्हणलं,आपल्या
विश्वासाच्या कमीच्याने कावून कि मी

तुमाले खरं सांगतो,कि जर तुमचा विश्वास
राईच्या दाण्या सारखा असता,तरी पहाडाले
म्हणसान कि अतून सरकून तती चालला
जाय,तर तो चालला जाईन,अन् कोणतीहि
गोष्ट तुमच्या साठी असंभव नाई हाय.
21 जवा ते गालीलात होते,तवा येशूने त्यांयलें
म्हणलं,माणसाच्या पोरगा,माणसाच्या
हातात पकडला जाईन. 22 अन् ते त्यालें
मारून टाकतीन,अन् तो तिसऱ्या दिवसी
जिता हून जाईन. 23 यावर ते लय उदास
झालें. 24 जवा ते कफरनुहात पोहचले,तवा
मंदिरासाठी कर घेणाऱ्यानी पेत्राच्या पासी
येऊन विचारलं,कि काय तुमचा गुरु,मंदिराचे
कर देत नाई?त्यानं म्हणलं हो देत असते.
25 जवा तो घरी आला,तवा येशूने त्यालें
विचार्याच्या पयले,त्यालें विचारलं,हे शिमोन
तु काय विचार करत?पृथ्वीचे राज्या
महसूलकरकोणाच्या पासून घेतात?आपल्या
पोरापासून या दुसऱ्या कोणापासून?पेत्राने
त्यालें म्हणलं,दुसऱ्या पासून. 26 येशूने त्यालें
म्हणलं,तर पोरं वाचले. 27 तरी आमी त्यालें
ठोकर नाई देली पायजे,तू सरोवराच्या
किनाऱ्यावर जाऊन गय टाकलें ,अन् मासोया
पयले निंगतील ते घे, ते मले, त्यायचं तोंड
खोलल्यावर एक शिक्का भेटीन,त्यालें घेऊन तू
माह्या व तुह्या बदल्यात त्यांईले देऊन देजोक.

18
1 त्याचं वात्ती,शिष्यायन येशूच्या
पासी येऊन विचारलं,कि स्वर्गाच्या
राज्यात मोठा कोण हाय. 2 यावर त्यानं
एका लेकराला बलावून त्यांईच्या मधात
उभं केलं, 3 अन् म्हणलं,कि मी तुमाले खरं
सांगतो,कि जतपर्यंत तुमी या लेकरा सारखे
नाई बनसान तोपर्यंत,स्वर्गाच्या राज्यात प्रवेश
करूं शकत नाई. 4 जो कोणी आपल्या
स्वताले या लेकरां सारखं लाहान करीन,तो
स्वर्गाच्या राज्यात मोठा होईन. 5 अन् जो
कोणी,माह्या नावाने अशा लेकरांना ग्रहण
करतो,तो मले ग्रहन करतो. 6 पण जो कोणी या
लायण्यातून तुह्यावर विश्वास ठेवतात,एकाले
ठोकर देईन,त्याच्या साठी चांगल होतं,कि
एक मोठ्या चक्कीचा पाटा त्याच्या गयात
बांधल्या जावा,अन् समुद्रात टाकल्या जावां.
7 ठोकरीच्या कारण संसारावर "हायहाय"
ठोकर लागण गरजेचे हाय,पण "हायहाय"
त्या माणसावर ज्याच्यापासून ठोकर लागते.
8 जर तुह्याला हात या पाय तुले ठोकर
देतीन,तर कापून फेकून दे दुन्डा या लंगडा
असलेला जीवनात प्रवेश करण तुह्याल्या साठी
चांगल होतं,कि दोन हात अन् दोन पाय,असून
तू अनंत आगीत टाकल्या जाशीन. 9 जर
तुह्याला डोया तुले ठोकर देईन, तर त्यालें
उपटून फेकून दे. 10 भोकण होऊन जीवनात
प्रवेश कर्ण तुह्या साठी चांगल हाय,कि दोन
डोये असून तू जर नरकात आगीत पडला
असता 11 अन् पाहा,तुमी या लायण्याय पैकी
कोणाले तुच्छ नका समजूं,कावून कि मी
तुमाले सांगतो,कि स्वर्गात त्यांयचे दूत माह्या
स्वर्गीय बापाचं तोंड रोज पायत रायतात.
12 तुमी काय सोचता?जर कोण्या माणसाची
शंभर मेंढर हायत,अन् त्यातून एक हारोपल
तर तो नव्यानिव ला सोडून जंगलात,व
पहाडावर जाऊन त्या हारोपलेल्या मेंढराला
पायणार. 13 अन् जर असं व्हावं,कि ते त्याला
दिसावं,तर मी तुमाले सांगतो,कि त्या नव्यानव
मेंढराले जे भटकलेले नाईत,एवढा आनंद
नाई करणार,जेवढा कि तो त्या हारोपलेल्या
मेंढरासाठी करीन. 14 अशाच तुमचा बाप
हाय,जो स्वर्गात हाय,हे इच्छा नाई,कि या
लायण्या पैकी कोण्या एकाच्या नाश हो.
15 जर तुह्या भाऊ तुह्या विरुध्य अपराध
करीन,तर जा अन् एकट्यात जाऊन समजावं
जर त्यानं तुह्य आयकल तर तुले आपल्या

भाऊ भेटला. 16 जर त्यानं नाई आयकलं,तर
एका दोगांना आपल्या संग घरून जाय, कि
हर एक गोष्ट दोन या तीन साक्षी त्याच्या
तोंडातून पक्की केल्या जावं. 17 जर त्यानं
त्यांईचं नाई आयकलं,तर मंडळी ले सांग पण
जर त्यानं,मंडलीच नाई आयकल,तर तुत्याले
अन्यजाती अन् महसूलकरघेणारा सारखा
समज. 18 मी तुमाले खरंखोर सांगतो,जे
काई तुमी पृथ्वींवर बांधसान ते स्वर्गात
बांधल्या जाईन,अन् जे काई तुमी पृथ्वींवर
उघडसान,तर स्वर्गात पण उघडल्या जाईन.
19 मंग अजून मी तुमाले म्हणतो,कि जर
तुमच्यातून दोघझण जर पृथ्वींवर एक मनाने
मांगतीन, एका मनाचे,जो माह्या बाप स्वर्गात
हाय,त्यांईच्या साठी होऊन जाईन. 20 कावून
कि जती दोन अन् तीन माह्या नावाने
जमा होतीन, तती मी त्यांयच्या मधात
राईन. 21 तवा पेत्राने जवळ येऊन त्यालें
म्हणलं,कि हे प्रभू जर माह्या भाऊ अपराध
करत रायला तर मी त्यालें कितीक वेळा
क्षमा करू?काय सात वेळा पर्यंत. 22 येशूने
त्यालें म्हणलं,कि मी तुले हे नाई म्हणत
कि सात वेळा,पण सातचे सत्तर गुनेला.
23 म्हणून स्वर्गाच राज्य त्या राजा सारखं
हाय,ज्यानें आपल्या दासांच्या पासून लेखा
जोखा घेयाले गेला. 24 जवा तो लेखा घेयाले
लागला,तवा एका झ्नाले त्याच्या समोर
आणण्यात आलं,जो दहा हजार तोंडाच्या
कर्जदार होता. 25 जवा त्याच्या पासी द्यायले
काईच नोत,तवा त्याच्या स्वामीने त्यालें
म्हणलं,कि हा अन् याची बायको अन् लेकरं-
बाकरं जे काई त्याचं हाय, ते इकले तर
कर्ज चक्त होऊन जाईन. 26 यावर त्याच्या
दासाने त्यालें पडून प्रणाम केला, अन् म्हणलं,हे
स्वामी,धीर धर मी सगळे फेडून देईन. 27 तवा
त्याच्या दासाच्या स्वामीने दया खाऊन सोडून
देलं,अन् त्याचं कर्ज माप केलं. 28 परंतु जवा
तो दास बायर निघाला,तवा त्याच्या साथी
दासा पैकी एक त्यालें भेटला,जो त्याचें शंभर
दिणार धरत होता,त्यानं त्यालें पकडून त्याच्या
गया पकडला,अन् म्हणलं,जे काई तू धरत
ते भरून दे. 29 यावर त्याच्या संगी दास
पडून त्यालें विनंती करू लागला,कि धीर धर
मी तुले सगळे भरून देईन. 30 त्यानं नाई
आयकल,परंतु जाऊन त्यालें जेलात टाकलं,कि
जवा तो कर्जाला भरीन तवा पर्यंत तो ततीच
राईन. 31 त्याचे संगचें दास हे जे झालं
होतं,पाऊन खूपच उदास झाले,अन् जाऊन
आपल्या स्वामीला सगळी गोष्ट सांगून देली.
32 तवा त्याच्या स्वामीने त्यालें बलावून त्यालें
म्हणलं,हे दृष्ट दासा, तू जे मले विनंती केली
होती,तवा मी तर तुह्याल सगळे कर्ज माफ
केलें. 33 जसी मी तुह्यावर दया केली,तसचं त्या
पण आपल्या संगी दासावर दया कऱ्याले नाई
पायजे. 34 अन् त्याच्या स्वामीने रागात येऊन
त्यालें दंड देणाऱ्याच्या हातात सोफुन देलें,कि
जवापर्यंत हा सगळे कर्ज नाई भरत,तवा
पर्यंत त्यांच्या हातात राईन. 35 अशाच प्रकारे
जर तुमचाईत हर एक आपल्या भावाला
मनाने क्षमा नाई करणार,तर माह्याला बाप
जो स्वर्गात हाय,तो पण तुमच्या संग असचं
करणार.

19 1 जवा येशूने ह्या गोष्टी सांगून
संपवल्या,तवा तो गालीलातु
चालला गेला,अन् यहुदि यांच्या देशात
यार्देनेचा पलीकडे आला. 2 अन् मोठी गर्दी
त्याच्या मांगे आली,अन् त्यानं त्यांईलें तती
बरे केले. 3 तवा परुशी त्याची परीक्षा
करण्याकरिता जवळ येऊन म्हणूं लागले,काय
हर एक कारणाने आपल्या बायकोची
फारकती घेण उचित हाय. 4 त्यानं उत्तर
देलं,काय तुमी नाई वाचलं,ज्यानें त्यांईलें

बनवलं,त्यानचं सुरवाती पासून नर अन्
नारी बनवून म्हणलं, 5 या कारणाने
माणूस आपल्या माय-बापापासून अलग
होऊन,आपल्या बायकोच्या संग राईन
अन् ते दोघं एक तन होतीन. 6 पण आता
दोघं नाई पण एकहा,म्हणून ज्यालें देवानं
जोडले,ते माणसाने तोडू नये. 7 त्यांयनं त्यालें
म्हणलं,मंग मोशेने का ठरवलं,कि फारकती
देऊन तिले सोडून द्या. 8 त्यानं त्यांईलें
म्हणलं,मोशेने तुमच्या मनाच्या कठोरतेच्या
कारणाने तुमाले आपल्या बायकोला सोडून
देण्याची आज्ञा देली,परंतु सुरुवाती पासून
असं नाई झालं. 9 अन् मी तुमाले सांगतो,कि
जो व्यभिचाराले सोडून आणखी कोण्या
कारणाने आपल्या बायकोले फारकती,दुसरी
संग लग्न करीन,तो व्यभिचार करतो,अन्
जो त्यागलेली संग लग्न करीन,अन् तो
पण व्यभिचार करतो. 10 शिष्यांनी येशुले
म्हणलं,जर माणसाचं बाई संग असा समंध
हाय,तर लग्न करण चांगल नाई. 11 येशूने
त्यांयलें म्हणलं,हे सगळे वचन ग्रहण करू
शकत नाईत,फक्त ते ज्यांयलें दान देलेले हाय.
12 कावून कि काई नपुसक असे हायत,जे
मायच्या गर्भा पासूननच असतात,अन् काई
नपुसक असे हायत,ज्यांयलें माणसाने नपुसक
बनवले,अन् काई नपुसक असे हायत,ज्यांयन
स्वर्गाच्या साठी आपल्या स्वताले नपुसक
बनवले हाय,जे हे ग्रहण करू शकतात,ते ग्रहण
करावं 13 तवा लोकायन लेकराईले येशूच्या
पासी आणले,कि तो त्यावर हात ठेवे,अन्
प्रार्थना करे,पण शिष्यायन त्यांयलें दटावलं.
14 येशूने म्हणलं,लेकरांना माह्याल्या पासी
येऊ द्या,अन् त्यांयलें मना नका करू,कावून
कि स्वर्गाच राज्य याच्यास सारख्याचे
हाय. 15 अन् त्यांयच्या वर हात ठेऊन,ततून
चालला गेला. 16 अन् पाहा,एक माणसाने
जवळ येऊन त्याला म्हणले,हे गुरु,मी कोणत
चांगल काम करू,कि अनंत जीवनाले पाऊ.
17 त्यानं त्यांयलें म्हणलं,तू मले भलाईच्या
विषयात कावून पुसतो?भलं तर एकच
हाय,पण जर तू जीवनात प्रवेश करण्याचा
हाय,तर आज्ञा जे हायत ते मान. 18 त्याने
त्याला म्हणले,कोणती आज्ञा हाय?येशूने
म्हणले,हेच कि खून नको करू,व्यभिचार
नको करू,चोरी नको करू खोटी साक्ष देऊ
नको. 19 आपला बाप अन् मायचा आदर
कर,अन् आपल्या शेजाऱ्यावर आपल्या
समान प्रेम कर. 20 त्या नवजवानाने त्यालें
म्हणलं,या सगळ्याले मी मानलं हाय, आता
माह्यात कोणत्या गोष्टी ची कमी हाय.
21 येशूने त्यालें म्हणलं,जर तुले सिद्ध बन्याचं
असीन,तर जाय,आपला माल इकून गरिबांना
दे,म्हणजे तुले स्वर्गात धन भेटीन,अन् येऊन
माह्याल्या मांग हून जाय. 22 परंतु तो जवान
हे गोष्ट आयकून उदास होऊन चालला
गेला,कावून कि तो खूप धनी होता. 23 तवा
येशूने आपल्या शिष्यांना म्हणले,मी तुमाले
खरंखोर सांगतो,कि धनवानाचं स्वर्गाच्या
राज्यात जाणं कटीन हाय. 24 अजूक तूमाले
सांगतो,कि देवाच्या राज्यात धनवानाचं
जाणं हे, उंटाच सुईच्या शिद्रातून जाणं
सोफे हाय. 25 हे आयकून,शिष्यांनी फार
थक्क होऊन म्हणाले,मंग कोणाचं तारण
होईन? 26 येशूने त्यांयच्या इकडे पावून
म्हणलं,माणसाच्याने तर हे नाई होऊ
शकत,परंतु देवाच्याने सगळे काई होऊ
शकते. 27 यावर पेत्राने त्याला म्हणलें,कि
पाह्य,आमी तर सगळे काई सोडून,तुह्याल्या
मांगे झालो हाय,तर आमाले काय भेटीन.
28 येशूने त्यांयलें म्हणलं,मी तुमाले खरं
सांगतो,पुनरत्पत्तीत,जवा माणसाचा पोरगा
आपल्या महिमेच्या सिहासनावर बसीन,तवा

तुमी पण जे माह्याल्या मांग झालें, बारा
सिहासनावर बसून इस्राएलाच्या बारा
गोत्राचा न्याय करसान. 29 अन् ज्या प्रत्येकाचे
घरे किंवा भाऊ किंवा बईन किंवा बाप व
माय व लेकरे व वावरं माह्याल्या नावाने
सोडले हाय,त्यालें शंभर पट भेटीन,अन् तो
सार्वकालिक जीवनाचा अधिकारी होईन.
30 परंतु जे पयले हायत,ते मांगचे होतीन,अन्
जे मांगचे हायत,ते पयले होतीन.

20 1 स्वर्गाचे राज्य कोण्या एका
घरधन्यासारखे हाय, जो सकाळी
निगाला,यासाठी कि आपल्या द्राक्षमळयात
कामगारांना लावण्यासाठी. 2 अन् त्यानं
काम कऱ्याशी प्रत्येकाला रोजचा एक रुपया
देण्याचा ठरावं,करून त्यांयलें आपल्या
द्राक्षमळयात पाठवले. 3 मंग तीसऱ्या
तासाच्या सुमाऱ्यात त्याने बायर जाऊन,अन्
बाकीच्यांना बेकार उभे पायले. 4 त्यानं
म्हणलं,तुमी पण द्राक्षमळयात जा, अन् जे
काई योग्य असेन ते मी तुमाले देईन मंग
ते गेलें. 5 मंग त्यानं सहाव्या अन् नवव्या
तासाच्या सुमारात त्यानें बायर जाऊन तसेंच
केलें. 6 मंग अकराव्या तासाच्या सुमारात तो
बायर गेला, बायर तवा दुसरे उभे रायलेले
त्यांले दिसले अन् तो त्यांयलें म्हणें तुमी
सारा दिवस अती रिकामे का उभे राईले
आहा. 7 ते त्यालें म्हणालें,आमाले कोणी
मोलानें लावले नाई म्हणून त्याने त्यांयलें
म्हणलं,तुमीही द्राक्षमळयात जा. 8 मंग
संध्याकाळच्या वाक्ती,अंगुराराच्या वाडीच्या
स्वामी ने आपल्या कारभाऱ्याला म्हणला,कि
कामकरीयांना बलाव,अन् मांगची अन्
आखरी पर्यंत त्यांयलें मजुरी देऊन दे. 9 जवा
ते आले,तवा अकराव्या तासाच्या सुमारात
लावलेले होते,ते आल्यावर त्यांयलें एक एक
रुपया भेटला. 10 जे पयले आले होते त्यांयनं हे
समजलं कि आमाले अधिक रुपये भेटतीन,पण
त्यांयलें एकच रुपया भेटला. 11 जवा भेटला
तवा ते त्या घरधन्यावर कुडकुड करून म्हणू
लागले. 12 कि या मांगच्यायन एकच घंटा
काम केलं,अन् त्यायलें आमच्या एवढेच रुपये
देलें,ज्यांयन दिवस भर भार उचललं,अन्
घाम गाडला. 13 त्यानं त्यांईच्या पैकी एकाला
उत्तर देलं,कि हे दोस्ता,मी तुह्या संग काई
अन्याय नाई करत,काय तू माह्याल्या संग
एक रुपयाचा ठरावं केला नोता काय?
14 जे तुह्याल हाय,ते उचल,अन् चालला
जाय,माह्याली इच्छा हे हाय,कि जेवळ तुले
तेवढ या मांगच्याले पण देतो. 15 काय योग्य
नाई,कि मी आपल्या मालातून जे वाटीन,ते
करीन?काय माह्य चांगल झालं म्हणून, बेकार
नजरीने पायतो. 16 या प्रकारे जे मांगचे
हाय,ते पयले होतीन,अन् जे पयले हायत,ते
मांगचे होतीन. 17 येशू यरुशलेमात जातानी
बारा शिष्यांना एकांतात घेऊन गेला,अन्
रस्त्याने त्यांईलें म्हणून रायला. 18 कि
पाहा,आपण यरुशलेमात जाऊन रायलो
हाय,अन् माणसाचा पोरगा,महायाजक अन्
शास्त्र्यायच्या हाती धरून देला जाईन,अन्
ते त्यालें मरणदंडाच्या योग्य ठरवतीन.
19 अन् त्यालें अन्यजातीच्या हातात सोफुन
देतीन,कि ते त्याची मजाक करेन अन्
फटके मारेन अन् वधस्तभावर चढवासाठी
अन् तो तिसऱ्या दिवसी जिवंत होईन.
20 जवा जब्दीच्या मुलांना आईन आपल्या
पोराबरोबर त्याच्यापासी येऊन त्याच्या
पाया पडून त्याच्या पासी काई मांगीतले.
21 त्यानं तीलें म्हणलं,तुले काय वाटते?तवा ते
बोलली,हे म्हणलं,कि माह्याले हे दोन पोरं
तुह्याल्या राज्यात एक तुह्या उजव्या बाजूने
एक तुह्या डाव्याबाजूने बसतीन. 22 येशूने
उत्तर देलें,तुमाले नाई माईत,कि तुमी काय

मांगता?जो प्याला"मी पेणार हाय,काय
तुमी पेऊ शकता?त्यांईनं त्यालें म्हणलं,पेऊ
शकतो. 23 येशूने त्यांयलें म्हणलं,तुमी
माह्याल्या प्याला तर पेसान,पण माह्याल्या
उजव्या डाव्या बाजूने बसवने हे माह्य काम
नाई,पण ज्यांयच्या साठी माह्या बापाच्या
इकून तयार केलं हाय त्यांयच्या साठी
हाय. 24 हे आयकून, दहा शिष्य त्या दोन्ही
भावांवर क्रोधीत झाले. 25 येशूने त्यायलें
जवळ बलावून म्हणलं,तुमाले माईत हाय,कि
अन्यजातीचे अधिकारी त्यांयच्या वर राज
करतात,अन् मोठे हायत,ते त्यांयच्या वर
अधिकार जतावतात. 26 परंतु तुमच्या मध्ये
असं नाई होणार,परंतु जो कोणी तुमच्याईत
मोठा होण्याले पायते,तो तुमचा सेवक
बनला पायजे. 27 अन् जो प्रधान बन्याले
पाहतो त्यानें तुमचा दास बन्याले पायजे.
28 जसा माणसाचा पोरगा,तो ह्या साठी
नाई आला,कि तुमी त्याची सेवा करावी,पण
स्वता सेवाकरण्यासाठी आला,अन् सर्वांना
सोडण्याले अन् आपला जीवं द्या ले. 29 जवा
ते यरीहोतून निघू रायले,तवा एक मोठी
गर्दी त्याच्या मांग आली. 30 अन् पाहा,दोन
फुटके,जे सडकीच्या बाजूने बसलेले होतें,हे
आयकलं कि येशू चालला हाय,जोऱ्याने
म्हणूं लागले,कि हे प्रभू दाविदाच्या
पोरा,आमच्यावर दया कर. 31 लोकांनी
त्यांयलें दटावलं,कि चूप रा म्हणून,तरी पण
ते जोऱ्याने म्हणूं लागले,हे प्रभू ,दाविदाच्या
पोरां,आमच्यावर दया कर. 32 तवा येशूने
उभें राऊन,त्यांयलें बलावलं,अन् म्हणलं.
33 तुमच्या साठी काय करावे,कि मी तुमच्या
साठी करूं?त्यांयनं त्यालें म्हणलं,हे प्रभू,हेच
कि आमचे डोये उघडावं. 34 येशूला कळवडा
आला,त्यायच्या डोयांना स्पर्श केला,अन् ते
लगेचंच पाऊ लागले,अन् त्याच्या मांगे झाले.

21 1 जवा ते यरुशलेमाच्या जवळ
पोचले,अन् जैतून पहाडवर
बैतफच्या पासी आले,तवा येशूने शिष्यांना
हे सांगून पाठवलं, 2 कि आपल्या समोरच्या
गावात जा,अन् तती पोहचल्यावर गदी
बांधलेली अन् तिचं पिलू तुमाले भेटीन, ते
खोलून मा पासी आणा. 3 जर तुमाले कोणी
काई म्हणीन,तर म्हणा,कि प्रभूला याची
गरज हाय,तवा ते लगेचं पाठवतीन. 4 हे
यासाठी झालं,कि जे वचन भविष्यवक्त्याच्या
व्दारे म्हणल्या गेलं होतं,ते पूर्ण व्हावे. 5 कि
सियोनाच्या पोरीला सांगा,पाह्य,तुह्याल्या
राज्या तुह्या पासी येत हाय,तो नम्र हाय,अन्
गद्यावर बसलेला हाय,वरण शिंगरू.
6 शिष्यांनी जाऊन,जसं येशूने सांगतलं
होतं,तसचं केलं. 7 अन् गद अन् पिलू
आणून,त्यावर आपले कपडे टाकले,अन्
तो त्यावर बसला. 8 अन् खूप लोकांनी
आपले कपडे रस्त्यावर आतरले,आणखी
आणखी लोकांनी झाडाच्या फांद्याकापून
रस्त्यावर आत्रल्या. 9 अन् जे गर्दी समोर
समोर जाऊ रायली होती,ते मांग मांग येऊ
रायली होती,अन् मोठ्या मोठ्याने म्हणत
होतें,कि दाविदाच्या पोरां होशांना,धन्य
हाय तो जो प्रभूच्या नावाने येतो,आकाशात
होशांना. 10 जवा त्यानं यरुशलेमात
प्रवेश केला,तवा साऱ्या नगरात हलचल
मचली,अन् लोकं म्हणत होतें,हा कोण
हाय? 11 लोकांनी म्हणलं,हा गालीलातला
नासरेतला भविष्यवक्ता येशू हाय. 12 येशूने
देवाच्या मंदिरात जाऊन,त्या सर्वांना,जे
मंदिरात देवाण घेवाण करत होते,हकालून
लावलं,अन् सोनाराचे चौरंग अन् कबुतराय्लें
ईकणारे च्या बैटकि फेकून देल्या. 13 अन्
त्यांयलें म्हणलं,लीवलेल हाय,कि माह्यालं
घर प्रार्थनेच घर म्हणल्या जाईन परंतु,तुमी

तर ते डाकुंची गुफा करून टाकली. 14 तवा
फुटके,अन् लंगडे त्याच्या पासी आले,अन्
त्यानं त्यांयलें बरे केले. 15 परंतु महायाजक
अन् शास्त्र्यानं हे अद्‌भुत काम जे त्यानें
केलें होतें, अन् लंगड्याना मंदिरात दाविदा
पोरालें अन् होशांना म्हणतानें पायले,तवा
रागात येऊन त्यालें म्हणूं लागले,काय तू
आयक्त कि हे काय म्हणत हायत? 16 येशूने
त्यांयलें म्हणलं,हो ,काय तुमी हे कधी नाई
वाचलं,कि लेकरं अन् दुध पेणारे ताणूले
यायच्या तोंडातून तू स्तुती पूर्ण ठरवली
हाय. 17 तवा तो त्यायलें सोडून नगराच्या
बायर,बैतनीय्यात गेला,अन् तती रात्र भर
रायला. 18 सकाऊन जवा तो नगरात वापस
येऊ रायला होता,तवा त्यालें भूख लागली.
19 अन् अंजिराचे झाडं सडकीच्या काटावर
पाहून तो त्याच्या पासी गेला,अन् पत्ते पत्ते
पाहून दुसरं काई त्याला दिसलं नाई, तवा
त्यानं त्या झाडाले म्हणलं,आतापासून तुले
फळ येणार नाईत,तवा अंजिराच झाडं
लवकरच सोकून गेलं. 20 हे पाऊन शिष्यांना
आश्चर्य वाटलं,अन् म्हणलं,हे अंजिराच झाडं
कावून एकदम सोकून गेलं. 21 येशूने त्यायलें
उत्तर देलं,कि मी तुमाले खरंखोर सांगतो,जर
तुमी विश्वास ठेवसान,अन् संशय न धरला,तर
हेच नाई करसान जे अंजिराच्या झाडाले
केलें हाय,परंतु या पहाडाले म्हणालं,कि
उपटून समुद्रात जाऊन पड,तर हे होऊन
जाईन. 22 अन् जे काई प्रार्थनेमध्ये विश्वासाने
मांगसान,ते तुमाले भेटून जाईन. 23 तो
मंदिरात जाऊन उपदेश करू रायला
होता,महायाजक अन् लोकं वडील यांनी
त्याच्यावाल्या पासी येऊन विचारलं,तू हे
काम कोणाच्या अधिकाराने करतो?अन्
तू हा अधिकार कोण देला हाय. 24 येशूने
त्यांयलें उत्तर देलं,कि मी पण तुमाले एक गोष्ट
विचारतो,जर तुमी मले सांगसालं,तर मी पण
तुमाले सांगीन,कि हे काम कोण्या अधिकाराने
करतो. 25 योहानाचा बाप्तिस्मा कुठून होता?
स्वर्गाच्या इकून या माणसाच्या इकून होता?
तवा ते आपसात विवाद करू लागले,जर
आपुन म्हणूं,कि स्वर्गाच्या इकून,तर तो
आपल्याले म्हणीन,मंग तो म्हणीन तुमी
त्याच्यावर विश्वास का केला नाई. 26 अन् जर
म्हणूं,कि माणसाच्या इकून,तर आपल्याले
या गर्दीचा भेवं हाय,कावून कि ते सगडे
योहानाला भविष्यवक्ता मानतं होते. 27 तवा
त्यांयनं येशूला उत्तर देलं,कि आमाले नाई
माईत,त्यांन पण त्यांयलें म्हणलं,तर मी
पण तुमाले सांगत नाई,कि हे काम कोण्या
अधिकाराने करतो हाय. 28 तुमाले काय
वाटते?कि कोण्या माणसाचे दोन पोरं
होतें,त्यानं पयल्याच्या पासी जाऊन म्हणलं,हे
पोरां आज अंगुराच्या वाडीत काम कर.
29 त्यानं उत्तर देलं,मी नाई जाणार,परंतु
मांगे पस्तावला. 30 मंग दुसऱ्या पासी जाऊन
असंचं म्हणलं,त्यानं उत्तर देलं,हो जातो,पण
नाई गेला. 31 या दोगा पैकी कोण बापाची
इच्छा पुर्ण केली?त्यांयनं म्हणलं,पयल्याने
येशूने त्यांयलें म्हणलं,मी तुमाले खरंखोर
सांगतो,कि कर वसुली करणारे अन् वेश्या
तुमच्या पयले देवाच्या राज्यात प्रवेश
करणार. 32 कावून कि योहान धर्माच्या
मार्गाने तुमच्या पासी आला,अन् तुमी
त्याच्यावर विश्वास केला नाई,पण करवसुली
करणारे अन् वेश्या यांनी त्याच्यावर विश्वास
केला,अन् तुमी हे पाऊन मांग पण पश्चाताप
केला नाई,विश्वास केला नाई. 33 एक आणखी
कथा आयका,एक घरधनी होता,ज्यानें
अंगुराची वाडी लावली होती,अन् त्याच्या
चारही बाजूनें कूप भरला होता,अन् त्याच्यात
अंगुराच्या रसासाठी गडां खोदला,अन् माळा

बनवला,अन् किसानांना त्याच्या ठेका देऊन
प्रदेशात चालला गेला. 34 जवा फळ याची
वेळ जवळ आली,तवा त्यानं आपल्या दासांला
आपले फळ घेयासाठी किसानांच्या पासी
पाठवलं. 35 पण किसानांनी याच्यावाल्या
दासांना पकडून,कोणाले झोडलं अन् कोणाले
मारून टाकलं,अन् कोणाले गोटे मारले.
36 मंग त्यानं आणखी दासांना पाठवले,जे
पयले पेक्षा जास्त होतें,किसानांनी त्यांयच्या
संग पण तसचं केलं. 37 आखरी मध्ये त्यानं
आपल्या पोरांना,त्यांयच्या पासी हे सांगून
पाठवले,कि ते माह्याल्या पोरांच्या आदर करे.
38 परंतु किसान पोरांना पाऊन आपसात
म्हणलं,हे तर वारीस हायत,या त्यांयलें
पण मारून टाकू,अन् त्यांयचा हक्क घेऊन
घेऊ. 39 अन् त्यांयनं त्यांयलें पकडलं,अन्
अंगुराच्या वाडीच्या बायर हकालुन मारून
टाकलं. 40 म्हणून,जवा अंगुराच्या वाडीचा
स्वामी येईन, तवा त्या किसानांच्या संग काय
करीन? 41 त्यांयलें त्यालें म्हणलं,तो त्या
बेकार लोकांना मारून टाकीन,अन् अंगुराच्या
वाडीचा ठेका,दुसऱ्या किसानांना देईन,जे
टाईमावर त्यालें फळ देतं जातीन. 42 येशूने
त्यांयलें म्हणलं,काय तुमी कधी पवित्र
शास्त्रात हे वाचलं नाई, कि ज्या गोट्याले
राजमिस्त्री यांनी निकम्मा ठहरवलं,तोचं
कोपऱ्याचा गोटा झाला. 43 हे प्रभू च्या
इकून झालं,अन् आपल्या पाह्यनी मध्ये
अद्भुत हाय,म्हणून,मी तुमाले म्हणतो,कि
देवाचं राज्य तुमच्या पासून घेऊन घेतल्या
जाईन,अन् आशांच जातीले जे त्याचं फळ
आणतील देऊन देल्या जाईन. 44 जो या
गोट्यावर पडीन,तो चकनाचूर होऊन
जाईन,अन् ज्यावर तो पडीन,तो भुगा करीन.
45 महायाजक अन् परुशी त्याच्यावाल्या
कथेला आयकून,समजून गेलें,कि तो आमच्या
विषयात म्हणत हाय. 46 अन् त्यांयनं त्यालें
पकड्याले पायलं,परंतु लोकाच्या भयाने
भेऊन गेलें,कावून ते त्याले भविष्यवक्ता
मानतं होतें.

22 1 यावर येशू आणखी कथेतून सांगून
रायला. 2 स्वर्गाच राज्य त्या राज्या
सारखं हाय,ज्यानें आपल्या पोराचे लग्न केलें.
3 अन् त्यानं आपल्या दासांना पाठवले,कि
आमंत्रणकारी यांना लग्नाच्या जेवणा साठी
बलवावे,परंतु त्यांयलें इयाचं नोत. 4 मंग
त्यानं अजून दासांना हे सांगून पाठवले,कि
आमंत्रणकारीयांना सांगा,पाहा, मी जेवण
तयार केलें हाय,अन् माह्याले बईल पाडलेले
पशु मारल्या गेलें हाय,अन् सगळे काई तयार
हाय,लग्नाच्या पंगतीत या. 5 पण ते काई
मनावर न घेता,कोणी आपल्या वावरात
अन् कोणी आपल्या व्यापारासाठी चालले
गेलें. 6 अन् जे रायलेले होतें त्याच्यावाल्या
दासांना पकडून त्यांयच्या अपमान केला अन्
मारून टाकलें. 7 राज्याले रांग आला,अन्
आपली सेना पाठवून,त्या खुणाऱ्याना मारून
टाकलें,अन् त्यायच्या नगरायले अन् गावाले
आग लावून फुकून देलें. 8 तवा त्यानं आपल्या
दासांना म्हणलं,लग्नाचं जेवण तर तयार
हाय,पण आमंत्रणकारी लायकीचे नोतें.
9 म्हणून,तुमी चौकत जा,अन् जेवडे लोकं
तुमाले भेटतीन,त्या सगळयाना लग्नाच्या
जेवणासाठी बलाऊन आणा. 10 तवा त्या
दासांनी सडकी वर जाऊन, बेकार अन् जेवडे
चांगले लोकं भेटले त्या सर्वांना एकत्र केलं,अन्
लग्नाच घर जेवणाऱ्यानी खचबज भरून गेलें.
11 जवा राज्या जेवणाऱ्याना पायण्यासाठी
अंदर आला,तवा त्यानं ततीसाकं एक माणूस
पायला,जो लग्नाचे कपडे नाई घातलेला होता.
12 त्यानं त्यालें विचारलं हे दोस्तां,तू लग्नाचें
कपडे न घालता अती कावून आला?त्याचं

तोंड बंध रायलं. 13 तवा राज्याने सेवकांना
म्हणलें,याचें हातपाय बांधून,त्यालें बायर
अधांराच्या कोठरीत टाका,ततीसाकं रडण
दात खानं हाय. 14 कावून कि, बलावले लय
हायत,पण निवडलेलें कमी हायत. 15 तवा
परुशांनि जावून आपसांत विचार केला,कि
त्यालें कोणत्या गोष्टीत फसवायचे. 16 तवा
त्यांयनं आपल्या शिष्यांना हेरोदीयांच्या संग
त्याच्या पासी पाठवून म्हणलें,हे गुरु,आमाले
मालूम हाय कि तू खरा हायसं,अन् देवाचा
मार्ग खऱ्या मनाने शिकवतो,अन् कोणाची
भीड धरीत नाई,कावून कि तू माणसाचे
तोंड पाऊन गोष्टी नाई करत. 17 म्हणून
आमाले सांग तू काय म्हणतोस?कैसराला
कर देणें योग्य हाय,कि नाई. 18 येशूने
त्यांयचा कपट पाऊन म्हणलं,हे ढोंग्यांनो तुमी
माह्याली परीक्षा कावून पायता? 19 कर चे
नाणे मले दाखवा,तवा त्यांयनं एक रुपया
त्याच्यापासी आणला. 20 त्यानं,त्यांयलें
पुसलं,हे मूर्ती अन् नाव कोणाचे हाय.
21 त्यांयनं त्याला म्हणले,कैसराचे तवा त्यानं
त्यांयलें म्हणलं,जे कैसराचे ते कैसराला
द्या,अन् जे देवाचे हाय,ते देवाला द्या. 22 हे
आयकून ते अचंबित झाले,अन् त्यालें सोडून
चालले गेलें. 23 त्याचं दिवसी सदुकी जे
म्हणत होते कि,मेलेल्याचे पुनरुज्जीवन हि
नाई,ते त्याच्यापासी आलें अन् त्यालें म्हणले.
24 कि हे गुरु,मोशेने म्हणलें होते,जर कोणी
बिना लेकराचा मरून जाईन,तर त्याच्या
भाऊ त्याच्यावाल्या बायकोच्या संग लग्न
करून आपल्या भावाच्या साठी संतती
वाढविन. 25 तर आमच्याजवळ सात भाऊ
होतें,तर पयला लग्न करून मेला,अन् लेकरू
नसल्याने आपली बायको आपल्या भावासाठी
सोडून गेला. 26 आशांच प्रकारे दुसऱ्याने
अन् तिसऱ्याने केलें,अन् सातही भावापर्यंत
असचं झालं. 27 अन् त्या सर्वाचा मागून ते
बायको पण मरून गेली. 28 तर पुनरुत्थानात
ते सांतांतील कोणाची बायको,होईन,कावून
कि ते त्या सर्वाची बायको झाली होती.
29 येशूने त्यांयलें उत्तर देलं,कि तुमी पवित्र
शास्त्र अन् देवाच्या सामर्थ्याले नाई वयखत
या कारणाने तुमाले चुकतां. 30 कावून कि
पुनरुत्थानात लग्न करून घेत नाईत अन् लग्न
करून दिले जात नाईत,परंतु ते स्वर्गात
देवाच्या दुतांच्या समान हायत. 31 परंतु
मेलेल्याच्या पुनरुत्थानाच्या विषयात
काय तुमी हे नाई वाचले,जे देवाने तुमाले
सांगतले. 32 कि मी अब्राहामाचा देव,अन्
इसहाकाचा देव,अन् याकोबाचा देव हावो?
तो तर मेलेल्याचा नाई पण जिवंताचा देव
हाय. 33 हे आयकून,लोकं त्याच्या उपदेशाने
हापचक चकित झाले. 34 जवा परुशांनि
आयकलं,कि त्यानं सदुकीयांचे तोंड बंध
केलें,तवा ते एकत्र झाले. 35 त्यांयच्या तून
एक नियमशास्ती यानें परख्यासाठी, त्यालें
पुसलं. 36 हे गुरु,नियमशास्त्रात कोणती मोठी
आज्ञा हाय? 37 येशूने त्यालें म्हणलं,कि तू
देव प्रभू वर आपल्या सर्व्या मनाने,अन्
साऱ्या जीवाने,अन् आपल्या बुद्धीने प्रेम
कर. 38 मोठी अन् मुख्य आज्ञा तर हेच हाय.
39 अन् त्याच्या समान हे दुसरी पण हाय,कि
तू आपल्या शेजाऱ्यावर आपल्या समान प्रेम
कर. 40 हे दोन आज्ञा सर्वी व्यवस्था अन्
भविष्यवक्त्याचा आधार हाय. 41 जवा परुशी
एकत्र होते,तवा येशूने त्यांयलें विचारलं.
42 कि ख्रिस्ताचा विषयात तुमी काय
समजता?कि तो कोणाचा पोरगां हाय,त्यांयनं
त्यालें म्हणलं.दाविदाचा. 43 त्यानं त्यांयलें
पुसलं,तर दावीद आत्म्यात हून त्याला प्रभू का
म्हणतो. 44 कि प्रभूने,माह्या प्रभूला म्हणले,कि
माह्याल्या उजव्या बाजूने बस,जतलग मी

तुह्याल्या वैरांना तुह्याल्या पायाची चौकी
नाई करणार. 45 जवा दावीद त्यालें प्रभू
म्हणते,तर त्याच्या पोरगा कसा असीन?
46 तवा कोणाला त्याले एक शब्द देखील उत्तर
देता,आलं नाई अन् त्या दिवसापासून कोणाले
पण काई विचाराची हिम्मत झाली नाई.

23 1 तवा येशूने गर्दीले अन् आपल्या
शिष्यायलें म्हणलं. 2 शास्त्री
अन् परुशी मोशेच्या गादीवर बसले.
3 म्हणून,ते तुमाले म्हणतील ते करजाकं,अन्
मानजाकं,परंतु त्यांयच्या सारखे काम करूं
नका,कावून कि ते म्हणतात, पण करत नाईत.
4 ते एक अशा मोठ्या भारी वज्यालें ज्यालें
उचलनं कठीण हाय,बांधून त्यालें माणसाच्या
खांद्यावर ठेवतात,परंतु स्वता आपल्या बोटाने
पण सरकवत नाईत. 5 ते आपले सगळे काम
लोकांना दाखवण्यासाठी करतात,ते आपली
स्मरणपत्रे रुंद करतात,व आपल्या कपड्याच्या
झालरी मोठ्या करतात. 6 ते आणखी
जेवणावळीत मुख्य मुख्य जागा घेतात,अन्
सभेमध्ये मुख्य आसन. 7 अन् बाजारामध्ये
नमस्कार अन् माणसांना गुरुजी म्हणणे
त्यांयलें आवडते. 8 परंतु तुमी गुरुजी नका
म्हणूं,कावून कि तुमचा एकच गुरुजी हाय,अन्
तुमी सगळे भाऊ हा. 9 अन् पृथ्वीवर कोणाले
आपला बाप म्हणूं नका,कावून कि तुमचा
एकच बाप हाय,जो स्वर्गात हाय. 10 अन्
स्वामी पण नका म्हणूं,कावून कि तुमचा एकच
स्वामी हाय,अर्थात~ख्रिस्त. 11 जो तुमच्याईत
मोठा हाय,तो तुमचा सेवक बनला पायजे.
12 जो कोणी आपल्या स्वताला मोठं करीन,तो
लायणा केला जाईन,अन् जो कोणी आपल्या
स्वताला लायणा करीन,तो मोठा केला
जाईन. 13 हे कपटी शास्त्रियो,अन् परुशांनों
तुमच्यावर हायहाय"तुमी माणसाच्या
विरोधात स्वर्गाच्या राज्याचे दरवाजे
बंध करता,नाही स्वता त्याच्यात प्रवेश
करता,अन् नाही प्रवेश करणाऱ्याना प्रवेश
करू देता. 14 हे कपटी शास्त्रीयो,अन् परुशांनो
तुमच्यावर हायहाय"तुमी विधवांच्या घराला
खाऊन घेता,अन् दाखव्यासाठी मोठ्याने
प्रार्थना करत रायता,म्हणून,तुमाले अधिक
दंड भेटीन. 15 हे कपटी शास्त्रीयो,तुमच्यावर
हायहाय"तुमी एका झणालेआपल्या मतात
येण्यासाठी सारे समुद्र पाताळ मध्ये
फिरता,अन् जवा तो मतात येतो,तवा
त्यालें आपल्या पेक्षा दुप्पट असा गेहेन्नाचा
पोरगा बनवता. 16 हे फुटके वाटाड्यानों
तुमच्यावर हायहाय" जे म्हणता,कि जर
कोणी मंदिराची शपत खाईन,तरी काई
नाई,परंतु जर कोणी मंदिराच्या सोन्याची
शपत खाईन,तर तो बांधला हाय. 17 हे
मुर्खानो,अन् फुटक्यानों,कोण मोठा हाय,सोनं
या ते मंदिर ज्यानें सोनं पवित्र होते.
18 मंग म्हणता,कि जर कोणी वेदीची शपत
खाईन,तर काई नाई,परंतु जे भेट त्यावर
हाय,जर त्याची शपत खाईल तर ऋणी
हाय. 19 हे फुटके हो,कोण मोठं हाय,भेट या
वेदी,ज्यानें भेट पवित्र होतें. 20 म्हणून,जो
वेदीची शपत खाते,तो त्याची जे काई
त्यावर हाय,त्याची शपत खातो. 21 अन्
जो मंदिराची शपत खाते,तो त्याची व
त्यातल्या रायण्याऱ्याची पण शपत खाते.
22 अन् स्वर्गाची शपत खाते,तो देवाच्या
सिहासनाची अन् त्यावर बसणाऱ्याची
शपत खाते. 23 हे कपटी शास्त्रीयो,अन्
परुशांनो,तुमच्यावर हायहाय"तुमी पुदिना व
सोपं अन् जिरे चा दहवा भाग देता,परंतु,तुमी
नियमशास्त्रांचे गंभीर गोष्टी सोडून देल्या,पण
तुमी ह्या करायच्या होत्या,अन् सोडायच्या
नोत्या. 24 हे फुटके पुढारीहो ,तुमी मुरुकुट
गाळुन काढता,व उंट गीळुन टाकता. 25 हे

कपटी शास्त्रियो,अन् परुशांनो तुमच्यावर
हायहाय"तुमी कटोऱ्याला अन् पानदानाले
वरून वरून तर घासता,परंतु ते अंदर
असंयम माने भरलेले हायत. 26 हे फुटक्या
परुशा,पयले कटोऱ्यालें अन् पानदानालें
अन्द्रून धूय,म्हणजें ते बायरुन स्वच्छ हो. 27 हे
कपटी शास्त्र्यानो,अन् परुशांनो तुमच्यावर
हायहाय"तुमी चुना लावलेल्या कबरेच्या
समान आहा,जे वरून तर चांगली दिसते,परंतु
अन्दुन तर मुर्दाच्या हड्या अन् सऱ्या प्रकारची
मलीनता ने भरलेली हाय. 28 अशाच प्रकारे
तुमी पण माणसांना धर्मी दिसता,पण
अन्द्रून कपट अन् अधर्म भरलेला हाय. 29 हे
कपटी शास्त्रानो,अन् परुशांनो,तुमच्यावर
हायहाय"तुमी भविष्यवक्त्यांची कब्रा
अन् धर्मियांच्या कब्रा बनवता. 30 अन्
म्हणता,जर आमी आपल्या बापदादांच्या
दिवसांत असतो,तर आमी भविष्यवक्त्यांच्या
खुणा मध्ये त्यांयचे सहभागी झालो नसतो.
31 यावरून तुमी आपल्याच विरूद्ध साक्ष
देता,कि तुमी भविष्यवक्त्यायलें घात
करणाऱ्याची लेकरे हा. 32 तर तुमी आपल्या
बापदादांचे पापाचा घडा भरून द्या.
33 अरे सर्पाचे कुरुश्यांच्या पिलानों,तुमी
नरकाच्या दंडा पासून का पडता. 34 यामुळे
पाहा मी,तुमच्यापासी भविष्यवक्त्यांना
ज्ञानी अन् शास्त्र्यांना पाठवतो,तुमी
त्यांतल्या कईकांना मारू ठाकसान,अन्
वधस्तभावर चढवसान,अन् कईकांना
आपल्या सभेमध्ये फटके मारसान,अन् एका
गावातून दुसऱ्या गावात पर्यंत त्यांयच्या
मांग लागसान. 35 ज्या धर्मी हाबिला पासून
बिरीक्याह चा पोरगा जकरयाह पर्यंत ज्यालें
तुमी मंदिराच्या वेदीच्या मदात मारून
टाकलं,जेवड्या धर्मी लोकांचे रक्त पृथ्वीवर
सांडल,ते सगळ तुमच्या डोक्यावर येऊन
पडलं. 36 मी तुमाले खरंखोर सांगतो,ह्या
सगळ्या गोष्टी,या काळाच्या लोकांवर येऊन
पडेलं. 37 हे यरुशलेमे हे यरुशलेमे,तू ज्या
भविष्यवक्त्यांना मारून ठाकलं हाय,अन्
जे तुह्याल्या पासी पाठवले हाय,त्यांयलें
गोटमार करतो,कितीतरी वेळ मले वाटलं कि
"जसी कोंबडी आपल्या पिलांना आपल्या
पंखाच्या खाली एकत्र करते,तसचं मी पण
तुह्याल्या लेकरांना एकत्र करीन,पण तुमची
इच्छा नोती. 38 पाहा,तुमचं घर तुमच्यासाठी
ओसान सोडले हाय. 39 कावून कि,मी तुमाले
सांगतो,कि आतापासून जत पर्यंत तुमी नाई
म्हणसान, धन्य हाय तो,जो प्रभूच्या नावाने
येतो,तवा पर्यंत तुमी मले परत कधी नाई
पाहसान

# 24

1 जवा येशू मंदिरातून जाऊ रायला
होता,तवा त्याचें शिष्य त्याले
मंदिराची बनावट दाखव्यासाठी त्याच्या
पासी आले होते. 2 त्यानं त्यांयलें म्हणलं,काय
तुमी ह्या सगळ्या इमारती पाहत ना का,मी
तुमालें खरखोर सांगतो,अती गोट्यावर गोटा
पण रायणार नाई. 3 अन् जवा तो जैतुन
पहाडावर बसलेला होता,तवा शिष्यांनी
त्याच्या पासी अलग येऊन म्हणलं,आमाले
सांग कि ह्या गोष्टी कवा होतीन?अन्
तुह्या इयाच्या,अन् जगाच्या आखरीचे
चिन्ह काय राईण. 4 येशूने त्यांयलें उत्तर
देलं,सावधान रायजाक,कोणीही तुमाले ना
भरमाये. 5 कावून कि बरेचं से असे होतीन,जे
माह्याल्या नावांने येऊन म्हणतीन,कि मी
ख्रिस्त हावो,अन् बऱ्याचं झनाना फसवतीन.
6 अन् तुमी लढायांविषयी व लढायांच्या
चर्चा आयकसान,पाहा,घबरावू नका,कावून
कि,ह्याचं होणं अवश्य हाय,परंतु त्या वाक्ती
अंत नाई होईन. 7 कावून कि जाती जातीवर
अन् राज्य राज्यावर चढाई करीन,अन् जागो

जागी अकाल पडीन,अन् भूकंप होतीन. 8 ह्या
सऱ्या गोष्टी वेदनांचा सुरुवात हाय. 9 तवा ते
तुमाले संकटाच्या हवाली करतीन,व तुमाले
जीवाने मारतीन,अन् माह्याल्या नावाने
सऱ्या जातीचे लोकं तुमचा राग करतीन.
10 तवा बरेचं से ठोकर खातीन,अन् एका
दुसऱ्यावर वैर करतीन. 11 अन् बरेचं से खोटे
भविष्यवक्ता उठून उभे होतीन,अन् पुष्कळांना
फसवतीन. 12 अन् अधर्म वाढल्या मुळे
पुष्कळांचे प्रेम थंड होईन. 13 परंतु जो आखरी
पर्यंत धीरज धरून राईन,त्याचचं तारण
होईन. 14 अन् राज्याच्या हा सुसमाचार सऱ्या
जगात प्रचार केला जाईन,ह्या साठी कि सऱ्या
जातीवर साक्ष व्हावी म्हणून,तवा अंत येईन.
15 म्हणून ज्या ओसाडलेल्या बेकार वस्तू ची
ज्याची चर्चा दानियेल भविष्यवक्त्यांच्या
व्दारे सांगतल्या गेली होती,ते पवित्र स्थानात
उभी हाय,पाहा,जो वाचन तो समजीन.
16 तवा जे यहुदियात हायत,त्यांयनं पहाडावर
पऊन जावं. 17 जो घराच्या धाब्यावर
असेल,त्यानें आपल्या घरांत असलेल्या वस्तू
बायर काढून घेण्याकरिता खाली उतरू नये.
18 अन् जो वावरात असेल,त्यानें आपले
कपडे घेण्याकरिता माघारे येऊ नये. 19 त्या
दिवसामध्ये जे गरोधर अन् दुध पाजत
असतीन,त्यांयलें हायहाय". 20 अन् प्रार्थना
करा,कि तुमाले हिवाळयात किंवा शब्बाथ
दिवसी भागना पडे. 21 कावून कि त्या
वात्की,असे भारी संकट येईन,जे जगाच्या
सुरवाती पासून आजवर नाई झाले,अन् नाहि
कधी होईन. 22 अन् जर ते दिवस घटवले
नसते,तर कोणतेहि प्राणी वाचले नसते,परंतु
निवडलेले जे हायत त्यांयच्या बद्दल दिवस
घटवले हायत. 23 त्या वात्की जर कोणी
तुमाले म्हणीन,कि पाहा,मसिह अतीसाक
हाय,या ततीसाक हाय तवा विश्वास ठेऊ
नका. 24 कावून कि खोटे ख्रिस्त,अन् खोटे
भविष्यवक्ता उठून उभे रायतीन,अन् मोठमोठे
चिन्ह अन् अद्भूत कामे दाखवतीन,अन्
निवलेल्यांना पण भरमावतीन, 25 पाहा,मी
पयलपणा पासून हे सगळ सांगून देलेले हाय.
26 म्हणून जर ते तुमाले म्हणतीन,पाहा,तो
जंगलात हाय,बायर नाई निघावं,पाहा,तो
जो खोल्यांमध्ये हाय,तवा विश्वास ठेवू नका.
27 कावून कि,जसी बिजली पूर्वे पासून
निघून पश्चिमे पर्यंत चमकत जाते,तसेच
माणसाच्या पोराचे येणे होईन. 28 जती
शव असेल,ततीचं गिधाडे जमतीन. 29 त्या
दिवसाईत संकटानंतर तुरंत सूर्य अंधुक
होईन,अन् चंद्राचा उजिड जाईन,अन् प्रकाश
देणारे तारे पडतीन,अन् अभायातल्या
शक्तीया हालविल्या जातीन. 30 तवा
माणसाच्या पोराचे चिन्ह आभायात दिसून
येईन,अन् तवा पृथ्वीचे सगळे कुळाचे
लोकं छाती पिटतीन,अन् माणसाच्या
पोराला मोठ्या सामर्थ्याने अन् एश्वर्याने
आभायातल्या ढगावर येतांना पायतीन.
31 अन् तो तुरहीच्या मोठ्या शब्दाचा संग
आपल्या दूतांना पाठवीन,अन् ते आभायाच्या
या भागातून तर दुसऱ्या भागापर्यंत,चारही
दिशापासून त्याच्या निवडल्यांना एकत्र
करतीन. 32 अंजिराच्या झाडापासून हा
दृष्टात सिखा,जवा त्याची डांग कोमल असते
तवा पत्ते निगतात,तवा तुमी ओळखता कि
उन्हाळा जवळ आला हाय. 33 तसेच तुमीहि
ह्या सगळया गोष्टी पायसान,तवा ओळखून
जा,कि तो जवळ हाय,दरवाज्या पासी हाय.
34 मी तुमालें खरखोर म्हणतो,जवा पर्यंत ह्या
गोष्टी पूर्ण नाई होतं,तोपर्यंत हे पिढी नाईसी
नाई होईन. 35 आकाश अन् पृथ्वी मीठून
जाईन,पण माह्यालें शब्द कधीही टलनार
नाई. 36 अन् तो दिवस अन् ते घडीच्या बद्दल

कोणाले माईत नाई,नाही स्वर्गदूत अन् नाहि
पोरगा फक्त बापचं. 37 अन् जसे नुहाचे दिवस
होते,तसेच माणसाच्या पोराचे येणे राईन.
38 कावून कि जसे महापुराच्या पूर्वीच्या
दिवसांमध्ये जो पर्यंत नुहा जहाजावर चढला
नोता,त्या दिवसापर्यंत लोकं खातपीत
जात,अन् त्याच्यात लग्न वरात होतहोत्या.
39 अन् जतलग महापुराने त्यांयलें वावून
नाई नेलं,तवा पर्यंत त्यांयलें काहीही
मालूम नोत,तसेंच माणसाच्या पोराचे येणे
राईन. 40 त्या वाकती दोघं झण वावरात
रायतीन,एकाले घेतलं जाईन अन् दुसऱ्यालें
सोडलं जाईन 41 दोन बाया जाते दडत
असतीन,एकीले घेतले जाईन अन् दुसरीलें
सोडले जाईन. 42 म्हणून जागी राहा,कावून
कि तुमाले नाई माईत कि तुमचा प्रभू
कोणत्या दिवसी येईन. 43 परंतु जाणून घ्या
कि घरचा स्वामीले मालूम असत कि चोर
कोणत्या वाक्ती येते,तर तो जागत रायला
असता,अन् आपल्या घरात चोरी होऊ देऊ
शकला नसता. 44 म्हणून तुमी पण तयार
राहा,कावून कि ज्या घडी तुमी विचार पण
नाई करसान,त्याचं घडी माणसाचा पोरगा
येवून जाईन. 45 म्हणून हे विश्वासयोग्य अन्
बुद्धीमान दास कोण हाय,ज्यालें स्वामीने
आपल्या नौकर चाकरावर सुभेदार केलें
हाय,कि वेळेवर त्यांना जेवण दे. 46 धन्य
हाय,तो दास ज्याचा स्वामी असचं येवून
करते. 47 मी तुमाले खरखोर सांगतो,तो
त्यालें आपल्या सऱ्या धनावर वर सुभेदार
ठेवीन. 48 परंतु जर तो दृष्ट दास विचार
करीन,माह्याल्या धनी येण्यासाठी उशीर
हाय. 49 तवा तो आपल्या संगी दासांना
झोडपून,दारुड्याचा संग खातपीत असीन.
50 तर त्या दासाच्या स्वामी अशा दिवसी
येईन,त्या वाक्ती तो त्याची वाट पण पायत
नसीन. 51 अन् घडी त्यालें मालूम पण
नसावं,अन् त्यालें भारी ताडना देवून,त्याच्या
भाग कपटीयांचा संग ठहरविन,जती रडणे
अन् दात खाणे असीन.

25 1 स्वर्गाच राज्य त्या दहा
कुमारीकेच्या सारखे होईन,जे
आपले दिवे घेऊन नवरदेवाले भेटण्यासाठी
चालले. 2 त्यांयच्यात पाच मूर्ख अन् पाच
समजदार होत्या. 3 पण मूर्ख कुमारिकेने
आपले दिवे तर घेतली अन् कुप्पित मध्ये
तेल नाई घेतलं. 4 पण शहाण्यांनी आपले
दिवे तर घेतली अन् कुप्पित मध्ये तेलं
पण घेतलं. 5 तवा नवरदेवाले येण्यात वेळ
लागला,तवा ते त्यायले डुलक्या आल्या अन्
झोपं आली. 6 अर्ध्या राती हाक आली कि
पाहा,नवरदेव आला,त्यालें भेटण्यासाठी
चला. 7 तवा ते सगळया कुमारिका आपले
दिवे ठीक करू लागली. 8 तवा मुर्खांनी
समजदारांना म्हटले, आपल्या कुप्पितल्या
तेलातून आमाले द्या,कावून कि आमचे दिवे
ईजून रायली हायत. 9 पण समजदारांनी
उत्तर देलं, कदाचित हे आमाले अन् तुमाले
पुरणार नाई तुमी इकनाऱ्यापाशी जा आणि
ईकत घ्या. 10 जवा ते ईकत घेण्यासाठी जात
होती,तवा नवरदेव आला,अन् ते ज्या तयार
होत्या ते त्याच्यावाल्या संग लग्नाच्या घरात
गेल्या,तवा दरवाजा बंद झाला. 11 मंग नंतर
दुसऱ्या कुमारिका येऊन म्हणू लागल्या,हे
स्वामी हे स्वामी आमच्यासाठी दरवाज्या
उघड. 12 त्यानं उत्तर देलं,मी तुमाले खरोखर
सांगतो,मी तुमाले नाई वयखत. 13 म्हणून
जागे राहा,कावून तुमाले ते दिवस किंवा
घटका ठावूक नाई. 14 कावून कि, त्या
माणसाची दशा ज्यानं परदेश जातांना
आपल्या दासांना बलावून आपली समपत्ती
सोपुन देली त्या प्रमाणे हाय 15 त्यांन एकाले

पाच हजार रुपये अन् एकाले दोन हजार रुपये
अन् एकाले एक हजार रुपये असे त्यायचा
योग्य ते प्रमाणे देले,अन् तवा तो गावी गेला.
16 ज्यालें पाच हजार रुपये भेटले होते,त्यानं
लगेचं जाऊन व्यापार केला,अन् पाच हजार
रुपयें अजूक कमावले. 17 अशाच प्रकारे
ज्याले दोन हजार रुपये भेटले होते,त्यांनहि
अजुक दोन हजार रुपये कमावले. 18 पण
ज्याले एक हजार रुपये भेटले होते त्यांन
जाऊन जमिनीत रोवून टाकले लपून ठेवले.
19 बऱ्याचं दिवसानंतर त्याच्यावाला धनी
घरी येऊन त्यायचा लेखा जोखा घेऊ लागला.
20 ज्याले पाच हजार रुपये दिले होते,त्यांन
पाच हजार अजुक आणून म्हणले हे स्वामी
तू मले पाच हजार रुपये दिले होते, पाहा
मी अजुक पाच हजार रुपये कमावले हाय.
21 त्याच्या धन्यानें त्यालें म्हणलं,धन्य
हायसं चांगल्या अन् विश्वासयोग्य दासां तू
थोडंशाकं मध्ये विश्वास योग्य रायला,मी तुले
बऱ्याचं वस्तूवर अधिकारी बनवतो आपल्या
स्वामीच्या आनंदात सहभागी हो. 22 अन्
ज्यालें दोन हजार रुपयें भेटले होते,त्यानं
पण येऊन म्हणलं,हे स्वामी पाह्य,तू मले
दोन हजार रुपयें देलें होतें,मी दोन हजार
आजूक कमावले. 23 त्याच्या वाल्या धान्याने
त्याले म्हणलं, धन्य हायसं खऱ्या चांगल्या
विश्वास योग्य दासां थोडंसाक विश्वासयोग्य
रायला,मी तुले बऱ्याचं वस्तूवर अधिकारी
बनवीन आपल्या धन्याच्या आनंदात
सहभागी होऊन जाय. 24 तवा ज्याले एक
हजार रुपये भेटले होते, त्यानं येऊन म्हणलं
हे स्वामी मले मालूम हाय कि तू कठोर
माणूस हायसं, जती तू पेरले नाई, ततीसाकं
कापणी करतोस,अन् जतुन पसरवलं ठेवले
होते ततून गोळा करतो. 25 म्हणून मी भेलो
अन् जाऊन, एक हजार रुपये मी जमिनीत
खोदुन लपून ठेवले होते,परत ते तुमचे तुमाले
भेटले. 26 तवा त्याच्या धन्याने त्याले उत्तर
देलं, हे दृष्ट अन् आलसी दासां जती मी
पेरले नाईत तती कापतो अन् पसरून ठेवले
नाईत ततून गोळा करतो हे तुले ठावूक होते
काय? 27 तर माह्याले रुपये सावकारापासी
ठेवायचे म्हणनें,मी येऊन व्याजा सगट
वापीस मिळाले असते. 28 म्हणून ते ज्यालें
थोड्सक देलं हाय,वापस घ्या अन् ज्याच्या
पासी दहा हजार रुपये हायत, त्याले त्यालें
द्या. 29 कावून कि ज्याच्या पाशी लयमोठं
होईण,त्यालें देलं अन् त्यालें भरपूर देलं
जाईन,अन् जा कोना पासी नाई त्याच्या
जवळ जे असीन ते पण त्याच्या पासून काढून
घेतलं जाईन. 30 अन् त्या निकम्या निरुपयोगी
दासाले, बायर अंधारात टाका,जती रडणं
दात वासनं राईन दात खाने राईन. 31 जवा
माणसाचा पोरगा आपल्या महिमेन येईन
अन् सगळे देवदूत त्याच्या सगं येतील
तवा आपल्या महीमाच्या सिहासनावर
राज्यासणावर बसेल, 32 तवा सगळया जाती
त्याच्या समोर एकत्री केली जाईन, अन्
जसे मेंढपाळ मेंढरांना बकऱ्यापासून अलग
करतात,तसेच तो पण एका दुसऱ्या पासून
अलग करणारं. 33 तो मेढराणा आपल्या
बाजूने अन् बकऱ्याना डाव्याबाजुने ठेविन.
34 तवा राजा आपल्या उजव्याबाजुवाल्यांना
म्हणीन,हे माह्याल्या बापाचे धन्य लोकं हो
या अन् त्याच्यावाल्या राज्यांचे सहभागी
व्हा,जो जगाच्या आदी पासून तयार केला
हाय. 35 कावून कि मी उपासी होतो,अन् तुमी
मले खायले देलं मले तहान लागली तुमी मले
पाणी पाजलं मी परदेसी होतो अन् तुमी मले
आपल्या घरी थांबवल. 36 मी भोंगया होतो
अन् तुमी मले कपडे घातले ,मी बिमार तवा
तुमी माह्याली सुधी घेतली मी जेलात होतो

तवा तुमी मले भेटण्यासाठी आले . 37 तवा
धर्मी त्याले उत्तर देतील ,हे प्रभू आम्ही तुले
कधी उपाशी पायलं अन् खाऊ घातलं,अन्
तहानलेलं पायलं तवा पियाले पाणी दिल.
38 आमी कधी तुले परदेशी पायलं अन्
आपल्या घरी ठहरवलं.या भोगयं पायलं,अन्
कपडे घातलें. 39 आमी कवा तुले बिमार अन्
जेलात पायलं तवा तुले भेटण्यासाठी आले.
40 तवा राज्या त्यायले उत्तर देणारं, मी तुमाले
खरोखर सांगतो कि, तुमी ज्या माह्याल्या या
लहानातील लहान भावांच्या मध्ये कोण्या
एकाच्या सगं केलं ते माह्याल्या संग केलं.
41 तवा तो बायरवाल्यांना म्हणीन,हे स्त्रापित
लोकोहो,माह्याल्या समोरून त्या अनंत
आगीत चालले जा,जे सैतात अन् त्याच्या
दूतांच्या साठी तयार केलें हाय. 42 कावून कि
मी उपासी होतो,अन् तुमी मले जेव्याले नाई
देलें,मी ताहानलेला होतो,तुमी मले पाणी
नाई पाजले. 43 मी परका होतो,अन् तुमी
मले आपल्या घरात नाई रौ देलें,मी भोगया
होतो,तुमी मले कपडे नाई घातलें,बिमार अन्
जेलात होतो,तवा तुमी माह्याली काढजी नाई
घेतली. 44 तवा ते उत्तर देतीन,हे प्रभू,आमी
तुले कवा उपासी,अन् ताहानलेला अन् परखा
या भोगया या बिमार या जेलात पायलं अन्
तुह्याली सेवा अटल नाई केली? 45 तवा तो
त्यांयलें उत्तर देईन,मी तुमाले खरखोर सांगतो
कि,तुमी जे या लाहानातून लायण्याले कोण्या
एका संग पण नाई केलं,ते माह्याल्या संग पण
नाई केलं. 46 अन् ते अनंत दंड भोगतीन पण
धर्मी अनंत जीवनात प्रवेश करतीन.

# 26

1 जवा येशूने ह्या गोष्टी
सांगतल्या,तवा आपल्या शिष्यांना
म्हणूं लागला. 2 तुमाले मालूम हाय,कि दोन
दिवसांनतर वल्हांडनाचा सन हाय,फसहअन्
माणसाचा पोरगा वधस्तभांवर चढवण्या
करिता पकडल्या जाईन. 3 तवा प्रधान
याजक अन् प्रजाचे पुरनिये कायफा नावाचा
महायाजकाच्या आंगणात एकत्र झाले. 4 अन्
आपआपसांत विचार करूं लागले कि येशूले
कपटाने पकडून मारून टाकू. 5 पण ते म्हणत
होते,सणाच्या वाक्ती नाई,असं नाई व्हावं
कि लोकांच्या मध्ये युद्ध व्हां. 6 जवा येशू
बेथनिय्याह मध्ये शिमोन कोढ्याच्या घरी
होता. 7 तवा एक बाई संगमरच्या पात्रात
सुगंधी तेलाची कुप्पी घेऊन,अन् जवा तो
जेवण करण्यासाठी बसला होता, तवा
त्याच्या डोक्शावर ओतून देले. 8 अन् हे पाऊन
त्याचें शिष्य रागावून,म्हणूं लागले,याचां नाश
कावून केला हाय? 9 हे तर चांगल्या पैयशात
इकून गरिबांना वाटलें जाऊ शकते. 10 हे
जाणून येशूने त्यांयलें म्हणलं,बाई ला कावून
त्रास देता?तिनं तर माह्याल्या साठी चांगल
काम केलं. 11 गोरगरीब तर नेहमी तुमच्या
पासी हायत,परंतु मी नेहमी तुमच्यापासी
नाई. 12 तिनं जे माह्याल्या शरीरावर तेलं
ओतले हाय,तें मले पुरण्याच्या तयारीसाठी
केले हाय. 13 मी तुमाले खरंखोर सांगतो,कि
सऱ्या जगात जती हे सुवार्था प्रचार केला
जाईन,तती या तिच्या कामाचें वर्णन पण केलें
जाईन. 14 तवा यहूदा इस्करितो नावाचा
बारा शिष्यातून एक ज्यानें महायाजकाच्या
पासी जाऊन म्हणलं. 15 जर मी त्यालें तुमच्या
हाती पकडून देईन,तर मले काय भेटीन?
त्यांयनं त्यालें तीस चांदीचे शिक्के मोजून
देलें. 16 अन् तवा पासून तो त्यालें पकडून
देण्याचा मोका पाऊ लागला. 17 अखमिरी
भाकरीच्या सणाच्या पयल्या दिवसी,शिष्य
येशूच्या पासी येऊन विचारू लागलें,तुह्याली
काय इच्छा हाय कि आमी तुह्या साठी
वल्हांडनफसह खाण्याची तयारी कुठंसाकं
करावं. 18 येशूनं म्हणलं,नगरात अमक्या

माणसाच्या घरी जा त्यालें म्हणा,गुरुर्जी
म्हणतें,कि माह्याली वेळ जवळ हाय,मी
माह्याल्या शिष्याच्या संग तुह्या घरी सण
साजरा करतो. 19 तवा शिष्यांनी येशूची
आज्ञा मानली,अन् फसह तयार केली. 20 जवा
संध्याकाळ झाली,तवा बारा शिष्याच्या
संग जेव्याले बसला. 21 जवा ते जेवू रायले
होतें,तवा त्यानें म्हणलं,मी तुमाले खरखोर
सांगतो,कि तुमच्यायं पैकी एक मले पकडून
देईन. 22 यावरून ते लय नाराज झालें,अन्
एक एक त्यालें विचारू लागलें,कि गुरुजी,
काय तो मी व्हावं? 23 त्यानं उत्तर देलं,ज्यानं
माह्याल्या संग पानदानात हात टाकले,तोचं
मलें पकडून देईन. 24 माणसाच्या पोराविषयी
जसं लीवलेलं हाय,तसा तो जातो खरा,परंतु
त्या माणसासाठी दु:ख हाय,ज्याच्याच्याने
माणसाचा पोरगा पकडून देला जाते,जर
त्या माणसाच्या जन्म झाला नसता तर
ते त्याच्या साठी बरे असतें. 25 तवा जो
त्यालें पकडून देणार होता,त्या यहूदाने
म्हणलें,कि हे गुरुजी,काय तो मी हावो?
26 येशूनं त्यालें म्हणलं,तू सांगून बसला,जवा
ते जेवू रायले,तवा येशूनं भाकर घेतली,अन्
धन्यवाद देऊन मोडली,अन् शिष्यांना देऊन
म्हणलं,घ्या,खा,हे माह्याले शरीर हाय. 27 मंग
त्यानं प्याला घेतला,धन्यवाद देला,अन्
त्यांयलें देऊन म्हणलं,तुमी याच्यातून प्या.
28 कावून कि हे नव्या कराराचे माह्यालें रक्त
हाय,जे सऱ्याच्या पापाचा साठी ओतले गेलें
हाय. 29 मी तुमालें सांगतो.कि अंगुराच्या हा
रस त्या दिवसालगु पेईन नाई जो पर्यन माह्या
बापाच्या राज्यांत तुमच्या बरोबर नवीन रस
नाई पिणं. 30 मंग ते भजन गाऊन जैतुनाच्या
पहाडावर गेलें. 31 तवा येशूने त्यायलें
म्हणलं, तुमी सगळे आज माह्याल्या बद्दल
अडखळात कावून कि असा शास्त्रलेख हाय,मी
मेंढपाळांला मारीन,अन् कळपातल्या मेंढरांना
दाना फान होईन. 32 पण मी उठून गेल्यावर
तुमच्या पयले गालीलात जाईन . 33 तवा
पेत्राने त्यालें उत्तर देलं,आपल्याविषयी सर्व
अळखले तरी हि मी कधी हि अळखनार नाई.
34 येशू ने त्याला म्हणले मी तुले खरखोर
सांगतो ह्याचं रातीत कोंबडा बाग देण्याच्या
पयले तू तीन वेळा मले नाकारशीन. 35 तवा
पेत्राने त्यालें म्हणलं,"जर मले तुह्याल्या संग
मरण्याचं पण पडीन तरी मी मांग सरकणार
नाई तवा सर्व सर्व शिष्यायन तसचं म्हणलं.
36 जवा येशू शिष्याय बरोबर गतसमनी
नावाचा एका जागी आला अन् आपल्या
शिष्यांना म्हणूं लागला,"अतीसाकं बसून
रायजाक जतलग मी तती जाऊन प्रार्थना
करतो. 37 तवा तो पेत्राले अन् जब्दीचा
दोनीही पोरांना संग घेऊन गेला अन् उदास
अन् व्याकूळ होऊ लागला. 38 तवा त्यानं
त्यांयलें म्हणलं,माह्याला जीवं लय उदास
हाय,अतलगकि माह्याला जीवं निगुन जात
हाय,तुमी अतिसाक थांबा अन् माह्याला
संग जागी राहा. 39 मंग तो समोर जाऊन
उभडा पडला,अन् त्यानं असी प्रार्थना केली,हे
माह्याल्या बापा होईन तर हा प्याला
माह्याल्या पासून दूर ठेव,तरी पण माह्याली
नाई पण तुह्याली इच्छा पूर्ण होवो. 40 मंग तो
शिष्याच्या पासी आला तवा त्यानं पायलंकि
ते झोपलेले होते,तवा त्यानें पेत्राला म्हणलं,
काय तुमी माह्याल्या सोबत एक घडी पण
जागू नाई शकले. 41 तुमी परीक्षेत पडावं
नाई म्हणून,जागी राहा अन् प्रार्थना करा
आत्मा तर तयार हाय पण शरीर दुर्बल
हाय. 42 आणखी त्यानं दुसऱ्यांदा प्रार्थना
केली, हे माह्याल्या बापा हे मी पेल्याशिवाय
हटून जात नाई तर तुह्याल्या इच्छेच्या
प्रमाणे होवो. 43 मंग तो परत येऊन त्यांयलें

झोपतांना पायले कावून कि त्यायचे डोये
झोपेच्या गुंगीत होते . 44 त्यांयले सोडून तो
परत चालला गेला,अन् त्याचं शब्दामध्ये
तिसऱ्या वेळ प्रार्थना केली. 45 तवा त्यानं
शिष्यांच्या पासी येऊन त्यायलें म्हणलं,आता
झोपत राहा,अन् आराम करत राहा,पाहा,वेळ
जवळ आली हाय,अन् माणसाचा पोरगा पापी
लोकांचा हातून पकडला जाईन. 46 उठा चला
पाहा,मले पकडणारा जवळ आला हाय. 47 तो
हे म्हणू रायला होता,तवा यहूदा जो बारा
मधून एक होता,आला अन् त्याच्या सोबत
प्रधान याजक अन् लोकांचे पुरनिये याच्या
इकून मोठ्या मोठ्या तलवारा अन् काड्या
घेऊन आले. 48 त्यालें धरून देणाऱ्यारा
त्यायले असी खून सांगू ठेवली होती कि मी
ज्याचा मुका घेईन तोच हाय त्यालें धरजाक.
49 अन् तवा लवकरचं येशूच्या पासी येऊन
म्हणलं,हे गुरुजी नमस्कार अन् त्याचा मुका
घेतला. 50 येशू ने त्यालें म्हणलं,हे मित्रा
ज्या कामासाठी तू आला हाय,ते कर तवा
त्यांयनं जवळ येशूला धरले. 51 तवा येशूच्या
साथीदारा पैकी एकाने हात लांब करून
आपली तलवार उपसली व प्रमुख याजकाच्या
दासावर प्रहार केला अन् त्याच्या कान कापून
टाकला. 52 तवा येशूनं त्यालें म्हणलं,आपली
तलवार जागच्या जागी घाल कावून कि
तलवार धरणारे सर्व जण तलवारीने नाश
करतीन. 53 काय तुले माईत नाई काय?माह्या
बापाच्यापासी मले मागता येत नाई काय
आताच्या आताच तो माह्यासाठी देवदूतांना
बारा सैन्या पैकी अधिक पाठवून देणार.
54 पण पवित्र शास्त्राचा शास्त्रलेख पुरा झाला
ज्या गोष्टी लीवलेल्या हायत असचं होणे
आवश्यक हाय कसे पूर्ण होणार. 55 त्याचं
वेळी येशू लोकसमूदायाला म्हणला"एखाण्द्या
चोराले धरावे तसे मले धरण्यासाठी तुमी
आले आहात मी हर रोज मंदिरात बसून
उपदेश देत जावो,अन् तवा तुमी मले नाई
पकडलें. 56 पण हे सगळ या साठी झालं,कि
भविष्यवक्त्यांचे वचन पूर्ण हो,तवा सगडे
शिष्य त्यालें सोडून पयाले. 57 मंग येशुले
अटक करणाऱ्यानी त्यालें कायफा याजक
ह्याच्या पासी नेलें शास्त्री अन् पूरनीये तती
साकं जमले होतें. 58 तवा पेत्र दुरून दुरून
त्याच्यावाल्या मांग मांग महायाजकाच्या
आंगनालग गेला,अन् अंदर जाऊन शेवट
पाहण्या करिता कामदारांच्या पासी जाऊन
बसला. 59 प्रमुख याजक अन् सर्वी न्याय सभा
येशुले जीवाने मारण्यासाठी त्याच्यावाल्या
बाऱ्यात खोटे आरोप लावू लागले. 60 अन्
बरेचं खोटे साक्षीदार आले असतांनाहि तो
त्यायलें भेटला नोता तरी आखरी मध्ये दोगे
झन म्हणलें,कि. 61 देवाचं मंदिर मोडन्यास
अन् तीन दिवसात ते बांधणार त्यात मी
समर्थ हाय,असं यानं म्हणलं होतं. 62 तवा
महायाक उभा हून येशूला म्हणला,"तू काईच
का उत्तर देतं नाईस?ते तुह्याल्या विरोधात
साक्ष देतात हे काय? 63 पण येशू चूप
रायला,तवा महायाजकानं त्यालें म्हणलं,मी
तुले जिवंत देवाची शपत देतो,जर तू देवाचा
पोरगा हायसं,ख्रिस्त हायसं,तर आमाले सांग.
64 येशूने त्यालें म्हणलं,तू स्वत: म्हणलं अन् मी
तुमाले म्हणले आतापासून तुमी माणसाच्या
पोराला सर्वशक्तिमान देवाच्या उजव्या बाजूने
बसलेले अन् आभायातून ढगांवर येताने
पायसान. 65 यावर महायाजकाने आपले
कपडे फाडले अन् म्हणलं,"त्यानं देवाची
निंदा केली,आता आमाले साक्षीदारांची काय
गरज पहा आता तुमी निंदा आयकली हाय.
66 तुमी काय विचार करता,तवा त्यायनं उत्तर
देलं,हा वधस्तभाच्या योग्य हाय, 67 तवा
त्यांयनं त्याच्यावाल्या तोंडावर थुंकले अन्

त्यालें कोढे फटके मारले,दुसऱ्यानं थापड
मारली अन् म्हणलं. 68 अरे ख्रिस्ता आमाले
भविष्यवाणीच्या व्दारे सांग कि तुले कोण
मारलं. 69 तवा पेत्र बायर आंगणात बसलेल्या
होता,तवा एक दासी त्याच्या पासी आली अन्
म्हणलं,तू पण येशूच्या संग होतानारे. 70 तवा
त्यानं सगळ्याच्या समोर मना केलं कि मले
नाई माईत कि,तू काय म्हणलें. 71 जवा तो
बायर देवडीवर गेला तवा दुसरीने त्यालें
पाहून म्हणलं,हा तर त्या नासरी येशूच्या
संग होता. 72 परत त्यानं शपत खाल्ली अन्
म्हणलंकि मी या माणसाला वयखत नाई.
73 मंग काई वेळा नंतर ततीसाक उभें रायणारे
जवळ येऊन पेत्राला म्हण्लें"खरंखोर तू पण
त्यातला हायसं नारे कावून कि तुह्याल्या
बोलीवरून मालूम पडते कि तू कोण हायसं.
74 तवा तो धीक्कारून"शपत खाऊ लागला अन्
म्हणूं लागला,मी त्या माणसाले वयखत नाई
तेवढ्यात कोंबड्यांने आरोळी केली. 75 तवा
कोंबडा आरोळी करण्यापूर्वी तू मले तीन वेळा
नाकारसीन,असे जे येशूने पेत्राला सांगतले
होते ते त्यालें आठवले तवा तो बायर जाऊन
मोठंमोठ्याने दु:खात रडूं लागला.

27 1 जवा सकाळ झाली तवा सगडे
प्रधान याजक अन् लोकांचे वडील
यायनं येशुले मारून ठाकण्याची सम्मती
केली. 2 त्यांयनं त्यालें बांधल अन् घेऊन
जाऊन पिलातूस सुभेदाराच्या हाती सोफुन
देलं. 3 जवा तो शिक्षास पात्र ठरवण्यात
आला तवा असं पाहून त्यालें पकडून देणारा
यहूदा पस्तावला अन् तीस चांदीच्या सिक्के
आणून प्रधान याजकाला म्हणूं लागला.
4 मी निर्दोशाचा घात करण्यासाठी पकडून
पाप केले हाय,त्यानं म्हणलं आमाले काय
तुयं तुलेच माईत. 5 तवा त्यानं चांदीच्या
सिक्कांना मंदिरात फेकून देले अन् चालला
गेला अन् जाऊन आपल्या स्वत:ले फासी
लावली. 6 प्रधान याजकानी त्या सिक्कांना
घेऊन म्हणलं,"सिक्कांना तिजोरीत ठेवणं
ठीक नाई कावून कि हे रक्ताचे मोल हायत.
7 मंग त्यांयनं आपसाआपसात विचार
करून त्या रुपयांना परदेशातील लोकांना
गाडण्यासाठी कुंभारा पासून वावर ईकत
घेतले. 8 तवा पासून तर आजपर्यंत त्या
वावराले रक्ताचे वावर असे म्हणतात.
9 तवा जे वचन यीर्मया भविष्यवक्त्यांच्या
व्दारे सांगितले होते ते पूर्ण झाले ते असे कि
अन् ज्याचें मोल इस्राएलाच्या वंशा पैकी
काहींनी हरवले त्याचे मोल म्हणजें ते तीस
हजार रुपये त्यांयनं घेतले. 10 अन् देवबापानं
म्हणलें आज्ञा केल्या,त्याचं प्रमाणे कुम्बांराचे
वावर होण्यासाठी त्यांयनं देलं. 11 जवा येशू
सुभेदाराच्या समोर उभां होता,तवा सुभेदार
त्यासं म्हणले विचारले"काय तू यहुदियांच्या
राज्या हायसं?येशू ने त्यालें म्हणलं,तू
स्वता:हि म्हणूं लागला हाय. 12 जवा प्रधान
याजक अन् वडील त्यावर दोष लावू रायले
होतें,तवा त्यानं काई उत्तर नाई देलं. 13 यावर
पिलाताने त्यालें म्हणलं,"काय तुले आयकू येत
नाई कि काय हे तुह्याला विरोधात किती
साक्ष देऊ रायले हाय. 14 पण त्यानं त्यालें
एका गोष्टीचे उत्तर देलं तवा सुभेदाराने
मोठं आश्यर्य वाटलं. 15 सुभेदाराची हे रीत
होती कि त्या सणाले ते लोकांच्या साठी
कोण्याएका बंदीला ज्यालें ते चाहत सोडून
देत होते. 16 त्या वाक्ती त्यायच्या अति
बरब्बा नावाचा एक माना हुवा एक कैदी
होता. 17 जवा ते एकत्र झाले तवा पिलाताने
त्यालें म्हणलं,"तुमाले कोण पायजे' कि मी
तुमच्यासाठी करावं अन् कोणाले सोडून देऊ
बरब्बाले या येशू जो ख्रिस्त म्हणल्या जाते?
18 कावून कि त्यालें मालूम होतं त्यांयनं त्यालें

हेव्याने धरलं हाय. 19 जवा तो न्यायाच्या
गादीवर बसलेला होता,तवा त्याच्या
बायकोने त्यालें निरोप पाठवला कि तू त्या
धर्मिच्या बाऱ्यात हात नको टाकू कावून कि
मी स्वप्नामध्ये त्याच्यावाल्या कारणाने दु:ख
झेलले हाय. 20 प्रधान याजक अन् वडीलांनी
लोकांना उकसवलं कि ते बरब्बा ले मांगाव
अन् येशूचा नाश करावं. 21 सुभेदाराने
त्यास विचारलं या दोघायपैकी कोणाले
चाहता,कि मी तुमच्या साठी करावं,त्यांयनं
म्हणलं 'बरब्बा. 22 पिलाताने त्यालें विचारलं
मंग येशू जो ख्रिस्त म्हणल्या जाते,त्याचं
काय करावं?सगळ्यांनी त्यायले म्हणलं
"त्यालें वधस्तभावर चढवा. 23 सुभेदाराने
म्हणलं,कावून बा..यानं असं कोणत बेकार
काम केलं हाय.पण ते कल्ला करून करून
म्हणूं लागले,"त्यालें वधस्तभावर चढवा.
24 जवा पिलाताने पायले कि काहीही केलें
तरी हंगामा थांबू नाई रायला तवा त्यानं
पाणी घेऊन गर्दीच्या समोर आपले हाथ
धुतले अन् म्हणलं मी या धर्मीच्यारक्ताने
निर्दोष हाय तुमचं तुमीचं पाहा. 25 तवा
सगळ्या लोकांनी उत्तर देलं,याच्यावाल
रक्त आमच्यावर अन् आमच्या वाल्या
लेकरांवर असो. 26 यावरून त्यानं बरब्बा
ला त्यांयच्या साठी सोडून देलें अन् येशुले
कोडे फटके मारून त्यायच्या हवाले देऊन
देलें,कि क्रुसावर वधस्तभावर चढवला
जावं. 27 तवा सुभेदाराच्या शिपायाने येशुले
किल्लावर जाऊन सगडी तुकडी एकत्र
करून त्याच्यावाल्या चवभवंताल जमवले.
28 अन् त्याच्यावाले कपडे काढून त्यालें
लाल रंगाच्या झगा घातला. 29 काट्याचा
मुकुट गुपून त्याच्या मस्तकावर ठेवला
त्याच्या उजव्या हातात वेत दिला अन्
त्याच्यावाल्या समोर घुटने टेकून"म्हणूं
लागले"हे यहुद्याच्या राज्या नमस्कार त्याची
थट्टा मांडली. 30 ते त्याच्यावर थुक्लें व तोचं
वेत घेऊन ते त्याच्यावाल्या मस्तकावर
मारू लागले. 31 मंग त्याच्यावाली मजाक
थट्टा केल्यावर त्यांयनं त्याच्या अंगातून तो
झगा काढून त्याची कपडे त्याच्यावाल्या
आंगात घातले अन् ते त्यालें वधस्तभावर
चढवण्यासाठीघेऊन गेलें. 32 ते बायर जात
असता सिमोन नावाचा कोणी एक कुरेनेकर
माणूस त्यास आढळला त्यालें त्यायनं
त्याच्यावाला वधस्तभ वाहण्याकरिता धरले
होते. 33 मंग गुलगुता नावाच्या जागी, म्हणजें
कवटीची जागा ततीसाक येऊन पोहचल्यावर.
34 त्यांयनं त्यालें पित्तमिश्रित'द्राक्षांरस पियाले
देला पण त्यानं चोखल्यावर तो पेईना.
35 त्यालें वधस्तभावर खिळल्यावर त्यांयनं
चिठ्या टाकून त्याच्यावाले कपडे काढून
घेतली अन् वाटून घेतले. 36 अन् ततीसाकं
बसून त्याच्यावाला पहारा देऊ लागले.
37 त्यांयनं त्याच्या डोक्यावर दोषारोपाचा
लेख लिवून लावला, तो असा"हा यहुदीयांचा
राजा येशू हाय. 38 त्याचं वेळी त्यांयनं
त्याच्याबरोबर दोन चोरांना एकाला
उजव्या बाजूने एकाला डाव्याबाजुने असे
वधस्तभावर चढविले होते. 39 अन् जवळून
येणारे जाणारे"डोके वरते करून त्याच्यावाली
असी निंदा करत होते कि. 40 अन् हे म्हणत
होते,हे मंदिराला पाडणाऱ्या अन् तिसऱ्या
दिवसी बनवणाऱ्या आपल्या स्वता:चा
बचाव कर जर तू देवाचा पोरगा हायसं तर
वधस्तभावरून उतरून ये. 41 अशाच प्रकारे
प्रधान याजक अन् शास्त्री अन् वडील समेत
त्याच्यावाली थट्टा मजाक करूं लागले अन्
म्हणत होते. 42 यानं दुसऱ्याना वाचविले,अन्
आपल्या स्वत:हाचा बचाव नाई करूं
शकत,हा तर इस्त्राएलाच्या राजा हाय,आता

जर वधस्तभावरून उतरून येयीन तर आमी
त्याचा विश्वास करू. 43 त्यानं देवाचा भरोसा
ठेवला हाय,जर तो याले चाहते तर सोडून
नेईन कावून कि यानं म्हणलं होतं मी देवाचा
पोरगा हाय. 44 अशाच प्रकारे डाकू पण
त्याच्यावाल्या बरोबर वधस्तभावर चढवले
होतें त्याच्यावाली निंदा करत होतें. 45 तवा
दुसऱ्या प्रहरा पासून तर तिसऱ्या प्रहरा
पर्यंत या सर्व्या देशात अंधार पडला होता.
46 तिसऱ्या प्रहरी च्या जवळ येशूने मोठ्याने
आरोळी ठोकली अन् म्हणलं"एली एली लमा
शबखतनी"अर्थात हे माह्या देवा हे माह्या देवा
तू मले कावून सोडलं. 47 जे ततीसाकं उभें होते
त्यायच्यातून कईकांनी हे आयकून म्हणलं,हा
तर एलियाले आवाज देते. 48 त्यायच्या तून
एक झण धावत जाऊन स्पंज घेतला अन् तो
ओबेंने भरून बोरुच्या ठोकावरठेवून त्यालें
चोखण्यास देला. 49 कईकांनी म्हणलं,असू दे
एलिया त्यालें वाचण्याले येते काय पाऊ.
50 मंग येशूने मोठ्याने ओरडून आपला जीवं
सोडला. 51 तवा पाहा पवित्रस्थानातील
पर्दा वर पासून खालंपर्यंत फाटून दोन भाग
झाला,जमीन कावली खडक फुटले. 52 अन्
कब्रा खोलल्या अन् झोपलेले पवित्र लोकं
बरेचंसे शरीर जे होते उठवली गेली. 53 अन् ते
त्याच्या पुनरुस्थानानंतर कब्र मधून जे निगाले
ते पवित्र नगरात जाऊन अनेकांना दिसले.
54 तवा सुभेदार अन् जे त्याच्या संग येशूचा
पहरा देवू रायले होते,भूकंप अन् जे काई
झालं होतं त्यालें पाहून खुपचं भेलें होतें अन्
म्हणू लागले खरोखर हा देवबापाचा पोरगा
होता. 55 तती बऱ्याचं बाया ज्या गालीलातून
येशूची सेवा करत त्याच्यावाल्या संग आले
होते,दुरूनच हे पायत होती. 56 त्यायच्यात
मरियम मगदलिनी अन् याकोब अन् योसेस
ची माय मरियम अन् जब्दीच्या पोराची
माय होती. 57 जवा संध्याकाळ झाली,तवा
योसेफ नावाचा अरीमतीया एक धनवान
माणूस जो स्वता येशूचा शिष्य होता आला.
58 त्यानं पिलाताच्या पासी जाऊन येशूचे
शव शरीरमांगतले यावर पिलाताने देऊन
देण्याची आज्ञा देली. 59 योसेफा ने शरीर
घेतले चमकीदार चाद्रात गुडावून. 60 अन्
त्याला आपल्या नवीन कबरे मध्ये ठेवले जे
त्यानें पहाडावर खोदलेली होती,अन् कब्रेच्या
दरवाज्यावर मोठा गोटा ढकलून चालला
गेला. 61 मरियम मगदलिनी अन् दुसरी
मरियम ततीसाकं कबरे पासी समोर बसली
होती. 62 दुसऱ्या दिवसी जो तयारी चा दिवस
होता,त्याच्या आगोदरच्या दिवसी प्रधान
याजक अन् परुशी अन् पिलाताने त्याच्या
पासी एकत्र होऊन म्हणलं. 63 हे महाराज तो
ठ्गी जिवंत होता,त्यानं म्हणलं होतं कि मी
तीनदिवसाने मी परत जिवंत होईन,असा तो
म्हणे आठवण हाय. 64 म्हणून तिसऱ्या दिवसा
पर्यंत कब्रेच्या बंदोबस करण्यासाठी सांगावे
नाई तर कदाचित त्याच्यावाले शिष्य त्याले
येऊन त्यालें चोरून नेतीन व तो मेलेल्यातून
जिवंत झाला हाय असं सांगतीन मंग शेवटली
फसगट पयल्यापेक्षा खराब होईन. 65 तवा
पिलास म्हणला,"तुमच्यापासी पाहारा
हाय, जा तुमच्याने होईन तसा बंदोबस
करा. 66 मंग पहरेदाराला घेऊन ते बरोबर
गेले,अन् त्यायनं गोटयावर मुहर लावून
कब्रेची रखवाली केली.

28 1 शब्बाथाच्या नंतर पयल्या दिवसी
सकाळीच मरियम मन्दालिनी
व दुसरी मरिया ह्या कब्रेच्या पासी
पाहण्यासाठी आला. 2 तवा पाहा,मोठा
भूकंप झाला,कावून कि प्रभूच्या देवदूत
स्वर्गातून उतरला होता,अन् जवळ येऊन
त्यानं त्या गोट्याले एका बाजून लोटला

अन् त्यावर तो बसला. 3 त्याच्यावालं रूप
बिजली सारखे चमचमीत अन् त्याचे कपडे
बर्फासारखे शुभ्र होते. 4 त्याच्यावाल्या
भयाने पाहारेकरी थरथरकापले अन् मृतप्राय
झाले. 5 तवा स्वर्गदूतांनी देवदूतांन त्या
बायांना म्हणलं,भेवूं नका मले मालूम हाय
कि तुमी येशुले जो क्रुसावर वधस्तभावर
चढवल्या गेल्या येशुले पायत आहा,हे मले
ठाऊक हाय. 6 तो अतीसाकं नाई हाय,पण
आपल्या वचनाव्दारे जिवंत झाला,हाय,या
ते जागा पाहा,जतीसाकं प्रभू पडला होता.
7 अन् लवकर जाऊन शिष्यांना सांगा कि
मेलेल्यातून उठला हाय,पहा तो तुमच्या
आधी गालीलात जातो हाय,ततीसाकं
तुमचा नजरीत पडीन पाहा,मी तुमाले हे
सांगतले हाय. 8 तवा त्या बाया भयाने अन्
मोठ्या आनंदाने कब्रेंच्या पासून लवकर
निघून आल्या त्याच्यावाल्या शिष्यांना
सुवार्था देण्यासाठी पयत गेल्या. 9 तवा येशू
त्यायलें भेटला अन् म्हणलं,नमस्कार त्यांयनं
जवळ येऊन त्याच्यावाले पाय पकडले अन्
त्यालें नमन केलें. 10 तवा येशूने त्यांयलें
म्हणलं,भेवू नका माह्याल्या भावांना जाऊन
सांगा कि गालीलात चालल जावं ततीसाकं
मले पायसान . 11 ते जाऊन रायले असता
कि पहरेदारापैकी काईनी नगरात जाऊन
पूर्ण हालचाल प्रधान याजकाले सांगून
देला. 12 तवा त्यांयनं वडीलांचा संग एकत्र
होऊन एकजूट होऊन सम्मती केली अन्
सिफायांना भरपूर चांदी देऊन म्हणलं.
13 हे म्हणजाकं कि जवा आमी राती झोपू
रायलो होतो,तवा त्याच्यावाले शिष्यांनी
त्यास येऊन त्यालें चोरून घेऊन गेले. 14 अन्
जर हे गोष्ट सुभेदाराच्या पासी तर आमी
त्यालें समजावीन अन् तुमाले जोखीम पासून
वाचविन. 15 मंग त्यांयनं पयसे घेऊन जसं
शिकविल गेलं होतं तसचं केलं हे गोष्ट
आजपर्यंत यहुदियात चालू हाय. 16 अकरा
शिष्य गालीलात ल्या पहाडावर येशूने
सांगून ठेवला होता त्यावर गेलें . 17 तवा
त्यायनं त्यालें पाऊन ततीसाकं नतमस्तक
झाले नमन केला पण कोणा कोणाले संदेह
वाटला. 18 तवा येशूने त्यायच्या पासी येऊन
म्हणलं,स्वर्गाचा अन् पृर्थ्वीचा सर्व अधिकार
मले देलेला हाय. 19 म्हणून तुमी जा सगळया
जाती जातीच्या लोकांना शिष्य बनवा,अन्
त्यांना बाप,पुत्र,अन् पवित्र आत्म्याच्या
नावाने बाप्स्तिमा द्या. 20 त्यायलें सगळया
गोष्टी जे मी तुमाले आज्ञा केल्या हाय ते मानने
शिकवा,अन् पाहा मी जगाच्या आखरी पर्यंत
सदासर्वदा तुमच्या संग हावो.

# MARK

# मरकुस

1 1देवाचा पोरगा येशू ख्रित ह्याच्या
शुंभवर्त मानाची सुर्वात 2जसं यशया
भविष्यवक्ताच्या ,पुस्तकात लीवलेलं आहें.
कि.पाय मि आपल्या दुताला तुया पय्ले,
पाटवतो.तो तुया मार्ग तयार करीन 3जंगलात
ऐक आवाज देणाऱ्याचा शब्द आवाज आयकून
येऊन रायला होता, तो असा कि देवाचा
मार्ग तयार करा अन् त्याचा रस्ता चांगला
सरका करा. 4योहान आला जंगलात प्रगट
झाला. त्या प्रमाणें पापाच्या क्षमेसाठी मन
फिरवून अन बाप्तिस्मा चा संदेश देऊन रायला
होता, 5 5तवा सगंळया यहुदी प्रदेशातले अन्
यरुशलेमातले सगळें रायाणारे निघूनं त्याच्या
पाशी आले 'अन् आप आपल्या पापाय्ले
मानून यरदन नदीत त्याईनं बाप्तिस्मा घेतला,
6योहान उंटाच्या केसांचे कपडे घालून अन्
त्याच्या कंम्रीले चांभड्याचा कमर्बंध बांधून
रायतं जाय अन् तो तोळे अन् रान मधुं
खात जाये, 7अन् असा संदेश देत होता.कि
माह्या मांगून जो येणार तो मायाउन हि
शक्ती शाली आहें . मि त्याच्या लायक
नाही. कि झुकून त्याच्या जोड्याच्या लेसा
सोडू , 8मि तुमचा बात्तीस्मा पाण्यानं
केला; पण तो तुमचा बाप्तिस्मा पवित्र
आत्म्याच्या द्वारे करणार, 9त्या दिवसात असं
झालं कि येशू ख्रिस्त गालीलाच्या नासरत
उन येऊनं येरदन नदीत योहानच्या हातून
बाप्तिस्मा घेतल, 10अन् जवा तो पाण्यातून
निगुन बाहेर आला तवा लवकरचं त्यान
अभायाले उघडतांना अन् आत्म्या ले कबुतरा
सारखं आपल्या वर्ते उतरतान पाय्ल. 11अन्
आभायातून हे आकाशवाणी झाली. कि तू
माह्या वाला आवडता पोरगा आहे .तुयावर
मि प्रसंन्न आहें 12मंग आत्म्यान लवकर त्याले
जंगलाच्या इकडे पाटवल. 13जंगलात त्याची
चाळीस दिवसा पर्यंत सैतांनान त्याची परीक्षा
घेतली . अन् तो वनपशु संग रायला. अन्
स्वर्गदूताईन त्याची सेवा केली, 14योहान
पकडल्या गेल्यावर येशू ख्रिस्तान गलीलात
येऊन देवाच्या राज्याच्या बाऱ्यात विषयावर
प्रचार केला. 15अन् म्हटलं कि वेळ पूर्ण झाली
, अन् देवाचं राज्य जवळ आले. आहें, मन
फिरून पच्याताप सुवार्तेवर विश्वास ठेवा,
16मंग गालील समुद्राच्या काटावर चालत
जात- असतांना त्यानं शिमोन व त्याचा भाऊ
आन्ध्रीयास ले समुद्रात जाळ टाकतांना पायलं
काउण कि ते मासोया पकडणारे होते, 17मंग
येशून त्यायले म्हटलं माह्या मागे या मि
तुम्हाला माणसाइले पकडणार बनविण. अस
मि तुम्हाला करीन 18अन् ते लवकरचं जाह्य
सोडून त्याच्या मांग मांग चालू लागले, 19मंग
ततून थोडं दूर गेल्यावर त्यान जब्दी चा
पोरगा याकुब अन् त्याचा भाऊ योहानले
पण जायाले चागलं करताना पायलं. 20मंग
त्याईन त्यांयले लवकरच बलावल मग त्याय्न
त्याइच्या बाबाले जब्दिले काम वाल्याइ संग
सोडून देल. अन् ते पण चालले गेले 21मंग
ते काफरनहुमात आले. अन् ले लवकरच
ते शाब्बाथ दिवसी सभास्थानात जाऊन
तो भाषण दिऊन रायला, 22अन् त्याच्या

भाषनाण लोक हापचक ठपं झाले,शास्त्रीय
लोकाइ सारखं नाई पण अधिकाऱ्या सार्क
भाषण देऊन रायला होता . 23 अन् त्याचं
वेळी त्याच सभास्थानांत एक असा माणूस
होता. त्याले अशुद्ध आत्मा लागलेली होती,
24 त्यान जोऱ्यानं आवाज देऊन म्हटंल हे येशू
नासरेत-करास आमच तुया संग काय समंध
तू काय आमचा नास करायले. आला काय
? मि तुले ओळखतो. कि तू कोण हास ?
देवाचा पवित्र जन 25 त्यान जोऱ्यानं आवाज
देऊन म्हटंल हे येशू नासरेत-करास आमच
तुया संग काय समंध तू काय आमचा नास
करायले. आला काय ? मि तुले ओळखतो.
कि तू कोण हास ? देवाचा पवित्र जन
26 तवा अशुद्ध आत्मा त्याच्या तून त्याले पिळून
टाकून अन् मोठ्यान कल्ला करून त्याच्या
तून निगुन गेली. 27 या गोष्टीवर सगळे लोक
अचंभा करत एक दुसऱ्या संग गोष्टी करू
रायले. कि बावा हि गोष्ट काय हाय बावा ,हे
कसं नवीन शिखऊन राय्ला, तो अधिकारान
अशुद्ध आत्माइले पण आज्ञा देते,अन् ते
पण त्याची आज्ञा मानतात , 28 हे सगंळी
कीर्ती लवकरंच गालीलच्या आसपास सगंळया
देशात अन् सगंळया जागी पसरली, 29 सभा-
स्थानातून निघाल्यावर तवा तो याकुब अन्
योह्नच्या संग सिमोन अन् आन्ध्रीयासच्या
घरी आले, , 30 अन् सिमोंनची सासू तापाण
आजारी पडलेली,होती त्याईनं येशूले लवकरच
सांगितले . . 31 तवा त्यांन जवळ जाऊन
तिचा हात पकडून तिले उठवल अन् तिचा
ताप लवकरच निगुन गेला, अन् ते त्याची
सेवा करू लागली. 32 संध्याकाळी म्हणजे सूर्य
डूबल्यावर सगंळया बिमार लोकाईले. अन्
दुष्ट आत्मवाल्या लोकाईले पण आणल. 33 अन्
सगळया गावातले लोक दरवाज्या पाशी
जमा झाले. 34 अन् त्याईन नाना प्रकारच्या
लोकाईले .बिमाऱ्याइले चांगलं केलं अन् लय
दुष्ट आत्म्याईले काढंल त्याईले,बोलू नाई .देल
. कावून कि ते त्याइंले ओळखत होती, 35 अन्
तो सकाळीच मोठ्या लवकर उटून पायटीत
बाहेर गेला ,अन् जंगलात जाऊन त्यानं तती
प्रार्थना केली. 36 मंग सिमोन अन् त्याचे
सोबती त्याले पाह्याले गेले, 37 तो त्याईले
भेटल्यावर त्याईन त्याले म्हणलं कि सर्व जन
लोक तुम्हाले पावून रायले. 38 तवा त्याईन
त्याले म्हणलं जवळच्या गावात जाऊन मि
तती भाषण कराव म्हणून आपण दुसरी कडे
जाऊ. करण कि मि याच उददेशान निघालो.
39 असा तो संगळया गलीलात अन् त्याईच्या
सभा स्थानांत जाऊन प्रचार करत अन् दुष्ट
आत्म्याइले काडत रायला. . 40 अन् एक
कुष्ठरोगी त्याच्या पासी आला अन् त्याईच्या
पुडे़ ़ येऊन घुंटणे टेकून त्यान त्याईले वीन्नती
केली. कि जर तुझी इच्छा असील तर मले
चागलं 41 तवा त्याले त्याच्या वर दया आली.
अन् त्यान हात लम्भा करून त्याले हात लाऊन
सांगितल कि माई इच्छा आहें. कि तू शुद्ध
हुन जाय , 42 मंग तवा त्याचा लवकरच
कुष्ठरोग चांगलाला गेला , अन् शुद्ध झाला,
43 मंग त्यान त्याले चीताऊन सांगून लवकर
पाठून देल, 44 अन् त्यान त्याले म्हंटल कि
पाय कोणाले काही सांगू नको. पण तू जाऊन
सो;ताले . याजकाले दाखव अन् तू चांगल्या
होण्याच्या बाबद जे काई मुसानं ठरवलं आहें.
अर्पण कर, कि त्याचावर साक्षी हो, 45 पण
त्यान या संगळया गोष्टी भाषण देऊन खुलंम-
खुल्ला सांगतल्या कि येशु बाहेर व नगरात पण
जायेना म्हणून तो बाहेर जंगलातल्या जागी
रायला, तरी पण लोक चहूकडून त्याच्या पाशी
येत जात

2 1 काई दिवसान तो पुन्हा कफर्णहुमत
आला असं आयकलं कि तो घरी आहें. ,

2तवा एवडे लोक जमा झाले कि दरवाजाच्या
इकून तिकून पण त्याईले जागा नोंती, तवा
तो भाषण देउन रायला होता, 33 मंग त्याचा
पासी एका लकव्याच्या माणंसाले चार
माणसाईन उचलून आणलं , 4अन् त्याईले
गर्दी च्यान ते त्याच्या पासी जाऊ शकले,
नाही म्हणून त्याईन तो जती उभा होता,
ततीच छपर उसलुन काडली ,अन् वाट पावून
ज्या बाजीवर तो लकव्याचा रोगी झोपला
होता, त्याईन ततून खाली सोडलं. 5अन्
येशून त्यैईचा विश्वास पावून त्या लकव्याच्या
मानसाले म्हटल कि पोरा तुह्या पापाची
शमा झाली, आहें . 6तवा कितीक शास्त्री
तती बसले,होते अन् आप आप ल्या मनात
विचार करून रायले होते , 7कि हा माणूस
असा काऊन बोलते हा त देवाची निंदा करते
देवा शिवाय कोणी पापाची शमा करू शकत,
नाई 8ते आपसात असा विचार करत होते,
येशु न लवकरच आपल्या आत्म्यात जानल
अन् म्हणलं कि तुम्ही आपल्या मनात असा
विचार कायले,करता ? 9तुया पापाची
शमा झाली,आहें असं लकव्याच्या मानसाले
म्हणलं ,'या असं म्हणन कि उठ आपली बाज
उचलून चल असं म्हणलं यातून कोणंत सोप,
आहे 10माणसाच्या पोराला पृथ्वीवर च्या
पापाची शमा करण्याचा अधिकार आहें,हे
तुम्हाले समजावे,, म्हणून तो लक-व्याच्या
मानसाले म्हणतो. 11मि तुले सांगतो उठ
आपली बाज उचलून आपल्या घरी चालला
,जाय/12अन् तो उठला त्याची बाज उचलून
तो सगळ्या समोर चालला गेला, यावर
सर्व हापचंप झाले, अन् देवाचे गौरव करत
म्हणाले,कि आम्हीत अस कधीच पाय्ल नाही
. 13तरी तो निगुन समुद्राच्या काटावर गेला,
अन् सगळे लोक त्याच्या पासी आले, अन्
तवा त्यान त्याईले शिक्षण देल, 14जाता
जाता त्यानं हलफई चा पोरगा लेवी तो
जकाइति च्या नाक्या वर बसलेला पाय्ल.
अन् त्याले म्हटलं कि माझ्या मांग ये ,तवाच
तो उठून त्याच्या मांग निघाला, 15मंग अस
झालं कि तो त्याच्या घरी लय जकातदार
व पापी लोक जेवाले सगळे झन एकाच
पंगतीत बसले, कारण कि ते लय जंन होते,
16अन् फरेसी व शास्त्री न हे पावून कि तो
पापि अन् जकात दाराइ संग जेवण करून
रायला.ते पाहून त्याच्या शिष्याईले म्हटलं
कि हा त जकात दार व पापी लोकाईसंग
जेवते, 17हे आयकून येशुन त्याईले असं
म्हटल कि निरोग्याला चांगल्याइले वैद्याची
गरज नाही,परंतु रोग्याईले आहें, मि धर्मी
लोकइले नाही, पन पापी लोकइले बलंव्याले
आलो, 18तवा योहानाचे शिष्य अन् फरीशी
उपवास करून रायले होते, मंग ते येऊन
त्याईन त्याले म्हटल, कि योहानाचे शिष्य
अन् फरीशी उपवास करतात, अन् तुझे शिष्य
उपवास काऊन नाई करत, 19येशून त्यैले
म्हटल कि वराडा संग नवंरदेव आहेत,तथं
पर्यंत त्याईले उपवास कर्ता येईल , काय?
जत पर्यंत नवरदेव त्याईच्या बरोबर आहें,
तथ पर्यंत त्याईले, उपवास कर्ता येत नाही
. 20तरी ते दिवस येतील , कि नवरदेव
त्याईच्या पासून अलग केल्या जाईल, तवा
ते त्या दिवशी उपास ठेवतील, 21कोणी
कोण्या फळक्याचा तुकडा जुन्या कपड्याले
लावत नाही लावला तर धळ करण्यासाठी
लावलेला तुकडा म्हणजे जुन्याले फाळते, अन
जुन्या पेक्षा नवीन फाटते, 22कोणी नवीन
द्राक्षरस जुन्या बोतलात ठेवत नाही ,पण
ते नविन द्राक्षरसाले जुन्या बोतलात ठेवल
तर बोटल्या फुटतात,अन् द्रक्षारस सांडते,
म्हणून नवीन द्राक्षरस नवीन बोतल मद्दे
ठूतात 23मंग अस झालं कि शब्बाथ दिवसी

वावरातून जात असतांना.त्याच्या शिष्याईन
रस्त्यान जाताना कणंस तोडून रायले, होते ,
24 तवा फरशीन त्याले म्हटलं पाय हे शब्बाथ
दिवसी जे कऱ्याले नाही ते हे कायले करतात,
25 येशून त्याईले म्हटलं कि दाविदाला
गरज पडली,म्हणजे त्याले व त्याच्या
बरोबरच्याईले भूक लागली होती तवा त्यान
काय केलं, 26 त्यान काउन अबियातार प्रमुख
याजक असतांना तो देवाच्या देवळात कायले
गेला, अन् ज्या समर्पित भाकरी याजका
शिवाय कोणीस नाही,खात जाये,त्या त्यान
खाल्ल्या.अन् त्याच्या संग जे होते ,त्याईले
कशा खायाले,देल्या हे तुमच्या वाचण्यात
आल नाई काय ? 27 अन् त्यान त्याले
म्हणलं कि शब्बाथ माणसा साठी झाला
,माणूस शब्बाथासाठी झाला,नाई 28 म्हणूनच
माणसाचा पोरगा शब्बाथाचा मालक धनी
आहें ,

3 1 अन् तो पुन्हा सभास्थानात गेला ,तती
एक माणूस होता तो लुल्या हाताचा
होता, 2 अन् त्याच्यावर दोष लावण्यासाठी कि
तो शब्बाथ दिवशी तो त्याले चागलं .करते
काय,ते पायाले ते .टपून होते, 3 अन् त्याईन
त्या लुळया हाताच्या मानसाले, सांगतल
कि मधात उभा राय , 4 अन् त्यान त्याईन
म्हटल.कि शब्बाथ दिवसी चागलं करण ,या
बेकार करण या जीववाचवण.या मारण यातून
चागलं कोणत आहें, पण ते चूप राय्ले.
5 मंग त्यान त्याच्या मनाले .कटीन करून
उदास होऊन त्या सगळयाच्या इकडे रागान
पायलं. अन् त्या मानसाले, म्हणलं कि आपला
हात लंम्बां कर अन् त्यान लंम्बा केला अन्
तो चालला गेला . 6 मंग फरीसी बाहेर
जाऊन लवकरच हेरोदियासच्या संग गोष्टी
केल्या.कि त्याले कसं मारलं पायजें. 7 येशू
आपल्या शिष्याईले घेऊन.समुद्राच्या इकडे
गेला ,तवा गालीलातून लय लोक त्याच्या
मांग चालले, 8 अन् याहूदिया येरुशलेम .इदोन
अन् येरदनच्या तीकळच्या प्रांत अन् सोर व
सिदोन च्या जवळ पासची लय लोको अलग
अलग प्रदेशातून यासाठी आले कि तो किती
अद्भुत सामर्थ्या चे कामं येशू करतो. 9 मंग
यीशुने आपल्या शिष्यायले कि लय गर्दीच्यानं
एक डोंगा तयार करायले सांगतला. 10 कारण
कि येशून लय झनायले,बऱ चागलं केलं होत,
म्हणून जेवडे लोक बिमार होते.ते सगळे
त्याच्या अंगावर पडून रायले,होते 11 जवा
अशुद्ध आत्मे त्याले पायत होते तवा ते
त्याच्या पाया लागून,जोऱ्यान म्हणत कि तू
देवाचा पोरगा आहेस . 12 अन् असे म्हणत
कि मले प्रगटकरू नोका असं त्याईन त्याइले
लयखेप सांगितल`. 13 मंग येशू पहाडावर
चढल्यावर जे जे त्याच्या मनाले चांगले
वाटल,त्याईले.त्यान बलावलं, अन् ते त्याचा
पाशी गेले, 14 तवा त्यान बारा झनायाले
निवळं यासाठी कि त्याइन आपल्या संग
राहावं अन् ते पाठविन कि भाषण दे,
15 अन् ते बिमाऱ्याइले चागलं करण,अन् भूत
कड्याचा अधिकार त्याईले असावा, 16 अन्
त्यान सिमोन ला पतरस नाव ठेवल. 17 जब्दी
चा पोरगा याकोब व याकोबाचा भाऊ योहान
याइले बेनेरे-गेश म्हणजे गर्जनेचा पोरगा
हे नाव दिल. 18 अन् आंद्रियास ,फीलिप
,बर्थलयम,मतय ,थोमा ,अल्फिचा पोरगा
याकुब , तद्य ,,सिमोन कनांनी, 19 अन् येहुदा
इस्कारियो ज्यांन येशूले धरून देल्त 20 अन् तो
घरी आला. एवडे लोक तती आले.कि त्याले
भाकर खायाले पण त्याले वेळ भेटला नोता
21 तवा त्याच्या घरी असं आयेक्ल. कि त्याले
कड्याले निघाले. कावून कि ते म्हणत जात
कि याचं डोक्स ठीकाण्यावर नाही. 22 तसचं
येरुशलेम उन जे शास्त्री खाली आले होते

अन् त्याले सैतान लागला आहें. तो भुताच्या
साह्यांन तो भूतं काढते, 23 तवा त्यान आपल्या
जवळ बलाउन त्याईले,गोष्टीत कथाइत म्हणून
रायला. की सैतान सैंतानाले कसा काढ़ीन,
24 जर बा कोन्या राज्यात फुट पडली.तर
राज्य टिकत नाई, 25 तसचं आपल्या घरात फुट
पडली तर ,घर पण टिंकत नाई. 26 जर सैंतान
त्याचाच विरोद करतो त त्याच्यात हि फुट
पड्ते अन् तो टिकत नाई, त्याचा नाश होते,
27 ताकत वान मानसाले बांधल्या शिवाय
कोणी ताकतवाणाच्या घरी जाऊन,चोरी नाही
करू शकत ,त्यांले बांद्लावर तो त्याचे घर
लुटीन. 28 मि तुम्हाले.सांगतो कि माणसाचे
पोरं जे काई पण पाप अन् बेकार निंदा.करतील
त्या सर्व्यासं क्षमा होईन. 29 पण जर कोणी
पवित्र आत्म्याच्या विरुद्ध बोलीन.त्याचे पाप
कधीच क्षमा नाई होईन.अन् तो सदा साठी
त्याचा पापाचा गुनेगार राहिन. 30 त्याले
असे म्हणत कि त्याले बेकार आत्मा लागेल
आहें.असं त्याले म्हणत, म्हणून तो असा म्हणतं
जाय. 31 तवा त्याची आई अन् त्याचा भाऊ
आला. अन् बाहेर निरोप पाठून त्याईन त्याले
बलाव्ल . 32 त्याच्या आजूबाजून लय लोक
बसले होते,त्यान त्याले म्हणल .कि आप्ले
आई व भाऊ बाहेर आपला शोध करून
रायले. 33 येशुन त्याईले उत्तर देल.मांहि आई
कोण अन् भाऊ कोण ,अन् जे त्याच्या आजू
बाजुले बसले होते.त्याइच्या इकडे पावून
तो म्हणाला,माहि आई अन् मांये भाऊ पा,
34 अन् जो कोणी देवाचा इच्छेप्रमाणे वागतो
चालतो,तोच माह्या भाऊ ,बहिण व आई आहें
. 35 होते,त्यान त्याले म्हणल .कि आप्ले आई
व भाऊ बाहेर आपला शोध करून रायले.

4 1 अन् आजून तो एका नदीच्या काटावर
भाषण देऊन.रायला. होता, अन् लय
लोक त्याच्या पाशी जमा झाले . 2 अन् तो
गोष्टी कथा सांगून अन् लय गोष्टी त्यानं
त्याच्या भाषनात सांगून रायला अन् यो
नदीत एका डोंग्यात जाऊन बसला अन् सगळे
गर्दी लोक जमिनीवर नदीच्या किनाऱ्या-वर
उभें होते. 3 कि आईका पाहा एक पेरनं
करणारा पेरणी करायला निघाला, 4 अन्
तो पेरत अस्थांना अस झालं कि काही बीज
रसत्यावर पड्ल अन् ते पाखराईन येऊन
खाऊन टाकलं, 5 अन् काई बी गोट्याइत
खड्कावरपड्ल तती त्याईले लय माती
नाही भेटल्यान ते लवकर उगय्ले . 6 अन्
सूर्य निघाल्यावर त्याले ऊन लागली,त्याले
मूंई नोह्ती ,म्हणून ते वाऊन गेलं. 7 अन्
काई बीज काट्याच्या झाडायंच्या मंधात
पड्ल, अन् झाड्यान वाढून त्याईले निगु
नाही. देल .म्हणून त्याले काईच पिकलं नाही,
8 अन् काई बीज चांगल्या मातीत पड्ल,अन्
उगल्यावर मोठ होते अन् त्याले तीसपट,
साठपट ,शंभरपट पिकते, 9 अन् मंग त्यान
म्हणलं कि,ज्याच्या पासी आयक्याले,कान
हायत, त्यान , आय्काव. 10 जवा तो एकटा
रायला,तवा त्याच्या संगच्याईन अन् बारा
झणाईन,या गोष्टीच्या विषयी त्याईन
विचारलं 11 येशून त्यान त्याईले म्हंणल
तुम्हाले त देवाचं राज्य च रहेस्य,समजून
घेण हे तुम्हाले.देल आहें,परंतु बाहेर वाल्या
साठी,सगळ्या गोष्टी कथा न होतात.
12 याच्यासाठी कि,पायत असताना पायायच
व त्यास कळत नाई ,आयकत असतांना
आयकाव . अन् त्याले नाही समजे.अस नाही
झालं पाहीजे कि ते फिरून अन् क्षमा केले
जात, 13 तवा त्याईले त्यान म्हणल.काय
तुम्हाले हे गोष्ट समजली, अन् अजुक सगळ्या
गोष्टी कशा समजाल. 14 पेरणारा वचन
प्रेरत असतो. 15 रस्त्यावर पेरलेल वचन जे
पेरल्या जाते . ते असे आहेत कि त्यैई्न

वचन आयेकल्यावर सैतान लवकर येऊन जे
वचन पेरल आहे ते उचलून गेऊन जातो.
16अन् गोत्याई-वर पेरलेल अस आहें,ते
वचन आयेकतात आनंदान ग्रहण करतात,
17अन् त्याच्या अंदर मूयॉ नसल्या न काहीच
दिवसासाठी ते रायते, अन् वचना पासून
जर सताव झाला,ते लवकरच मांग हट्टात
18झाडाईत पेरल्या गेलेलं त्याईन वचन
आयेकल, 19अन् त्याईले संसाराची काळजी
,पैसे ,धोखा ,वस्तूंचा लोभं त्याचीयात
जाऊन वाढ होत नाही,अन् ते निष्फळ वाया
जाते. 20चांगल्या मातीत पेरलेल ते असं
आहें,ते वचन आयकून स्वीकारतात मंग
कोणी तिसपट ,कोणी साठ्पट,कोणी शंभरपट
असे पिक देतात . 21अजुक त्यान त्याईले
असं म्हणल,कि दिवा बाजाय खाली ठेव्याले
,आणते काय ? कि दिव्याले टेबलावर या
वरत ठेव्याले , आणते कि नाही, 22कावून कि
कोणतीच वस्तू लपलेली नाही,पण याच्या
साठी कि संगळ दिसलं पायजे, समोर येणार
नाही अशी कोणतीच गोष्ट नाही, 23ज्याइले
आय्काय्ले कान हात तो आयको. 24अन् त्यान
त्याईले म्हणल, कि तुम्हि जे आयेक्ता त्या
विषयी तुम्ही सावधान राहा,ज्या मापान
तुम्ही माप्सन त्याच मापान तुमचाई साठी
मापल्या जाईन,अन् तुम्हाले अजुक देल्या
जाईल. 25कावून ज्याच्या पासी आहें,त्याले
दिल्या जाईन अन् ज्याच्या पासी नाही
आहें,त्याच जे असीन ते पण घेतल्या जाईन,
26मंग त्यान म्हटल कि देवाचं राज्य अस
आहें,कि जसा कोणता माणूस वावरात बीज
टाकतो 27अन् रात्रीला झोपे दिवसात जागे,
अन् ते बीज अस निघते अन् असं वाडते
कि त्याले पता चलत नाही , 28पुर्थ्वीवर
आपोआपच पिक देते, पहिले अंकुर,मग
कनूस,मग ,कंनसात भरलेला दाना, 29अन्
दाना पकल्यावर लवकरच आपण त्याले
इव्हा,लावतो .कावून कि सोंग्याची वेळ
झाली आहें, 30मंग त्यान म्हतल कि देवाच्या
राज्याची गोष्ट ,कोण्या गोष्टी ऊन द्यावी
,अन् कोण्या गोष्टी ऊन त्याचं, सांगाव
, 31ते मवरीच्या दाण्या सारखं आहें,
जवा थो वावरात पेरताना तो पृथ्वीच्या
सगळ्या बिया पेक्ष्या तो लायनं बारीक
असते, 32ते मवरीचा दाण्या सारखे,आहें तो
जमिनित पेंरताना उगवल्यावर अन् सगळ्या
भाज्यांमद्ध्ये,मोटा होतो, अन् त्याले फांद्या
फुटल्यावर आकाशातले पाखर त्याच्या
सावलीत,राय्तात, 33अन् येशून त्याईले
अश्या प्रकारे त्याले लय गोष्टी सांगून त्याईन
ते आयकल्या . अन् असं त्यान वाचनातून
त्याले सांगतल, 34अन् गोष्टी वाचून त्यान
तो त्याईच्या संग बोलला नाही , पण ऐकांत
मध्ये जाऊन त्यान सगळ्या गोष्टी त्यान
समजावून सांगतल्या, 35अन् त्याचं दिवशी
संध्याकाळच्या पायरी तो त्याईले. म्हनांला
कि चला आपण तिकून जाऊ, 36अन् तो
गर्दीले सोडून जसा तो होता, तसचं त्याले
डोग्यावर घेऊन गेले.अन् त्याच्या संग दुसरे
पण डोंगे अन् मासोया पकडणारे होते, 37अन्
मंग लय मोठ वारावाय्द्र तुफान अन् लाटा,
डोग्यावर आल्या अन् पाणि पण डोग्यात
येऊन, रायल होत, 38अन् तो डोग्याच्या
खालच्या भागात झोपला होता . अन् त्याईन
त्याले,उठऊन .असं म्हटलं,कि गुरुजी आता
आपण डूब्तो, तुम्हाले , काळजी नाई, काय ?
39अन् त्यान उठून वारावाय्द्णाले दाटलं अन्
समुद्रा ले म्हणलं कि मुकाराय.शांत होय.अन्
वार-वाय्द्र शांत झालं,अन सर्व वातावरण
शांत झालं. तवा त्यान त्याईले म्हटलं कि
तुम्ही काय ले भेले.काय तुमचा आता पर्यंत
विश्वास, नाई काय, 40तवा त्यान त्याईले

म्हटलं कि तुम्ही काय ले भेले.काय तुमचा
आता पर्यंत विश्वास, नाई काय, 41 तवा ते
लय भेले.अन् येका-मेका संग म्हणून रायले,कि
हा हायेतरी बावा कोण,वारावाय्द्र अन् समुद्र
हे पण याचं आयेक्ते,

5 1 अन् ते सरोवराच्या तिकंड्चा बाजुले
गरसेकरांच्या देशांत पोहचले| 2 अन्
जवा तो डोंग्यातून उतरल्यावर लगेच अशुद्ध
आत्मा लागलेला एक माणूस मसणखाईतून
निगुन त्यालें भेटला. 3 तो मसणखाईत
रायतं होता.अन् त्यालें सांखयदाडानं.कोणी
बांदू नाय.शकतं होतं. 4 कावून की त्यालें
लय खेफ साखयदांडानं बांधलं होतं तरी
त्यानं सांखयदांड तोडून टाकलें होते.अन्
बेड्यांचे तुकडे तुकडे केलें होते;अन् त्यालें
कोणी पण वशात करू शकत नोत 5 तो
हमेशा,रातदिवसां मसनांत अन् पहाडावर
राऊन कल्ला करतं होता.व गोट्यानं आपल्या
आंगाले ठेचतं होता. 6 अन् त्यानं येशुलें
दुरून पायल्यावर तो पयतं आला.त्याच्या
पाया लागलां 7 अन् जोऱ्यानं कल्ला करून
म्हणलां,हे येशू, परमप्रधान देवाच्या पोरा,..
तुयावाल्या संग माह्यं काय काम? म्या
तुले देवाची शपथ देतो, मले छ्डू नोको.
8 काऊन की तो त्यालें म्हणतं होता,.हे अशुद्ध
आत्म्या,या माणसांतून नीघं. 9 त्यानं त्यालें
पुसलं, तुयावालं नांव काय हाय? त्यानं त्यालें
उत्तर देलं,माह्यावालं नांव सैन्य हाय,'काऊन
की आमी लयझनं हांव; 10 अन् आमालें या
देशांतून बायर नोको पाटु अशी तो त्यालें
आग्रहाची विनंती करत होता. 11 तती
पहाडाच्या बाजुले डुकरायंचा एक मोठा
कळप चरू रायलां होता. 12 तवां भूतायनं
त्याले विनंती केली की,आमाले त्या डुकराईत
पाठवं त्यांयच्यात आमाले लावून दे. 13 मंग
त्यांन त्यांयले परवानगी देलीं;तवा ते अशुद्ध
आत्मे त्याच्यातून निगुन डूकरांईच्या अंदर
घुसलें,अन् तो सुमारे दोन हजार डूकरांयचा
कळप पयत सरोवराच्या काठावरून पडला
अन् पाण्यांत डुबून मेला. 14 अन् डूकरं
चारणारे पयाले व गावात जाऊन भोभाठा
करून लोकाय्लें सांगून रायले. 15 तवा लोकं
पायाले आलें की, काय झालं मनून,त त्यायले
ज्यालें भूत लागलां होता तो येशू पासी
कपडे घालून बसून दिसला. लोकं त्याले
भेलें 16 अन् ज्यायनं ज्यांयनं हे पायलं की
ज्यांच्यात भूतं होता अन् त्या डूकरांयच्या
बदल.सगडी.हकीकत त्यायलें सांगतली.
17 तवा आपुन आमच्या एरियातून निंगून
जाय असं विनवूं लागलें 18 अन् तो डोंग्यात
बसूं रायला होता तवां ज्या माणसालें भूत
लागला होता.तो त्याले विनंती करून
मने.मले पण तुयावाल्यां संग राऊ दें. 19 परंतु
त्यांन त्याले येऊ नाय.देलं,अन् त्यालें म्हणलं,
तू तुया घरी जाय तुया लोकाईत जाय;अन्
त्यायलें सांग, की प्रभूनं तुयासाठी काय काम
केलं व तुयावर कशी दया केली ते सांग.
20 तवा तो निगाला अन् येशूनं जे मोठे काम
त्याच्या साठी केलें होते ते सांगून लागलां
लोकायले आश्चर्य वाटलं 21 मंग येशू डोंग्यात
बसून ईकून तिकडे गेलां तवा त्याच्या पासी
लोकायंची मोठी गर्दी जमा झाली तवा तो
सरोवराच्या काट्यावर होता. 22 तवा याईर
नांवाचा सभास्थानाचां एक अधिकारी आलां
तवा तो त्यालें पाऊन त्याच्या पाया लागला.
23 त्यानं हे म्हणून विनंती केली की माह्याली
लायनी पोरगी मरून रायली हाय;तु येऊन
तिच्यावर हाथ ठेवं.ते चांगलीहून जगली
पायजे, 24 मंग तो त्याच्या संग जाऊन
रायलां होता. तवा लोकायंची खूप मोठी
गर्दी त्याच्या मांग झाली होती, अत परंत
कि लोकं पडत होते 25 अन् तती एक बारा

वर्षा पासून रक्तस्रावानं रोगी बाई होती.
26अन् तिनं बऱ्याच वैद्याच्या पासून लय
हाल सोसून आपल्या पाचां होता- नोता
सगडा पयसा गमाऊन टाकला होता.तरी ते
चांगली नाय,झाली ते जास्त रोगी झाली
27येशूच्या बद्दल आयकून ती त्या गर्दीत
गेली अन् त्याच्या मांगून इउन तिनं त्याच्या
कपड्याले 28कावून की म्हणतं होती म्या
याच्या कपड्याले छुवलं तं चांगली होऊन
जाईन. 29अन् तवा लवकरचं रगतवायनं
बंद झालं अन् मी चांगली झाली असं
तीलें तिच्या आगाले वाटून आलं. 30येशूनं
जाणलं माह्यातून शक्ती निगाली हाय.
अन् गर्दीत वडून म्हणलं माह्या कपड्याले
कोण छुवलं? 31तवा त्याच्या शिष्यायंन
त्यालें म्हणलं, लोकं आपल्या भवताल गर्दी
करून तुह्यावर पडून रायले हाय हे आपुन
पायता,तरी तुमी म्हणता, मले कोनं छुवलं?
32मंग त्यानं तिले पायाले जीनं हे काम
केलं होतं चवंभवताल पायलं. 33तवा ती
बाई,तिच्या बाबतीत जे काई,घडलं जाणून
ती भेतं भेतं अन् कांपत कांपत त्याच्यावाल्या
पासी आली,अन् त्याच्या पाया लागून. जे
काय, झालं ते खरं खर सांगतलं. 34तवा
त्यानं तीलें म्हणलं,पोरी तुया विश्वासानं तू
चांगली झालीं हायं;शांतीनं जाय अन् तू या
बिमारी पासून चांगली होय. 35तवा तो हे
म्हणतं होता त.. तेवंड्यात सभास्थानाच्या
अधिकाराच्या घरून काई माणसं येवून
त्याच्या कानांत सांगू रायलें तुयाली पोरगी
मेली हाय;आतां गुरुजीले त्रास काय्लें देता?
36जे काय,तो बोल्ला त्याच्या इकडे येशूनं
लक्ष न देता,सभास्थानाच्या'अधिकाऱ्यालें
म्हणलं भेऊ नोको,फक्त विश्वास धर.
37त्यानं पेत्र,याकोब अन् याकोबाचा
भाऊ योहान यांयच्या शिवाय कोनालें हि
आपल्या बरोबर येऊ देलं नाय. 38मंग
ते सभास्थानाच्या'अधिकाऱ्याच्या घरात
आल्यावर त्यानं लय लोकांयले मोठ्या मोठ्या
न रडतांन अकात करतांन पायलं. 39त्यानं
अंदर जाऊन त्यांयले म्हणलं, तुमी कायले
गोधंड करू रायले अन् रडू रायलें? ती पोरगी
मेली नाय, पण झोपलेली हाय| 40पण ते
त्यालें हासूं लागलें;पण त्यानं त्या संगड्यालें
बायर काडून देलं अन् पोरीचें मायबाप
अन् आपल्या सोबतच्या माणसांले यायलें
घेऊन पोरगी. होती तती अंदर गेलां 41अन्
पोरीच्या हातांले पकडून म्हणलां,तलीथा
कूम;याच्या अर्थ हा हाय "पोरी म्या तुले
सांगतो, उठ,, 42अन् तवंरुत ते पोरगी उडून
चलु फिरू लागली;कावून की ते बारा वर्षाची
होती.तवां लोकं हापचकं झालें. 43मंग त्यानं
चिताऊन आग्या देऊन म्हणलं अती जे झालं
हे कोणाले मालूम नगां करू ;अन् म्हणलं इल
जेव्याले द्या

6 1मंग तो ततून निगुन आपल्या गावातं
आला, अन् त्याचे शिष्य त्याच्या मांग
आलें. 2मंग शब्बाथ दिवसी तो सभास्थानांत,
संदेश देऊ रायलां, अन् खूप लोकं त्याचं
आयकून ठप झाले, अन् म्हणाले , याले हे
सगड् कुटून प्राप्त झालं? हे कोणत ज्ञान
हाय जे त्याले देल्या गेलं हाय? अन् कसें
याच्या हातून आश्चर्य कर्म होतात 3काय तो
वाडी नाई;जो मरीयेचा पोरगा, अन् याकोब
योसे,यहूदा व शिमोन याचा भाऊ तो हा
हायना? अन् , याच्या बईनी अती आपल्या संग
नाई रायतं म्हणून? त्यायनं त्याच्या बाऱ्यात
ठोकरा खाल्ल्या| 4तवा यीशु त्यायले मनतें,
भविष्यवक्ताच्या आपल्या देशांत, त्यायच्या
सोयऱ्यात अन् , घरात सन्मान होत नायी
असं नायं, 5अन् त्यांन तती'कोणतं परांक्रचं
काम करू शकला, नाई काई थोड्या बिमार

लोकायवर हात ठेऊन त्यायले बर केलं 6 अन्
त्यानं त्यायच्या अविश्वास पाउन तो हापचक
झाला, मंग तो शिकवण देता देता गाव गावात
चवंभवंताल हिंडला 7 मंग त्यान त्या बारा
झणायेले आपल्यापाशी बलावल,तो त्यायले
दोगा दोगायेले पाठू राय्ला त्यान त्यायले
अशुध्द आत्म्या वरचा अधिकार देला; 8 अन्
त्यांन त्यायले आज्ञा केली की, रस्त्यान जाता
काठी शिवाय दुसर कायी घेऊ नोका; न भाकरी
न झोयना न कंबर कशात पैसे 9 पण वायना
घाला ;दोन दोन मनिले घालू नोका 10 अन् तो
त्यायले मनतो,जती कुठी तुमी कोणत्या घरी
जासाल तवा पासून जवा जासालं ततीच रा.
11 अन् ज्या ठिकाणी तुमाले ग्रहण करत, नायी,
अन् जती लोकं तुमचं आयकत नायी, ततून
जातान् त्यायले गवाई झाली पायजे मनून
आपल्या पायाची माती ततीचं झेटकवां 12 अन्
त्यांयनं जाऊन प्रचार केला, कि मन फिरवा|
13 अन खूप भुत काढले, अन् लय बीमारायेले
तेल लावून चांगलं केलं 14 अन् हेरोद राजानं
त्याच्या बाऱ्यात आयकलं, काऊन की त्याचं
नावं गाजलेलं होतं, अन् त्यानं म्हणलं,योहान
बाप्तिस्मा देणारा मेलेल्यातून जिवंत झाला
हाय मनून सामर्थाचे काम तेचात. हून रायले
15 अन् कोणी मने हा एलिया हाय, पण
कोणी मने भविष्यवक्ता हाय नायी तहा
,भविष्यवक्त्याय पैकी एक हाय 16 हेरोद हे
आयकून मनु लागला, की ज्या योहानाचं'
म्या मुण्डक कापलं तो जिवंत झाला की
काय 17 कावून की हेरोदनं आपला सक्का भाऊ
फिलीप्पूस याची बायको, हेरोदियास ईचा
संग लग्न केलं मनून, हेरोद न माणसायले
पाठवलं अन् योहानाले धरून जेलात टाकून
देल 18 कावून की योहान त्याले मने तु आपल्या
भावाची बायको ईचा सग कायले लग्न केलं
हे चांगल नायी 19 म्हणून हेरोदाची बायको
हेरोदियास योहानाचा राग करत होती, तिले
वाटे की हा मेला पायजे, पण तसं नाय
झालं 20 अन् हेरोद योहानाले चांगला धर्मी
माणुस हाय असं समजून त्याले तो भेत
होता, अन् योहान त्याले बोलत जाय, त्याचं
बोल्नं आयकून तो गोंधळत जाय पण त्याचं
मंन्न आनंदान आयकून घेत जाय 21 अन् एक
दिवसं पावून, हेरोदनं आपल्या वाढदिवसाचं
आमञन आपल्या प्रधानायले अन् सरदारायले
अन् गालीलातल्या ठ्यिक-ठ्यिक लोकायले
पंगत ठेवली 22 अन् हरोदियेच्या पोरीनं स्वता
अंदर जाऊन ती नाचली, अन् हेरोदाले अन्
त्याचा बरबर बसलेल्यायले तिनं नाचून खुस
केलं; तवा राजा त्या पोरीले मन्ते" तुले जे
पायजे', ते मले तू मांग मी तुले देतो 23 तवा
त्यानं शपत खांली की म्या माह्याल्या अर्ध्या
राज्यालगं जे काय मांगसीन तेमी तुले देयीन
24 तवा बायर गेली, अन् मायले मन्ते म्या
काय मागू? तवा तिची माय मन्ते? योहान
बाप्स्तिमा देणारा ह्याचं मुंण्डक मांग, 25 तवा
ती एकदमच राजा पासी आली, अन् तिन
विनंती केली माह्याली इच्या हाय, की मले
तुमी योहान बाप्तिस्मा देणार्याचं मुंण्डक मले
ताटात आताच्या आतं आणून द्या 26 तवा राजा
लय नाराज झाला, पण त्यानं देलेल्या शपतीनं
तो अन् जेवनाले बसलेल्या लोकायचानं तिले
त्याले मना नाय कर्ता आलं 27 तवा राजानं
आपल्या शिपायाले आज्ञा देली जाय, त्याचं
मुंण्डक आन् 28 तवा तो जेलखान्यात गेला,
त्याले मारून त्याचं मुंण्डक ताटात आणलं,
अन् त्या पोरीले देलं अन् पोरीनं माय पासी
नेऊन देलं 29 हे आयकल्या वर त्याचे शिष्य
आले अन् त्याचं प्रेत उच्चलं कबरेतमसणखाईत
नेऊन ठेवलं 30 त्या नंतर प्रेषित यीशु पासी
येऊन यक्कठा हून झाले, त्यायन जे काय
केलं, 31 अन् काय काय शिकवलं ते सगडं

त्यायनं त्याले सांगतल. 32 तवा तो त्यायले
मने, तुमी जंगलात चला तती आराम करा;
कावून की तती लय लोकं येण जान करत,
असल्याने त्यायले जेवनाले पण सवड भेटेनां
33 मनून ते डोग्ग्यातं बसून तीक्ठ्या बाजुले
जंगलात एकांतात गेले 34 लोकायन त्यायले
जाता -जाता पाय्ल' अन् लय लोकाय्न त्यायले
ओळखलं, अन् तथंल्या सगड़या गावातून
लोकं पैदल-पैदल पयत- पयत त्यायच्याई
पय्ले गेले.येशू डोंग्यातून उतरला तवा त्यान
लोकायचा मोठा जनसमुदाय पायला, त्याले
मया आली ते मेंढपाड नसलेल्या मेंढरा सार्खे
होते, तवा तो त्यायले शिकवन देऊ लागला.
35 जवा दिवसं डुबल्या वर त्याचे शिष्य त्या
पासी आले अन् मनतात हे सुनसान जागा
हाय अन् दिवसं डुबत हाय 36 36त्यायले जाऊ
दे, ते अवताल- भोवताल च्या खेड्यापाड्यात
जाऊन, आपआपल्या साठी खायाले, कायी
विकत घेतील, 37 त्यानं त्यायले उत्तर देलं तुमी
त्यायलें जेव्यालें घ्या, ते त्यालें मने, काय हो
आमी शंभर दीनार भाकऱ्या विकत आणू खाऊ
घालू 38 तो त्यायलें मन्तें,जाऊन पा तुमच्या
पासी कितीक भाकरी हाय? ते पायल्यावर
ते म्हनतात पाच भाकरी अन् दोन मासोया
39 तवा त्यानं मनलं, की तुमी त्यायलें हिरव्या
गवतावर लाईन लाईननं बशाले सांगा ,
40 तवा ते शंभरशंभर-पन्नासपन्नास च्या पंगती
पंगतीनं बसलें 41 मग त्यानं त्या पांच भाकरी
अन् दोन मासोया; घेऊन व्रतें स्वर्गा इकडे
पावून धन्यवाद देला, अन् भाकरी मोडल्या व
त्या त्यायलें वाढायलें आपल्या शिष्या पासी
देल्या ते दोन मासोया पण सर्वाय्ले वाटून
देल्या 42 सगडे झन जेवल्यावर तृप्त झालें
43 अन् त्यायनं.उरलेल्या भाकऱ्यायचे कुटके,
बारा टोपल्यात भरून अन् कायी मासोया पण
नेल्या 44 ज्यांयन भाकरी खाल्या ते पांच हजार
माणसं होते 45 तवा त्यांन तवंरुत शिष्याय्लें
म्हणलं, तुमी डोंग्यात बसून तीक्ठ्या बाजुले
बेथसैदा ले जा, तथ;परेंत म्या लोकांल्ये निरोप
देतो| 46 मंग तो लोकायले निरोप देऊन तो
प्रार्थना कराले पहाडावर गेला 47 अन् झाकडं
झाली, तवा तो डोगा समुद्राच्या मदातं होता,
अन् येशू एकटाच जमिनीवर होता. 48 तवा
त्यालें ते हाका मारून- मारून ते हैराण
झालेलें दिसले,. कावून कि वारा त्यायच्या
विरूद्ध होतां,मंग तो झाकठीच्या.चवंथ्या
पहराच्या वेडेत. तो सरोवरावरून चालत
त्यायच्या .पासी आला;अन् त्यायच्या जवडून
पुढे जाण्याचां त्याचं बेत होता ; 49 त्यायले
तो दिसला .त्यायलें वाटे कि हा भूत हाय,
अन् ते कल्ला .करू रायले 50 त्यालें पाऊन
ते सगडे भेलें होते .अन् तो त्यायच्या संग
बोलू .लागला तवा त्यायले मने धीर धरा
म्या .हाय भेऊ नका. 51 तवा तों त्यायच्या
पासी डोग्ग्यातं आला,तवा वारा थांबला,
त्यायले एकदमचं ते आश्चर्य करू लागलें 52 अन्
त्यायले. भाकरी ची गोष्ट समजले.नोते कावून
की त्यायचं मन कटोर झालं हाय.. 53 मंग ते
पलीकडे उतरून गनेसरेत. पोचले,.अन् डोगा
घाटावर ठेवला 54 ज्या वाकती ते .डोग्ग्यातून
उत्तरले तवा लोकायनं त्याले ओळखले 55 अन्
ते आसपासच्या सगड्या भागांत चवंभवताल
धावत-पयतं गेलें अन् बीमार लोकायले बाजी
वर टाकून जती- तो हाय तती ते त्यायले
नेवू लागले 56 अन् खेड्यापाड्यात नगरांत
किवां वसस्तीतून.कुटे ही तो जाई तती ते
बिमाराय्ले बजारात आनत् अन् त्यालें मनत.तू
तुह्यावाल्या कपड्यालेचं हात लाऊ दे अन् जे
हात लावत होते तेवंडे चांग्ले होतं होते

7 1 तवा फरुशी अन् कितीक शास्त्री
यरुशालेमातून आलेलें एखंठ्या येवून
त्याच्या पासी आलें.. 2 अन् त्यायनं त्याच्या

कायी शिष्यायंले अशुद्ध अर्थातनं धुतलेल्या
हातानं जेवतानं पाय्ल.होतं 3 कावून की
फरुशी अन् सगडे यहुदी, वाडवडिलाच्या
संप्रदायाले पालन .करून जेव्याच्या पयले
हाथ नाय धुतलें त. जेवण नाय कराचे 4 ते
बजारातून आल्यावर आगुंड.करे परेंत, जेवण
जेवत नोते ,अन् गिलास, मटके पितड. चे
भांडे धुणें अशा कितीक रुडी मानत होतें,
5 म्हनून फरुशायनं अन् शारुत्यानं त्याले
पुसलं, तुह्याले शिष्य हात धुयाच्या पयले
जेवतात ते. वाडवडीलायच्या संप्रदायानं
कावून चालतं नायी? 6 त्यानं त्यायलें उत्तर
देलं, तुमच्या. ढोंग्यायं बद्दल यशयानं
चांगला संदेश देला हाय, तो., हा हाय...
ते लोकं होठायनं माला संन्मान करतात,
पण त्यायचं मन माल्या पासून दूर हाय .
7 ते व्यर्थ माली उपासना करतात, कारण
कि, ते. शास्त्र मनून शिकवतात,ते हाय...
माणसाचे नियम' 8 अन् तुमी देवाची आज्ञा लें
सोडूनं माणसाच्या.रीतीरिवाजले.चीकडून
रायता.. 9 आजूक त्यानं त्यायलें मनलं, तुमी
तुमच्या संप्रदायाले पाँळ्याले, देवाच्या आज्ञा
मोड्याच्या, चांगला रस्त्या काडला...हाय
10 कावून कि मोसेनं सांगतल् हाय; कि
तू आपल्या ,बापाच्या अन् माय, च्या
मान.ठेवजो, अन् जे कोणी आपल्या
.बापाची किवा मायची चुगल्या'करते,
त्याले मारून टांक्ल. पायजे 11 पण तुमी
मंणता जर एखांन्धा, आपल्या बापांलें
नायं, त मायले.मनाला कि जे ,म्या तुमालें
पोषणासाठी ध्या, चे कुर्बान मन्जे अर्पण
केलं हाय; 12 त तुमी त्यालें आपल्या
बापाची किवा मायची सेवा करू देतं नांयीत
13 अशा यानं तुमी आपल्या रीती चालू. रावू
देता,अन् देवाचं वचन रद्द कर्ता,अन् अशा
सारख्या आजूक खूप गोष्टी कर्ता 14 तवा
त्यानं लोकांयलें आपल्या. पासी बलावलं,
अन् त्याय्लें मन्तें तुमी सगडे मालं,आयका
अन् समजून. घ्या ; 15 बायरून च्या वस्तू
माणसाच्या अंदर जाऊन त्यालें खराब करत
असं काय.. नाय , तर माणसाच्या" अंन्दुन जे
निगते' तेचं खराब करते" 16 ज्यांलें आयकाय्लें
कान हायत त्यायनं,आयकावं 17 जवां
लोकसमुदायातून तो घरी निगुन आला,
तवा शिष्यांनी त्यालें त्यां दृष्टान्त,नांचा;
बदलं पुसलं 18 त्यानं त्याय्लें मनलं,तुमी पण
एवडें अज्ञानी आहा? कि काय ,जे कायी
बायरून माणसाच्या अंदर जाते ते. त्याले
खराब करत नाय,हे तुमालें समजतं नाय.
काय? 19 कावून कि ते .त्याच्या मनांत नायं,
पण त्याच्या पोटांत जातें,अन् संडासातून
बायर निन्गतें?अशा यांन त्यानं सगडंद्या
अन्नालें शुद्ध ठरवलं 20 आजूक तो मनंला,
जे काय ,माणसातून बायर निन्गते.तेच
त्यालें खराब कर्ते, 21 मंग त्यानं म्हणलं,
माणसाच्या.मनातून खराब" विचार निघनं,ते
त्याले खराब करते 22 जसं अन्द्रून चोरी,
खून, व्यभिचार, लोभ, दुष्टपणां, कपटीपण,
कामातुरपणा, हेवा, शिविगाड् अहंकार
मूर्खपणा. 23 ह्या सगड्या ,खराब गोष्टी
अन्द्रूनं बायर.निगतात अन् माणसाले.भ्रस्ट
करतात 24 मंग तो ततून निगुन सूरसेयदा
देशात गेला ,तती तो यका घरात गेलां हे
कोणाले माईत नाय झालं पायजे मनून,
असं त्याच्या मनात,होय तरी त्याले. लपून
राय्न.नायं झालं 25 अन् ज्या बाईच्या,
लायन्या.. पोरीलें अशुद्. आत्मा लागला
होतां, अन् त्या बाईनं त्याच्या.बाऱ्यात
आयकलं ते तती येवून त्याच्या पाया लागली.
26 ते बाई युनानी असून सरफूनिच्या
जातीची होती, तिनं त्यालें विनंती केली
कि तुमी माह्या पोरीच्या आगातून भूत

काढा. 27 तो तिलें मनें लेकरालें पयले तृप्त
होऊ दे ,कावून कि लेकराची भाकर घेऊन
कुत्र्यायलें टाकणं चांगल नायं. 28 मंग तिनं
त्यालें मनलं खरं हाय महाराज,घरच्या कुत्र्ये
मेजाखालची लेकराय्च्या.हातंल्या पडलेल्या
चुरा खातात. 29 तो तिलें मनंला,तुयालें
मनने पटलें.जाय तुया पोरीतून.भूत निगुन
गेला हाय 30 मंग ते घरी गेली अन् त्या
पोरीलें बाजीवर.पडलेलं पायलं अन् भूत
निगुन गेला हाय. हे तिलें,माईत.झालं 31 मंग
तो सूरसयदा देशातून निगुन सिदोनातून
दकापली या देशातून गालीलच्या सरोवरा
पासी गेला 32 तवा लोकायनं, एका बयऱ्या,
तोतऱ्या, माणसालें त्याच्या पासी आणलं,
अन् तुमी तुमचा.. हात ठेवा अशी विनंती
केलीं; 33 तवा त्यानं त्यालें लोकांयपासून
कोपऱ्यात नेवून त्याच्या कानांत बोटें टाकलें
अन् थुक्लां.त्याच्या जिबलें छुवलं 34 अन् वर्ते
स्वर्गाइकडे पाऊन त्यानं उसासा टाकला, अन्
म्हनलं, इप्फाथा,मन्जें मोकङ् हो 35 तवा
त्याचें कान मोकडे झालें, अन् त्याची जीबेची
गांठ सूटली तो स्पष्ट बोलुं लागलां 36 तवा
त्यानं म्हनलं हे कोणाले माईत करू नका असं
त्यानं त्याय्लें मनलं पण त्यायनं त्या गोष्टी चा
भोभाटा.केलां 37 अन् ते हापचक ,होऊन
म्हनलें, त्यानं हे संगङ् चांगलं केलं हाय, या
बयऱ्यालें आयकाय्लें अन् मुक्यालें बोल्याची
शक्ती देतों

8 1 अन् त्या दिवसांत, परत एकदां
लोकायची मोठी गर्दी जमली होती,
अन् त्यायच्या पासीं खायालें काई नोंत, त
त्यानं आपल्या पासी शिष्याय्लें बलाऊन
त्यायलें मनलं, 2 मलें या लोकायची दयामया
येतें, काऊन,कि ते माह्या.. बराबर, तीन
दिवसांपासून" हायत्.अन् त्यांयच्या. पासी
खायालें काई नांय; 3 म्या त्यांयलें उपाशी घरी
पाटून,देलंत ते,रस्त्थान गयाट्टीनं;काऊन कि
त्यायच्यातलें काई काई झनं दुरून आलें हाय.
4 त्याच्यां शिष्यायेन् त्यालें उत्तर देलं,अती.
जंगलात यवड्या .भाकरी कुठून आण्याच्या
हे तृप्त हा 5 त्यानं त्यायलें पुसलं, तुमच्यां
पासी कितीक भाकरी हायत्?ते म्हनतात
सात. 6 तवा त्यानं लोकायलें जमिनीवर
बशालें सांगितलं,अन् त्या सात भाकरी घेऊन
धन्यवाद केलां, त्या मोडल्या अन् त्यानं
आपल्या शिष्याय, पासी देवून वाढ्याले
सांगत्ल्या त्यायनं वाढल्यां 7 त्यायच्या.पासी
थोडंशाकं लायन्या मासोयां होत्या;त्या पण
धन्यवाद देऊन वाढ्याले सांगत्ल्या.. 8 ते
जेवून तृप्त झालें व उरलेल्या कुटकेयंच्या सात
पाट्या भरून घेतल्या 9 तती सुमारे चार
हजार लोकं होते.मंग त्यानं त्यायलें निरोप
देलां 10 मंग तो आपल्या शिष्याय् संग डोंग्यात
लवकर निगुन दल्मनुथा देशात आला 11 मंग
फरुशी त्याच्या पासी यवून, वाद करू लागलें,
अन् त्यायनं त्याचीं परीक्षा पायालें, ते त्याच्या
पासी गेलें, अभायातून चिंन्ह मागू राय्लें
होते. 12 तवा तो आपल्या आत्म्यांत कावड-
वावड होऊन मनलां, ह्या पिढ्या चिंन्ह कावून
मांगतात? म्या तुमाले खरंखर सांगतो कि
ह्या पिढीलें चिंन्ह मुळींच देलं जाणार नायं
13 मंग तो त्यायलें सोळुन परत डोंग्यातं बसून
तिकंळया बाजुलें गेलां 14 ते भाकरी घ्यायलें
भूल्लें होते ;अन् त्यायच्या पासी डोंग्यात एक
भाकर होती. 15 मंग त्यानं त्यायलें चिताऊन
सांगतल, की पायजाकं,फुरुश्यांचे खमीर अन्
हेरोदाचे खमीर, ह्यां विषयी हुशारकीनं
रायजाक. 16 तवा ते आपल्या पासी भाकरी
नाईत,अशा आपआपसात गोष्टी करू रायलें.
17 हे पावून येशू त्यायलें मन्तें, तुमच्या पासी
भाकरी नाय हाय, ह्या बद्लं कायलें विचार
करतां? तुमाले आजूक लक्षात नाय. हाय?

काय,तुमाले समजतं नाय काय. 18 तुमचं मन
कठोर कावून झालं? डोये असून तुमालें दिसत
नायकि काय, व कान असून तुमाले आयकू..
येतं नायकाय? तुमाले आठोन.नायी वाट्ते
19 म्या पांच हजार लोकांय्लें पांच भाकरी
मोडून वाटून देल्या, तवा तुमी कुटक्यायच्या
कितीक टोपल्या भरून घेतल्या? ते त्यालें
म्हनतं, बारा 20 तसंच चार हजार लोकांय्लें
सात भाकऱ्या मोठ्या तवा किती.पाट्या
तुकडे भरून घेतले ,ते म्हणतं सात. 21 तवा
तो त्याय्लें मणे तुमाले आजून नाई समजलं?
22 मंग ते बेथसैदा ले आले,तवा लोकायनं
त्याच्या पासी एका फुंटक्याले आणलं व
त्यालें तुमी स्पर्श करावा असी त्यालें विनंती
केली 23 तवा त्यानं त्या फुंटक्याच्या, हात
धरून त्यालें गावाबाहेर नेऊन अन् त्याच्या
डोयावर थुंकून व त्याच्या वर हात ठेवलां,
अन् त्यालें पुसलं तुलें काई दिसतें काय; 24 तो
वर पाउन म्हणलां मले माणसे दिसुं रायले
हाय, ते झाडां सारखें दिसूं राय्लें ते चालू
रायलें. 25 आजूक त्यानं त्याच्या डोयावर हात
ठेवला;तवा त्यानं निरखून पायलं.अन् तो
चांगला झाला त्यालें सगडं कायी चकं दिसू
लागलं 26 मंग त्यानं त्यालें घरी पाठवतानां
त्यालें सांगतल कि या गावात पाय टाकू नको.
27 मंग येशू अन् त्याचें शिष्य, कैसरीयाच्या
फिलीपाच्या आजू बाजू च्या खेड्यापाड्यात
जायाले निगाले ;तवा रस्त्यानं जाताजाता.
शिष्यायलें पुसतें लोकं मले काय म्हणतात?
28 त्यायनं त्यालें उत्तर देलं;बाप्तिस्मा करणारा
योहान. कोणी,कोणी म्हणें एलिया; कोणी
म्हणें भविष्यवक्तातून एक असें म्हणतात.
29 तवा त्यानं त्यायलें पुसलं , पण तुमी मले
काय म्हणता ,पेत्रान नं उत्तर देलं तुमी ख्रिस्त
हा. 30 तवा त्यानं त्यायलें म्हणलं माह्या बद्लं
कोणाले सागू नगा .असं चीताऊन देलं. 31 तो
त्यायलें शिक्षण देऊ रायला.माणसाच्या
पोरानें .दुःख भोगावी,वडीलमंडल ,मुख्य
याजक व शास्त्री ह्यायच्या पासून नाकारलें
जावें,जीवाण मारलें जावें,अन् तो तीन
दिवसानं परत जिवंत हयावा. 32 ह्या गोष्टी
तो साफ साफ बोलू रायला.होता, तवा
पेत्राने न. त्यालें बाजुले नेउन,त्यालें दटावुं
लागलां 33 तवा त्यानं फिरून आपल्या
शिष्याइकडे पायलं.अन् पेत्राले लें दटावून
म्हणलां,हे सैताना,माह्या पासून निंग, कावून
कि तुयालें विचार देवाचे नाईत.माणसाचें
हायतं.. 34 मंग त्यानं आपल्या शिष्यायलें व
लोकायलें बलाऊन म्हणलां, जर कोणी माह्या
अनुयायी होणार त्यानं स्वताच्या इन्कार
करून आपला वधस्तंब उचलावा माह्या मांग
ह्वावा.. 35 कावून कि जोकोणी आपला
जीवं वाचवेल.तो गमावीन,अन् जो कोणी
आपला जीवं सुवार्ते साठी देईन तो त्यालें
वाचवेन. 36 जर माणसानं संगड्या जगाले
प्राप्त केलं, अन् आपल्या जीवालें नष्ट केलय.त
काय फायदा ? 37 अन् माणूस आपल्या
जीवाबद्दल काय मोबदला देऊ शकतें? 38 अन्
जो कोणी व्यभिचारी व पापी पिढीमध्ये
जाँय्लें माई व माह्या वचनाची लाज वाटीनं.
जवा माणसाच्या पोरगा पवित्र देवदूता संग
बापाच्या गौरवानें येईन त्यालें पण त्याची
लाज वाटीनं;

9 1 अजून, तो त्यायलें म्हणें,म्या तुमालें
खरखरं सांगतो कि अथी उभे असणाऱ्या
पैकी, काई झंन असे हायत. की, देवाचें
राज्य सामर्थ्यानिशी आलेंलं.दिसे पर्यंत त्यायलें
मरणाचा अनुभव" येणारच नाय" 2 मंग सहा
दिवसाच्या नंतर येशू न.पतरस, याकोब
अन् योहान ह्यायलें आपल्यासंग घेऊन एका
उंची पहाडावर एकांतात नेअलं अन् तती
त्यायच्या.देखत त्याचे रुपांतर झालें ; 3 तवा

त्याचें कपडे यवडे चकचकित पांढरे झाले
की, पुथ्वीवर चा कोणताही धोबी यवडे
पांढरे करू शकणार नाय ; 4 अन् त्यायलें
मोशे संग एलिया दिसलें अन् ते येशू संग
बोलतं होते 5 तवा पतरस येशू ले म्हणें
गुरुजी,आपुन अति हावो हे चांगल हाय ;तरी
आमी तीन मंडप बनवतो,एक तुमच्या साठी,
एक मोशेसाठी, एक एलिया साठी 6 काय
बोलावं हें त्यालें सुचतं नायजाय,कावून कि
ते भेलें होते 7 तवा एक ढग आला, व त्याने
त्यांच्यावर छाया केली' अन्' त्या ढगातून
असा आवाज आला. हा माह्याला..प्रिय पोरगा
हाय, याचे तुमी आयका; 8 मंग त्यायनं
एकदमचं चौकडें पायलं त..येशुशिवाय त्यायलें
आपल्या पासी अजून कोणी दिसले नाय;
9 मंग ते पहाडावरून उतरता- उतरता त्यानं
त्यायलें आज्ञा केली की,तुमी जे पायलं
हाय, ते" माणसाचा पोरगा" मरणातून परत
जिवंत होय" परंत तुमी जेकाय.. पायलं
ते कोणालें सांगू नगा; 10 ते बोलणं मनांत
ठेवून, मरणातून परत जिवंत होणं, म्हणजें
काय हाय?ह्याच्या बद्लं ते एकामेकालें
विचारपुसू लागलें 11 मंग त्यायनं त्यालें पुसलं,
पयल्यानं, एलिया आला पायजे,असं शास्त्री
म्हणतात हे असं कसं, 12 त्यानं त्यायलें उत्तर
देलं,एलिया पयल्यानं येऊन सगङ् कायी
सुधरीन हें खरं हाय,तर मंग माणसाच्या
पोरानें एवडें दूःख सोसावी अन् तुच्छ
मानला जावा,असं त्याच्या बाबद.लिवलेलं
हाय, 13 पण म्या तुमाले म्हणतों एलिया त
..आलाच हाय, अन् त्याच्याबद्दल लिवलेल्या
प्रमाणे त्यायलें वाटलं तसं त्यांनी त्याचें
केलें 14 मंग तो शिष्याय पासी आला,तवा
त्यायच्या अवताल भवताल.लोकायची मोठी
गर्दी होती, अन् शास्त्री त्यायच्या संग
वादविवाद करू रायलें होते, हे त्यालें ते दिसलं
15 त्यालें पायल्यांवर सगडें लोकं हापचकं
झाले, अन् त्याच्या इकडे पयत.जावून त्यायनं
त्यालें प्रणाम केला. 16 त्यानं त्यायलें पुसलं,
यायच्या संग तुमचा कायचा वादविवाद
सुरु हाय? 17 तवा समुदायातून एकानें उत्तर
देलं हे गुरुजी,म्या माह्या पोराले तुमच्या
पासी घेवून आलो.ह्यालें मुकी आत्मा लागला
हाय . 18 तो जती जती ह्याले पकडतो
तती तती तो याले.खाली आपट्ते, मंग हा
तोडालें फेंस आणते, कडकडून दांत खाते, व
निपचेप पडते.ह्याले काढावं म्हणून आपल्या
शिष्यालें म्या सांगतल, पण त्यायलें तो
काढता नाय आला 19 ह्यावर तो म्हणला.
हे अविश्वासी लोकोहो म्या कुटपरंत तुमच्या
संग रायणार? कूटपरंत तुमाले वागवणार?
त्यालें माह्या पासी आणा , 20 त्यायनं त्यालें
त्याच्या पासी आणलं, तवा त्या आत्मानें येशुलें
पायल्यावर पोराले.पीडून टाकलं, अन् तो
जमिनीवर पडला तोंडाले फेंस आणून लोटांगण
घेऊ लागलां. 21 तवा त्यानं त्याच्या बापाले
पुसलं,याले असं होऊन कितीक दिवसं झालें
तो म्हणलां लानपणापासून . 22 त्यानं म्हणलं
म्या याले नाश करण्यासाठी याले कितीक खेपं
इसत्यातं अन् पाण्यात टाकलं, पण तुमच्या
हातून होतं असेल त.. आमच्या वर द्या करा
आमाले साहाय्य करा. 23 येशू त्यालें म्हणे ,
असं कसं म्हणतो विश्वास करण्याऱ्याले संगङ्
काय .शक्य हाय, 24 एकदमचं पोराचा बाप
मोठ्यान म्हणें,माह्या विश्वास हाय माह्या
अविश्वास उपाय करा. 25 तवा लोक पयत
यऊन झुंबड करत हाय,हे पाहून येशू अशुध्द
आत्म्यालें दटावून म्हणला ,अरे मुक्या -बयऱ्या
आत्म्या ,म्या तुले आज्ञा देतो ,याच्यातून निंग
व डबल कधी यच्यात येवू नगों. 26 तवा
तो आत्मा कंल्ला करून व त्यालें फारच
पीडून निगाला ,अन् तो मेल्यासारखां झाला,

अन् लय लोकं म्हणू लागलें कि हा मेला
27 पण येशून त्यालें हात धरून उठवलं व
तो उभा रायला. 28 मंग तो घरात गेल्यावर
त्याच्या शिष्यायन.त्याले एकांतात पुसलं
आमाले तो कावून काढता आला नाय ? 29 तो
त्यायलें म्हणें ,हे जात प्रार्थनेवांचून दुसऱ्या
कायनंचं निंगणारी नाय 30 मंग ते ततून निगुन
गालीलामधून चाल्लें होते;अन् हे कोणाले
मालूम नाय ह्वोवं म्हणून अशी त्यायची इच्छा
होती. 31 कावून की तो आपल्या शिष्याय्लें
शिकवतं होता ;तो त्यायलें असं सांगत होता
की मनुष्याचा पोरगा माणसाच्या हाती देला
जाणार हाय ते त्यालें जीवाण मारतीन.अन्
मारल्या गेल्यावर तो तिसऱ्या दिवसी तो
परत उठीन ; 32 पण त्यायलें या बोलण्याचा
अर्थ समजलां नाय, ते त्याले विचाऱ्याले भेलें;
33 परत ते कफर्णहुमात आले;अन् ते घरीं यवून
त्यानं त्यायलें पुसलं ,तुमी रस्तानं कायच्या
गोष्टी करत होते , 34 ते गुपचांप रायले,कावून
कि सर्वात मोठा कोण ह्या विषयीं त्यायची
रस्तानं गोष्टी सुरु होत्या 35 त्यानं बसून त्या
बारा झनायलें बलावून म्हणलं, जर कोणाले
मोठं ह्वायचं असीन, त त्यानं सगड्यात
लान ह्वाव लागेल, अन् सगड्यायचा सेवक
झाला पायजे. 36 मंग त्यानं एका लेकराले
घेऊन त्यायच्या मदात.ठेवलं कवळ्यात घरून
त्यानं म्हणलं 37 जे कोणी माह्या नांवान
असा लेकरायतून एकाले, स्वीकारते तो मले
स्वीकारते,अन् जो कोणी मले स्वीकारते त्यालें
मले पाठवणारा त्यालें स्वीकारते. 38 योहान
त्यालें म्हणे ,गुरुजी आमी एका माणसाले तुया
नांवान भूत काढतान पायलं,तवा आमी त्याले
मना केलं, कावून की तो आपला अनुयायी
नोता. 39 येशू म्हणलां, त्यालें म्हणा करू
नगा,कावून की तो माह्या नांवान सामर्थाचे
काम करू रायला.तो माह्याली निंदा करेल
अस कोण नाय; 40 कावून की जो आपल्या
प्रतिकूल नाई तो आपला अनुकूल हाय; 41 तुमी
ख्रिस्ताचे म्हणून तुमाले. जो कोणी गीलासं
भर पाणी पियाले देईन तो त्याचं प्रतीफळ
घेईन हे म्या तुमाले खरखरं सांगतो 42 पण
जे या लायण्यां मधले हाय, जे माह्या वर
विश्वास ठेवतात याय्लें कोणाले अरथडा.करतो
त.. त्याच्या साठी चांगलं हाय, कि त्याच्या
गयात जात्याचा पाट लटकून समुन्द्रात टाकून
द्या हे त्या साठी चांगल हाय ; 43 तुह्या वाला
हात तुलें जर अरथडा करत असीन त..त्याले
कापून टाक 44 तुले दोन हात असून जर नरकात
म्हणजे न हिजलेल्या इस्तंवात जात असतीन
त..तुले दुंन्ड होऊन जीवनात जाण.चांगल
हाय; 45 तुयावाले पाय तुले,जर अरथडा करत
असीन त..त्याले कापून टाक; 46 तुले दोन पाय
असून जर ते तुले नरकात नेत असतीन त..त्या
पेक्षा लंगड्या होऊन जीवनात जांण चांगल
हाय 47 अन् तुयावाला डोया, तुले जर अरथडा
करत असीन त..तो काडून टाक, तुले दोन डोये
असून ते जर तुले नरकात नेत असतीन त..भोक्न
हून देवाच्या राज्यांत जांण तुया साठी चांगल
हाय; 48 तती त्याच्या किड्या मरत नाय व
इंस्थो हिझत.नाय 49 कावून कि हरएक माणूस
आगीनं खारवण्यात येईन प्रत्येक बलिदान
मिठांन खारवंतीन. 50 मीठ चांगल हाय;पण
मिठाचा खारटपणा गेला त..त्याले रुची कायनं
आणावी?तुमी आपल्यात.मीठ असू द्या;अन्
एकमेका संग शांतीनं रा

10 1 मंग तो ततून निगुन यहुदिया
प्रांतात यरदन च्या तिकड्या
बाजुले गेला,तवा परत लोकायनं त्या पासी
झुंबड कर्ण सुरु केली.अन् तो आपल्या
परिपाठाप्रमाणे त्यायलें शिकवणं देऊ
लागला. 2 फरीसी तती आले अन् त्याची
परीक्षा पायाच्या उद्देशान, त्यायनं त्यालें

पुसलं.काहो" नवऱ्यानं बायकोले टाकून.देणं हे
कायदेशीर हाय काय? 3 तवा त्यानं त्यायलें
उत्तर देवून म्हणलं,मोशे नं तुमाले काय आज्ञा
केली? 4 त्यायनं म्हणलं, फारकतीपत्र देवून
तीलें सोडून द्या असी मोशेनं आज्ञा देली.हाय
; 5 येशूनं त्यायलें म्हणें, तुमचे अंत;कर्ण कठीण
हाय म्हणून त्यानं हे आग्या तुमच्या साठी
लिवली. 6 पण उत्पत्तीच्या सुरवाती पासून
देवानं त्यायलें बाई- माणूस म्हणून,बनवलं
7 याच्या यान. माणूस,आपल्या माय-बापालें
सोडून आपल्या बायको संग जुडून राईन.अन्
ते दोघ...एक देह होईन ; 8 म्हणून ते दोन
नाई पण एक देही हाय 9 म्हणून देवबापानं जे
.जोडलं हाय ते माणसानं तोडलं नाय.पायजे
10 मंग घरात आल्यावर शिष्यायनं त्यालें
त्या गोठी बद्ल डबलं पुसलं. 11 तवा तो
त्यायलें म्हणें.जो कोणी आपल्या बायको ले
टाकून दुसरी संग लग्न करते तो व्यभिचार
करतें ; 12 अन् जे आपल्या नवऱ्याले सोडून
जर दुसरं.लग्नं करतें ते पण व्यभिचार करतें.
13 मंग लोकायनं. लेकरांय्लें" त्याच्या पासी
आणलं, कि त्यानं त्यायलें हात लावलांपायजे"
म्हणून पण त्याच्या शिष्यायेन आणनाऱ्याय्लें
दटावलं, 14 ते पाऊन येशुले खराब वाटलं;अन्
तो त्यायलें म्हणे,लेकराय्लें माह्यापासी येऊ
घ्या;त्यायलें मना करू नगा,कावून कि देवाचे
राज्य यायच्या सारख्यायचें हाय. 15 म्या
तुमाले खरखरं सांगतो,जो कोणी लेकरायं
सारखे होऊन देवाच्या राज्याचा स्वीकार
करणार नाय.तो त्याच्यात कधी जाईन नाई,
16 तवा त्यानं त्यायलें गोदीत.घेतलं अन् हात
ठेऊन त्यायलें आशीर्वाद देलां 17 जवां तो
रस्त्यानं जाऊ रायलां होता,तवा एक माणूस
पयत-पयत आलां टोगें टेकून त्याले पुसलं
काहो"उत्तम गुरुजी ,सार्वकालिक जीवन
भेट्यालें म्या काय करू 18 येशू त्यालें म्हणें,
मले उत्तम कावून मंन्त?कोणी नाय पण
देव उत्तम हाय. 19 तुले त..आग्या मालूम
हायबे...कि खून करू नोको ,व्यभिचार
करू नोको,चोरी करू नोको, खोटा पुरावा
देऊ नोको,टकवुं नोको,आपला बाप व
आपली मायचा मानपान ठेवं. 20 त्यानं
त्यालें म्हणलं गुरुजी ह्या सगड्या आग्या
म्या लानपणा पासून मानत. आलो हाय.
21 येशूनं त्याच्या इकडे पायलं,व त्याच्यावर
त्यानं प्रीती केलीं अन् म्हणलं, तुयात एका
गोठीची कमी हाय;जाय जे.जे तुयावाल.हाय
ते इकून टांक अन् गरीबाय्लें दान कर मंग
तुले स्वर्गात धन भेटीनं,अन् माह्या मांग
येवून जाय .. 22 पण हे आयकून त्यानं तोंड
कुळुमुळू झालं अन् दुखी होऊन तो ततून
निगाला कावून कि तो लय श्रीमंत होता
23 तवा येशू चंवभवताल पावून आपल्या
शिष्याय्लें म्हणें,देवाच्या राज्यांत श्रीमंता
यलें जांण किती अवघड हाय 24 तवा त्याचें
शिष्य त्याच्यां बोलण्याने चक्क झाले;येशू
नं त्यायलें डबल म्हणलं,लेंकरहो,देवाच्या
राज्यांत जाणं लय कठीण हाय; 25 धनवानाले
देवाच्या राज्यांत जाणं ह्यापेक्षा उंटाले
सुयचा शेद्रातून जाणे सोफ हाय 26 मंग ते
हापचंकहून आप-आपसांत म्हणू लागलें मंग
कोणाले तारण शक्य हाय 27 येशू नं त्यायलें
टकमक पायलं, अन् म्हणलं, माणसाय्लेंत
..हे अवघड हाय पण देवालें संगङ् काय
शक्य हाय. 28 पेत्रस त्यालें म्हणे,पाय आमी
संगङ् काय सोडून तुयावाल्या मांग आलो
हाय; 29 येशूनं उत्तर देलं,म्या तुमाले खरखंर
सांगतो,जाणंजाणं माह्या साठी अन् सुवार्ते
साठी घरदार, बईनभाऊ,मायबाप,लेंकर
बाकरं वावरगीवर सोडलं असीन; 30 असं
सगड्यायलें सांप्रतकाळी छळणुकीबरोबर
शंभरपटानं घरं,भाऊबईनी,आया लेंकर,वावंर

अन् येण्याऱ्या युगात सार्वकालिक जीवन
हे भेटल्या शिवाय रायणार नाय; 31 तरी
पयलें ते शेवटचे व शेवटचे ते पयलें,असे लय
झंन होतील . 32 मंग ते यरूशलेमात जावून
रायलें होतें, तवा येशू त्यायच्या समोर-समोर
रस्तानं जावू रायलां होता,.तवा ते हापचंक
झाले अन् जे त्याच्या मांग मांग चलू रायलें
होते, ते भेऊ रायलें होतें, तवा त्यानं त्या
बारा झणाय्लें आपल्या पासी बलावलं,
त्यायलें आपल्यालें काय होईन त्या बाऱ्यात
सांगू लागलां 33 पायजाक आपुन यरुशलेमात
जावून रायलो;तती माणसाच्या पोराले
मुख्य याजक व शास्त्री यायच्या इकडे देलं
जाईन;अन् ते त्यालें देहान्त शिक्षा ठरवतीन
अन् अन्यजातीयाच्या हाती देवून देतीन.
34 34अन् ते त्याची मजाँक करतीन.त्यावर ते
थुकतीन,त्यालें झपाटे मारतीन ,अन् त्याच्या
जीवं घेऊन टाकंतीन अन् तो तिसऱ्या दिवसी
परत जिवंत होईन. 35 जब्दीचे दोन पोरे..
याकोब अन् योहान,त्याच्यापासी जावून
म्हणलं,गुरुजी आमी तुयापासी जे काय मांगू
तसं तू आमच्या साठी करा, असी आमची
इच्या हाय, 36 तो त्यायलें म्हणें,म्या तुमच्या
साठी काय करायचं,कसी काय तुमची इच्या
हाय; 37 त्यायनं त्यालें म्हणलं, तुह्याल्या
वैभावांत आमच्यातून एकाले उजव्या बाजुलें
अन् दुसऱ्याले डाव्याबाजुले बसूं दे 38 येशूनं
त्यायलें म्हणलं,तुमी काय मागता? हे तुमाले
समजतं नाय;जो गिल्लास म्या पेईन तो
तुमालें पेला जाईन काय?अन् जो बाप्तिस्मा
म्या..घेईन तो तुमाले घेलां जाईन काय,
39 त्यायनं त्यालें म्हणलं, पेईन.येशूनं त्यायलें
म्हणलं,जो गिल्लास म्या पेईन तो तुमी
पेसांन काय अन् जो बाप्तिस्मा म्या घेईन
,तो तुमी घेसांन हे खरं हाय, 40 पण माह्या
उजव्या बाजुलें अन् डाव्या बाजूनं कोणाले
बसू दियाचं माह्या हाती नाय.त्या जागा
ज्यायच्या साठी ठेवल्यां हाय,ते त्यायलें
भेतीन 41 हे आयकून बाकीचे दाहा झंन
याकोब अन् योहानावर तपलें 42 तवा त्यायलें
आपल्यापासी बलाउन म्हणलं, अन्यजाती
सत्ताधारी मनून.मानलेलें हाय;ते त्यायच्या
वर जुलूम करतात.अन् त्यायच्यातलें मोठे
लोकं त्यायच्या वर अधिकार चालवतात,हे
तुमाले मालूम हाय; 43 पण तुमची गोट तसी
नाय;जो तुमच्यायतून ज्यायलें मोठं ह्यायचं
असीन त्यानं पयलें तुमच्या सेवक झालं
पायजे; 44 अन् ज्यालें कोणाले तुमच्यातून
प्रदान होयाची इच्या हाय;त्यानं पयलें
तुमच्या सेवक झाला पायजे; 45 कावून कि
मनुष्याच्या पोरगां सेवा करून घ्यालें नाय,त
सेवा कर्याले अन् बऱ्याच, झंनाय्लें मुक्तीसाठी
आपला जीव खंदणी म्हणून अर्पण कऱ्यालें
आला.हाय; 46 मंग ते येरीहोत आलें अन् तो..
त्याचें शिष्य, एक मोठी गर्दी यरीहोतून निगुं
रायली होती.तीमायाच्या पोरगां बरतिमाई
एक फुट्कां भिखारी रस्ताच्या बाजूनं बसलां
होता , 47 तवा हा नाशरेथकर येशू हाय,हे
आयकून तो जोरजोऱ्यानं म्हणू लागलां
अहो दाविदाच्या पोरा .माह्यावर द्या कर
. 48 तवा तो चूप रायला, पायजें म्हणून
लय झंनायेणं त्यालें दटावलं;पण तो आजूक
जोऱ्यानं कंल्ला करू रायलां हे दाविदाच्या
पोरां माह्यांवर दया कर. 49 तवा येशू तती
थांबला.अन् त्यानं म्हणलं त्यालें अन् लोकांनं
त्यालें बलाउन,म्हणलं जरासाकं धीर धर तो
तुलें बलाऊन रायला हाय. 50 तवा त्यानं
आपलें कपडे फेकून उटला.अन् येशू पासी
गेला. 51 येशू त्यालें म्हणें, म्या तुयासाठी
काय करू? तुयावाली.इच्या हाय ,फुटक्या
नं म्हणलं गुरुजी म्या डोयानं पाय्ल.पायजे.
52 येशूनं त्यालें म्हणलं, जाय.तुया विश्वासानं

तुले चांगलं केलं हाय,.अन् त्यालें फटकनं
दिसू. लागलं, अन् रस्तान येशु च्या मांग मांग
चालू लागला.

# 11

1 तवा ते यरुशलेमाच्या जवड
जैतुन च्या पहाडापासी.बैथफगे
अन् बैथानी पासी आले. तवा त्यानं आपल्या
शिष्यायतून.दोघालें धाडतांन.सांगतलं
2 समोरल्या गांवांत जा;अन् तती गेल्यावर
तुमाले एक शिंगरू दिसीन.त्यावर कोणी
कधी बसलं नाय;ते सोडून आणा. 3 अन्
तती तुमाले कोणी पुसीन.त सांगजा प्रभूले
याची गरज हाय; अन् तो लवकर मणां
वापस त्यालें अती पाठवीन. 4 तवा ते निगुन
तती आले तवा.त्यायलें रस्ताच्या बाजूनं
दरवाज्या पासी, बांधलेलं शिंगरू दिसलं
ते त्यालें सोडू राय्लें होते तवा 5 तती उभे
असलेल्या लोकांयतून कायी झणांयण त्यायलें
म्हणलं,हे शिंगरू तूमी कावून सोडतां?
6 येशूनं त्यायलें जसं सांगतल होत,. त्यायनं
तसचं म्हणलं, तवा त्यांनी त्यायलें जाऊ
देलं. 7 मंग त्यांयनं ते शिंगरू येशू पासी
आणलं,त्यावर आपले कपडे टाकले अन्
तो त्यावर बसलां. 8 तवा लय लोकांयन
आपआपलें,कपडे रस्थावर आतरंले;कायी
लोकांयनं वावरातून डांगा आणल्या, अन्
रस्थावर आतंरल्या; 9 अन् समोरलें जाणारे,
अन् मांगले येणारे लोकं, असां जयजयकार
करू लागलें की,होसान्ना,प्रभूच्या नांवान,
जे येत असतीन.त्यायच्या धन्यवाद हो ;
10 आमचा पूर्वज दावीद याचे येणारे राज्य
धन्यवादित होवो;अभायात होसान्ना'. 11 मंग
ते यरुशलेमात आल्यावर तो मंदिरात गेला
अन् त्यानं अवतल-भवताल पायल्यावर
झाकट.पडली म्हणून,तो आपल्या बारा
शिष्याय संग बेथानिया लें आला 12 दुसऱ्या
दिवशी ते बेथनियाहून निगाला तवा त्यालें
भूक लागली. 13 तवा पाल्यांन गचबच एक
अंजिराचं झाड त्यालें दिसल,अन् कदाचित्
काय तरी त्यावर असीन.या अपेक्षेन तो
त्या पासी गेला;पण तती गेल्यावर त्याले
पालापाला दिसला कावून कि अजून अंजिराचं
शिजन आलं नोत् . 14 तवा त्यानं त्याले
म्हणलं, कोणी पण तुयालं फय नाय खाईन हे
शिष्य आयकत होते. 15 मंग ते यरूशलेमात
आल्यावर तो मंदिरात गेला, अन् मंदिरात
लेवान- देवान करणाऱ्यायले बायर हाकलू
लागला,.त्यानं सराफाचे चौरंग अन् कबुतर
विकणाऱ्याच्या बैठकी उलटून देल्या. 16 त्यानं
कोणाले पण मंदिरातून कोणतही भदाडाय्लें
नेऊ नायी देलं 17 मंग तो त्यायलें शिकऊ
लागलां, अन् म्हणलां, कि माह्य घर सगड्या
जाती साठी प्रार्थना मंदिर म्हन्तीन;असं
शात्र्यात. हाय ना?पण तुमी लुटारूची गुफा
बनून टाकली हाय, 18 महा याजकाय्न अन्
शात्र्यांन हे आयकल्,अन् त्याले नाश कसं
करायचं याच्या बद्दल सोचू लागलें;कावून
कि सगडे लोकं त्याचं भाषण आयकून ठंप
झाले होते.अन् त्यालें ते भेत होतें. 19 रोज
संध्याकाळी ते शहराच्या बायर जात असत.
20 मंग सकाऊन रस्त्यानं जातांनं,त्यायलें तें
अंजिराचं,झाड बुडापासून 21 तवा पेत्राले ले
आठवण आली अन् त्यानं त्यालें म्हणलं,गुरुजी
तुमी ज्या अंजिराच्या झाडाले सराफ
देला.होता ते वायलेंल हाय पा. 22 येशूनं
त्यायलें उत्तर देलं,देवावर विश्वास ठेवा.
23 म्या तुमाले खरखंर सांगतो.कि, जे कोणी
या पहाडाले मनीनं, तू बुडापासून उपटून
समुद्रात टाकलां जा,असं मनीनं अन् आपल्या
मनांत शंका न करता असं मनीनं,त त्याच्या
बोलण्यां प्रमानंचं.त्या साठी तें घडून येईन
24 म्हणून म्या तुमालें सांगतो,तुमी प्रार्थना
करून जें काय मांगतलं ते आपल्यालें भेटलं

हाय असा विश्वास ठेवा म्हणजें ते तुमाले
भेटीनं. 25 अजुक तुमी जवां जवां प्रार्थना
कऱ्याले उभे राऊरायले तवां तवां तुमच्या
मनांत कोणाच्या बद्दल.कायी असीन तं
त्याची क्षमा करा,अशासाठी की,तुमच्या
स्वर्गातलां बाप तुमाले तुमच्या अपराधांची
क्षमा करीन. 26 अन् तुमी जर क्षमा करणार
नायं तं"तुमचां स्वर्गातलां बाप तुमच्या
अपराधांची क्षमा करणार नायं. 27 मंग ते
डबलं यरुशलेमांत आलें,अन् तो मंदिरात
फिरतं होता तवां मुख्य याजक,शास्त्री अन्
वडील त्याच्या पासी येऊन त्यालें पुसू
लागलें, 28 तुमी कोणत्या अधिकारानं या
गोष्टी करतां? अन् त्या कऱ्याचां अधिकार
तुमालें कोणं देलां? 29 येशूनं त्यायलें
म्हणलं,म्या तुमाले एक प्रश्न पुसतो मले
उत्तर द्या म्हणजें ह्या गोष्टी म्या कोणत्या
अधिकारानं करतो हाय ते म्या तुमालें
सांगीन. 30 योहानाचा बाप्तिस्मा स्वर्गापासून
होता.कि माणसांपासून होता? याचें मले
उत्तर द्या. 31 तवां ते आपआपसात.विचार
करू लागलें;स्वर्गापासून हाय;असं म्हणू
त..तो मनीनं तुमी त्याच्यावर विश्वास
कावून नाय; ठेवलां? 32 माणसांपासून होता
असं म्हणावं त..त्यायलें लोकांयच्या भेवं
लागतं होता,कावून कि योहान खरोखरचं
भविष्यवक्ता होता.हे संगळ्या लोकांयलें
माईत होतं. 33 तवां त्यायनं येशुलें उत्तर
देलं.आमालें माईत.नाय;येशू त्यायलें म्हणें
त.. मंग कोणत्या अधिकारांन म्या ह्या गोष्टी
करतो हाय;ते म्याही तुमालें सांगतं नाय;

12 1 मंग येशू कथेतून त्याईच्या.संग
बोलून रायला, कि कोण्या
एका माणसाण अंगुराची वाडी लावली.
अन् त्याच्या भवती चार कोपऱ्यावर
कुंपण कूपंभरला,अन् ईर खंन्दली.अन्
बांन्ध टाकला.अन् तो अंगुराच्या वाडीले.
दुसऱ्याच्या हाती देऊन परदेशात चालला
. 2 मंग हंगामावर अंगुराईच्या फळाई तून
काई भेटलं.पाहीजे म्हणून त्यांन अंगुराईच्या
वाडीच्या ईकळे ऐका दासाले पा़ठवलं
3 त्याईन त्या दासाले धरून मारलं.अन्
त्याले त्याईन रिकाम्याच हातांन पाठून
देल. 4 त्यांनं अजुक दुसऱ्या दासाले त्याच्या
ईकडे पाठवलं.त्याईन त्याचं डोक्स फोडून
टाकलं अन् त्याचा अपमान पण केला. 5 अन
त्यांन आजूक ऐका झणाले पाठवलं.अंन्
त्याईन त्याले मारून टाकलं,अंन् त्यान
असचं लय झनाय्ले पाठवलं.त्यायीले असचं
केलं.त्याईच्या तून कोणाले झोळपंल अन्
कोणाले मारून पन टाकलं. 6 मंग त्याच्या
पाशी ऐकचं झण राय्ला होता.अन् तो त्याचा
आवडता पोरगा होता . आखरी मध्ये त्यान
त्याच्या पोराले पन त्याईच्या पाशी असा
विचार करून पाठवलं कि ते माह्या पोराचा
मानदान व आदर सम्मान करतीन. 7 मंग त्या
वाडीत काम करणाऱ्याईन म्हटलं कि हा त
वारीस आहे.चला आपण त्याले मारून टाकू
मंग वाडी आपलीच होऊन जाईन. 8 अन्
मंग त्याईन त्याले पकडून मारून टाकलं,अंन्
अंगुराच्या वाडी तून त्याले बाहेर फेकून
देल, 9 अंन् मंग अंगुराच्या वाडी चा मालक
घरधनी काय करीन.अन् तो येऊन त्या
काम करणाऱ्याइ चा धीगाना करीन.अन्
अंगुराईची वाडी दुसऱ्याईले दिईन . 10 काय
तुम्ही पवित्र शास्त्रात हे वचन नाही वाचलं
काय कि ज्या गोट्याले राजमिसरी याईन
बेकार म्हटलं होत.तोचं गोटा कोण्याचा गोटा
झाला, 11 हे देवाच्या ईकून झालं अन् हें
आपल्या डोया समोर हें. आश्चर्याचंकार्य आहे.
12 तवा त्याईन त्याले पकड्याले.'पायलं.कावून
कि ते समजून गेले कि 'त्यान आमच्या

विरोधातच हि गोष्ट सांगतली;अंन् लोकाईले
भेले.अन्न त्याले सोडून ते चालले गेले.
13 तवा त्याईन त्याले गोष्टीत फसव्या साठी
त्याईन फरेसी अंन् हेरोदी याच्या तून बरेच
झणाईले,त्याच्या इकळे पाठवलं. 14 अंन्
त्याईन येऊन त्याले म्हटलं,गुरुजी आम्हाले
मालून आहें.आपण खरे आहा,कोणाची
काळजी नाई करत.कावून कि तुम्ही माणसाचं
तोंड पावून तुम्ही गोष्टी नाही.करत देवाचा
रस्ता मार्ग खरोखोर शिखवता. 15 केसर ले
कर देन हे.चांगल आहें काय कि नाही,आम्ही
देल पाहिजे कि नाही.त्यान त्याईचे ढोंग
वयखुण त्यानं म्हटलं,कि तुंम्ही माई परीक्षा
कायले पायता.एक पावली दिनार माह्या
पासी आणा.कि मी पाईन 16 अंन् ते त्याईन
आणली,तवा त्यान त्याईले म्हटलं ,कि हे मुर्ती
अंन् हे नावं कोणाचं आय. अंन् त्याईन म्हटलं
कि केईसरच. 17 येशून त्याईले म्हटलं जे
केसरचे हाय ते केसरले.द्या,अंन् देवाचं देवाले
भरून द्या,तवा त्याईन त्याच्या विषयीलय
आचर्य केल. 18 अंन् मंग पुनरुत्थान नाई.असं
म्हणनारे सदुकी हे त्याच्या पाशी येऊन
त्यायले.विचारलं 19 गुरुजी,मोसेंन आमच्या
साठी असं लिवून ठेवल.कोण्या एकचा
भावाले .लेकरुच नाही अंन् मेला त त्याच्या
भाऊ त्याच्या बायको संग लग्न करून घे,त्यान
आपल्या भावाचा वंश चालववा. 20 कोणी
सात भाऊ होते अंन् पहिल्या भावान लग्न
केल,अंन् तो बिना लेकराचा तो मरून
गेला, 21 अंन् मंग दुसऱ्या भावान त्याचं
बाई संग लग्न अंन् बिना लेकराचा मरून
गेला,अंन् तसचं तिसऱ्यान पण असचं केलं.
22 अंन् सात झनाइले लेकरू नाही,झालं अंन्
सगळयाईच्या आखरी त्याची बाईको मेली,
23 अंन् पुनरुत्थाना वात्की ते त्याच्या तून
कोणाची बायको होईन, कावून कि ते सात
झणायची बायको झाली,होती. 24 अंन् येशून
त्याईले म्हटलं कि तुम्ही शास्त्र वचनअंन्
देवबापाच्या सामर्थे नाई वळखलं म्हणून
तुम्ही भ्रमात पड्ले आहें,ना. 25 कावून ते
मेलेल्यातून जिवंत उठल्यावर लग्न करता,येत
नाही.अंन् लग्नई करून देत नाही.अंन्
ते स्वर्गातल्या देवदूता सारखे असतात.
26 मेलेल्यातून जिवंत उठवल्या जाईन यांच्या
विषयी मोश्याच्यामुसापुस्तकात लिवलं
आहें ,कि झुळपाच्या प्रकरणात,देवाण त्याले
म्हटलं. मी अब्राहमाचा देंव इसहाकाचा देव
अंन् याकोबाचा देव आहें.हे तुमच्या वाचनात
आलं नाही. काय , 27 तो मेलेल्याचा देव बाप
नाही.पण तो जिवंनता चा देव आहें.तुम्ही
लय मोठ्या ब्रामातपडले आहें. 28 तवा शास्त्री
लोकाई तून एका न येऊन त्याईले गोष्टी
करताना.आयेकाल अंन् त्यान त्याले संमपर्कात
उत्तर देल.ते पाहून त्याले विचार्ल,सर्वात
पय्ली आज्ञा कोणती, 29 येशू न त्याले उत्तर
देल,कि सर्व्या आज्ञा तून हे आहें.कि हे इस्रायेल
आयेक,देव आपला देवबाप एकचं देव आहें.
30 तू आपल्या प्रभू व देवबाप याच्यावर पूर्ण
मनाने,पूर्ण जीवाने ,पूर्ण बुद्धीने ,अंन् पूर्ण
शक्तीन प्रेम कर, 31 दुसरी हि कि जसं आपण
आपल्यावर प्रेम करतो,तसचं तू आपल्या
शेजाऱ्यावर प्रेम कर, याच्याऊन मोठी दुसरी
कोणतीच आज्ञा नाई. 32 तवा शास्त्री न त्याले
म्हटलं गुरुजी आपण खरोखर बरोबर बोलला
कि तो एकच आहे, त्याच्या अंन् शिवाय
दुसरा नाही. 33 अंन् त्यान पूर्ण मनांन,पूर्ण
बुद्धीन,अंन् पूर्ण शक्तीन प्रेम करण,अंन्
शेजाऱ्यानवर आपल्या सारखंच प्रेम ठेवण,हे
सगळया होम-उन अंन् बलीदानाऊन चांगल
आहें. 34 अंन् येशून त्याले पाय्ल.कि त्यान
शाहन पणान उत्तर देल.तवा त्याले म्हटलं,कि
तू देव बापाच्या राज्या पासून दूर नाही.तवा

पासून त्याले अजुक कोणाले विच्यारायची
हिम्मत नाही ,झाली. 35 मंग येशून देवळात
शिकवत असतांना,त्यान असं म्हटलं'कि
ख्रिस्त दाविदाचा पोरगा आहें .असं शास्त्री
म्हणतात, 36 दाविदान स्वताःपवित्र आत्म्या
च्या अगुवाईन म्हटलं कि देवान माझ्या
प्रभूले साग्तलं कि, मी तुया शत्रूंना तुया
पायाचे आसन करे पर्यंत तू माह्या उजवी कडे
बसं, 37 अंन् मंग दावीद स्वतः त्याले प्रभू
म्हणते,अंन मंग तो त्याचा पोरगा आहें.कसं
हे त्याचं बोलन आयकून लोकाईन आनंदान
आय्कल. 38 अंन् शिकवत असतांना,त्यान
त्याईले'म्हटलं कि शास्त्री पासून सावधान
राहा.ते लंम्बें; झगे घालून फिरतात. 39 अंन्
बजारात नमस्कार अंन् सभास्थानात मुख्य
मेन जागी अंन् जेवाच्या वाक्ती पण मुख्यच
जागा आवड्ते. 40 अंन् ते विधवांयचे घर
खाऊन टाकतात,अंन् दाखवण्यासाठी लय
वेळे प्रर्यंत लंबी लंबी प्रार्थना करतात.त्याईले
अधिक लयदण्ड भेटीन 41 अंन् लोकं
देवळातल्या भंडाराच्या समोर बसून पाऊन
रायले.होते कि'लोकं देवळातल्या कसे अंन्
कितीक पैसें टाकतात,अंन् लय धनाड्याईन
सुकीलय दान टाकलं. 42 तेव्ळया एका गरीब
विधवेन येऊन दोन दमळया टाकल्या .
43 तवा त्यान त्याच्या शिष्याइले. जवळ
बलाउन म्हटलं कि मी तुम्हाले खर खर
सांगतो, कि देवळाच्या भंडारात टाकणाऱ्या
ऊन या गरीब विधवेन सगळया ऊन अधिक
टाकलं. 44 काऊन कि सगळयाइन आपल्या
आपल्या समृद्धी तून टाकलं परंतु या विधवेन
आपल्या कमाईतून जे होत. तेवळ तिची सर्वं
उपजीविका टाकली.

13 1 अन् तवा तो मंदिरातूण निगुन
जात असतांना. त्याच्या शिष्याय्तून
एका शिष्याले म्हणलं' कि; गुरुजी पाहा
कसें-कसे गोट्याईचे अन् कशा -कशा
इमारती आहेत. 2 येशून त्याले म्हटलं कि
काय तुम्हि या मोठ्या मोठ्या घराइले
पायतांना.काय जे पडल्या जाईन नाई असा
तती गोठ्याईवर गोटा राईन नाई, 3 मंग तो
जैयतून पहाडाच्या वर मंदिराच्या समोर
बसला होता. अन् पतरस, याकुब ,अन् योहान
,अन्न आन्द्रीयासन पण अलग अलग जाऊन
त्याले विचारलं. 4 आम्हाले सांग कि या गोष्टी
कवां होतील.अन् जावा ह्या गोष्टी पुऱ्या
होतीनत ,बावा त्या वेळेचं चिन्हं काय होईन
,ते आम्हाले सांग. 5 मंग येशून त्याईले म्हतलं
कि सावधान राहा, कि कोनि तुम्हाले नाई
फसवलं पायजे. म्हणून जपा , 6 लय लोकं
माह्या नावान येथीन अन् म्हणतीन कि ,मी
तोच आहो,म्हणून लय लोकाईले, फासव्तीन.
7 जवा तुम्ही लढाया मांग लढाया च्या विषयी
आयकसान तवा तुम्ही 8 मंग जाती वर जात
अन् राज्यावर राज्य उठीन अन् कुटीसा पण
भूपंक होईन, अन् अकाल पडीन, हात वेद्राची
सुर्वात होईन. 9 पण तुम्ही आपल्या विषयात
तयार राहा, कावून कि लोकं तुम्हाले,न्याय
सभेत सोपून देतीन. अन् पंचाईताईत तुम्हाले
मारतीन,माह्या च्यान तुम्हाले शिपाई अन्
राजाई च्या समोर तुम्हाले, उभं करतीन
काऊन कि त्याईच्या साठी कि गवाही व्हावी,
म्हणून . 10 पण सर्वात पयले, सुवार्थेची
घोषणा सगळया जातीत, प्रचार केल्या जाईन
. 11 जवा ते तुम्हाले,घेऊन जातीन चवकशी
करतीन,दुसऱ्याईच्या हाती सोपून देतीन,
त तुम्ही पयलेस काळजी नोका करू,कि
आंम्ही काय बोलू,पण जे काई तुम्हाले बोला
लागिनते तुम्हाले तवाचं सांगातल्या जाईन,
तेच बोल्याचं,कारण कि तवा बोलणारे
तुम्ही नाई पण पवित्र आत्मा राईन .
12 अन् भाऊ भावाले,अन् बाबाले पोरगा

माऱ्यासाठी सोपून देतीन, अन् पोर आई
बाबा विरोधात ऊठतीन.अन् त्याईले मारून
टाकतीन. 13 अन् माह्या नावाच्यान सगळे
झन तुमचा राग तिरस्कार कारतीन,पण जें
आखरी परेंनत धीरज टिकूनधरतीन,त्याचाचं
उध्दार होईन. 14 पण जवा तुम्ही उजडणारी
बेकार वस्तूले जती नाई पायजे, तती
उभी पायली.वाचणारा समजून घीनतवा
यहुदीयात असलेल्याईन पहाडावर पवून
जाईन . 15 जो धाब्यावर कोठे अशीन त्यान
खाली उतरू नये, अन आपल्या घरांत पण
काई घ्यायले. घरात जाऊ नये . 16 अन्
कोणी वावरात असतांना,त्यान आपले कपळे
घ्यायले.मांग नाई जावाव? 17 त्या दिवसाईत
जे गर्भवती अन्न दुध पाजणाऱ्या असतीन
त्यांची अवस्ता अति भयंकर होणार . 18 अन्
प्रार्थना करत राहा, कि हे हिवाळयात जाडे
झालं नाई पायजे . 19 काऊन कि ते दिवस
अशे पिळ्याचेदुःखाचेअसतील, कि सुष्टी देवाण
बनवली, तिच्या सुर्वात पासून आजपर्यंत
झाल नाई असं अन् पुडे होणारं नाई,असें ते
दिवस संकटाचे होतील, 20 अन् जर ते दिवस
येशून प्रभून कमकेले नसते त कोणताच प्राणी
पण वाचला नसता ,पन त्यान आपल्याले
निवडलं,अन ज्याले त्यान निवडलं त्या
निवडल्यासाठी त्यान ते दिवस कम केले.
21 त्या दिवसाइत जर कोण तुम्हाले म्हतल?
कि पाहा ख्रिस्त अति आहें,नाईतर पहा तती
आहें , त खर माणू नका. 22 त्या वात्ती खोटे
खिस्त अन् खोटे भविष्यवक्ता उभे होतीन,
चिन्न अन् अत्भुत चमत्कार दाखवतीन, अन्
निवडल्याइले.पण घाबरून देतीन . 23 पण
तुम्ही सावधान राहा, पाहा म्या तुम्हाले
सगळया गोष्टी पयलेच सांगून ठेवलं आहे
. 24 त्या दिवसाईत हे दुखः संकट येऊन
गेल्यावर मंग 'सूर्य अंधारमय होईंन .अन्
चंद्र उजीळ दिन नाई. 25 अभायातून तारे
पडतीन. अन् अभायातल्या ताकतबलेहालून
जाईन, 26 तवा लोकं माणसाच्या पोराचा
लय पराक्रमान सामर्थ्यानेअन् महिमेच्या
संग ढगाइत येतांना पायतीन .अभायाच्या
27 त्या वेळेवर तो आपल्या दुताईले,पाठऊन
पृथ्वीवरच्या सीमेपासून त अभायाच्या
सीमेपरेन्त चाऱ्ही चारदिशाईतून आपल्या
निवडलेल्या इले 'एकटाएकत्र करीन. 28 अन्
आता अंजीराच्या झाडाच्या गोष्टीऊन
शिका.जवा त्या झाडाच्या डांगीले कवळी
होते,अन् त्याच्यातून कोम निगुन त्याच्यातून
पत्ते ,निगु लागतात.तवा तुम्हाले मालूम
होते कि ऊन्नाळा जवळ आला अस तुम्ही
समजता, 29 या सारखच जवा तुम्ही ह्या
गोष्टीले पायसान त जान्साल कि ते जवळ
आहे पण दरवाज्यावरच आहे .अस समजसान
, 30 मी तुम्हाले खर-खर सागतो की जतपरेंन्त
हे पूर्ण होणारं नाई तत परेंन्त हे पीडी नाश
हुईन नाई . 31 आभायाचा व पूथ्वीचा नाश
हुईन,परंतु माह्य वचन कधीच नाश होणार
नाई. 32 अन् त्या दिवसा विषयी अन् त्या
घटनेच्या विषयी कोनालेचा मालूम नाई,
स्वर्गदुताइले ,नाई ,पोराले पण नाई,फक्तं
बापालेच देवालेच मालूम आहें. 33 पाहा
जागृत राहा अन् प्रार्थना करत राहा ,कावून
कि तुम्ही नाई जान्साल कि तो वेळ कधी
येणारं. 34 दुसऱ्या देशात रायणाऱ्याकोणी
एका मानसान आपल घर सोडून आपल्या
नावकराले. आपल घर देल.अन् नवकारले
अधिकार देला, अन् हरेकाले आप आपल काम
देऊन गेला ,अन् चावकी दारले जागी रायाची
आज्ञा देल,म्हणून जागी राहा . 35 कारण कि
घरधनी कधी येईन, संध्याकाळी,मध्यरात्री
,कोंबडा आरवतान,नायत्न सकाळी हे तुम्हाले
ठाऊक नाई . 36 अस नाई झाल पायजे कि तो

अचानक आलात तुम्हाले झोपीत असतांना
पायलं तर 37 अन् जे मी तुम्हाले सांगतो,तेच
सर्वंव्याईले सांगतो,कि जागृत राहा ,

## 14

1 दोन दिवसाच्या झाल्यावर फसह
अन् अखमिरी भाकरीचा सन
होऊन रायला होता,अन् याजक व शास्त्री
या गोष्टीतच होते. कि त्याले कसं विरोध
करू अन् पकडून मारून टाकू, 2 मंग असें
म्हणत कि'सणाच्या दिवसी नाई,काऊन
कि लोकाईन तांड्व नाई मचवला पायजें.
3 मंग तो बैतनीय्यात शिमोन कुष्ठरोगीच्या
घरी जेवण कऱ्याले बसला होता. तवा एक
बाई संगमरमरच्या कुप्पित एक जटामासीच
बहुमुल्य शुद्ध ईत्र घेऊन आली,अन् कुप्पिले
तोडून ईत्र त्याच्या डोकंशावर टाकले. 4 पण
कोणी कोणी आपल्या मनांत,अन् आपसात
म्हणून रायले.होते कि या ईत्राचा धीगाना
केला? 5 काऊन कि या ईत्राची किमत त
तीनसे दिनार उन पण अधिक किमतीत इकून
गरीबाईत वाटता. आलं असतं असी त्याईन
तिच्या विरुद्ध कुरकुर केली. 6 येशून त्याईले
म्हटलं कि'तिले सोडून द्या तिले कायले. तरास
देऊन रायले? तीन त माया संग भल केल.
7 गरीब तुमच्याच संग रायतात.अन् तुम्हाले
जवा वाटल तवा तुम्ही भलाई करू शक्ता.पण
मी तुमच्या संग नेहम्मी नाई राईन. 8 अन्
जे काई तो करून रायली ,ते तीन केलं.तीन
मले रोयाच्या पयले.तीन माह्या आंगावर
ईत्र लावल . 9 मी तुम्हाले खर सांगतो,कि
साऱ्या जगात कुठी पण प्रचार केल्या
जाईन तती त्याच्या या कामाची चर्चा पण
त्याच्या आठवनीन केल्या जाईन 10 तवा
येहुदा इस्कार्य तो बाराइतून एक होता.तो
महायाजकाय पासी गेला,कि तो त्याले
त्याईच्या हाती दिन . 11 अन् ते आयकून
ते खुश झाले.अन् त्याले पैसे द्याय्ले ग्रहण
केल.अन् ते मौका पावूनरायले होते कि त्याले
कस पकडून देऊ बा 12 अखमिरी भाखरीच्या
सणाच्या पयल्या दिवशी त्या वात्ती बलिदान
करत जात.त्याच्या शिष्या -यन त्याले म्हटलं
कि ताय म्हन्न काय आहे.कि आम्ही जाऊन
तुया साठी फसह जेवाले तयार करू , 13 त्यान
त्याच्या शिष्याय्तून दोघायले अस म्हणून
पाठवल,कि नगरात जा अन् एक माणूस
तुम्हाले पाण्याचा माठ घेऊन जातांना तुम्हाले
भेटीन त्याच्या मांग मांग चालले जाजा.
14 अन् तो ज्या घरी जाईन त्या घरच्या
माल्कले म्हनजा,कि गुरुजी म्हणतात् कि माई
पहूनशाळा ज्याच्यात मी माया शिष्याई संग
फसह जेऊ ते कुटसा आहे? 15 अन् तो तुम्हाले
स्वतः साजव्लेली अन् तैयार केलेली एक मोठी
माळी दाखवीन तती तुमच्या साठी तैयार
करा. 16 अन् शिष्य निघून नगरात आले.अन्
जस त्यान त्याईले सांगतल होत.तसचं पायल
अन् फसह तैयार केला , 17 अन् संध्याकाळ
झाल्यावर तो बारा शिष्याई संग आला.
18 अन् ते बसून जेवण करून रायले होते.तवा
येशून त्याईले म्हटल कि'मी तुम्हाले खर
सांगतो, कि तुमच्याईतून जो माह्या संग
जेऊन रायला.मलेप पकडून दिन . 19 अन्
त्याईच्यावर उदाशी आली,अन् एक एक झन
त्याले म्हणे कि 'मी आहे काय तो ? 20 अन्
त्यान त्याले म्हटलं कि तो बाराय झनायतून
एक आहे.जो माया संग टाटात हात टाकून
रायला . 21 पण माणसाचा पोरगात जस
त्याच्या बाबतीत लीवलेलं आहे कि,अन् जाते
पण त्या माणसावर धिकार असो,कि त्याच्या
पासून माणसाचा पोरगा पकडल्या जातो'त्या
माणसाचा जन्म नसता झाला ते त्याच्या
साठी चांगल असत 22 अन् ते जेऊन रायले
होते.अन् त्यान भाकर घेतली,अन् आशीर्वाद
मागून तोडली.अन् त्याईले देली,अन् म्हटलं

कि घ्या हे माय शरीर आहे. 23 अन् मंग
त्यान गडवा प्यालाघेऊन धन्यवाद केला.अन्
त्याईले देला.अन् सगळयाइन त्याच्यातून
पेले. 24 अन् त्यान त्याईले म्हटल कि,माह्या हे
कराराच रक्त,आहे ते लय झनाय साठी वायत
जात आहे 25 मी तुम्हाले खर सांगतो,कि
द्राक्शरस त्या दिवसा परेंन्त मंग कधी पिईन
नाई,जत प्रेंन्तदेवा च्या राज्यात नवीन न
पिन. 26 मंग ते भजन गाऊन बाहेर जैतूनच्या
पहाडावर गेले. 27 तवा येशून त्याईले म्हटलं
कि,तुंम्ही ठोकर खासान,कावून कि लीव्लेल
आहे.मी मेंढपाळांले मारीन अन् मेंढर ईकळे
तीकडे होतीन. 28 पण मी जिवंत झाल्यावर
तुमच्या पयले गलीलात जाईन. 29 पत्रस
न त्याले म्हटलं कि,एकान ठोकर खाल्ली
त, खाल्ली,मी ठोकर नाई खाईन/30 येशून
त्याले म्हटलं कि,मी तुले खर सांगतो.कि आज
म्हणजे याचं राती 'कोंबड्यान दोन वेळा बाग
द्यायच्या पयले.तू तीन वेळा मले नाकार्शीन.
31 अन् त्यान अजून जोर देऊन म्हटल
कि,जर मले तुया संग मरावे लागल तरी मी
तुया इन्कार कधीच नाई करीन असचं त्या
सगळयाइन असच म्हटल. 32 मंग ते गतसमने
नावाच्या जागी आले.अन् त्यान आपल्या
शिष्याइले,म्हटलं'कि अति बसले राहा,जत
परेन्त मी प्रार्थना करीन. 33 अन् पत्रस,याकुब
व योहानले त्याच्या संग घेऊन,गेला.अन्
लय चकित कमजोर होऊन रायला होता.
34 अन् त्यान म्हटलं माय मन लय उदास
आहे.अत परेन्त कि मी मरणार आहो ,तुम्ही
अतिसाचं थांबा ,अन् जागी राहा. 35 अन्
तो थोडासा पुढे गेला.अन् जमिनीवर पडून
प्रार्थना करून रायला होता कि,जर होईंन्त हा
वेळ माह्याहून टळून जावो. 36 अन् म्हटल कि
हे अब्बा हे बापा,तू सर्व काई करू शकतो.हा
प्याला माया पासून दूर कर,तरी जस मी
म्हणतो तसं नाई ,पण जस तुले वाटीन
तसंच कर, 37 अन् मंग तो आला अन् त्याईले
झोपलेलं पायल तवा पत्रस ले म्हटलं कि हे
शिमोन तू झोपून रायला.?काय तू एक घंटा
घडी पण तू जागी रायला. 38 जागी राहा अन्
प्रार्थना करत राहा कि तुम्ही परीक्षात नाही
पडो,आत्मा तैयार आहे, पण शरीर आशक्त
आहे. 39 अन् तो मंग चालला गेला.अन् तेच
गोष्टसांगून प्रार्थना केली. 40 अन् अजून येऊन
त्याईले झोपलेलं पायल.कारण कि त्याईच्या
डोयात झोपिन भरलेले होते.अन् त्याईले
मालूम नोह्त कि त्याले काय ऊतर द्याव
बावा. 41 अन् तिसऱ्यानदा येऊन त्याईले
म्हटलं,आता झोपून राहा अन् विश्श्राराम
करा.बस वेळ जवळ आला,पाहा माणसाचा
पोरगा पापी माणसाच्या हाती धरून देल्या
जाईन. 42 ऊटा,चला ,पाहा,मले पकडणारा
जवळ येऊन रायला.आहे 43 तो असा म्हणूनच
रायला होता. कि येहुदा तो बारायतून
होता.अन् त्याच्या संग महायाजकायले अन्
शास्त्री वडीललोक त्याईच्या इकून लय
लोक तलवार, अन् काळया घेऊन लवकरच
आले. 44 अन् त्या पकडणाऱ्यान त्याईले हे
सांगतल होत कि ज्याचा मी मुका घेऊ तोच
आहे.त्याले पकडून व संभाडून नेजा. 45 अन्
तो आला अन् लवकरच त्याच्या पाशी जाऊन
म्हटलं,हे गुरुजी अन् त्यान त्याचे लय चुंबन
मुकेघेतली. 46 तवा त्याईन त्याच्यावर हात
टाकून त्याले पकडून घेतल. 47 त्याच्यातून
जे त्याच्या पाशी उभे होते.त्याच्या तून
एका झनान तलवार काढून महायाजकाच्या
सेवकावर चालवली,अन् त्याचा कान कापून
टाकला. 48 येशून त्याईले म्हटलं कि काय
तुम्ही डाकू समजून मले पकड्याले तलवार
अन् काळया घेऊन आले. 49 मी त दरोरोज
मंदिरात तुमच्या संग राऊन उपदेश देत

जावो,अन् तवा तुम्ही मले नाई पकडलं पण
हे याच्या साठीझाल कि पवित्र शास्त्रातले
गोष्टी पूर्ण व्हावे,म्हणून हे झाल आहे. 50 मंग
याच्यावर त्याचे सर्वं शिष्य त्याले सोडून
पयाले . 51 त्याच वेळी एक जवान उघळया
आंगावर चादर घेऊन त्याच्या मांग गेला.अन्
त्याले पण लोकाई न पकडून नेल. 52 अन् यो
चादर सोडून उघळया अंगाचाच पयाला
गेला. 53 अन् मंग ते येशुले महायाजका
पासी घेऊन गेले,अन सगळे महायाजक
अन् वडील अन् शास्त्री त्याच्या घरी जमा
झाले. 54 पेत्रान दुरून दुरून त्याच्या मांग
महायाज्काच्या आंगणा वाळयातअंदर परेंत
घेला अन् कामवाल्या संग बसूब आंगशकत
बसला, 55 महायाजक अन् सारी महासभा
येशुले मारून टाक्याचा विरोद करून गवाई
च्या मंग होते.अन् भेटली नाई . 56 कावून
कि लय झन त्याच्या विरोधात खोटी साक्ष
देऊन रायले होते,पण त्यायची साक्ष एक
सारखी नोह्ती. 57 तवा लय झनायन उठून
त्याच्यावर ते खोटी साक्ष देली. 58 कि
आम्ही याले हे म्हणतांना आयकल कि,मी
या हातांन बनवल्या देवळालेपडून टाकीन
अन् तीन दिवसात मी दुसर बनविण.जे
हातांन नाई बांधलेलं . 59 याच्यावर त्याईची
साक्षी एक सारखी नाई निघाली. 60 तवा
महायाजकान मन्धात उभ रून विचारल कि
तू कोणतच उत्तर नाई देत .?कि हे लोक
ताया विराधात काय साक्ष देतात. 61 अन्
तो चुपच्यापच रायला.अन् काहीच उत्तर
नाई देल.महायाज्कन त्याले अजून विचारल
काय तू त्या परम धन्य चा पोरगा येशू आहेस
काय.? 62 येशून म्हटल कि,मी आहे.अन् तुम्ही
माणसाच्या पोराले सर्व सामर्थ्याच्या जेवण्या
बाजून बसलेल.अन् आकाश्याच्या मेघासंग
येतांना पायसान. 63 तवा महायाजकान
आपले कपडे फाडून म्हटलं कि,आता आम्हाले
साक्षीदारायची काई जरुरत नाई . 64 तुम्ही
हे निंदा आयकली काय?तुमची राय काय
आहे.अन् त्या सगळयाईन म्हटल कि हा
मरण दंडाचा पात्र आहे. 65 तवा कोणीत
त्याच्यावर थुकन अन् कोणी त्याच तोंड
लपउन त्याले कोम्बे मारण त्याले म्हणत
जात कि भविष्यवाणी कर ,अन् कामदारायन
त्याले घेऊन चापता मारल्या 66 तवा पत्रस
खाली आंगणात होता,तवा महायाजकच्या
दाशी पयकी तती आली. 67 अन पत्रसले
सेकावर आंन्ग तपतांना पायल व त्याईच्या
ईकळे टकटकपायल,अन्त्याईले म्हटलं कि
तुय येशू नासरी संग होता. 68 पण त्यान
नाकारून म्हटलं कि,मी त्याले ओयखत
नाई,तू काय म्हणत मले मालूम नाई कि तू
काय म्हणून रायली.मंग तो बाहेर देवडीवर
गेला.तवा कोंबड्यान बाग देला. 69 अन् मंग
त्या दाशीन त्याले पाहून त्याच्या पाशी जे
उभे होते.मंग आजून म्हटल कि,त्याच्यातून
एक आहे. 70 तरी त्यान पुन्हा;नाकारले अन्
थोळया वेळान त्याईन जे त्याच्या पाशी
उभे होते.मंग पत्रसले म्हटल कि खरच तू
त्याच्यातून एक आहेस,कारण कि तू गलेली
पण आहेस 71 तवा त्यान नाई बावा तिरस्कार
करून ,शपथ घेऊन रायला होता.कि मी त्या
मानसाले ज्याची तुम्ही चर्चा गोस्त करता.मी
त्याले ओळखत नाई . 72 तवा लवकरच
दुसऱ्यान डाव कोंबल्यान बाग देला.पत्रसले हे
गोष्ट जे येशून त्याले म्हनली होती .ते आठोन
आली कि कोंबल्यान दोन वेळा बाग द्यायच्या
पयले.कि, तू तीन वेळा माह्या नाकार करशीन
तो या गोष्टीचा विचार करून रडला.

15 1 अन् सकाळ होतांच, मुख्य याजक,
वडील, अन् शास्त्री ह्यांच्या संग व
सगडी न्यायसभा ह्यायनं संल्ला करून.येशूलें

बांदून नेऊन पिलातूस च्या स्वाधीन केलं.
2 तवा पिलातूस नं त्यालें विचारलं तू
यहुधांचा राजा हायसं काय?त्यानं त्यालें
उत्तर देलं;आपुन म्हणतां तसचं 3 मुख्य
याजक त्याच्यावर खुपं सारे आरोप लाऊ
रायलें होतें 4 तवा पिलातूस नं त्यालें डबलं
विचारलं ,काय तू कावून उत्तर देतं नाई,
पाय ते तुयावर.कितीक आरोप लाऊ रायलें
हाय? 5 तरी येशूनं काईचं उत्तर देलं नाई;
ह्यावरून पिलातूस ले आश्चर्य वाटलं. 6 अन्
सणातीवाऱ्याच्या दिवसी' लोकं ज्या एखांध्या
कैधांले मांगतं जात.त्यालें तो त्यांयच्या साठी
सोडून देतं जाय; 7 तवा बंडातील कितीक
खुनी बंडखोरा संग बांधून ठेवलेला बरब्बा
नावांचा कोणी एक माणूस होता. 8 अन्
लोकांयची मोठी झुंबड समोर येऊन.पिलातूस
ले विनंती करून म्हणें, तू जसं आमच्या साठी
करतो तसचं कर. 9 पिलातूस नं त्यांयलें उत्तर
देलं,काय?म्या तुमच्या साठी यहुध्याचा
राज्या ले सोडून देऊ असी तुमची ईच्या हाय"
काय? 10 कावून की मुख्य याजकांनं त्यालें
हेव्याने धरून देलं होतं,हे त्याच्या ध्यानांत
येऊ लागलं. 11 पण त्यालें सोड्ल्या पेक्षा
बरब्बाले आमचां साठी सोडा असं मन्यालें
मुख्य याजकांनं लोकाईले चेतवंल. 12 तवा
पिलातूस न त्यांयलें डबलं विचारलं मंग तुमी
ज्यालें यहुध्यांचा राजा म्हणतां त्यालें म्या
काय करावं? 13 त्यालें वधस्तंभावर खिडून
टाका;असा त्यांयनं कल्ला केलां 14 पिलातूस
नं त्यांयलें म्हणलं कावून बा..यांन असं कोणतं
खराब केलं हाय"?.तरी ते आजूक कल्ला
करून म्हणू रायले यालें वधस्तंभावर खिडून
टाका. 15 तवा लोकांयले खुस कऱ्याच्या हेतूनं
पिलातूस न बरब्बाले त्यांयच्या साठी सोडून
देलं,अन् येशू ले कोडे मारून वधस्तंभावर
खिळण्यासाठी शिफायांपासी देऊन द 16 मंग
शिपायांयनं त्यालें प्रयतोग्रीमांत नावांच्या
कचेरीत नेलं अन् त्यांयनं संगड्या तुकडी
ले एखट्टा बलावलं 17 मंग त्यांयनं त्याच्या
आगावर जांभळे वस्त्र चढवलें अन् कांट्यांचा
मुकुट करून त्याच्या डोक्शांवर घातला;
18 अन् ते नमस्कार करून त्यालें म्हणत"हे
यहुध्यांच्या राज्या, तुह्यावाला जयजयकार
असो. 19 त्यांयनं त्यांच्या डोक्यावर बेतानं
मारलं; त्याच्यावर थुंकले टोगें टेकून त्यालें
नमस्कार करत जात. 20 अशी त्याची मजाक
केल्यावर, त्यांयनं त्याच्या आगावंरचे जांभळे
वस्त्र काढले, अन् सोताचे कपडे त्याले डबल
घालले,अन् वधस्तंभावर खिळण्यासाठी ते
त्यालें बायर घेऊन गेले. 21 अन् सिकन्दर
रुफूस ह्याच्या बाप, शिमोन नावांचा एक
कुरेनेकर माणूस,जो गावातून येऊ रायलां
होता, तो ततून जाऊ रायला होता;तवा
त्यायनं त्यालें रिकामं पकडलं,कि त्याच्या
वधस्तंभ घेऊन चले 22 अन् त्यायनं त्यालें
"गुलगुता" नावाच्या जागेवर ज्याच्या
अर्थ हा हाय कंवटीची जागा तती आणलं.
23 अन् त्यालें बोळ मिसंवलेला अंगुराच्या
रस पियाले देला,पण त्यानं तो घेतला
नाई 24 तवा त्यायनं त्यालें वधस्तंभावर
चढवलं,अन् त्याच्या कपड्यातून कोणता
कपडा कोणं घ्यायच्या ह्यासाठी त्यावर
चिठ्या टाकून त्या वाटून घेतल्या; 25 त्यायनं
त्यालें वधस्तंभावर चढवलं तवा दिवसाच्या
तिसरा तास झाला होता. 26 अन् त्याचं
दोषपत्र लिवून त्याच्या वर लावलं होतं,
असं कि "यहुध्याच्या राज्या,, 27 अन् त्यायनं
त्याच्या संग दोन चोरांना एक उजव्या
बाजूनं अन् एक डाव्या बाजूनं वधस्तंभावर
चढवलें 28 अन् अपराध्यांय संग तो गणलेला
जाईन,हा शास्त्राचा लेख पुरा झाला. 29 अन्
रस्तानं जाण्याऱ्या येणाऱ्यायनं,मुंण्डक हालुन

हालुन त्याची असी निंदा केली की,अरे
मन्दिर मोडून तीन दिवसांत बणवंन्याऱ्या,
वधस्तंभावरून खाली ये आपला बचाव
कर. 30 तसचं मुख्य याजक हि शास्त्र्यांसंग
31,आपआपसात थट्टा करून म्हणतं;ह्यानं
दुसऱ्याले तारलं, पण स्वताले बचाव करता
येत नाई; 32 इस्त्राएलाचा राजा ख्रिस्त, ह्यानं
आतां वधस्तंभावरून खाली ह्यावं,म्हणजे ते
पावून आमी विश्वास ठेऊ;अन् त्याच्या संग
जे वधस्तंभावर चढवलें होते, ते पण त्याची
निंदा करतं होते. 33 अन् दुपार पासून.त
तीन वाजे परेंत सर्व्या जगात अधांरपडला.
34 तिसऱ्या पहरी येशूनं मोठ्यानं आरोई
मारून म्हणलं,'एलोई,एलोई,लमा
सबखथनी?'म्हणजे 'माह्या देवा, माह्या देवा,
तू माह्याला त्याग कावून केला? 35 तवा तती
जवळ उभे रायणाऱ्यायं पैकी कईकायनं हे
आयकून म्हणलं,पाहा,तो एलियाले हाका
मारू रायला हाय. 36 अन् कोणं एकानं पयत
जाऊन स्पंज 'ओबेनं' डुबून अन् बोरुच्या
टोकावर ठेऊन त्यालें चोखाले देला;अन्
म्हणलां,थांबून जा एलिया ह्याले उतरावयास
येतें कि काय पाऊ. 37 तवा येशूनं मोठ्यानं
आरोई मारूली अन् जीवं सोडलां. 38 तवा
मंदिराचा पर्दा वरून खालं परेंत फाटला दोन
तुकडे झाला 39 जो सुभेदार त्याच्या जवळ
उभारायलेला होता, जवां त्यानं आरोई करून
आपला जीवं त.. सोडला, त्यानं हे पायलं
अन् म्हणलं, खरंच हा माणूस देवाचा पोरगा
हाय; 40 काई बाह्या दुरून पाऊ रायल्या
होत्या,त्याच्यातून मरीया मग्दालिया अन्
लायन्या याकोब अन् योसे ह्याची माय
मरिया,अन् सलोमे ह्या होत्या; 41 जवा तो
गालीलांत होता, तवा त्या त्याची सेवा
करतं असतं;अन् लय बाह्या यरूशलेमातून
त्यायच्या संग आल्या होत्या 42 तितक्यात
संध्याकाय झाली; तवा तो तयारीचा दिवस
म्हणजे शब्बाथाचा आगुदरला दिवस होता.
43 अरीमथाईतीलचा रायणारा योसेफ
आला,जो न्यायसभेचा एक सन्मान्य सभासद
जो सोता देवाच्या राज्याची वाट पायतं
होता, तो हिमंत धरून पिलातूस पासी
गेला अन् येशूचं प्रेर्थशरीर मांगतल 44 तवा
पिलातूस न आश्चर्य केलं, कि तो एवंडा लवकर
मेला,अन् सुभेदाराले पुसलं,काय त्यालें मरून
लय वेळ झाला काय? 45 सुभेदाराच्या पासून
माईत झाल्यावर,त्यानं ते शव योसेफाले देऊन
देलं. 46 तवा त्यानं एक मलमल चांदर ईकत
घेतलं,अन् शव चांद्रीनं गुडाऊन कब्रगड्यातजे
गोट्याईत खोदलेली होती,त्यातं ठेवलं,अन्
दरवाजाले एक मोठा गोटा लाऊन देला.
47 अन् त्यालें कुठं ठेवलं हाय, ते मरिया
मग्दालिया, अन् योसेची ची माय मरिया
पाऊ रायली होती;

16
1 जवा शब्बाथाचा
दिवस गेल्यावर,मरिया
मग्दालिया,याकोबची माय मरिया अन्
सलोमी ह्यायनं तिकडे जाऊन त्याले लाव्या
साठी सुगंधद्रव्य ईकत घेतली 2 अन् ह्प्ताच्या
पयल्या दिवसी मोठ्या सकाऊन,जवा सूर्य
निगालाचं होता, तवा त्या कब्रे पासी आल्या
3 तवा त्या एकमेकीले म्हणतं होत्या आपल्या
साठी ,कबरेच्या दरवाज्याचा गोटा कोणं
काडला. 4 जवा त्यायनं डोये वरते केले,
त पायलं कि गोटा लोटलेला हाय कावून
कि तो लय मोठा होता 5 मंग त्या कब्रेचा
अंदर जाऊन, त्यायनं एका जवानाले पांढरे
कपडे घालून उजव्या बाजूनं बसलेलं पाऊन
त्या हापचंक झाल्या. 6 तो त्यायलें म्हणें,
हापचंक होऊ नका;तुमी येशू नासरेथकर, जो
वधस्तंभावर चडवल्या गेला होता त्याले पाऊ
रायल्या काय,तो जिवंत झाला हाय;अतिनाय

पाहा,हेस ते जागा हाय,जती त्यायनं त्यालें
ठेवलं होतं 7 पण तुमी जा,अन् त्याच्या
शिष्याय्ले अन् पेत्राले हे सांगा, तो तुमच्या
पयले गालीलांत जाईन, जसं त्यानं तुमाले
सांगतल होतं,तुमी तती त्यालें पायसान| 8 मंग
त्या बायर निगुन कबरे पासून पयाल्या;कावून
की त्या कांपत कांपत भीऊन रायल्या होत्या,
त्यायनं कोणाले काईस सांग्त्ल नोतं; कावून
त्या लय भेल्या होत्या 9 हप्ताच्या पयल्या
दिवशीं भल्या सकाऊनचं, त्याचं पुनरुत्थान
झालं,त्यानं पईल्या पयल्यान मग्दालिया
मरिया ले जिचातून त्यानं सात भूतं काढली
होती तिले दिसला 10 तिनं जाऊन त्याच्या
संगचायंले" जे दुखी होऊन रडू रायले होते,
त्या लोकांय्ले सांगतल. 11 अन् त्यायनं हे
आयकून कि तो जिवंत झाला हाय,तिनं त्याले
पायलं हा;विश्वास केला नाय. 12 ह्या नंतर
तो दुसऱ्या रुपात त्यांयच्यातून दोगायलें
जवा ते गावाच्या इकडे जाऊ रायले होते,
तवा दिसून आला. 13 त्यायनं पण जाऊन
इतरांय्ले सांगतलं तरी त्यायनं त्यायच्या
वर विश्वास ठेवला नवतां. 14 नंतर तो त्या
अकरा झनायले,जवा ते जेव्याले बसले
होते, दिसून आला,पण त्यायच्या अविश्वास
अन् मनाचा कटीनपणा ह्या बद्दल त्यांयले
दोष लावला,कावून कि ज्यायनं त्याले
जिवंत झाल्यावर पायलं होतं त्यायनं
त्यायच्यावर विश्वास केला नोता. 15 मंग
त्यानं त्यायलें सांगतल,तुमी सऱ्या जगांत
जाऊन सर्व्या पृर्थीच्या लोकाईत सुवार्था
प्रसार करा. 16 जो विश्वास करीन, अन्
बाप्तिस्मा घेईन, त्याचंच तारण होईन;पण जो
विश्वास करीन नाई तो शिक्षेस पात्र ठरीन.
17 अन् विश्वास करणाऱ्याईत चिन्ह असत
जातीन;ते माह्यावाल्या नावांन भूतं काढतीन.
18 नयानया भाषा बोलतीनं,सर्फाय्ले
उचलं-तील, अन् कोणताहि प्राणघातक पदार्थ
पेले तरी तो त्यायलें काईचं बाधणार नाई;ते
बिमार लोकाय वर हात ठेवंतील तते चांगले
होऊन जातिनं 19 ह्या प्रमाणे त्यायच्या
बरोबर बोलल्यानंतर प्रभु येशू स्वर्गात
घेतल्या गेला,अन् देवाच्या उजव्या बाजून
बसला. 20 तवा ते तथून निगुन जाऊन सऱ्या
इकडे प्रसार केला,अन् प्रभू त्यायच्या संग
कार्य करत होता,अन् घडणाऱ्या चिन्हांच्या
द्वारे वचनाचें समर्थन करत होता. आमीन

# LUKE

# लुका

1 1 बऱ्याचं झनांय्न ज्या गोष्ठी
आमच्याईत झाल्या होत्या ,इतिहास
लीव्याले हाथभार लावला. 2 जसं
ज्यायनं जे पयलं-पणा पासून ज्या गोष्ठीले
पायणारे,वचनाचे सेवक होते आमच्या परन्त
पहुचवल्या. 3 म्हणून हे श्रीमान थियफीला
मले पण मालूम झाल्या,म्हणूत त्या गोष्टीचा
सगडा हालचाल सुरवाती पासून ठीक
ठीक जाचून त्या तुया साठी क्रमानुसार
लिवतो. 4 कि तू जाणून घे, कि ज्या गोष्टीचं
त्या शिकवनं घेतली किती अटल हाय.
5 यहुदीयांचा राजा हेरोद याच्या दिवसांत,
अबियाच्या वर्गा ईतला जखऱ्या नांवाचा एक
याजक होता, अन् त्याची बायको हरोणाचा
वशांतली होती,जिचं नावं अलीशिबा होतं
6 अन् ते दोगेही देवाच्या समोर धर्मी होते;
अन् देवाच्या सऱ्या आग्या अन् विध्या
प्रमाण वागतं, अन् निर्दोष होते,त्यायलें
लेकरू नोतं. 7 कावून कि अलीशिबा वांजोटी
होती,अन् ते दोगेही बुढे होते. 8 अन् असं
झालं कि तो आपल्या वर्गाच्या प्रमाण
देवाच्या समोर याजकाचं काम चालवतं
होता. 9 याजकपदाच्या रीती प्रमाण त्याच्या
नांवाची चिठ्ठी निगाली,कि जाऊन प्रभूच्या
मंदिरात धूप जाळयाची पाळी होती. 10 अन्
धूप जाळयाच्या वाकती लोकांयचा सरा
समुदाय बायर प्रार्थना करत होता. 11 तवा
प्रभूचा देवदूत धुपवेदीच्या उजव्या बाजूनं
उभा असलेला त्याले दिसून आला. 12 अन्
त्यालें पाऊन जखऱ्या घाबरला, त्याले भेवं
पडले. 13 पण देवदुतानं त्यालें म्हतलं,हे
जखऱ्या भेऊ नोको कावून कि तुह्याली प्रार्थना
आयकली हाय.तुह्याली बायको अलीशिबा
ईच्या पासून तुले पोरगा होईन अन् तू
त्याच्यावालं नांव योहान ठेवजो. 14 अन्
तुले आनंद उल्हास वाटीन;अन् लय लोकं
त्याच्या जन्मानं हर्षउल्हास करतीन 15 कावून
कि तो प्रभूच्या दृष्टीनं महान होईल.अन्
द्राक्षारस व मंधःदारू कधी पेईन नाई;अन्
आपल्या मायच्या गर्भा तूनचं पवित्र आत्म्यानं
परिपूर्ण असीनं 16 अन् तो इस्राएलातून
बऱ्याचं झनांय्ले त्यायच्या प्रभू देवाच्या
ईकडे फिरविनं. 17 तो एलियाच्या आत्म्यांत
अन् सामर्थ्यात हून त्याच्या समोर समोर
चलीन,बापांच मन पोरांच्या इकडे, अन्
आग्या नाई माणनाऱ्याय्ले तो धर्मी जनांच्या
ज्ञानाचा कडे वडविन, अन् प्रभूच्या साठी
सिद्ध प्रजा तयार करीन. 18 तवा जखऱ्यानं
देवदुताले पुसलं;हे म्या कसंकाय समजू?
कावून कि म्याःत बुढा हाय,अन् माह्याली
बायको पण बुढ़ी हाय. 19 देवदुतानं त्याले
उत्तर देलं,म्या गर्ब्रीएल हाय;जो देवा समोर
उभा रायतो,अन् मले तुह्या संग बोल्याले,
अन् सुवार्था तुले सांग्याले पाठवंण्यात आलं
हाय. 20 पाह्य,हे होईन त्या दिवसां लगू तु
मुका रायशीन,अन् तुले बोल्तां येईन नाई,
कावून कि तू माह्याल्या वचनांवर तू विश्वास
ठेवला न्हाय. 21 तवा लोकं जखऱ्याची वाट
पायतं होते, अन् त्याले पवित्रस्थानांत
उशीर लागल्यानं त्यायलें आश्चर्य वाटलं.

22 मंग तो बायर आल्यावर,त्याले त्यायच्या
संग बोल्तां नाई ये;तवा त्यायनं ओळखलं
कि याले पवित्रस्थानात दर्शन झालं हाय,
अन् तो त्यायलें खुणावुं लागला,व मुका
रायला. 23 जवां त्याच्या सेवेचे दिवस पुरे
झाल्यावर, तो आपल्या घरी गेला. 24 अन्
त्या दिवसानंतर त्याची बायको अलीशिबा
गरोधर रायली;अन् पाच महिन्या परेंत
तिनं स्वताले लपून ठेवलं 25 ती म्हणतं
होती, लोकाईत माह्यावाल्या अपमान दूर
कऱ्यासाठी प्रभूनं माह्या ईकडे पायलं तवा
माह्यासाठी त्यानं असं केलं. 26 नंतर सहाव्या
महिन्यात देवाच्या ईकून गब्रीएल देवदुताले
गालीलांतील नासरेथ नांवाच्या गावांत एका
कुमारीच्या ईकडे पाठवलं. 27 जिची सोयरिक
योसेफ नावांचा जो दाविदाच्या घराण्यांतला
एका माणसा संग झाली होती;अन् त्या
कुमारीचं नांव मरिया होतं. 28 अन् देवदुत
तिच्याकडे आंत येऊन म्हणाला;कृपा
पावलेल्या बाई तुह्याली जय असो,जिच्यावर
देवाचा अनुग्रह झाला हाय,प्रभू तुह्याबरोबर
हाय'. 29 पण ते त्याच्या बोलण्यानं खूप
घाबरली,अन् हे अभिवादन काय असीन
ह्याच्या ते विचार करू लागली. 30 देवदुतानं
तिले म्हणलं,हे मरिया भेऊ नोको,कावून कि
देवाचा अनुग्रह तुह्यावर हाय; 31 पाह्य,तू
गरोधर रायसीन, अन् तुले एक पोरगा
होईन.त्याचं नांव येशू ठेवजो. 32 तो महान
होईल; अन् त्यालें परमप्रधानाचा पोरगा
म्हनतीन; प्रभू देव त्यालें त्याच्या पूर्वज
दावीद ह्याचं राजासन देईन; 33 अन् तो
याकोबाच्या घराण्यावर 'युगानुयुग राज्य
करीन; अन् त्याच्या राज्याचा अंत होईन
नाई. 34 तवा मरियानं देवदुताले म्हणलं,हे
कसंकाय होईन म्हलेःत पुरुष ठावं नाहय
35 तवा देवदुतानं तिलें उत्तर देलं,पवित्र
आत्मा तुह्यावर येईन, अन् परमप्रधानाची
सामर्थ तुह्यावर छाया करीन;ह्या कारणानं
ज्याच्या जन्म होईल.त्यालें पवित्र,देवाचा
पोरगा असं म्हणतीन. 36 पाह्य,तुह्यावाल्या
नात्यांतली अलीशिबा हिले म्हतारपणी
पोराचा गर्भ रायला हाय; अन् जिले वाजोटी
म्हणतं तिलें सहावा मयना हाय; 37 कावून कि
देवाचं कोणतही वचन जे त्याच्या इकून असते
,ते सामर्थ्यहीन होईन नाई 38 तवा मरीयानं
म्हणलं,पाह्य,म्या प्रभूची दासी हाय;मले
तुह्या शब्दा प्रमाणे होवो.मंग देवदूत तिच्या
पासून निगुन गेला. 39 त्या दिवसांत मरिया
घाईघाईनं पहाड्याचा प्रदेशाईत यहुध्यातील
एका गावांत गेली. 40 अन् जखऱ्याचा घरी
जाऊन अलीशिबा ले नमस्कार केला. 41 तवा
असं झालं कि अलीशिबानं मरिया चा
नमस्कार आयकल्यावर तवा तिच्या पोटातलं
लेकरानं गुतकून उडी मारली, अन् अलीशिबा
पवित्र आत्म्यान परिपूर्ण झाली. 42 अन् तीनं
मोठ्या आवाजानं म्हणलं, स्त्रियांयतून तू धन्य
अन् तुह्या पोटचं फळ धन्य हाय. 43 हा अनुग्रह
मले कसा झाला हाय, कि माह्या प्रभूची आई
माह्यावाल्या पासी आली 44 पाह्य तुह्या
नमस्कराचा शब्द माह्या कानांत पडल्यावर
माह्या पोटातल्या लेकरानं आनंदानं उडी
मारली. 45 धन्य हाय ते जीनं विश्वास ठेवला,
कि ह्या गोष्टी प्रभूच्या इकून तिच्या म्हणल्या
हाय, त्या पुऱ्या होईन. 46 तवा मरियानं
म्हणलं,माह्यावाला जीवं प्रभुले थोर मान्ते.
47 अन् माह्या आत्मा, माह्य तारण करणारा
देवाच्यांन आनंदित हाय. 48 कावून कि 'त्यानं'
आपल्या दाशीच्या दैन्यावस्तेचें अवलोकन
केलं हाय' पाहा,आतांपासून सऱ्या पिढ्या मले
धन्य म्हणतीन; 49 कावून कि,जो शक्तिवान
हाय,त्यानं माह्यासाठी मोठ् मोठे काम केलें
हायत; अन् त्याचं नांव पवित्र हाय, 50 अन्

जे त्याचा 'भय' धरतात,त्यांच्यावर त्याची
दया पिढ्यान पिढ्या राईन. 51 त्यानं आपल्या
भुजबडान पराक्रम केला हाय, अन् जे सोताले
मोठ् समजतं,त्यायलें दाणाफान केलं हाय;
52 त्यानं अधिपत्याय्लें'राजसनांवरून'होडून
काढलं हाय',दीनांयले मोठ् केलं हाय. 53 त्यानं
भुखंलाग्लेंल्यायले उत्तम पदार्थान'तृप्त केलं
हाय,'व धनवानायंले रिकाम्या हातांन लाऊन
देलं हाय. 54 त्यानं आपला सेवक इस्राएल
ह्याला साहाय्य केलं हाय. 55 यासाठी कि
त्यानं आमच्या पुर्वजाय्ले सांगतलं,त्याप्रमाण
त्यानं अब्राहाम अन् त्याची संतान त्यायच्या
वर आपली दया सऱ्याकाळ आठवावी.
56 मरिया लगभग तीन मयने तिच्यापासी
राऊन, आपल्या घरी वापस आली.
57 अलीशिबाचे दिवस पूर्ण भरल्यावर तिले
पोरगा झाला. 58 प्रभूनं तिच्यावर मोठी
दया केली, हे आयकून तिचे शेजार च्यायनं
अन् तिच्या सोयऱ्यायनं तिच्या संग हर्ष
केला. 59 मंग असं झालं, आठव्या दिवसी
त्या लेकराचा खतना कर्याले आले, तवा
त्याचं नांव त्याच्या बापाच्या नावांवरून
जखऱ्या ठेवांच होतं. 60 पण त्याच्या आईनं
म्हणलं, 'नाह्य' ह्याचं नांव योहान ठेव्याचं
हाय. 61 त्यायनं तिले म्हटलं,ह्या नावांचा
तुह्याल्या सोयऱ्याईत कोणी नाह्य. 62 तवा
त्यायनं त्याच्या बापाले खुणाऊन पुसलं 63 कि
तूले ह्याचं कोणतं नांव ठेव्याचं हाय?त्यानं
लीव्याची पाटी मांगीतली लिऊन देलं, कि
त्याचं नांव योहान हाय ,तवा सऱ्याह्ले
आश्चर्य वाटलं. 64 मंग त्याचं तोंड अन् जीभं
एकदम मोकई झाली.अन् त्यानं देवाचां
धन्यवाद करून बोलू लागला. 65 अन् त्याच्या
अवतीभोंवती रायणाऱ्या सऱ्याय्लें भय
वाटला; अन् त्या सगड्या गोष्टीच्या बद्दल
यहुध्याच्या साऱ्या पहाडी देशात फैयंल्या.
66 अन् साऱ्या आयकनाऱ्यानं ह्या गोष्ठी
आपल्या मनांत विचार करून म्हणल्या,हे
"लेकरू" कसं होईन? कावून कि 'देवाचा'
हात त्याच्या बरोबर होता. 67 अन् त्याचा
बाप जखऱ्या,हा पवित्र आत्म्यांन परिपूर्ण हून
,भविष्यवाणी करू रायला. 68 इस्राएलाचा
देव प्रभू धन्यवादित हो,कावून कि त्यानं
आपल्या लोकांयले पाऊन अन् त्यांयची सूटका
केली हाय. 69 अन् आपला सेवक दावीद
च्या घराण्यात आपल्यासाठी एक बलवान
उध्दारक प्रस्थापीत केला हाय. 70 अन् जसं
त्यानं आपल्या पवित्र भविष्यवक्त्याच्या
पासून जे जगाच्या पयलं पणा पासून
होत आल्या हायत;असं त्यानं सांगतल.
71 म्हणजे- आपल्या 'शत्रूच्या' अन् आपल्या
'व्देष करणाऱ्याच्या सऱ्याच्या हातून सुटका
करावी. 72 ह्यासाठी कि आपल्या पूर्वजायवर'
त्यानं 'दया' करावी,अन् त्यानं आपला पवित्र
करारवाचा. 73 म्हणजें जे शफत आपला
पूर्वज अब्राहाम ह्याच्या संग त्यानं खांली
होती ते आठवावी. 74 ते अशी की,तुमी
आपल्या शत्रूच्या हातून सुटून. 75 माह्या
समोर पवित्रतानं अन् धार्मितानं जीवन भर
निर्भयपणान त्याची सेवा करत राहा. 76 अन्
हे लेकरां तूले परमप्रधानचा भविष्यवक्ता
म्ह्नतीन,कावून कि तू प्रभूच्या मार्ग तयार
कऱ्याले त्याच्या समोर समोर चालशीन;
77 याच्या साठी कि, त्याच्या लोकांयले
तारणाचं ज्ञान दे, जे त्यांयच्या पापाच्या
क्षमे पासून त्यायलें प्राप्त होते. 78 हे आपल्या
देवाच्या परम दयेनं झालं हाय,ज्याच्याचानं
वरून आपल्या वर सकाळचा उजिड
येयीन. 79 ह्यासाठी की,त्यानं अंधारात अन्
मृत्यूछायेत बसलेंल्याले प्रकाश दियासाठी अन्
आमचे पाय शांतीच्या मार्गास लावण्यासाठी
दिवसाच्या उदय आमच्या पासी येयीन. 80 ते

लेकरू वाढत गेलं अन् आत्म्यांत बलवान होतं
गेलं,अन् इस्राएलाच्या प्रगट होयाच्या दिवसां
परेंत जंगलात रायलं.

2 1 त्या दिवसांत असं झालं की, औगुस्तुस
कैसरची आज्ञा निगाली,ती अशी की,
सऱ्या जगातल्या लोकाय्चें नांव लीवा.
2 पयली नांव लिवाई' त्या वाकती झाली,जवा
"क्विरीनियुस सुरिया" सुभेदार होता.
3 तवा सर्वे लोकं आपआपल्या गावंगावी
नांव लीऊन दियाले गेलें. 4 योसेफ हा
दाविदाच्या घराण्यांतला व कुळांतला तो पण
गालीलातल्या नासरेथ गावातून यहुदीयाच्या
दाविदाच्या बेथलेहेम गावांत गेला. 5 आपल्या
मंगेतर मरीया जे गरोधर होती, तिचं पण
नांव लिऊन दियाले संग घेऊन गेला. 6 तती
असंतान असं झालं,तिचे दिवस पूर्ण भरले;
7 तती तिले पयला पोरगा झाला,अन् त्याले
बाळंत्यानं गुंडाऊन गव्हानीत ठेवलं,कावून
की त्यांयले उतारशाळेत जागा नोती. 8 त्याचं
परिसरांत मेंढपाळ जंगलात राऊन, रात्रीचा
वात्ती आपल्या कळपाचं राखनं करत होते.
9 तवा प्रभूचा एक दूत त्यांयच्या पासी
उभा रायलां,अन् प्रभूचा तेज त्यांयच्या
अवंताल-भवंताल चमकला,तवा ते लय
भेलें. 10 तवां देवदूत त्यांयलें म्हणलं,'भेऊ
नका'कावून की पाहा' जो मोठा आनंद सऱ्या
लोकाय्लें होणार हाय,त्याची सुवार्था म्या
तुमाले सांगतो; 11 ते हे आज दाविदाच्या
नगरात तुमच्या साठी एक 'तारणारा' जन्मला
हाय अन् तोचं "ख्रिस्त प्रभू" हाय ; 12 अन्
तुमच्या साठी त्याची खूण हे हाय,एक
बालक बाळंत्यान त्यालें गुंडाऊन गव्हानीत
ठेवलेलं पायसाण. 13 एवंड्यात स्वर्गातील
सैन्याच्या समुदाय,एकदमचं त्या देवदूता
पासी येऊन सरे देवदूत देवाची स्तुति
करत म्हणलें. 14 अभायांत देवाचा गौरव
अन् पृथ्वीवरच्या मनुष्याईत ज्यायच्या
त्याचां आशीर्वाद झाला हाय, शांती असो.
15 जवा देवदूत त्यायच्या पासून स्वर्गात
गेलें,तवा मेंडपाळानं एकमेंकायलें म्हणलं
चला आपुन बैथलेमेत जाऊन हे गोष्ट जे
प्रभून आपल्यालें सांग्तली हाय पाऊ. 16 तवा
त्यायनं घाईघाईनं जाऊन मरिया, योसेफ
अन् गव्हाणीत ठेवंलेल्या बाळाले पायलं.
17 त्यायनं त्यायलें पायल्यावर त्या बाळाचां
बद्दल त्यायलें जे सांगतलं होतं ते त्यायनं
त्या प्रगट केलं. 18 अन् सऱ्या आयकनाऱ्यानं
ज्या गोष्ठी मेंडपाळायनं त्यायलें सांगतल्या
हापचकं जनक वाटल्या. 19 पण मरीयेन ह्या
सऱ्या गोष्ठी आपल्या मनांत ठेवून विचार करू
लागली. 20 अन् मेंडपाळायंले जसं सांगण्यात
आलं,तसचं आयकून अन् पाऊन देवाच्या
गौरव स्तुति करून वापस गेल 21 जवा आठ
दिवस पूरे झालें, त्याचा 'खतना' कऱ्याच्या
वात्ती त्याचं नांव येशू ठेवण्यातं आलं,जे
दुतानं पोटातं यायच्या पयले ठेवलं होतं.
22 मंग मोशेच्या नियमशास्त्राप्रमाणे त्याचं
शुद्धीकरण कर्याचे दिवस भरल्यावर तवा ते
त्यालें यरूशलेम घेऊन गेलें समर्पण कऱ्याले.
23 जसं प्रभूच्या नियमशास्त्रांत लीवलेलं
हाय,की हर एक पयलोटा प्रभूचा साठी पवित्र
म्हणावा. 24 अन् प्रभूच्या नियमशास्त्राच्या
वचनाच्या अनुसार पारव्यांचा एक
जोडा,किंवा कबुतराचे दोन पिलं आणून
बलिदान करावे 25 अन् पाहा,यरुशलेमेत
शिमोन नांवाच्या एक माणूस होता अन् तो
धर्मी भक्त होता,अन् इस्राएलाच्या शांतीची
वाट पायत होता, पवित्र आत्मा त्याच्यावर
होता. 26 पवित्र आत्म्यांन त्यालें प्रगट केलं
होतं,की जत परंत तू प्रभू ख्रिस्ताले पाह्याच्या
पयले तथ-परंत मरणाले नाह्य पायणार.
27 आत्म्यांन त्यालें मंदिरात आणलं;जवा

माय-बापनं येशू बाळाले आतं आणलं,कि
त्याच्या साठी नियमशास्त्राच्या रीतीचा
अनुसार करे. 28 तवा त्यानं त्यालें आपल्या
गोदीत घेतलं अन् देवाचा धन्यवाद केला अन्
म्हणलं. 29 हे स्वामी,आता तू आपल्या दासाले
आपल्या वचनाच्या अनुसार शांतिनं जाऊ देतं
हायसं. 30 कावून कि माह्यावाल्या डोयानं
तुयालं तारण पायलं हाय. 31 ज्याले त्या
सऱ्या देशाच्या लोकांयच्या समोर तयार केलं
हाय. 32 कि तो अन्य जातीले उजिड ह्यासाठी
दिवा, अन् तुह्याल्या इस्राएलाची महिमा
हो. 33 अन् त्याचां बाप अन् माय त्याच्या
बऱ्यातल्या गोष्टी आयकत त्यांयलें त्या आश्चर्य
वाटत जाय. 34 तवा शिमोनानं त्यांयले
आशीर्वाद देला,अन् त्याच्या 'माय' मरियाले
म्हणलं,पाह्य तो इस्राएलात लय झनायचं
पड्याले,अन् उठ्याले,अन् एक असं चिन्ह
व्ह्याच्या साठी ठेवलं हाय,ज्याच्या विरोधात
गोष्टी होतीनं. 35 आणखी तुह्या स्वत:च्या
जिवातून तलवार भोसकून पार जाईन;हे
ह्यासाठी लयझनांयचे विचार मनातील
विचार प्रगट व्हावेत 36 अन् आशेराच्या
वशांतली हन्ना नांवाची फनुएलाची पोरगी
एक भविष्यवक्तीनं होती,ते फार बुढी
होती,अन् लग्न झाल्यावर सात वर्ष नवऱ्या
पासी रायली होती. 37 ते चौऱ्याऐंशी वर्षाची
विधवा होती,मंदिराले सोडत नोती ते
उपवास अन् प्रार्थना करून करून रात दिवसा
उपासना करत जाय. 38 अन् ते त्या वाक्ती
मंदिरात आल्यावर प्रभूचा धन्यवाद करून
रायली,जे यरुशलेमच्या छुटकाराची वाट
पायतं होते.त्याचा विषयी ते सांगू रायली.
39 अन् जवा त्यायनं प्रभूच्या नियमशास्त्राच्या
सऱ्या विधी पुऱ्या केल्यावर ते गालीलाच्या
आपल्या नासरेथ गावांत वापस गेलें. 40 अन्
तो बालक वाढत गेला,बलवान होतं गेला,अन्
ज्ञानानं परिपूर्ण होतं गेला अन् देवाचा अनुग्रह
त्याच्यावर होता. 41 अन् त्याचें माय-बाप
दरवर्षी वल्डांडण सणाले यरुशलेमेत जात
असतं. 42 जवा तो बारा वर्षाचा झाला,तवा
ते सणाच्या रीतीचा अनुसार यरुशलेमेत
गेलें. 43 मंग त्यायनं ते दिवस संपवल्यावर
ते वापस जाह्याले निगालें तवा तो पोरगा
येशू यरुशलेमेत मांग रायला अन् हे त्याच्या
माय-बापाले माईत नाह्य झालं. 44 ते
हे समजून कि तो वाटीच्या सोबत्याईत
अशीन त्यांयलें वाटे,एक दिवस निगुन
गेला.मंग ते त्यालें आपल्या सोयऱ्याईत अन्
ओळखिवाल्याईत पाह्याले लागले. 45 पण
तो त्यांयलें दिसला नाह्य,त पायतं-पायत
यरुशलेमेत वापस गेलें. 46 अन् असं झालं,
तीन दिवसानं,तो त्यांयलें मंदिरात गुरूच्या
पासी बसून त्यांयचं आयकून त्यांयच्या संग
प्रश्न करतांन पायलं. 47 अन् जे त्याचं आयकत
होते,ते त्याच्या बुध्दीवर, अन् त्याच्या
उत्तरांवरून थक्क झाले होते. 48 तवा त्यायनं
त्यालें पायलं चकित झालें,अन् त्याच्या
मायेन त्यालें म्हणलं;हे पोरा तू आमच्या संग
असा कावून वागला?पाह्य तुह्यावाला बाप
अन् म्या तुले दुखी होऊन तुलें पाऊ रायलो
हाय?. 49 तवा त्यानं त्यायलें म्हणलं,तुमी
माह्याला कावून शोध करत हायत?.काय
तुमाले मालूम नाह्य म्या माह्याला बापाच्या
घरांत असीन हे तुमाले ठाऊक नोत काय?
50 पण जे गोष्टी त्यानं त्यायलें म्हणल्या,ते
त्यायलें नाह्य समजल्या. 51 तवा तो त्यायच्या
संग नासरेथेत गेला,अन् त्यायच्या आज्ञात
रायला,अन् त्याच्या माय-न त्या सऱ्या गोष्टी
आपल्या मनात ठेवल्या. 52 अन् येशू आज्ञेत व
शरीरान अन् देवाच्या व माणसांच्या कृपेत
वाढत गेला.

# 3

1 तिबिर्य कैसर याच्या राज्याच्या
पंधराव्या वर्षी पंतय पिलात हा
यहुदीयाचा अधिकारी होता,अन् गालीलात
हेरोद राजा होता,अन् त्रखोनिनी त्याच्या
भाऊ फिलीप्पूस,अन् अबिलेनेचा लुसनीय
राजा होता. 2 जवा हन्ना अन् कयफा
महायाजक होते, त्या वाक्ती देवाचं वचन
जंगलात जखऱ्याचा पोरगा योहानले
वचन प्राप्त झालं. 3 अन् त्यानं यरदनाच्या
अवतालं-भवंतालच्या सर्व्या भागात
जाऊन,पापांच्या क्षमेसाठी पश्चातापाचा
बाप्तीसम्याचा संदेश देतं फिरला. 4 जसं
यशया भविष्यवक्ता ह्याचा वचनांच्या
पुस्तकात लिवलेलं हाय,ते असं जंगलात
ओरडण्याऱ्याचा शब्द झाला,कि प्रभूचा
मार्ग तयार करा,त्याचें रस्ते चांग्लें करा.
5 सऱ्या खोऱ्या भरल्या जातीन,सरे पहाड
अन् टेकड्या खाली केल्या जातीन,अन् जे
हेकोडं हाय ते संर्ख केलं जाईन अन् जे उंच
खाली हाय ते सफाट होईन. 6 अन् सरे
मनुष्यप्राणी 'देवाचं' तारण पायतीनं. 7 जे
भीड़ ची भीड़ त्याच्या पासी,बाप्तिस्मा
घ्यालें येतं जाय,त्यायलें तो म्हणें अरे सर्पाचे
पिलहो,होण्याऱ्या क्रोधापासून तुमाले
कोणं सुचवलं. 8 पश्चाताप च्या योग्य फळ
आणा,अन् आपल्या मनांत हे सोचू नका,की
आपला बाप अब्राहाम हाय,कावून की म्या
तुमाले म्हणतों,'देव' या गोट्यायंतून अब्राहाम
ह्याच्या साठी सन्तान उत्पन्न करू शकते.
9 अन् आता कुऱ्हाड झाडाच्या बुड़ापासी
ठेवली हाय,म्हणून जे जे झाड चांगलं फय देतं
नाह्य,ते तोडून आगीत टाकलं जात हाय.
10 तवा लोकायनं त्यालें पुसलं आमी काय
करावं? 11 त्यानं त्यांयलें उत्तर देलं,ज्याच्या
पासी दोन मनिले हायत,त्यानं' ज्यालें नाईत
द्याचं, अन् ज्याच्या पासी अन्न हाय,त्यानं पण
हेचं करावं. 12 मंग जकातदारही बाप्तिस्मा
घीयाले आले,अन् त्यालें पुसलं,हे गुरु आमी
काय करावं? 13 त्यानं त्यांयलें म्हणलं,तुमाले
जे नेमलेल हाय,त्याहून काई घेऊं नका.
14 तवा शिफायांयनं पण त्याले पुसलं,आमी
काय करावं? त्यानं त्यांयलें म्हतलं,कोणावर
उपद्रव करू नका,अन् कोणावर खोटा आरोप
लाऊ नका तर आपल्या पगारावर तृप्त
असा. 15 तवा लोकं वाट पायत असतां,अन्
सरे आपल्या आपल्या मनांत योहानचा
विषयी विचार करू रायलें होते, कि हा
ख्रिस्त त.. नाह्य. 16 योहानान संर्व्याचं
उत्तर देऊन म्हणलं,म्या तुमाले पाण्यानं
बाप्तिस्मा देतो.पण जो माह्याहून सामर्थी
हाय,म्या त..योग्य नाह्य, त्याच्या वायणांचा
बंद सोड्याले,तो तुमाले पवित्र आत्म्याच्या
आगीनं बाप्तिस्मा देईन. 17 त्याचं सुफ त्याच्या
हातांत हाय,अन् तो आपलं खळें चांगल्या
तरेन साफ करीन,अन् गव्हाले कोठाऱ्यात
एकत्र करीन,पण भुशाले आगीत जे ईजत
नाह्य जाऊन टाकीन. 18 आजूक त्यानं बऱ्याचं
गोष्ठी शिकऊन लोकायलें सुवार्था सांगत
रायला. 19 पण त्यानं राजा हेरोद ले त्याच्या
भाऊ फिलीप्पूसची बायको हेरोदिया च्या
बद्दल अन् सऱ्या दुष्कर्मा च्या बद्दल जे त्यानं
केलं होत दोष लावला. 20 म्हणून हेरोदन
त्यांयच्या पेक्षा हि दुष्कर्म केलं हाय,कि
योहानाले बंदीगृहात टाकून देलं. 21 जवा
सऱ्या लोकायन बाप्तिस्मा घेतला,अन् येशूनं
पण बाप्तिस्मा घेऊन प्रार्थना करू रायला
होता,तवा अभाय मोकड् झालं. 22 अन्
पवित्र आत्मा शरीरिक रुपान कबुतराप्रमाणे
त्याच्यावर उतरला,अन् अभायातून असा
शब्द झाला कि ,हा माह्याला प्रिय पोरगा
हाय, म्या तुयावर प्रसन्न हाय 23 जवा येशू
स्व:त उपदेश दिऊ रायला होता, तवा त्याचं

वय तीस वर्षाचं होतं,अन् असं समजल्या
जात होतं,तो योसेफाचा पोरगा हाय तो
एलिचा . 24अन् तो मत्तीयाचा,तो लेवीचा
,तो मल्खीचा,तो यन्नयाचा,तो योसेफाचा.
25अन् तो मत्तीथ्याचा,तो आमोसाचा,तो
नहुमाचा,तो हेस्लीचा,तो नग्गयाचा.
26अन् तो महथाचा,तो मत्तीयाचा,तो
शिमयीचा,तो योसेखाचा,तो योदाचा.
27अन् तो योहाणाचा,तो रेशाचा, तो
जरुब्बाबेलाचा,तो शल्तीएलाचा,तो
नेरीचा. 28अन् तो मल्खीचा,तो अद्दीचा,तो
कोसोमाचा,तो एल्मदामाचा,तो एराचा.
29अन् तो येशूचा,तो अलीयेजराचा,तो
योरीमाचा,तो मत्ताथाचा,तो लेवीचा.
30अन् तो शिमोणाचा,तो यहुदाचा,तो
योसेफाचा,तो योनामाचा,तो एल्याकीमाचा.
31अन् तो मल्याचा,तो मिन्नाचा,तो
मत्तत्ताचा,तो नाथानाचा,तो दाविदाचा.
32अन् तो इशायाचा,तो ओबेदाचा,तो
बवाजाचा,तो सल्मोनाचा,तो नहशोनाचा.
33अन् तो अम्मीनादाबाचा,तो अर्णयाचा,तो
हेस्त्रोनाचा,तो पेरेसाचा,तो यहुदाचा.
34अन् तो याकोबाचा,तो इसहाकाचा,तो
अब्राहामाचा,तो तेरहाचा,तो नाहोराचा.
35अन् तो सरूगाचा,तो रऊचा,तो
पेलेगाचा,तो एबरचा,तो शेलहाचा. 36अन्
तो केनानाचा,तो अर्पक्षदाचा तो शंमाचा,तो
नोहोचा तो लामेखाचा. 37अन् तो
मथुशलहाचा,तो हनोखाचा,तो यारेदाचा,तो
महललेलाचा,तो केनानाचा. 38अन् तो
अनोशाचा तो शेथाचा,तो आदामाचा,तो
देवाचा होता.

4 1मंग येशू पवित्र आत्म्यांन भरून
यार्देनेपासून परतला,अन् चाळीस
दिवसा परेंत आत्म्यांन जंगलात नेलं,अन्
तती सैतानानं त्यांची परीक्षा केली. 2त्या
दिवसात त्यानं काई खाल्लं नोतं,अन् जवा
दिवस पुरे झालें,तवा त्यालें भूक लागली.
3अन् सैतानान त्यालें म्हणलं,जर तू देवाचा
पोरगा हायसं त या गोट्याले मन भाकर
होय, असी आग्या कर 4मंग येशूनं त्यालें
उत्तर देलं, असं लीवलेल हाय मनुष्य केवल
भाकरीन जीवित नाह्य रायणार. 5अन् त्यानं
त्यालें वरते नेऊन काळाच्या एका क्षणात
जगाची सरवे राज्यें त्याले दाखवली. 6अन्
सैतानान त्याले म्हतलं, ह्या सरा अधिकार
अन् त्याचं वैभव म्या तुले देईन, कावून की हे
माह्यवाल्या हाती देलं हाय, अन् माह्या मनांत
येईन त्यालें म्या देतो. 7म्हणून जर तुं माह्या
समोर नमन करशीन त..हे सरं तुह्याल होईन.
8तवा येशूनं त्यालें उत्तर देलं, लीवलेलं
हाय,कि तू 'प्रभू आपल्या देवाले'नमन कर
अन् फक्त त्याचीचं सेवा कर असं लीवलेलं
हाय. 9तवा अजून तो त्यालें यरुशलेमाचा
मंदिरावर घेऊन गेला काटावर त्यालें उभं
केलं अन् त्यालें म्हंटल तू जर देवाचा पोरगा
हायसं त..ततून खाली उडी मार. 10कावून
की लीवलेलं हाय,कि तो तुह्याविषयी
आपल्या देवदुताले आग्या देईन कि तुह्य
रक्षन करे. 11अन् ते तुले हातांवर झेलतीन,
तुह्यावाला पाय गोट्यावर आपटावं नाह्य
म्हणून. 12तवा येशूनं त्यालें उत्तर देलं, हे पण
सांगतलेल हाय,कि तू प्रभू आपल्या देवाची
परीक्षा पाऊ नको. 13जवा सैतानानं सऱ्या
परीक्षा संपवल्या काई वेळा पुरता त्याच्या
पासून निगुन गेला. 14नंतर येशू आत्म्याच्या
साम्र्थ्यात भरून गालीलात वापस आला
अन् त्याची चर्चा आजू बाजू सऱ्या देशात
पसरंली. 15अन् तो त्यांयच्या सभास्थानात
शिकवन देतं रायला,अन् सरे झन त्याची
महिमा करत. 16मंग तो नासरेथांत आला,
जती तो लायण्याचा मोठा झाला होता, अन्

आपल्या रितीरिवाजाप्रमाणें शब्बाथ दिवसी
सभास्थानात जाऊन वाचाले उभा रायला.
17 तवा यशया भविष्यवक्त्याचा ग्रंथपाळ त्यालें
देल्या गेला,अन् त्यानं ग्रंथ खोलून ते जागा
काढली जती लीवलेलं हाय. 18 परमेश्वराचा
आत्मा माह्व्रर आला हाय, म्हणून त्यानं
दीनांय्लें सुवार्था सांग्याले माह्यालां अभिषेक
केला हाय,अन् मले या साठी पाटवलं हाय,कि
धरून नेलेल्यालें सुटका अन् फुटक्याय्लें परत
दिसासाठी सुवार्था पसार करु अन् ठेचले जात
हायत त्यायलें सोडू. 19 अन् प्रभूच्या प्रसन्न
रायाचां वर्षाचा पसार करू. 20 तवा त्यानं
ग्रंथ बंद करून सेवादाराचा हातांत देऊन
देला,खाली बसून गेला तवा सभास्थानाचे
सरे लोकं पायत रायलें. 21 तवा तो त्यांयलें
म्हणू रायला,आजचं हा शास्त्र-लेख तुमच्या
समोर पुरा झाला हाय. 22 अन् सगड्यानं
त्याची वाहवा केली, जवा कृपावचनाच्या
गोष्टी मुखांत आल्या त्याबद्दल ते आश्चर्य
करू लागले,काय तो योसेफाचा पोरगा त.
नशीन?. 23 त्यानं त्यांयलें म्हणलं,तुमी
माह्यावर हे म्हण खरचं लागू करालं,कि
वैध्या,तू स्वता:ले चांगलं कर;जे काय आमी
आयकलं हाय,कफर्णहुमांत ज्या गोष्टी त्या
केल्या हायतं त्या आपल्या गावांत कर. 24 अन्
तो म्हणलां,म्या तुमाले खरंखर सांगतो
की,कोणताई भविष्यवक्त्याचं आपल्या देशात
मान-सम्मान नाह्य होत. 25 आजून म्या
तुमाले खरंखर सांगतो की,एलियाच्या काळी
वाकती साडेतीन वर्षे अभाय बंद रायलं अन्
सऱ्या देशात मोठा दुष्काळ पडला होता,त्या
वाक्ती इस्राएलात लय विधवा होत्या.
26 तरी एलियाले त्यातल्या एकीच्याही पासी
नाह्य पाठवलं,फक्त 'सिदोन प्रदेशातल्या
सारफथच्या एका विधवे पासी पाठवलं होतं.
27 तसचं अलीशा भविष्यवक्त्याचा काळी लय
माहारोगीकुष्ठरोगीहोते,तरी त्यातले कोणी
नाह्य 'शुद्ध झाले'पण सुरीयाचा नामान शुद्ध
झाला. 28 हे आयकून जेवडे सभास्थानात
होते त्यायच्यातल्या सगड्यालें राग आला.
29 तवा ते उठले अन् त्यालें गावाबाहेर काढून
देलं, ज्या पहाडावर त्यांयचं गाव बसलं होतं,
त्याचं ठेकडीवरून त्यालें खाली फेक्याले
तथंलगु नेलं. 30 पण तो त्यांयच्या तून निगुन
चाल्ला गेला. 31 मंग तो गालीलातल्या
कफर्णहून गावात गेला,अन् शब्बाथ दिवसी
लोकाय्लें उपदेश देऊ रायला होता. 32 अन्
ते त्याच्या उपदेशानं हापचक्क झाले,कावून
की त्याचं बोलणं अधिकारयुक्त होतं. 33 तवा
सभास्थानात एक अशुद्ध आत्मा लागलेला
माणूस होता. 34 तो मोठ्यानं कल्ला करून
म्हण्लां,हे येशू नासरेथकरा,तू आमच्याईत
कायले पडतं?काय तू आमाले नाश कऱ्याले
आला कि काय?म्या तुले ओळखतो तू कोण
हायसं,देवाचा पवित्र माणूस हाय. 35 येशूनं
त्यालें दाटून म्हणलं,चूप राय अन् त्याच्यातून
निगुन जाय,तवा त्याच्यातल्या भूतानं
त्याले खाली आपटून,काई गडबड न कर्ता
त्याच्यातून निगुन गेला. 36 ह्यावर सऱ्याय्लें
आश्चर्य वाटलं,अन् आपआपसांत गोष्टी करून
राय्लें,हे कसं बोलणं हाय?हा अधिकारानं अन्
सामर्थानं अशुद्ध आत्म्यालें आग्या करते,अन्
ते निगुन जातात. 37 नंतर ह्या विषयाची
धूम बातमी अवताल-भवंतालच्या टिकाणी
पसरली. 38 मंग तो सभास्थानातून उठला
अन् शिमोनाच्या घरी गेला.शिमोंच्या सासूलें
ताप वाढलेल्या होता अन् त्यांयनं त्यासं
विनंती केली. 39 तवा त्यानं तिच्या समोर उभं
राहून, तापाले दटावलं अन् तवा ताप उतरला
अन् लगेचं ते उठून त्याची सेवा करू लागली.
40 सध्याकाय च्या वाक्ती,ज्यायच्या ज्यायच्या
घरी नाना प्रकारच्या बिमारीनं ग्रहसीत लोकं

होते ते सरे त्यांयनं त्याच्या पासी आणले, अन्
त्यानं एका एकावर हात ठेऊन त्यांयले चांगलं
केलं. 41 तवा दृष्टआत्मावाले भूत कल्ला करून
म्हणतं,कि तू देवाच्या पोरगा हाय,तवा भूत
लय झणायतून निगाले,तवा तो त्यांयलें दटावे
अन् बोलू नाही दे कावून त्यांय्लें ठावूक होतं
हा ख्रिस्त हाय. 42 मंग दिवस उगल्यावर
तो निगुन एका सुनसान जागी गेला,तवा
लोकायची मोठी झुभडं त्याले पायतं-पायतं
त्याच्या पासी गेले,अन् आपल्या पासून नाह्य
जावावं म्हणून ते त्यालें अळवतं होते. 43 पण
तो त्यांयलें म्हणे,मले बाकीच्या गावांत
देवाच्या राज्याची सुवार्था साग्याचं हाय,
कावून की मले त्यासाठी पाटवलं हाय .
44 मंग तो गालीलातल्या सभास्थानात प्रचार
करत फिरला.

5 1 जवा लोकांयची झुंबड़, वचन
आयक्यांले त्याच्या पासी गर्दी करत,
तवा तो गनेसरेच्या सरोवराच्या काटावर
उभा होता तवा असं झालं. 2 तवा त्यानं
सरोवराच्या काटावर दोन डोंगे बाजुले
लावलेल्या पायल्या,तवा मासोया पकडनारे
खाली उतरून जाई धुऊन रायले होते.
3 त्या डोंग्यायं पैकी एक डोंगा शिमोंनचा
होता, त्याच्यावर चडून तो त्यालें म्हणे
थोडंसाकं काटावरून अंदर घे, तवा तो बसला
लोकाय्लें शिकवण देऊ लागला. 4 जवा
बोलणं संपल्यावर त्यानं शिमोनालें म्हणलं,
खोल पाण्यात डोंग्यालें जाऊ दे ,मासोया
पकड्याले तुमचं जाळ टाका. 5 शिमोनानं
त्यालें उत्तर देलं, गुरुजी आमी सऱ्या रात्रभर
मेहनत केलें पण काईचं धरलं नाह्य,तरी
तुह्या म्हण्यांन ज़ाळ टाकतो. 6 मंग त्यांयनं
तसं केल्यावर मासोयांचा मोठा गोयंका
जाळयातं आला. तवा त्यांयचं जाळं फाटु
लागलं. 7 तवा त्यांयनं आपल्या संगचें जे
दुसऱ्या डोंग्यात होते, त्यांयलें खुणावलं की
येऊन आमाले साहायता करा,तवा त्यांयनं
येऊन दोनीही डोंगे एवडे भरले कि ते डुबू
लागलें. 8 तवा शिमोन पेत्र येशूच्या पाया
लागून म्हणलां,प्रभुजी माह्यावाल्या पासून
जाय कावून कि म्या पापी माणूस हाय.
9 कावून कि एवंळया मासोयाले पकंल्ळानं
त्यालें, अन् त्याच्या संगच्यालें अद्भुत वाटलं.
10 तसेंच जब्दीचे पोरं याकोब अन् योहान जे
शिमोनाच्या संगचे होते,अद्भूत वाटलं:तवा
येशूनं शिमोनाले म्हणलं,भेऊ नको ;अथून
तू जिवंत माणसाय्लें पकडशिन. 11 मंग
डोंगे किनाऱ्यावर लावल्यावर सरं सोडून
ते त्याचे अनुयायी झालें. 12 जवा तो एका
गावात होता,पाहा तती कुष्ठरोग माहारोग
झालेला एक माणूस होता,त्यानं येशुलें पाऊन
पालथं पडून त्यालें विनंती केली की,प्रभुजी
तुह्यावाली इच्या असीन त.. मले शुद्ध करू
शकतं. 13 तवा त्यानं हाताले पुढं करून त्याले
स्पर्श केला अन् म्हणलं,माह्याली इच्या हाय,
तू शुद्ध व्हावा,तवा तो माहारोग एकदम
चांगला झाला. 14 मंग त्यानं त्यालें चितऊन
सांगतलं कोणाले सांगू नको, स्वोताले
जाऊन याजकाले दाखवं,अन् आपल्याले
शुद्ध करण्यासाठी जे काई मोसेनं नेमलेल्या
प्रमानं कर. 15 पण त्या विषायाची चर्चा
आजूकचं फसरली,अन् बऱ्याचं लोकायची
गर्दी त्याचं आयक्यालें अन् बिमारीतून चांगलं
होया साठी तती जमाहु लागलें. 16 पण तो
जंगलात एकांतात जाऊन प्रार्थना करत जाय.
17 एका दिवसी असं झालं की,जवा उपदेश
देऊ रायला गालील अन् यहुदियाच्या हर-रेक
गावातून अन् यरूशलेमेतून आलेलें परुशी व
शास्त्री तती बसलेले होते.अन् रोग चांगलं
बरंकर्याची सामर्थ्य त्याच्या पासी होती.
18 तवा पा कित्येक माणसांयन कोण्याएक

पक्षघाती माणसांय्लें बाजीवर आणलं त्यांयलें
आत नेऊन,त्याच्या समोर नियाच्या उपाय
करू लागलें. 19 पण गर्दीच्यानं त्यांय्लें आत
नेयाले चानसं नोता, म्हणून त्यायनं घरावरचे
कवंल काढून बाजीसगट येशूच्या समोर
वरूनखाली सोडलं. 20 तवा त्याच्या विश्वास
पावून तो म्हणला,हे माणसा तुह्यावाल्या
पापांची क्षमा झाली हाय. 21 तवा शास्त्री
अन् परुशी विचार करू लागले कि हा कोण
हाय,जो देवाची निंदा करते,देवा वाचून कोणी
पापांची क्षमा करू शकत नाय. 22 तवा येशुनं
त्यांयच्या मनातला विचार ओळखून त्यांयलें
उत्तर देलं,तुमी तुमच्या मनात असा विचार
कायले करता? 23 तुह्यावाल्या पापांची
क्षमा झाली हाय ,नाह्यतर उठून चाल
ह्याच्यातून कोणतं म्हणनं सोफं हाय. 24 परंतु
तुमाले समजले पायले म्हणून,मनुष्याच्या
पोरालें पुर्थ्वीवरच्या पापांची क्षमा कर्याच्या
अधिकार हाय,त्यानं त्या पक्षघाती माणसाले
म्हणलां म्या तुले सांगतो आपली बाज उचलून
घे घरी जाय. 25 तो लगेचं त्यायच्या समोरून
उठला ज्याच्या वर तो पडून होता, ते
उचलून घेऊन देवाचा महिमा करत आपल्या
घरी गेला. 26 तवा ते सरे झन हापचकं
झाले;देवाचा महिमा करू लागले,अन्
भेऊन म्हणाले,आमी आज अलग गोष्टी
पायल्या हायत. 27 मंग तो बायर गेला,तवा
त्यानं लेवी नावाच्या एका जकातदाराले
जकातीच्या नाक्यावर बसलेलं पायलं अन्
त्यालें म्हणलं,माह्यावाल्या मांग ये. 28 तवा
तो सर्व काई सोडून,त्याच्यावाल्या मांग गेला.
29 मंग लेविनं आपल्या घरी त्याले मोठी
मेजवानी देली;त्यावात्ती त्याच्याबराबर
जकातदार दुसरे लोकं पण ह्यायचां मोठा
समुदाय जेव्याले बसला होता. 30 तवा
पुरूशी व त्यांयच्यातले शास्त्री हे त्याच्या
शिष्यायं विरुद्ध कुरकुर करत त्यायलें म्हणत,
जकातदार अन् पापी लोकांय संग तुमी
कायले जेव्याले बसले होते. 31 येशूनं त्यांस
उत्तर देलं,निरोग्याले वैधाची गरज नाह्य,
पण रोग्याले असते. 32 म्या धर्मियांसाठी
नाह्य,पण पापी लोकांस पश्चातापासाठी
बलव्याले आलो हाय. 33 तवा त्यांयनं
त्यांले म्हणलं,योहानाचे शिष्य वारंवार
उपास ठेवतात अन् प्रार्थना करतात, तसेंच
पुरुशाचे शिष्य करतात परन्तु तुह्यावाले
शिष्य खातात पितात. 34 येशूनं त्यांयलें
म्हटलं,वऱ्हाडाबराबर नवरदेव हाय तोपरेंत
तुमी त्यांय्लें उपास कर्याले लावता येईन
काय. 35 पण असे दिवस यईल,नवरदेवाले
त्यांच्या पासून अलग केलं जाईन,तवा ते त्या
दिवसांत उपास करतीन. 36 त्यानं एक दृष्टात
पण त्यांयलें सांगतला;कि कोणी माणूस नया
कपड्यातून फाडून जुन्या कपड्याले थीगय
नाईत लावत, तसं केलं त.. नवं फाटून जाईन
अन् जुन्यात जूडत पण नाह्य. 37 म्हणून
नवा द्राक्षारस जुन्या मटक्यात कोणी ठेवतं
नाह्य;ठेवला तर नवा द्राक्षारसाचे मटके फुटून
गऊन जातीन अन् मटक्याच्या नास होईन.
38 म्हणून नवा द्राक्षारस नव्या मटक्यातभरून
ठेवला पाय्जें. 39 कोणी माणूस जुना द्राक्षारस
पेऊन,नव्याची इच्या करत नाह्य,कावून कि
त्याले जुना चांगला हाय असं तो म्हणतें

# 6

1 मंग तो शब्बाथाच्या दिवशी वावरातून
जाऊन रायला,होता.अंन् त्याचे शिष्य
कणसं मोडून हातावर चोऊन खाऊन
रायले.होते. 2 अंन् तवा फरीशी मधून काई
झन असें, म्हणून रायले होते. कि 'तुम्ही हे
काम कायले, करून रायले.जे शब्बाथाच्या
दिवशी कारण चांगलं नाई, 3 येसून त्याईले
उत्तर देल कि,'कि काय तुम्हीं हे नी वाचाल
कि दविद जवा तो अंन् त्याच्या संगचे

उपाशी होते, तवा त्यान काय केल.? 4 तो
कसा देवाच्या घरीत गेला. अंन् समर्पित
भाकरी घेऊन खाल्ल्या, त्याईले खान
याजकाई शिवाय दुसर कोणाले,चांगल
नाई .अन् आपल्या संगच्याइले देल्या.
5 अन् त्यान त्याइले म्हटल' कि माणसाचा
पोरगा शब्बाथाचा धनी आहे. 6 अस झाल
कि एका शब्बाथवारी तो सभाथानात
जाऊन शिखऊन रायला होता.अन् तती एक
माणूस होता,त्याचा डावा हाथ सुकलेला
होता. 7 शास्त्री अन् फरशी त्याच्यावर दोष
लावाच्या फिक्रीत होते.कि पाऊ तो शब्बाथ
दिवशी चांगल करते कि नाई. 8 पण तो
त्याईच्या विच्याराई ले वयक्त होता.म्हणून
'त्यान सुक्या हात वाल्या मानसाले म्हटलं
कि उट अन् मन्धात उभा राय,अन् तो उभा
झाला. 9 येशून त्याले म्हटलं कि 'मी तुम्हाले
हे विचारतो ,कि शब्बाथ दिवशी काय चांगल
आहे,कि चांगल कारण या बेकार करण, जीव
वाचवणे या नाश करन,? 10 तवा त्यान
चारही इकून त्या साग्ड्याइले पाऊन त्या
मानसाले म्हटलं, कि 'आपला हात लंम्बा कर;
त्यान तसचं केलं,अन् त्याचा हात मंग चांगला
झाला. 11 अन् मंग ते स्वःता बाहेर जाऊन
आपसात विवाद करून रायले.होते कि 'आम्ही
येशूच्या संग काय करू ? 12 त्या दिवसाइत
तो पहाडावर प्रार्थना करयाले गेला,अन्
देवबापा संग प्रार्थना पूर्ण रात केली. 13 अन्
दिवस झाल्यावर त्यान आपल्या शिष्याइले
बालाउन त्याच्यातून बारा झणाईले निवडून
त्याईले प्रेषित म्हणून नाव देल. 14 अन् ते हे,
शिमोन त्यान त्याला पतरस पेत्र हे पण नाव
देल .त्याचा भाऊ आन्द्रीयास ,अन् याकुब
योहंना अन् याकुब,योहान अन् फिलीपूस
,अन् ब्रतुलेमी 15 अन् मत्ती थोमा अन् हल्फई
चा पोरगा याकुब शमोन त्याले जोल्तेस
म्हणतात, 16 अन् याकुब चा पोरगा यहूदा
अन् यहूदा इस्कार्य ज्यांन त्याले पकडून देल.
17 तवा तो त्याइच्या संग उतरून चैऊकात
एउन उभा झाला,अन् त्याच्या शिष्यायची
लय गर्दी अन् सारे यहुदिया ,येरुशलेम ,अन्
सूर अन सैदा च्या समुद्राच्या किनाऱ्या उन
लय लोक , 18 त्याचं आयक्याले अन् आपल्या
बिमारीतून चागलं होण्यासती त्याच्या पासी
आले होते. ते तती होते.अन् दुष्ट आत्म्या
पासून सतावले लोक पण तती चांगले हून
जात. 19 तवा सगळे लोक त्याले स्पर्श हात
लाव्याले करायची इच्छा होती,काऊन
कि त्याच्यातून समर्थ निगुन सगळयाइले
चांगल करत होती. 20 तवा त्यान आपल्या
शिष्याईले इकळे पावून म्हटलं,कि 'धन्य;
आहा तुम्ही जे दिन आहा. काऊन कि देवाचं
राज्य तुमचेच आहे. 21 धन्य; आहा तुम्ही जे
आता भुके आहेत,काऊन कि तुम्ही तृप्त केल्या
जासाल,धन्य;आहा तुम्हि जे आता रळतात
काऊन की ते हसतील . 22 धन्य आहा तुम्ही
जे माणसाच्या पोराच्या कारण लोक तुमच्या
संग द्रेंष तिरस्कार करतीन अन् तुम्हाले कडून
देतीन,अन् तुमची निंदा करतीन.अन् तुमचं
नाव बेकार समजून कापून टाकतीन. 23 त्या
दिवशी आंनदात होऊन,उड्या मारा; काऊन
कि पाहा ,तुमच्या साठी स्वर्गात मोठ प्रती
फलं आहे.त्याईच्या पूर्वज भविष्यवकत्या
च्या संग पण असचं करत होते. 24 पण
हाय तुमच्यावर जे धनवान हात,काऊन कि
तुम्हाले आपली शान्ति भेटून गेली. 25 पण
हाय तुमच्या वर जे आता तुरुप्त व्हा .काऊन
कि उपाशी असान त ,हाय तुम्हच्यावर जे
आता हसतात,काऊन इ ते शोक करतीन. अन्
रडतीन . 26 हाय तुमच्यावर ,जवा सगळे
माणस तुम्हाले चांगल म्हणतात.कौन कि
त्याईचे पूर्वज खोट्या भविष्यवक्त्यांच्या संग

पण असचं करत जात . 27 पण मी तुम्हाले
आयक्नाऱ्या ले म्हणतो कि'आपल्या शत्रूवर
प्रेम करा.जो तुमच्यावर तिरस्कार करींत
त्याईच चांगल करा. 28 जो तुम्हाले शाप
दिन त्याले आशीर्वाद द्या,जो तुमचा अपमान
करीन ,त्याच्या साठी प्रार्थना करा. 29 जो
ताया एका गालावर झापळ मारीन त्याच्या
इकळे तू दुसरा पण गाल फिरव अन् जो तुई
दोरी हिचकीन त्याले तू कुळत सदरा गेतांना
मना करू नोक 30 अन् जो कानी तुले मागीन
तुत्याले दे,अन् जो तुई कोणती वस्तू हिचकीन
त्याले मागू नोको. 31 अन् जसी तुमची
इच्छा आहे कि लोकन तुमच्या संग केल
पायजे.तुम्ही पण त्याईच्या संग तसच करा.
32 पण तुम्ही आपल्या प्रेम करणाऱ्याई संग
प्रेम करा.तवा तुमचे काय उपकार ?काऊन
कि पापी पण आपल्या प्रेम करणाऱ्याई वर
प्रेम करते. 33 अन् जर तुम्ही आपल्या भलाई
करणाऱ्यावाल्याई संग भलाई करता,तो
तुमचे काय उपकार ?काउन कि पापी पण
असचं करतात. 34 अन् जर तुम्ही त्याले
उधार देसान त त्याले मग भेटीन म्हणून
आशा ठेवता तो तुमची काय उपकार ?काऊन
कि पापी पापीयाईले उधार देत असते.कि
तेवडच भेटल पायजे. 35 पण आपल्या शत्रूवर
प्रेम करा,अन् भलाई करा.अन् मंग भेटल
पाहिजे म्हणून इच्छा नाई ठेवायची उधार
द्या,तुमच्या साठी मोठ प्रतिफल अशीन,अन्
तुम्ही परंमप्रधाना चे लेकर होसान, काऊन
तो त्याईच्यावर जो धन्यवाद नाई करत,अन्
बेकाऱ्यावर पण प्रेमळ आहे. 36 जसा तुमचा
बाप दयाळू आहे,तसेच तुम्ही पण दया
37 दोष लाऊ नका, तवा तुमच्यावर पण दोष
लावल्या जाणार नाई,दोषी नोका ठहरु तवा
तुम्ही पण दोषी नाई ठरवल्या जाशील क्षमा
केल्या जाईन . 38 देत जासाल त तुम्हाले
पण देल्या जाईन लोक पुर्ण माप दाबून
दुबून हालउन गिलउन शिक भरून तुमच्या
पदरी टाकतीन काऊन कि ज्या मापन तुम्ही
मापसान त्याच मापन तुमच्या साठी मापल्या
जाईन 39 मंग त्यान त्याईले म्हटलं,कि एक
गोष्ट सांगीतली,कि काय आंधळा आंधळयाले
रस्ता दाखविण काय?काय दोघ गडॅयातनाई
पडतीन काय? 40 शिष्याईन आपल्या गुरुजी
ऊन मोटा नाई,पण जो परिपक्य अशीन तो
आपल्या गुरुजी सारखा होईन. 41 तू आपल्या
भावाच्या डोयातल्या कुसय कचर कायले
पायत अन् आपल्याच दोयातल मुसी काढून
तुले सुचत नाई ? 42 अन् जावा तू आपल्याच
डोयातल कचर नाही पायत,त तू आपल्या
भावले कायले म्हणत कि 'हे भाऊ थांब तुया
दोयात्ल कचर काडू दे,?हे कपटी ढोंग्या पयले
आपल्या डोयातल कचर पयले.काड तवा जो
ताया भावाच्या डोयात जे काई पण आहे ते तू
लवकर अन् स्पष्ट दिशीन. 43 कोणतच चांगल
झाळ नाई, त्याले बेकार फळ इन बावा ,अन्
कोणतच बेकार झाळ आहे ज्याले चांगल फळ
ईन , 44 हर एक झाळ आपल्या फळा पासून
ओळखल्या जाते,काऊन कि लोक झाळा
इतून अंजीर नाई तोडत अन् नाई गोवरीच्या
झेडबरी उन अंगूर 45 चांगला माणूस आपल्या
अंतकरणातून चांगल्या भांडारातून चांगलच
काढतो. बेकार माणूस बेकरीतून बेकार
काढतो.काऊन कि जे अंतकरणात भरलेलं
असते तेच तोंडातून बाहेर निघते . 46 जवा
तुम्ही माई गोष्ट म्हणन नाई आयकत,त मले
प्रभू-प्रभू कायले म्हणता. 47 जो कोणी माह्या
माया पाशी येते,अन् माह्या गोष्टी आयकून
त्याले मानते मी त्याईले सांगतो. कि ते कोण
सारखे आहेत.? 48 तो त्या माणसा सारखा
आहे.त्यान घर बांध्याच्यावात्ती जमीन खोल
खदुन खडकावर पाया टाकला. अन् जावा

मंग पूर आला. व ओल आली .पण ते हलले
नाई, काऊन कि ते पक्कं होत, 49 पण जो
आयकून नाई मानत तो त्या माणसा सारखा
आहे.त्यान मातीवर बिना पाया टाकून घर
बांधल ज्वा त्याच्यावर ओल आली,तवा तो
लवकरच पडून गेल. अन् ते पडून त्याचा
धीगाना झाला.

7 1 जवा तो लोकाईले साऱ्या गोष्टी
सांगतल्यावर तो कपरनुमात आला.
2 अन् कोण्या सुबेदाराचा एक दास तो
त्याचा आवडता होता.बिमारीन मऱ्याले
टेकला होता. 3 त्यान येशूची येसुच्या विषयी
गोष्टी आयकून येहुदिया मधले काई वडील
मंडळीले त्याईले विनती करून त्याच्या पाशी
पाठवलं,कि येऊन माह्या दासाले चांगल कर.
4 ते येशूच्या पाशी येऊन त्याले ली बिनती
करून म्हणाले.कि तो याच्या योग्य आहे,कि
तू त्याच्या साठी हे कर . 5 कावून कि तो
आपल्या जातीवर प्रेम करते अन् त्यानच
आपल्या साठी सभास्थानात बनुन देल आहे.
6 येशू त्याईच्या संग -संग चालला.पण तवा
तो घरा पासून दूर नोता,तवा सुबेदारान लय
दोस्ताय झना पासी निरोप पाठवला कि हे
प्रभू दुख नको उचलू काऊन कि मी याच योग्य
नाई कि तू माह्या सप्पर खाली. याव म्हणून
योग्य नाई . 7 यांच्या च्यानं म्या स्वताले
याच्या योग्य पण नाई,समजल कि तुया पाशी
येऊ ,पण तर शब्द बोला माया दास चांगला
होणार. 8 मी पण अपराधी माणूस आहे.अन्
शिपाई माझ्या ताब्यात आहेत,अन् जावा
ऐकाले म्हणतो.कि जाय तवा तो जाते.अन्
दुसऱ्याले म्हणतो,कि ये त तो येते.अन्
आपल्या कोण्या दासाले हे कर त तो थे करते.
9 हे आयकून येशून अचंभा आचर्य केला.अन्
त्यान आपल्या मांग चालणाऱ्या लोकाईले
म्हटल कि मी इस्राएलात असा विश्वास
नाई पायला. 10 अन् पाठवलेल्या लोकाईन
घरी येऊन त्याले चांगल पायल. 11 काई
दिवसाच्या बाद तो नाईन नावाच्या नगरात
गेला. अन् त्याचे शिष्य अन् लोकायची एक
ली मोठी गर्दी त्याच्या संग चालली होती.
12 जावा तो नगरच्या फाटका पाशी गेला.तवा
त्यान पायल कि लोक एका मुरद्याले बाहेर
गेऊन चालले होते. जो आपल्या मायचा
एकलोवता पोरगा होता.अन् ते विधवा
होती.अन् नगरातले सगळे लोक .त्याच्या संग
13 ते त्याले पावून प्रभूले द्या आली, अन् त्याले
म्हटल कि रळू, नको . 14 तवा त्यान जवळ
येऊन मुरद्याच्या किडीले हात लावला, अन्
उचलणारे थांबुन गेले.तवा त्यान म्हटल कि,हे
तरुण मी तुले म्हणतो. कि ऊठ ; 15 तवा तो
मुर्दा उठून बसला, अन् बोलू न रायला.अन्
त्यान त्याच्या आईच्या पाशी सोडून देल
16 तवा सर्वावर भय प्राप्त झाला,अन्
ते देवबापाची गौरव करत म्हणाले, कि
आमच्या मध्ये एक मोठा भविष्यवक्ता उत्पन
झाला,अन् देवाण आपल्या लोकाईवर कृपा
दुष्टी केली. 17 अन् याच्या विषयी हे गोष्ट
सगळ्या यहुदीयात अन् आजू बाजूच्या साऱ्या
देशात हे गोष्ट पसरली. 18 अन् यहुना ले त्याचे
शिष्यन या गोष्टीचा समाचार देला, 19 तवा
यहुंनान आपल्या शिष्याइ तून दोघाईले
बलून प्रभू च्या पासी हे विचारले पाठवलं
,कि काय येणारा तुच आहे,काय कि आम्ही
दुसऱ्याची वाट पाऊ.. 20 त्याईन त्याच्या
पाशी येऊन म्हटल कि,यहुना बाप्तिस्मा
देणाऱ्यानआम्हाले तुया पाशी हे विच्याऱ्याले
पाठवल कि,येणारा तुच आहे.कि आम्ही
दुसऱ्याची वाट पाऊ? 21 त्याचं वेळी लय
झणाई न बिमाऱ्याइले पिडा व वाईट आतम्या
वाल्याईले,मुक्त केल. अन् लय फुटक्याईले
डोळे देले. 22 अन् त्यान त्याईले म्हटल कि,जे

काई तुम्ही पायल.अन् आयकल जाऊन
यहुना ले सांगजा कि आंधळे पायतात.लंगळे
चलतात व फिरतात.कुस्तरोगी शुद्ध होतात.
अन् गरीबलोकोइले सुर्वात सांगण्यात.येते.
23 अन् धन्य हात ते जे मायाचान परीशानी
उचलतात. 24 जवा यहुनाचे पाठवले
लोक चालले गेले. अन्तवा येशू यहुनाच्या
विषयात लोकाईआले सांगून रायला.तुम्ही
जंगलात काय पाया ले गेलते,?काय हवे न
हललेले,बोरू काय,? 25 त मंग तुम्ही कायले
पयले गेलते,काय ?नर्म कपडे घातलेल्या
मानसाले काय ?पा भडक कपडे घातलेले,अन्
सुखं आरामान रायणारे ते राज्याच्या भवनात
रायतात. 26 त मंग काय पायाले गेलते,?
काय कोण्या भविष्यवकत्या ले ?मी तुम्हाले
सांगतो ,कि भविष्यवकता उन मोठ्या ले ,
27 हाच तोच आहे,त्याच्या विषयी लीव्लेल
आहे कि पाय मी आपल्या दुताले तुया पयले
पाठवतो, तो तुया पयले रस्ता सरका करीन
28 मी तुम्हाले सांगतो कि जो बायाय पासून
जल्मला आहे,त्याईच्या तून यहुना उन मोटा
कोणीस नाई पण देवाच्या राज्यात लान उन
लांन आहे ते त्याच्याउन मोटा आहे. 29 अन्
सगळया साधारण माणसान आयकून,अन्
जकेतदाराईन यहुनाचा बाप्तिस्मा गेऊन देवळे
खरं मानल . 30 पण फरशी अन् वेवस्तापक
न त्याच्या हातून बाप्तिस्मा नाई गेऊन
देवाच्या ईच्छेले आपल्या विषयात टाल
मानल/नाई देल . 31 या पिडीच्या लोकायची
उपमा कथा कशी दु. कि ते कोणासारखे
आहेत. 32 ते त्याईच्या लेकराय सरके हात
ते बाजारात बसलेले,एक दुसऱ्याले आवाज
देण म्हणतात.कि आम्ही तुमच्या साठी
बासरी अन् तुम्ही नाचले नाई,आम्ही विलाप
केला.अन् तुम्ही रडले,नाही , 33 काऊन कि
यहुना बाप्तिस्मा देणारा पोई ख्यात आला
नाई अन् दक्षारस पेत आला अन् तुम्ही
म्हणता कि त्याच्यात अशुद्ध आत्मा आहे.
34 माणसाचा पोरगा खात पेत आला.अन्
तुम्ही म्हनता कि पहा पेटू कादोड अन् पेनारा
मानुस कर घेणारा अन् पाप्याचा मित्र '
35 पण ज्ञान आपल्या सगळया लेकर उन
चागलं असते. 36 मग कोण्या फरेशीन त्याले
विन्नती केली.कि माह्या संग जेवण कर तवा
तो त्या फरेशी च्या घरात जाऊन जेवण
कऱ्याले.बसला 37 अन् पहा,त्या नगराची
एक पापी बाई हे समजून कि तो फरीशी
च्या घरी जवन कराले बसला आहे. 38 अन्
त्याच्या पायाच्या पाशी, मांग उभी राहून,
त्याच्या पाया पासी रडूत असून त्याचे पाय
भिजून अन् आपल्या डोक्श्याच्या केसान
पुसून रायली,अन् त्याचे पाय लय -वेळा मुके
घेऊन ईञ लावल. 39 ते पाहून, तो फरीशी
ज्यान त्याले बलावले होत,त्यान त्याच्या
मनात मनल, जर हा भविष्यवक्ता असता तर
समजून गेला असता, म्हणजे जे त्याले हात
लावत आहे, ते कोण अन् कशी बाई आहे/
म्हणजे ते तर पापी आहे. 40 हे आयकून यीशुन
त्याच्या उत्तरात म्हनल ये शीमोना मले तुया
सोबत काही बोलायचं आहे त्यान म्हणल, हे
गुरु मन. 41 कोण्यातरी सावकाराचे दोन
कर्जदार होते, एक पाशेची, अन् दुसरयाले
पणास दे या चे असणार. 42 जेव्हा वापस
द्याले त्यांच्यापाशी काही नाही राहील,
तेव्हा त्यान त्या दोघाले माफ केल तर,
त्याच्यातून कोण त्याच्या सोबत प्रीति करील.
43 शिमोनान उत्तर देल, कि,माह्या लक्षात तो
ज्याच त्यान आजून सोडून देल,त्यान त्याले
सांगतल, त्या बरोबर विचार केला. 44 अन्
त्या बाई च्या इकडे वळून त्यान शिमोणाले
म्हणल, तू या बाईले पायत काय? मी तुया
घरात आलो पण त्या पाय धुवाले पाणी नाही

देल, पण इन माये पाय आसून भिजवले, अन्
आपल्या केसाने पुसलं. 45 त्या माह्या मुका
नाही घेतला, पण जेव्हा पासून मी आलो
तेव्हा पासून इन माह्या पायाचे मुके नाही
घेतले. 46 त्या माया डोकश्यावर तेल नाही
लावल, पण इन माह्या पायावर ईत्र लावल.
47 म्हणून मी तुमाले सांगतो; ईचे पाप लय
होते,माफ केले, कारण कि इने लय प्रेम केल;
पन ज्याच थोडी माफी भेटली, तो थोडच प्रेम
करते. 48 अन् त्यान बाईले म्हणलं, तुये पाप
माफ झाले. 49 तेव्हा जे लोक त्याच्या सोबत
जवाले बसले होते, ते आपल्या मनात विचार
करू लागले, ह्या कोण होय जो पापाले पन
माफ करते? 50 पन त्यान बाईले म्हणलं, तुया
विश्वासान तुले वाचवल,बरोबर जाय

8 1 त्याच्या नंतर तो नगर नगर अन् गाव
गाव प्रचार करत, अन् देवाच्या राज्याच
सुसमाचार सांगत, फिरू लागला. 2 अन् ते
बाहेर त्याच्या सोबत होते: अन् किती बाया
पण ज्याईले दुष्टआत्मा ऊन अन् बिमारीतून
सोडून देल,अन् थे हे होते.मरियम जे मगदिनी
म्हटल्या जात जाय तीच्यातून सात अशुध्द
आत्मा निघाल्या होत्या, 3 अन् हेरोदेसच्या
कारभारी खोज्या ची बायको,योअन्ना अन्
सुसन्नाह अन् लय दुसऱ्या बाया त्याईच्या
संग होत्या,अन् ते आपल्या पैशातून त्याची
सेवा करत होत्या. 4 जवा लय लोक जमा
झाले,अन् गावा -गावातून लोक त्याच्या पाशी
येत होते.तवा त्यान कथेतून सांगतल. 5 कि
एक वावर पेरणारा बी पेऱ्याले निघाला,
पेरायच्या वाक्ती काई रसत्यावर पडल,अन् ते
तुडून गेलं,अन् अभायातले पाखराईन खाऊन
टाकलं . 6 अन् काही खडकावर पड्ल, अन्
निघाल ओलावा नाई भेटल्यावर ते वाऊन
गेलं, 7 काही काटेरी झुडपात पडल,अन् काटेरी
झुडपांईन त्याईच्याच संग वाढलं,अन् वाढून
त्याईले त्यान दाबून टाकलं. 8 अन् काही
चांगल्या वावरात पडलं,अन् उगऊन शंभर पट
पिकं आले,हे म्हणून त्यान मोठ्यान म्हटल कि
ज्याईले आयकायले कान हात त्यान आयकून
घ्या. 9 त्याच्या शिष्याईन त्याले म्हटल, कि
कि हे गोष्ट काय आहे,त्यान म्हटलं 10 तुम्हाले
देवाच्या राज्याच्याच रहष्य जनन्याच दान
देल आहे.पण दुसऱ्याइले गोष्टीतून संगतल्या
जाते,यासाठी कि,पायत असतांना त्याईले
दिसत नाई,अन्न आयकत असतांना समजत
नाई, 11 गोष्ट हे आहे,कि बी, देवाचं वचन आहे.
12 रसत्याच्या बाजूचे हे हात ,त्याईन आयकल,
अन् शैतान येऊन त्याईच्या अंतकर्णातून वचन
गेऊन जाते. असं नाई झालं पायजे कि ते
विश्वास करून तारण पायतीन, 13 खडकावर
पडलेले ते हे हात, ते आयकतात अन् आनंदान
वचन ग्रहण करतात,पण त्याईले मूय नाई
भेटत पण ते काई वेळे पर्यंतच विश्वास
ठेवतात,अन् परीक्षेच्या वेळी भ्रमात पडतात.
14 कट्याईच्या झाडाईत पडलेल,हे आहे, जे
आयकतात,पण वाढता वाढता संसाराच्या
चिंता , धन व विशेष सुखात फसून जातात,अन्
त्याईच फल नाई पक्त , 15 पण चांगल्या
मातीवर पडलेलं हे आहे, जे आयकून निष्कपट
अन् चांगल्या अंतकरणान धरून ठेवतात,अन्
धीराने फळ देत जातात. 16 कोणी दिवा
लाऊन तो भांड्याखाली ठूत नाई, अन् नाई
पलंगाखाली ठूत नाई,पण तो दडळी वर
ठेवतात,कि अंदर येनाऱ्याले उजीळ उजीळ
दिसला पाहिजे. 17 अस लपवल नाई,जे
दिसणार नाई अन् न काही गुप्त आहे जे
उजीळात येणार नाई,अन् काई झाकलेल
नाई. 18 यासाठी चौकस राहा,कि तुम्ही कसें
आयक्ता ?काऊन कि ज्याच्या पाशी आहे त्याले
देल्या जाईन अन् ज्याच्या पाशी नाही,त्याच्या
पासून ते पण घेतल्या जाईन,ज्याले तो आपल

समजते. 19 त्याचे आई अन् त्याचे भाऊ त्याच्या पाशी आले,पण गर्दीच्यान त्याले ते भेटू शकले नाई. 20 अन् त्यान त्याले सांग्याल्या गेल कि तुये आई अन् भाऊ तुया साठी बाहेर उभे हात तुले भेट्याची ईच्या आहे, 21 त्यान त्याले उत्तरात त्याईले म्हटलं कि, माई आई व माये भाऊ हे हात जे देवच वचन आयेकतात,अन् मानतात. 22 मंग एका दिवशी तो अन् त्याचे शिष्य डोंग्यावर बसले, अन् त्यान त्याईले म्हटल कि,चला आपण नदीच्या तिकून जाऊ,अन् त्याईन डोंगा पाण्यात सोडला . 23 पण जावा डोंगा सुरु झाला तवा तो झोपून गेला.अन् तवाच वारा वाय्द्र सुटल अन् डोंगा पाण्यान भरण सुरु झाली,व ते संकटात पडले. 24 तवा त्याईन त्याच्या पाशी येऊन त्याले उठवलं,अन् म्हटल,कि गुरुजी गुरुजी आपण पाण्यात दुबतो,तवा त्यान उठून वारावाय्द्राले व लाटायले धमकावल,अन् ते थांबून गेल,अन् बंद झाल. 25 अन् त्यान त्याईले म्हटल,कि तुमचा विश्वास कुटस गेला.? पण ते भिऊन गेले.अन् हाप-चप झाले , एक मेकाईले म्हणून रायले कि हा, कोण आहे,? काऊन कि तो वारावायदनाले व पाण्याले तो आज्ञा देतो अन् ते पण त्यच आयेकतात.
26 मंग ते गरसेकराच्या देशात पोचला,तो त्या बाजुले गलील च्या समोर आहे. 27 जवा तो कटावर उतरला तवा त्या गावतला माणूस त्याले भेटला,त्याच्यात भूत अशुद्ध आत्मा होता.अन् लय दिवसान तो कपडे नेसला नोहता अन् नाई,घरी रायत होता. पण तो कब्राईत रायत होता. 28 अन् तो येशुले पाहून कल्ला केला अन् त्याच्या समोर पडून मोठ्यान म्हटल कि हे परम प्रधान देवाचा पोरगा येशू मले तुया संग कोणत काम ,मी तुले विनंती करतो कि मले त्रास देऊ नको.
29 काऊन कि तो त्या अशुद्ध आत्म्याले त्या माणसातून निग्याची आज्ञा देऊन रायला होता,यासाठी कि तो त्याच्यावर लय वेळा होऊन रायला होता. अन् लोक साकई दांडान बांधत होते तरी तो त्याई ले तोडत होता,अन् अशुद्ध आत्मा त्याले जंगलाइत फिरवत होती
30 येशून त्यैले म्हटल,कि तुय नाव काय आहे .त्यान म्हटल कि सैन' काऊन कि त्याच्यात लाय अशुद्ध आत्मा होती. अन् त्याईन त्याले विनंती केली कि आम्हाले अथाह् डोवान्धी गड्यात जायाची आज्ञा दे. 31 अन् त्याईन त्याले विनंती केली कि आम्हाले अथाह डोवान्धी गड्यात जायाची आज्ञा दे. 32 तती पहाडावर डुकरायचा एक कळप समुदायचरून रायला होता.त त्याईन त्याले विनंती केली कि आम्हाले,त्याच्यात जाऊ दे अन् त्यान त्याले जाऊ देल. 33 तवा अशुद्ध आत्मा त्या माणसातून निगुन त्या डुकराईत गेली.अन् तो कळप पयत जाऊन पाण्यात जाऊन डुबून मेला. 34 मंग ते चारणारे जे हे झाल ते पावून पयाले, अन् गावात व गल्लीत जाऊन त्याचा समाचार सांगतला. 35 अन् लोक जे हे झाल होत, ते पायाले गेले.अन् येशूच्या पाशी येऊन ज्या माणसातून अशुद्ध आत्मा निघाली होती.त्याले येशूच्या पायापाशी कपडे घालून चुपचाप बसलेलं पावून भिऊन गेले. 36 अन् पायणाऱ्याईन त्याईले सांगतल,कि तो अशुद्ध आत्म्याचा सतावलेला माणूस कसा चांगला झाला, 37 तवा गरसेकराच्या आजू बाजू चे सगळे लोकईन विनंती केली कि आमच्या अतून चालला जाय काऊन कि त्याईच्यावर लय भय पसरला होता, अन् ते डोंग्यावर बसून वापस चालले गेले. 38 ज्या माणसातून अशुद्ध आत्मा निघाली.होती तो त्याले विनंती करत होता.कि मले तुया संग रौ दे, पण येशून त्याले पटून देल.अन् म्हटल कि 39 आपल्या घरी चालला जाय, अन् लोकायले सांग कि

देवाण तुया साठी कसे मोठे मोठे काम केले,तो
जाऊन गावात जाऊन सांगत रायला, कि येशून
माया साठी किती मोठ काम केल. 40 अन्
येशू वापस जाऊन रायला होता,तवा लोक
त्याले आनदान भेटले.काऊन कि लोक त्याची
वाट पाहून रायले होते. 41 अन् पाहा, याईर
नावाचा माणूस जो सभास्थानाचा सरदार
होता.आला अन् येशूच्या पायावर पडून त्यान
विनंती केली, कि माह्या घरी चल, 42 काऊन
कि त्याची बारा वर्षाची एक्लोवती पोरगी
होती.अन् ते मऱ्याले झालती जवा तो चालला
होता.तवा लोक त्याच्यावर पळत होते. 43 अन्
ऐक बाई होती,तिले बारा वर्षा पासून रक्त
वाहण्याची बिमारी होती.अन् ते आपले सारे
पैसे वैद्यच्या मांग गमाउन बसली होती. तरी
ते कोणाच्या हातून चांगली झाली नोह्ती.
44 मंगून येऊन तीन त्याची कपड्या इले हात
लावला,अन् तुरंत इच् रक्त त्राव थांबला.
45 पण येसून म्हटल कि मला कोण हात
लावला.तव्हा सर्व झन म्हणत कि मी आहे,
तवा पत्रस अन् त्याच्या शिष्यायन म्हटल
कि गुरुजी मीच त गर्दीत दबून रायलो,
अन्तुयाव्र ते पडून रायले. 46 पण येशून म्हटल
कि कोण तरी मले हात लावला, काऊन
कि म्या जाणलं अन् मयातून शक्ती निघाली
. 47 ज्वा त्या बाईन पायल, कि मी लपू
नाई शकत.तवा ते कापत कापत आली अन्
त्याच्या पायावर पडून सगळया लोकीच्या
समोर सांगतल.कि म्या कोण्या करणान तुले
हात लावला.अन् लवकरच मी चांगली होऊन
गेली. 48 त्यान तिले म्हटल,कि पोरी तुया
विश्वासान तुले चांगल केल,आनंदान चालली
जाय. 49 तो हे म्हणूनच रायला होता.कि
कोण्या सभाथ्यानात च्या सरदाराच्या अतून
येऊन म्हटल, कि तुई पोरगी मरण पावली,
गुरुजीले दुख देऊ नको. 50 येसून हे आयकून
त्याईले उत्तर देल कि,भिऊ नोक फक्त विश्वास
ठेवा. त ते वाचून जाईन. 51 घरी येऊन त्यान
पत्रस ,यहुंना व याकुब अन् पोरीच्या आई
बाबले अन् दुसऱ्या इले अंदर जाऊ नाई
देल. 52 अन् सगळे तिच्या साठी रडून रायले
होते.पण त्यान म्हटल कि,रडू नोका ते मेली
नाई झोपली आहे. 53 ते हे जाणून कि मेली
आहे.त्याच्यावर हसून रायले होते. 54 पण
त्यान तिचा हात पकडून अन् आवाज देऊन
म्हटल,कि हे पोरगी उठ, 55 तवा तिचा आत्मा
परत आला,अन् ती लवकरच उठली.मंग त्यान
आज्ञा देली.कि तिले काई खायाले द्या , 56 तिचे
आई बाबा हाप-चप झाले,पण त्यान त्याईले
सांगतल,कि हे घडलेली गोष्ट कोणाले सांगू
नका .

9 1 मंग त्यानं त्या बारा झनायय्लें
बलावून,त्यांयलें सऱ्या भूतांयवर अन्
बिमारीले चांगलं कर्याची सामर्थ व अधिकार
देला. 2 अन् त्यांयलें देवाच्या राज्याच्या
प्रचार कर्याले,अन् बिमार्याय्लें चांगलं कर्याले
पाटवलं 3 तवा त्यानं त्यांयलें म्हणलं,रत्यानं
जातान काई घेऊ नका,नाई काडीनाई झोई
नाई भाकरी नाई पयसे नाई दोन दोन
मनिले. 4 अन् ज्या घरात जासानं ततीचं
रायजाक जवा जासान ततूनचं जाजाक 5 जे
कोणी तुमचं स्वागत करत नाईत, तवा त्या
गावातून निग्याच्या वाक्ती आपल्या पायाचा
धुंल्ळा झेटकवा, ह्या साठी कि त्यायच्यावर
साक्ष व्हावी म्हणून. 6 तवा ते निगाले अन्
गावगावी सऱ्या इकडे सुवार्था प्रचार करून
लोकायचे दुखणे चांगले करत फिरत गेले.
7 देशाचा राज्या हेरोद, ह्यानं ह्या सर्व्या गोष्टी
बद्दल आयकून,खूप घाबरला कावून कि कईक
झनं म्हणत होते, कि योहान मेल्यानंतर
जिवंत झाला हाय. 8 कईकायनं म्हणलं, कि
हा एलिया दिसते, अन् कईक म्हणत हा

भविष्यवक्त्यांय पयकी कोणी तरी जिवंत
झाला हाय. 9 पण हेरोदान म्हणलं,म्यात
योहानाचं मुंडक कापून टाकलं हाय,आता हा
कोण हाय कि ज्याच्या बद्दल म्या गोष्टी आयकू
रायलो? तवा त्यानं त्यालें पायण्याची इच्या
केली. 10 तवा प्रेषितांय्न त्याच्या पासी वापस
येऊन,त्यायनं जेंजें काई केलं तेंतें त्याला सर्व
सांगतलं, तवा त्यानं, त्यांयलें आपल्या संग
बेथसैयदा नांवाच्या गावात घेऊन गेला.
11 हे समजल्यावर लोकाईची झुंबड त्याच्या
मांग गेली,तवा तो आंनदान त्याय्लें भेटला
अन् देवाच्या राज्याच्या बाऱ्यात बोलू
लागला,अन् ज्याईलें चांगलं व्हायचं होतं
त्यांयलें चांगलं करत होता. 12 जवा दिवसं
डुबू रायला होता, तवा बारा झनं त्याच्या
पासी येऊन त्याले म्हणलं,लोकायय्लें जाऊ
द्या,ह्यासाठी कि ते अवतालं-भवतालंच्या
गावांत खेड्यात जाऊन आपआपल्या साठी
जेव्याची सोयसाय लावतीन,कावून कि
आपुन जंगलातल्या जागी व्हावो. 13 पण
त्यानं त्यांयलें म्हणलं,तुमीचं त्यांयलें जेव्याले
द्या;तवा त्यायनं म्हटलं आमच्या पासी पांच
भाकरी अन् दोन मासोया याच्या पेक्षा अधिक
नाई,पण जर आमी जाऊन यायंच्या साठी
अन्न ईकत घेतले त..हु शकते,तवा तती पांच
हजार माणसं होते. 14 तवा त्यानं आपल्या
शिष्याय्लें म्हटलं,पन्नास पन्नासांच्या पंगतीनं
यायलें बसवा. 15 त्यांयनं तसचं केलं,अन्
सऱ्या झणायंलें बसवलं. 16 तवा त्यानं त्या
पांच भाकरी अन् दोन मासोया घेतल्या,अन्
स्वर्गाच्या ईकडे पाऊन धन्यवाद देला,अन्
त्या तोडून लोकाईले वाढ्या साठी शिष्यायं
पासी देल्या. 17 तवा ते सरेझणं जेवन करून
तृप्त झाले,अन् उरलेल्या तुकड्याचे बारा
टोपल्या भरून उचलून घेतल्या. 18 जवा तो
एकांतात प्रार्थना करू रायला होता,तवा
शिष्य त्याच्या संग होतें,तवा त्यानं त्यांयलें
पुसलं,कि लोकं मले काय म्हणतात?. 19 तवा
त्यांयनं उत्तर देऊन म्हणलं,बाप्तिस्मा देणारा
योहान,अन् कईक म्हणतात एलिया,अन् कईक
झण म्हणतात कि पुरातन भविष्यवक्त्यातून
कोणी परत उठला हाय. 20 पण त्यानं त्यांयलें
म्हटलं,तुमी मले काय म्हणता?तवा पेत्रानं
उत्तर देलं "देवाचा ख्रिस्त". 21 तवा त्यानं
त्यांयलें चीताऊन सांगतलं,हे कोणाले सांगू
नका. 22 अन् त्यानं म्हणलं,माणसाच्या
पोराले पुष्कळ दु;खे भोगावी,अन् वडील व
मुख्ययाजक अन् शास्त्री ह्यायच्या कडून तुच्छ
समजून जीवानं मारलं जावं,अन् तो तिसऱ्या
दिवसी परत जिवंत व्हावा. 23 अन् त्यानं
सर्वाय्लें म्हणलं,जर कोणाले माह्याल्या मांग
यायचं हाय त.. त्याले सोताले नाकारून
व हररोज आपल्या वधस्तंभ उचलून घेऊन
माह्यावाल्या मांग चलावं. 24 कावून कि जो
कोणी आपला जीवं वांचवायला इच्छितो
तो त्याले गमाविन,पण जो माह्याल्या साठी
आपला जीवं गमावीन तो त्यालें वाचविन.
25 जर माणूस सऱ्या जगाले प्राप्त करून
सोताचा जीवं गमावीन,या सोताचा नाश
करून घेईन, तवा त्याले काय लाभ होईन?
26 जो कोण माह्यी, अन् माह्या वचनाच्या
बद्दल लाज धरते, तवा मनुष्याचा पोरगा
जवा आपल्या सोताच्या अन् बापाच्या अन्
पवित्र दुतांच्या गौरवानं येईन तवा त्यालें पण
वाटीन. 27 अन् म्या तुमाले खरंखर सांगतो,कि
अती उभे असलेल्यापैकी त्यांयच्यातून
कोणी कोणी असे हायत कि ते देवाचं राज्य
पायतीन तोपर्यंत त्यांयले मरणाचा अनुभव
येणार नाह्य. 28 ह्या गोष्टी झाल्यावर आठ
दिवसानंतर तो पेत्र अन् योहान अन् याकोब
यांयलें संग घेऊन प्रार्थना कर्यासाठी पहाडावर
गेला. 29 जवा तो प्रार्थना कर्याले लागला

होता,तवा त्याच्या चेहऱ्याचं रूप बदलून गेलं
अन् त्याचें कपडे पांढरे अन् चमकदार झाले.
30 अन् पाहा,मोशे अन् एलिया,हे दोन पुरुष
त्याच्या संग गोष्ठी करू राय्लें होते. 31 ते
तेजोमयात दिसले,अन् तो जे आपलं प्रयाण
यरुशलेमेत पुरं करणार होता,त्याच्या बद्दल
ते बोलू रायले होते. 32 तवा पेत्र अन् त्याच्या
संग जे होते ते झोपेच्या गुंगीत होते,जवा
ते पूर्ण पणे जागी झाले तवा त्यांयनं त्याचं
तेज,अन् जे पुरुष त्याच्या पासी उभे होते
त्यांयलें पण पायलं. 33 जवा ते त्याच्या पासून
जाऊ रायले, तवा पेत्राण येशुला म्हणलं,हे
गुरुजी आमचं अति असणं चांगलं हाय,तर
आमी तीन मंडप करतो,एक तुह्यासाठी,एक
मोशेसाठी अन् एक एलिया साठी, आपुन
काय बोलून रायलो हाय, याचं त्यालें भान
नवतं. 34 तो ह्या गोष्ठी बोलत असतां, तवा
एका ढगानं त्यांयच्या वर येवून सावली
करू लागला, जवा ते पुऱ्या ढगात समवू
लागले तवा ते लय भेलें. 35 "अन् त्या ढगातून
आवाज आला कि हा "माह्याला निवडलेला
पोरगा हाय याचं आयका""." 36 तो आवाज
झाल्यावर येशुले तती एकटचं पायलं, अन् ते
चूप रायले,आणखी काई पायलं हाय,त्यातल्या
काईचं गोष्ठी कोणाले सांगतल्या नाई. 37 अन्
दुसऱ्या दिवसी ते पहाडावून उतरल्यावर तवा
लोकायची मोठी झुभंड त्याले भेटली. 38 तवा
पहा लोकायंच्या झुंबड मधून एक माणूस
जोऱ्यानं म्हणाला,हे गुरुजी,म्या तुले विनंती
करतो कि माह्याल्या पोरावरं कृपादृष्टी
कर,कावून कि तो माह्यावालं एकूलंत पोरं
हाय. 39 अन् पाह्य,कोणता आत्मा त्याले
पकडते,मंग तो एकदमचं कल्ला करते,अन्
तो त्यालें असं मरोडून टाकते कि त्याच्या
तोडात फेस आणते अन् त्यालें कुचलून मोठ्या
कठीनाईनं सोडून जाते. 40 अन् म्या तुह्या
शिष्याय्लें विनंती केली कि त्याच्यातून त्यालें
काढून टाक्यालें,पण त्यांयलें काढता नाह्य
आला. 41 तवा येशूनं उत्तर देऊन म्हणलं,हे
अविश्वासी अन् ह्ठीले लोकहो,म्या कुटपरेंत
तुमचा संग रायणार,अन् तुमची सयणार?
आपल्या पोराला अति आण. 42 मंग तो
येऊ रायला होता तितक्यात भुतानं त्यालें
खाली आपटून,जोऱ्यानं पीडून टाकलं पण
येशूनं त्या अशुद्ध आत्म्यालें धमकावलं अन्
पोराले चांगलं करून त्याच्या बापाच्या
पासी दिवून देलं. 43 तवा सरे लोकं देवाच्या
सामर्थ्यानं चकित झाले. 44 अन् तो जे काम
करत होता त्या कामाचं सरेझण आश्चर्य करत
जातं तवा त्यानं आपल्या शिष्यायंलें म्हणलं
ह्या गोष्ठी तुमी तुमच्या लक्षात ठेवा;कावून
कि मनुष्याच्या पोरगा माणसाच्या हाती
देला जाईन. 45 पण ते बोलनं त्यांयलें
समजलं नाई,त्यांयलें ते समजूं नाई म्हणून
ते त्यांच्यापासून गुप्त राखलेलें होतें,अन् ते
त्या बोलण्या बद्दल त्याले विच्यार्याले भेत
होते. 46 अन् आपल्याईत मोठ्या कोण हाय,
याच्या बद्दल त्यांच्याईत वादविवाद उठला
47 तवा येशूनं त्यांयच्या मनांतला विचार
ओळखून एका लेकराले जवळ घेऊन त्यालें
आपल्यापासी उभं केलं. 48 अन् त्यांयलें
म्हंटलं,जो कोणी माह्यावाल्या नावांन
या लेकराले ग्रहण करतो, तो मले ग्रहण
करतो,अन् जो कोणी मले ग्रहण करतो तो
माह्या पाठवंनार्याले ग्रहण करतो कावून कि
तुमच्या सर्वाईत जो कोणी लायना हाय,तोचं
मोठा हाय. 49 तवा योहानान म्हणलं,हे
गुरुजी,आमी एका माणसाले तुह्यावाल्या
नावांन भूताय्लें काढतानं पायलं, अन् आमी
त्यालें मना केलं कावून कि तो आमच्या संग
हून तुह्यावाल्या मांग चालत नाई. 50 तवा
येशूनं म्हणलं,त्याले कायले मना करता,

कावून कि तो तुमच्या विरोधात नाई तो
तुमच्या ईकून हाय. 51 जवा त्याच्या वरते
जायाचा समय जवळ आला तवा त्यानं
यरुशलेमेत जायाच्या विचार निश्चय केला.
52 अन् त्यानं आपल्या समोर देवदूताय्लें
पाठवलं,कि ते शोमरोन्यांच्या एका गावात
गेलें, कि त्याच्या साठी जागा तयार करे.
53 पण त्या लोकायनं त्याले अंगिकारलं
नाई,कावून तो यरुशलेमात जाऊ रायला
होता. 54 हे पाऊन त्याचे शिष्य याकुब अन्
योहानानं म्हणलं,हे प्रभू,काय तुह्याली इच्छा
हाय, कि आमी आग्या द्यावी कि अभायातून
अग्नी पडून त्यांयच्या नाश करावा?. 55 तवा
त्यानं त्यांयलें दटावलं,अन् म्हणलं,तुमाले
माईत नाई काय? तुमी कोणत्या आत्म्याचे
हा. 56 कावून कि मनुष्याच्या पोरगा
लोकांयच्या जीवाच्या नाश कर्याले नाई,तर
त्यांयलें वाचव्याले आला हाय,मंग ते दुसऱ्या
गावांत गेले. 57 जवा ते रस्त्यानं चलू रायले,
तवा कोण्यातरी एकानं त्याले म्हणलं,जती
तू जासीन,तती म्या तुह्यावाल्या मांग येईन.
58 तवा येशूनं त्यालें म्हतलं,कोल्हाय्लें बिडें
अन् आभायातल्या पांखरायचें खोफड्या
हायत,पण मनुष्याच्या पोराला आपलं
डोकं टेव्याले जागा नाई. 59 मंग त्यानं
दुसऱ्या एकाले म्हतलं,माह्या मांग ये,पण
त्यानं म्हणलं हे प्रभू,पयले मले जाऊ दे कि
आपल्या बापाले गाडू दे. 60 तवा येशूनं त्याले
म्हटलं,मेलेल्यांलें आपले मूरदे गाडू दे,पण तू
जाऊन देवाच्या राज्यांची कथा सांग. 61 तवा
आजूक एकाझणानं म्हणलं,हे प्रभू,म्या तुह्या
मांग येईन,पण पयले मले घरच्या लोकाच्या
निरोप घीयाले जाऊ दे. 62 पण येशूनं त्यांयले
म्हटलं,जो कोणी आपला हात नांगरावर ठेऊन
मांग पायतें तो देवाच्या राज्यात उपयोगी
नाई.

10 1 अन् या गोष्ठी नंतर प्रभूनें अजून
सत्तर झनाय्लें निवडलं,अन् ज्या
ज्या नगरात व ज्या ज्या ठिकाणी तो स्वता
जाणार होता,तती त्यांयलें दोगादोगाय्लें
आपल्या आगुदर पाठवलं. 2 तवा त्यानं
त्यांयलें म्हतलं,पीक आलेले वावर लय
हायत'पण काम करणारे थोडेसेंक हायत,
म्हणून वावंरावाल्या मालकाले विनंती
करा,कि तो आपल्या वावंरातलं पीक
काढ्यासाठी मजूरांय्लें पाठवावे म्हणून,
तुमी त्याची प्रार्थना करा. 3 जा;पायजाक
म्या तुमाले लांडग्यांच्या मध्ये जसं कोंकरांस
पाठवावे तसं म्या तुमालें पाठवतो. 4 म्हणून
पिवसी किंवा झोई किंवा वायना घेऊं
नका,अन् रस्त्यानं कोणाले नमस्कार करू
नका. 5 अन् ज्या कोणत्या घरांत तुमी
जासान,तती पयल्यानं म्हणा कि या घरांतचं
शांती असो. 6 जर तती शांतीप्रिय कोणी
असला तर तुमची शांती त्यावर होईन,नाई
त.. तुमच्या पासी वापस येईन. 7 अन् तुमी
त्याचं घरी रायजाकं ते देतीनं ते खाजाकं
पिजाकं कावून कि मजुराले आपली मजुरी
भेटली पायजे,घरोघरी नका फिरू. 8 अन्
गावांत तुमी जासानं अन् ततःचे लोक तुमचे
स्वागत करतीन, तवा ते जेंजें तुमच्या
समोर जेव्याले देतीन ते खाजाक. 9 अन्
तत;च्या बिमार लोकायले चांगलं करजाक,
अन् त्यांयलें सांगजाकं कि देवाचं राज्य
तुमच्या पासी आलं हाय. 10 परंतु तुमी ज्या
गावांत जासानं,अन् तत;ले लोकं तुमाले
ग्रहण करत नसंतीन त ;त्यांयच्या बजारात
जाऊन म्हणा. 11 तुमच्या गावांच्या धुंळया
पण आमच्या पायांले लागला हाय,ते आमी
तुमच्या समोर झेटकून टाकतो,तरी हे
जाणून घ्या कि देवाचं राज्य तुमच्या पासी
आलं हाय. 12 म्या तुमाले सांगतो, कि त्या

दिवसांची त्या गावांची दशा सदोमाच्या
दशा पेक्षा सोपी जाईन. 13 हे खोराजीना,
तुह्या हायहाय! हे बेथूसैदा,तुह्या हायहाय!
कावून कि जे सामर्थ्याचे काम तुमच्याईत
केले गेलें,जर ते सोर व सीदोनात केलें
असते,तर त्यांयन मांगेच तरट आगावर घेऊन
व राखोंडीत बसून पश्चाताप केला असता.
14 पण न्याय, याच्या दिवसालगं तुमची दशा
सोर व सीदोन यांना तुमच्या पेक्षा अजून
सोफी जाईन. 15 अन् हे कफर्णहुमा,काय तुले
अभायापर्रेंत ऊचं केलं जाशीन काय,तुले त;ह
मृतलोकांपर्यंत खाली टाकला जाशीन. 16 जो
तुमचें आयकतो तो माह्य आयकतों,अन् जो
तुमाले नाकारते तो मले नाकारते,अन् जो
मले नाकारते तो ज्यानं मले पाठवलं त्यालें
नाकारत 17 नंतर ते सत्तर झण आंनदान
वापीस येऊन म्हणतात,हे प्रभू,तुह्यावाल्या
नांवान भूतं पण आमच्या स्वाधीन होतात.
18 तवा त्यानं त्यांयलें म्हटलं,म्या सैतांनाले
बिजली सारखं अभायातून पडतानं पायलं.
19 पाहा,म्या तुमाले सर्पाले अन् इचू यायलें
तुडवंण्याचा,अन् वैऱ्याच्या सर्व्या शक्तीवर
अधिकार देला हाय,अन् कोणत्या हि
वस्तूनं तुमची हानी नाई होईन. 20 तरी
याच्यात आंनद माणू नका,कि भूतं तुमच्या
वशात येतात,पण यच्यांत आनंद करा कि
स्वर्गातआभायात तुमचं नांव लीवलेलं हाय.
21 त्याचं वाकती तो पवित्र आत्म्यांत आनंदात
भरपूर हून बोलला,हे बापा,अभायाच्या
अन् पृथ्वीच्या प्रभू,म्या तुह्या धन्यवाद
करतो,कावून कि तू या गोष्टी तू ज्ञानी अन्
समजदारा पासून गुप्त ठेवल्या हाय,अन्
लेकरा वर प्रगट केल्या हायत,हो बापा तुले
हेचं चांगलं वाटते. 22 माह्या बापानं मले
सर्वकाई सोपून देलं,अन् पोरगा कोण हाय हे
बापावांचून कोणाले ठाऊक नाह्य,अन् बाप
कोण हाय,हे पोरावांचून व ज्याले प्रगट
कर्याची इच्छा असीन त्या त्याच्यावांचून
कोणाले ठाऊक नाई. 23 तवा त्यानं शिष्याकडे
फिरून एकांती म्हणलं,तुमी ज्या गोष्टी
पायतां त्या गोष्टी जे डोये पायतात ते धन्य
हायत. 24 कावून कि म्या तुमाले सांगतो,ज्या
ज्या गोष्टी तुमी पायतां त्या पायन्याची
बऱ्याचं भविष्यवक्ताची अन् राज्याची
इच्छा होती,तरी त्या त्यायनं पायल्या
नाईत,अन् ज्या गोष्टी तुमी आयकता,त्या
आयक्याची त्यांयची इच्छा होती तरी
त्यांयन आयकल्या नाईत. 25 अन् पाहा,एक
नियमशास्त्री उभा राउन, अन् हे म्हणून
त्याची परीक्षा करून रायला,कि हे गुरुजी,
सार्वकालिक जीवनाचा वारीस होण्या
साठी म्या काय करू? 26 मंग त्यानं त्यांले
म्हटलं,नियमशास्त्रांत काय लीवलेलं हाय?
तू कसा वाचतो? 27 तवा त्यानं उत्तर देऊन
म्हणलं,कि तू प्रभू,आपल्या देवाले आपल्या
सर्व्या मनानं अन् आपल्या सर्व्या जीवांन
अन् आपल्या सर्व्या शक्तीनं अन् आपल्या
बुद्धीनं प्रेम कर;अन् आपल्या शेजारच्यावर
आपल्या जसं सोतावर प्रेम करतो तसचं
कर. 28 मंग त्यानं त त्यासं म्हतलं,तू बरोबर
उत्तर देलं हाय,हेचं कर म्हणजें वांचशीन.
29 पण त्यानं हे सोताले न्यायवान होयाच्या
इच्छानं,येशुले पुसलं होतं,तर माह्याल्या
शेजारी कोण? 30 येशूनं उत्तर देऊन
म्हणलं,कि एक माणूस यरुशलेमेतून यरीहोत
जाऊ रायला होता,पण त्याले डाकूंच्या
घेऱ्यात तो सापडला,तवा त्यांयनं त्याचें
कपडे काडून त्याले मारपिट करून अर्धमेला
म्हणून ते सोडून गेले. 31 अन् असं झालं,कि
त्याचं रस्त्यानं एक याजक जाऊ रायला
होता,तवा त्यानं त्यालें तो पाऊन दुसऱ्या
बाजूनं निगुन गेला. 32 अन् तसाच एक लेवी

त्या ठिकाणी आल्यावर,त्यालें पाऊन दुसऱ्या
बाजूनं निगुन गेला. 33 तवा एक शोमरोनी
प्रवास करत असतां त्या ठिकाणी आला अन्
त्यालें पाऊन तो तरसला. 34 अन् त्याच्या
पासी येऊन अन् त्याच्या जखमांवर तेल अन्
द्राक्षारस ओतून त्यावर पट्टी बांधली अन्
त्यालें आपल्या जनावरावर बसून सरायात
आणलं,अन् त्याची सेवा केली. 35 अन् दुसऱ्या
दिवसी त्यानं,दोन दीनार त्या सरायातल्या
घरधन्याले देल्या,अन् म्हणलं,याची सेवा
करजोकं अन् जे काई तु खर्च करसीन तो
म्या तुले वापस येतान देऊन देईन. 36 आता
माह्याल्या विचारानं,जो डांकूच्या घेऱ्यात
आला,या तिघांयतुन त्याच्या शेजारी कोण
झाला असं तुले वाटतें. 37 तवा त्यानं म्हतलं,
तोचं ज्यानं त्याच्यावर दया केली होती ,तवा
येशूनं त्यालें म्हणलं,तू जाऊन तसचं कर.
38 जवा ते जाऊ रायले होते तवा ते एका
गावांत गेले,तवा मार्था नांवाच्या बाईनं त्यालें
आपल्या घरांत नेऊन स्वागत केले. 39 अन्
मरिया नावाची तिची एक बहीण होती,ते
पण येशूच्या पायांपासी बसून त्याचं बोलणं
आयकत होती. 40 पण मार्था सेवा करता
करता घाबरली,अन् त्याच्या पासी येऊन
म्हणून रायली हे प्रभू,माह्यावाल्या बहिणीनं
मले सेवा कऱ्यासाठी एकटीलेचं सोडलं हाय?
तिले म्हणून माह्यावाली मदत कऱ्याले सांग.
41 तवा प्रभूनं उत्तर देऊन म्हणलं,मार्थे मार्थे
तू ,तू बऱ्याचं गोष्टीची चिंता कावून करते
अन् घाबरतं. 42 पण एक गोष्ट हाय,अन् त्या
उत्तम भागाले मरीयेनं निवडलं हाय,ते तिच्या
पासून हिसकावलं नाई जाईन.

11 1 मंग तो एका ठिकाणी प्रार्थना
करून रायला होता, अन् जवा
प्रार्थना झाली, तवा त्याच्या शिष्यायंतून
एकानं त्यालें म्हणलं,हे प्रभू,जसं योहानानं
आपल्या शिष्याय्लें प्रार्थना कऱ्याले
शिकवलं,तसचं आमाले शिकवं. 2 तवा
त्यानं त्यांयलें म्हतलं,जवा तुमी प्रार्थना
करसान,तवा असं म्हणा,हे आमच्या
अभायातल्या बापा,तुह्यावालं नांव पवित्र
मानलं जावं,अन् तुह्य राज्य येवो, जसं
अभायात तसचं पृथ्वीवर पण तुह्या
इच्छेप्रमाणे होवो; 3 आमची रोजची भाकर
रोज रोज आमाले देत जा . 4 अन् आमी
जे पाप केलं हाय,त्याची आमाले क्षमा दे,
कावून कि आमी पण आमच्या वैऱ्याले क्षमा
करतो,अन् आमाले परीक्षेत पाडू नको.तर
आमाले त्या वाईटा पासून सोडवं. 5 आजूक
त्यानं त्यांयलें म्हतलं,तुमच्याईत कोणता
असा हाय कि त्यालें दोस्तमित्रहाय अन्
तो अर्ध्याराती त्याच्या पासी जाऊन त्यालें
म्हणेल,हे दोस्तां मले तीन भाकरी उसन्या
दे. 6 कावून कि माह्या एक दोस्तमित्रप्रवास
करून माह्याल्या जवळ आला हाय,अन् त्यालें
वाढ्याले माह्याल्या पासी काई नाह्य. 7 अन्
तो अन्द्रून उत्तर देऊन म्हणीन,मले त्रास
देऊ नको,आता दरवाज्या लावला हाय,अन्
माह्याले लेकरं बाकरं माह्या पासी "रजईत"
सात्रीतहायत,म्हणून माह्यानं उठून तुले
देववत नाई?. 8 म्या तुमाले सांगतों,जरी
त्याच्या दोस्तमित्रहाय तरी पण तो त्यालें देत
नसीन,तरी पण त्याच्या आग्रहामुळे तो उठून
त्याले जितक्याची गरज हाय तितक्या त्यालें
देईन. 9 अन् म्या तुमाले सांगतो,मांगसानं
त..तुमाले देलं जाईन,पाह्यसानं त..तुमाले
साफळीन,ठोकसानं त.. तुमच्या साठी उघडलं
जाईन. 10 कावून कि जो कोणी मांगते
त्याले मिळतें,अन् जो कोणी खोजतें त्यालें
साफडतें, अन् जो कोणी ठोकतें त्याच्या
साठी उघडलं जाईन. 11 तुमच्याईत असा
कोणता बाप हाय,कि जवा त्याच्या पोरगा

भाकर मांगीण तवा त्याले गोटा देईन नाईतर
मासोई मांगीण त.. मासोईच्या बदल्यात
त्याले साफ सरपं देईन. 12 या आडें मांगीन
त.. इचुं देईन? 13 जरी तुमी वाईट हा तरी
तुमी आपल्या लेकरां बाकरांलें चांगल्या
वस्तू देण्याचे तुमाले समजतें,तर मंग तुमचा
अभायातला बाप आपल्या मांगनांरायले
पवित्र आत्मा कावून नाई देईन. 14 मंग त्यानं
एका मुक्या दृष्टआत्म्यालेंभूत काढलं,जवा
दृष्टआत्माभूत निगाली,तवा तो मुका बोलू
लागला,तवा लोकायनं आश्चर्य केलं. 15 परंतु
त्यांयच्यातल्या कईकायन म्हणलं,भूतांयच्या
अधिकारी बालजबुल याच्या साह्यानं तो
भूत काढतें. 16 अन् दुसऱ्या कईकायन त्याची
परीक्षा पाह्या साठी अभायातलं चिन्ह
मांगतजात 17 तवा त्यानं त्यांयच्या मनातल्या
गोष्टी ओळखल्यावर,त्यांयलें म्हतलं, ज्या
ज्या राज्यांत फुट पडते,ते राज्य ओसाड
पडते,अन् ज्या घरांत फूट पडते ते नाश हून
जाते. 18 जर सैतानहि आपलाचं विरोधी हून
जाईन,त त्याचं राज्य कसं ठिकीन?कावून
कि तुमी माह्याल्या बद्दल म्हणतां,कि हा
सैतानाच्या साह्यानं भूत काढते. 19 अन् जर
म्या सैतानाच्या साह्यानं भूतांय्ले काढतो त..
तुमचे पोरेंलेकरं कोणाच्या साह्यानं काढतात?
म्हणून तेचं तुमचा न्याय करतीन. 20 पण म्या
जर देवाच्या सामर्थ्यान भूत काढत असीन,तर
देवाचं राज्य तुमच्या पासी आलं हाय. 21 जर
बलवान माणूस अवजार घेऊन आपल्या
घराची रखवाली करते, तवा त्याची संपती
सुरक्षित रायते. 22 पण त्याच्याहूनहि बलवान
माणूस त्याच्यावर चढाई करून त्यालें जिकते,
तवा जे अवजार ज्याच्यावर त्याच्या भरोसा
होता,ते हिसकावून घेऊन संपत्तीले वाटून देते.
23 जो माह्याल्या बरोबर नाई तो माह्याल्या
विरूद्ध हाय,अन् जो माह्याल्या बरोबर गोळा
करत नाई तो बिखरून टाकते. 24 पण ज्या
माणसातून दृष्टआत्मा निगुन जाते तवा ते
पाणी नसलेल्या जागी विश्राम कऱ्यासाठी
फिरत रायते,अन् ते त्याले मिळत नाई तवा
तो म्हनतो ,म्या ज्या तून निगुन आलो त्या
माह्याल्या घरांत म्या वाफस जाईन. 25 मंग
तो त्यालें झाडलेलें अन् श्रुंगारलेलें असं त्याले
आढळते. 26 नंतर तो जाऊन आपल्याहून
दृष्ट असे अजून सात आत्मे संग घेऊन अन्
ते आत शिरून तती रायतात,मंग त्या
माणसाची दशा पयल्या पेक्षा अजून खराब
होते. 27 जवा तो ह्या गोष्टी बोलू रायला
होता,तवा समुदायातूनगर्दीतूनकोणत्या एका
बाईन मोठ्यान बोलून त्याले म्हणलं,धन्य तो
गर्भ ज्याच्यात तू रायला अन् ते स्तनें जे तू
चोखली आशीर्वादित! 28 त्यानं म्हणलं,हो पण
धन्य ते हायत,जे देवाचं वचन आयकतात अन्
मानतात 29 जवा मोठी गर्दी त्याच्या पासी
हून रायली होती, तवा तो म्हणें या युगाचे
लोकं बेकार हायत,ते चिन्ह मांगतात, पण
योना भविष्यवक्त्यांच्या चिन्हावाचून दुसरं
काई चिन्ह ह्यायलें देलं जाईन नाई. 30 कावून
कि जसा योना निनवेच्या लोकायसाठी
चिन्ह झाला, तसां मनुष्याच्या पोरगा
ह्या युगाच्या लोकायं साठी चिन्ह होईन.
31 दक्षिण ची राणी न्यायाच्या दिवसी,या
समयाच्या माणसाबरोबर उठेन व त्यांयलें
दोषी ठरविण,कावून कि ते शलमोनाचं ज्ञान
आयक्याले पृथ्वीच्या शेवटल्या सीमेपासून
आली,अन् पाहा शलमोना हून मोठा तती
कोणी हाय. 32 निनवेचे लोकं न्यायाच्या
दिवसी या समयाच्या लोकायं बराबर
उभे राऊन,तिले दोषी ठरवतीन,कावून
कि त्यांयनं योनाचा प्रचार आयकून मन
फिरवलं होतं अन् पाहा अति योनाहूनही
मोठा हाय. 33 कोणी माणूस दिवा लावून

गुप्त ठिकाणी,किंवा मापाखाली ठेवत
नाई,पण दिवठावर ठेवते.ह्या साठी कि
येणाऱ्या जाणाऱ्याय्ले उजिड हो. 34 तुह्याल्या
शरीराचा दिवा तुह्या डोया हाय,म्हणून जवा
तुह्ये डोये निर्दोष हायत,तवा तुह्य सर्व शरीर
उजिडमय असते,पण ते जर बेकार असीन
त..ते अंधारमय असतें. 35 म्हणून सावध
राहा,जो उजिड तुह्यात हाय,तो अंधारमय
न हून जावं. 36 म्हणून जर तुह्य सर्व शरीर
उजिडमय हाय, अन् त्याच्या कोणताही भाग
अंधारमय न राहो, अन् जवा ते सर्व उजिडमय
होईन,जसं ज्या वाकती जसा दिवा आपल्या
चमकनं तुले उजिड देते तसं 37 जवा तो
बोलू रायला होता,तवा एका परुशानं त्यालें
आपल्या संग जेव्यासाठी बशाची विनंती
केली,तवा तो अंदर जाऊन जेव्याले बसला.
38 अन् परुशायनं हे पायलं कि तो जेव्याच्या
पयले त्यानं हात पाय नाई धुतले होते म्हणून
याचं त्यांयलें आश्चर्य वाटलं. 39 तवा प्रभूनं
त्यांयलें म्हतलं,हे परुशाय्नों,तुमी कटोऱ्या अन्
पानदान वरून वरून त धुता,पण तुमच्या
अंदर अंधार अन् दृष्टता भरलेली हाय. 40 हे
मुरखानो,ज्यानं बाहेरचा भाग बनवला,काय
त्यानं अंदरची भाग बनवला नाई काय.
41 परंतु आत ज्या वस्तू हायत,त्या दान
करून टाका,मंग पाहा तुमच्या साठी सर्व्या
वस्तू शुध्द हून जातीन. 42 परंतु हे परुशांनो,
तुमची हायहाय!कावून कि तुमी पुदिना अन्
सताप अन् हर प्रकारच्या भाज्याचां दहावा
भाग देतां,पण न्याय अन् देवाचं प्रेमाले
बाजून टाकून देता,पण ज्या गोष्टी तुमाले
कऱ्याच्या होत्या त्या सोड्याच्या नोत्या. 43 हे
परुशांनो तुमच्यावर हायहाय,कावून कि तुमी
सभास्थानांतले मुख्य आसन अन् बजारांईत
मुजरे घेण तुमाले आवडते. 44 म्हणून तुमचा
हायहाय,कावून कि तुमी त्या लपलेल्या
कबरेचा सारखे आहा,ज्याच्यावर लोकं
चलतात पण माहित नाई होतं. 45 तवा एका
नियमशास्त्रांतील कोणत्या एकानं त्यालें उत्तर
देऊन म्हणलं,हे गुरुजी या गोष्टी बोलून तुमी
आमचा कायले अपमान करू रायले बा..
46 तवा त्यानं म्हणलं,हे नियमशास्त्रियो,
तुमच्यावर पण हायहाय तुमी असं वजन
ज्याले उचलणं कठीण हाय, ते माणसावर
टाकता,पण तुमी त्या वज्याले बोट सुधा
लावत नाह्य. 47 तुमच्यावर हायहाय,तुमी
त्या भविष्यवक्त्यांचे कबरे बनवता,ज्यायलें
तुमच्या बाप दाद्यानं मारून टाकले होते.
48 म्हणून तुमी साक्षी हा ,अन् आपल्या बाप
दाद्यांच्या कर्मावर मान्यता देता,कावून कि
त्यांयन त.. त्यांयलें मारून टाकलं होतं तुमी
त्यांयच्याचं कब्रा बनवता. 49 म्हणून देवाच्या
बुद्धिने म्हणलं हाय,कि म्या त्यांयच्या
पासी भविष्यवक्त्यालें अन् प्रेशिताय्ले
पाठवतो,अन् ते त्यायच्यातून कईकायलें
मारतीन अन् तरास देतीन. 50 कावून कि ज्या
भविष्यवक्त्याचं रगत या जगाच्या उत्त्पती
आगुदर सांडलं होतं,त्या सऱ्याचां हिशोब
या युगाच्या लोकायं पासून घेतला जाईन.
51 हाबिलाच्या खुणा पासून तर जखऱ्या च्या
खुणा परेंत जे वेदी अन् मंदिराच्या मधात
घात झालें,म्या तुमाले खरं सांगतो,याच्या
लेखा या काळाच्या लोकायं पासून घेतला
जाईन. 52 हायहाय तुमी नियमशास्त्री,कावून
कि तुमच्या पासी ज्ञानाची किल्ली त..
घेतली परंतु तुमी आत गेलें नाई, पण आत
जाण्याऱ्यालें पण जाऊ नाई देलं. 53 जवा तो
ततून निगाला,तवा शास्त्री अन् परुशी रागानं
त्याच्या अंगावर येऊन अन् चिडवू लागलें तो
आजून बऱ्याचं गोष्टी बोलावं म्हणून. 54 तवा
ते टपून होते,त्याच्या मुखाची गोष्ट पकडण्या
साठी.

12 1इतक्यांत हजारों लोकायची
भीड लागली,एवडी कि ते एका
दुसऱ्यावर पडू रायलें होतें,तवा तो सऱ्याईत
पयले आपल्या शिष्याय्लें म्हणें,कि परुशाच्या
ढोंगी खमिरा पासून चौकस राहा. 2काई
झाकलेलं नाई,जे उघडलं नाई जाईन,अन्
काई लपवलेलं नाई,जे कळनार नाई.
3म्हणून जे काई तुमी अंधारात मणालं,ते
उजिडात आय्कंलं जाईन,अन् जे काई तुमी
घरामध्ये कानांत बोलता,ते धाब्यावर प्रचार
केला जाईन. 4पण म्या तुमाले जे माह्याले
मित्र हायत म्हणतों,जे शरीरालें जिवांन
मारतात,पण त्याच्या अतिरिक काई करू
नाई शकत,त्यांयलें भेऊ नका. 5पण तुमी
कोणाले भ्यावे हें म्या तुमाले सुचवतो,जीवांन
मारल्यानंतर नरकात टाक्याचा अधिकार
ज्याच्या पासी हाय, त्यालें भ्या,म्हणून म्या
तुमाले सांगतो त्यालें भ्या. 6काय दोन
पयशाच्या पाच चिमण्या विकतात कि नाई
,तरी पण देवबाप त्याच्या तून एकाले पण
विसरत नाई. 7परंतु तुमच्या डोक्शावरचे
केसं पण मोजलेले हायत,म्हणून भेऊ
नका,कावून कि तुमी त्या चीमण्याहूनपण
मोल्यवान आहा. 8पण म्या तुमाले
सांगतो,जो कोणी माणसासमोर मले मानीन,
मनुष्याचा पोरगा पण देवाबाप अन् देवदूतांय
समोर त्याले मानीन. 9पण जो माणसांय
समोर माला तिरस्कार करीन,तो पण देवा
समोर अन् देवदुताय समोर तिरस्कार करीन.
10जो कोणी मनुष्याचा पोरां चा विरोधात
कोणती गोष्ट मनीन,त्याच्या तो अपराध क्षमा
केला जाईन,पण जो कोणी पवित्र आत्म्याचा
विरोधात बोलीन त्याची त्याले क्षमा नाई
रायणार. 11अन् जवा लोकं तुमाले सभाये,
सरकार,अधिकाऱ्याच्या समोर नेतीन,तवा
चिंन्ता करू नका कि आमी कसंकाय उत्तर
देऊ अन् काय बोलवं. 12कावून कि पवित्र
आत्मा त्याचं वाकती तुमाले शिकवीन कि
काय बोलावं. 13तवा समुदायांतून कोणत्या
एकानं त्याले म्हणलं,हे गुरुजी मले माह्याल्या
बापाच्या संपत्तीतून वाटा मीडावं म्हणून
माह्याल्या भावाले सांगा. 14तवा त्यानं त्याले
म्हणलं,हे माणसां कोणं मले तुमचां न्याय
करणारा कोणं नियुक्त केलं हाय?. 15आजूक
त्यानं त्यालें म्हणलं, चौकस रायजाकं,अन्
सर्व्या प्रकारच्या लोभा पासून दूर रायजाकं,
कावून कि कोणाचं जीवन त्याची संपत्ती
असते असं नाई. 16तवा त्यानं त्यालें कथा
सांगतली,कि कोण्याएकां धनवान माणसाच्या
जमिनीत लय पीकं आले. 17तवा तो आपल्या
मनांत विचार करून रायला,अन् म्हणें, म्या
काय करू?,कावून कि माह्याल्या अति जागा
नाई,जती आपलं पीक ठेवू. 18मंग त्यानं
म्हणलं,म्या हे करतो,म्या आपल्या कोठाऱ्या
मोडून त्याच्याहून मोठी बांदिन. 19अन् तती
आपलं सर्व अन्न धान्य मालमत्ता ठेवीनं, अन्
आपल्या जिवाले मनीन,हे जिवा,तुह्या पासी
लय वर्षासाठी बऱ्याचं मालं ठेवला हाय,तू
आराम घे खाऊन पिऊन सुखानं राय. 20पण
देवानं त्यालें म्हतलं,अरे मुर्खा,याचं राती
तुह्या जीव तुह्यापासून घेतला जाईन,अन्
त्या जे धन एकत्र केलं हाय मंग ते कोणाचं
होईन? 21आसाचं तो माणूस पण हाय,
जो आपल्या साठी धन एकत्र करते,पण
देवाच्या नजरीत धनी नसते. 22अजुक
त्यानं आपल्या शिष्याय्लें म्हणलं,म्हणून म्या
तुमाले सांगतो,कि आपल्या जीवांची चिंता
नका करू,कि आमी काय खावं अन् आपल्या
शरीरा बद्दल कि आमी काय नेसावंघालावं.
23कावून कि अन्नापेक्षां जीव,अन् कपड्या
पेक्षा शरीर मोठं हाय. 24कावळयांयवर
ध्यान ठेवा, ते त..पेरतं नाई,न कापणी करत

नाई अन् त्यांयचें न.. भंडारघर असतात अन्
खत्ताबळदअसते,तरी पण देवबाप त्यांयचं
पालन पोषण करते,म्हणून तुमी पाखरांपेक्षा
कितीतरी मोलाचे हा. 25 तुमच्याईत असा
कोणता हाय,जो चिंता करून आपलं आयुष्य
वाढवतो असा कोण समर्थ हाय. 26 म्हणून,
जर तुमच्याच्यानं सऱ्याईत लायण्यात लान
काम पण होतं नसीन,तर बाकीच्या गोष्टी
साठी चिंता कायलें करता?. 27 रानफुलांच्या
इकडे ध्यान करा,कि ते कसेकाय वाढतात,ते
त.. कष्ट पण करत नाई, अन् त्यालें काटतांत
नाई ,तरी पण म्या तुमाले सांगतो,शलमोनानं
पण आपलं सर्व वैभवांत त्यांयच्यातल्या एका
सारखे हि कपडे घातलें नाई. 28 म्हणून,जर
देवबाप मैदानाचा गवतालें जे आज हाय,अन्
उध्या भट्टीत टाकली जाईन,असा पोषाक
हाय त..हे अल्पविश्वासीहो, तो तुमाले
कावून नाई पोषाक घालीन. 29 अन् आपुन
काय खाऊ अन् आपुन काय पिऊ ह्याच्या
साठी तुमी झटू नका,अन्न संसई मनाचे होऊ
नका. 30 कावून कि जगातील जातीराष्टे
ह्या सऱ्या गोष्टीच्या खोज्यात रायतात,पण
तुमचा बाप जाणते कि तुमाले ह्या गोष्टीची
गरज हाय. 31 पण तुमी त्याच्या राज्याच्या
खोज्यात राहा,तवा ह्या गोष्टी पण तुमाले
मिळून जातीन. 32 हे लायण्यां कळपा,भेऊ
नको,कावून कि तुमच्या बापाले हे भावलं कि
तुमाले राज्य ध्यावे 33 जे तुमची संपत्ती हाय
ते विकून दान करा,अन् आपल्या साठी अशा
पिवशां बनवां,कि ते कधीचं जुनी नाई होईन,
अर्थात अभायातस्वर्गात असं धन एकत्र
करा,जे घटत नाई,अन् तती चोर जात नाई,
कीडा बिगडवंत नाई. 34 कावून कि, जती
तुमचं धन हाय, तती तुमचं मन पण लागीन.
35 तुमच्या कंबरा बांधलेल्या अन् तुमचे दिवे
लावलेले असो. 36 अन् तुमी त्या माणसायं
सारखे बना,जे आपल्या धन्याची वाट पाऊ
रायले,कि त्यांयच्या धनी लग्नांवरून कधी
वापस येईन, जवा तो येऊन दरवाज्या
वाजवीन, तवा ते लवकर येऊन खोलतिन.
37 धन्य हायत ते दास,ज्यायलें धनी मालक
येऊन जागी हायत असं पायतें,म्या तुमाले
खरंखर सांगतो,तो कंबर बांदून त्यांयलें
जेव्याले बसविण,तो आजूक जवळ येऊन
त्यांयची सेवा करीन. 38 अन् जर तो रातीच्या
दुसऱ्या किंवा तिसऱ्या प्रहरी येऊन त्यांयलें
जागी पाईन त..ते दास धन्य हायत. 39 परंतु
हे जाणून ह्या,जर घरंच्या मालकाले माईत
असतं बा..कि चोर कोणत्या वाकती येते,
तवा तो जागी रायला असतां, अन् आपल्या
घरांत चोरी होऊ देली नसती. 40 म्हणून,
तुमी पण तयार राहा,कावून कि कोणत्या
वाकती, तवा तुमी विचार पण करसान
नाई, त्याचं वाकती मनुष्याचा पोरगा
येऊन जाईन. 41 तवा पेत्राण म्हणलं,हे
प्रभू काय हे "कथा"दृष्टानं तुमी आमाले या
सऱ्यायंसाठी सांगून रायले काय. 42 तवा
प्रभूनं म्हतलं,असा कोणता विश्वास योग्य
बुद्धिमान कारभारी कोण हाय,ज्याचा
घरधनी त्यालें नौकर चाकरावर सरदार ठेवे
अन् तो नेमलेल्या वाकती अन्नवाटा ह्यायलें .
43 धन्य हायत,ते दास ज्याले त्यांचा घरधनी
असचं करतान पाईन. 44 म्या तुमाले खरंखर
सांगतो,तो त्यालें आपल्यापासी जे संपत्ती
हाय, त्याले त्यावर सरदार ठेवीन. 45 पण जर
माह्याल्या दास विचार करीन,कि माह्याल्या
धनीमालकयेण्यात उशीर करुन रायला,तवा
तो दास दासियालें मारते पीटतें अन् खाऊन
पिऊन पेण्यारा हून रायला असीन. 46 तवा
तो वाट पायत नाई त्या दिवसाची अन् त्यालें
मालूम नाई त्या दिवसी त्याचां घरधनी
येईन,अन् ज्या घडीची त्यालें माईती नाई

त्याचं वाकती येऊन त्याले मारून ठाकीन
अविश्वासयोग्य गीणून टाकीन. 47 अन् जो
दास ज्यानं आपल्या घरधन्याची इच्छा काय
हाय हे जाणून,पण तयारी केली नसीन,अन्
त्याचां इच्छाचा अनुसार नाई चलत असीन
तर तो लय मार खाईन. 48 परंतु ज्यानं ते न
जाणून झोडपे खायाजोक्ते काम केलं असीन
त..त्यालें थोडंसेंक झोडपे देलें जाईन, म्हणून
ज्यालें लयमोठं देलं गेलं हाय, त्याच्या पासून
खूप मोठं मांगतलं जाईन,अन् ज्यालें बरचं
सौफलं हाय त्याच्या पासून लय मांगतलं
जाईन. 49 म्या पृथ्वीवर आग लाव्यालें आलो
हाय,अन् जर ते याचं आगुदर पेटलेली असीन
तर अजून मले काय पायजे. 50 अन् मले त.एक
बाप्तिस्मा घ्यायचां हाय,तो होईपर्यंत म्यातं
मोठ्या पेचातं हाय. 51 काय तुमाले वाटतें
कि म्या पृथ्वीवर शांती द्यालें आलो हाय?,
पण म्या तुमाले सांगतो फुट पाड्यालें आलो
हाय. 52 कावून कि, आतापासून एका घरांत
पाचझणं आपसांआपसांत, तिघं दोग्यायं संग
अन् दोघ तिघांय संग विरोध करतीन. 53 बाप
पोराच्या संग अन् पोरगां बापाचां संग विरोध
करीन,माय पोरी संग अन् पोरगी माय संग
अन्,सासू सुनी संग अन् सूनं सासू संग विरोध
करीन. 54 आजुक त्यानं लोकाय्लें म्हणलं,
जवा तुमी ढघांले पश्चिमेकडून चढतांना
पायतां, तवा तुमी एकदम म्हणतां कि पाणी
येतें अन् तसचं होतें. 55 अन् दक्षिणेचा
वारा सुटतो तवा म्हणतां,कड्याक्याची
गर्मी होईन असं म्हणतां अन् तसचं होतें.
56 अरे ढोंग्यांनो,तुमाले पृथ्वीचें अन्
अभायातलेंभेदलक्षणे करता येतात,पण या
युगाचा भेदलक्षणे का नाई करता येत?.
57 अन् तुमी सोताचं कावून निर्णय घेत ना,कि
बराबर काय हाय.? 58 अन् तू आपल्या वाध्या
बराबर अधिकाऱ्यापासी जातानं रस्त्यांनचं
त्याच्यासंग तडजोड कऱ्याचां यत्न कर,नाई
तर तो तुले न्यायाधीशापासी ओढतं नेईन अन्
न्यायाधीश तुले शिफायाच्या हाती देईन व
शिफाई तुले जेलात टाकीन. 59 म्या तुमालें
सांगतो,तू शेवटची कवडीन् कवडी देखील
फेडशीन तो परंत ततून सुटशीन नाई.

13 1 अन् त्याचं वाकती काई लोकं
आले होते,त्याच्या संग त्या
गालीलीयांच्या बद्दल चर्चा करू रायले होते,
ज्यायचं रगत रक्त पिलातानं त्याच्याचं यज्ञात
मिसळून टाकले होते त्याचं बद्दल सांगू रायले
होते. 2 हे आयकून त्यानं त्यांयलें उत्तर देऊन
म्हतलं,ह्या गालीलीकरांनी असे दु:ख सोसले
हाय,ह्यावरून ते इतर सऱ्या गालीलकरांहून
अधिक पापी हाय असं तुमाले वाटते काय.
3 म्या तुमाले सांगतो,हे असं नाई, पण तुमी
जर पश्चाताप करसानं नाई त..तुमी सर्वे
ह्यायच्यां सारखे नाश हून जासानं 4 काय त्या
अठरा झणं ज्यांयच्यावर शिलोहांतला बुरुज
पडला,अन् ते दबून मेले,ते यरुशलेमातल्या
सगड्या रायणाऱ्यायंवून अधिक अपराधी
होते. 5 म्या तुमाले सांगतो,हे असं नाई,
पण तुमी पश्चाताप करसानं नाई त..तुमी
सर्वे ह्यायच्यां सारखे नाश हून जासानं.
6 तवा त्यानं हा दृष्टान सांगतला,कोण्या
एकाझणांच्या अंगुराच्या वाडीत एक
अंजिराच झाडं लावलेलं होतं, तो त्या झाडाले
फळ पाह्याले आला पण दिसलं नाई. 7 तवा
त्यानं वाडीच्या रखवाल्याले म्हणलं,पाह्य
म्या तीन वर्षापासून ह्या झाडाले फळ
पाह्याले येऊ रायलो, पण मले काईचं दिसलं
नाई,म्हणून ते झाड तोडून टाक फालतू काऊन
जमिनीवर वझं ठेव्याचं?. 8 तवा त्यानं त्यालें
उत्तर देलं,हे स्वामी ह्याले यंदाचाही वर्षी
राऊ ह्या, म्या याची सोय घेतो अन् खत
पाणी टाकतो. 9 अन् जर अतून त्या झाडांन

फळ देलें नाई त..ते तू तोडून टाकजोकं
10 शब्बाथाच्या दिवसी येशू सभास्थानांत
शिक्षण देऊ रायला होता. 11 अन् पाहा,तती
एक बाई जीले अठरा वर्षापासून एक
विकाराचा आत्मा लागला होता,अन् ते
कुबडी झाली होती, कोणत्याचं रितीन सरखी
होत नोती. 12 येशूनं तिले पाऊन जवळ
बलावलं,अन् म्हणलं बाई तू आपल्या या
विकारापासून मुक्त केलेली हायसं. 13 तवा
त्यानं तिच्यावर हात ठेवला,अन् ते लगेचं
सरखी झाली,अन् देवाचा गौरव करू लागली.
14 परंतु येशूनं शब्बाथ दिवसी चांगलं केलं,
म्हणून सभास्थांनाचा अधिकारी रीसियाकर
लोकायले म्हणें, साहा दिवसं हायत त्या
दिवसांत बरं हून जात जा, अन् शब्बाथाचा
दिवसी येऊ नका. 15 हे आयकून प्रभूनं
उत्तर देऊन म्हतलं,अरे ढोंग्यांनो,तुमच्याईत
कईक झणं आपल्या बैलालें किंवा गद्याले
शब्बाथाचा दिवसी ठाणावरून सोडून
पाणी पियाले नेत नाईत काय. 16 अन्
काय हे योग्य नाई,हे बाई अब्राहामाची
पोरगी हाय,जीलें सैतानानं अठरा वर्ष हिले
बांधून ठेवलं होतं,शब्बाथाच्या दिवसी त्या
बंधनातून सोडल्या गेली. 17 जवा त्यानं
ह्या गोष्टी सांगतल्या, तवा त्याचें सगळे
विरोधी लाजले, अन् सऱ्या लोकांय्न त्याचां
गौरवाचा कामाचा जे त्यानं केलें होते आंनद
18 ह्यावरून तो म्हणलां,देवाचं राज्य कायच्या
सारखं हाय,अन् म्या त्यालें कायची उपमा
देऊ. 19 ते मोवरीच्या दाण्यासारखं हाय,ते
मनुष्यानं घेऊन आपल्या वावरांत पेरलं,अन्
ते वाढलं मोठं झाडं झालं,तवा अभायातले
पाखरं त्यावर राहू रायले. 20 त्यानं आजुकं
म्हणलं,म्या देवाच्या राज्यांची उपमा कायनं
देऊ. 21 ते खमिरासारखे हायत,ज्याले एका
बाईनं तीन मापं पीटात लपून ठेवले, अन्
सगळे पिट खमीर झाले. 22 तवा तो गांवा
गावांत खेड्यापाड्यात शिकवणं देतं देत
यरुशलेमेच्या इकडे जाऊन रायला होता.
23 अन् तवा कोणतरी एका झनानं त्याले
म्हतलं,हे प्रभू तारण पावणारे थोडंकेच हायत
काय. 24 तवा त्यानं त्यांयलें म्हतलं,अरुंद
दरवाज्यानं जायाचा यत्न करा,कावून कि
म्या तुमाले सांगतो,बरेचं झणं जायाच्या
साठी समोर जातीन पण जाऊ शकणार नाई.
25 जवा घरमालकांन उठून दरवाज्या बंद
केला,अन् तुमी बायर उभे राऊन दरवाज्या
वाजवून म्हणून रायले,हे प्रभू आमच्या साठी
उघड, तवा तो तुमाले उत्तर देऊन मनीन,म्या
तुमाले ओळखतं नाई तुमी कुठचे आहा.
26 तवा तुमी म्हणसानं,कि आमी तुह्यावाल्या
समोर जेवलो खावलो पेलो, अन् त्या आमच्या
बजाराईत शिक्षण देलें. 27 पण तो बोलीन
अन् म्हणेन तुमी कुठ्ठ्चें आहा ,हे मले माईत
नाई अरे पाप करणाऱ्यानो तुमी माह्यावाल्या
पासून दूर जा. 28 जवा तुमी अब्राहामाले
अन् इसहाकाले व याकोबाले अन् सर्व्या
भविष्यवक्त्यांले देवाच्या राज्यांत बसलेले
अन् आपल्या स्व:ताले काढलेलं पायसानं,
तवा तती रडनं दांत खाणे होईल. 29 तवा
ते पूर्वे पासून पश्र्चीमे पासून उत्तर दक्षिण
पासून लोकं येऊन देवाच्या राज्यांत सहभागी
होतीन. 30 अन् पाहा,जे मांगचे हायत,पयले
होतीन,अन् जे पयले हायत मांगचे होतीन.
31 त्याचं वाकती परुश्यांनं येऊन त्यालें
म्हणलं, तू अतुनं जाय कावून कि हेरोद तुले
जीवांन मारून ठाक्यासाठी पाऊ रायला
हाय. 32 तवा त्यानं त्यांयलें म्हणलं,जाऊन
खोकडाले सांगा,पाहा म्या आज अन् उद्या
भूतांय्लें काढतो,अन् बिमार लोकांय्ले चांगलं
करतो,अन् तिसऱ्या दिवसी पूर्ण करतो.
33 तरीपण मले आज अन् उद्या अन् परवां

चल्याले पायजें,कावून कि भविष्यवक्ता
यरुशलेमाच्या बायर मारला जावं असं
व्हायचं नाई. 34हे यरुशलेम हे यरुशलेम
तू जे भविष्यवक्त्यालें मारून टाकतो,अन्
तुह्यापासी ज्यायलें पाठवलं त्यांयलें गोटमार
करतो,कईक वेळा माह्याली इच्छा होती,जसी
कोंबडी आपल्या पिलाय्लें पंखाखाली एकजूड
करते,तसचं म्या तुह्याल्या लेकरांना एकजूट
कऱ्याची माह्यावाली इच्छा होती,पण
तुमची इच्छा नोती. 35पाहा,तुमचं घर
तुमच्यासाठी ओसाड असं सोडलं हाय,अन्
म्या तुमाले सांगतो,प्रभूच्या नांवान येणारा
तो धन्यवादित हाय,असं तुमी जत लग नाई
म्हणालं तथलग तुमी मले पायसानं नाई.

# 14

1अन् असं झालं,कि शब्बाथ दिवसी
तो परुशांयचा अधिकारी कोण्या
एकाच्या घरी जेव्याले गेला,अन् तवा ते
पाळनिवर बसले होते. 2अन् पाहा,एक
माणूस त्याच्या समोर बसला होता त्यालें
जालिंदरांचा रोग होता. 3तवा येशूनं
नियमशास्त्री अन् परुशांना म्हणलं,काय
शब्बाथ दिवसी रोग चांगलं करण योग्य हाय
किंवा नाई? पण ते चुपचाप रायले. 4तवा
त्यानं त्यालें हात लावून बरं केलं अन् जाऊ
देलं. 5अन् त्यानं त्यांयलें म्हतलं,तुमच्याईतून
असा कोण हाय,ज्याचां गधा नाईतर बईलं
विरीत पडला पण तो त्याले तुरंत शब्बाथ
दिवसी बाईर नाई काडीनं कि नाई . 6तवा
त्यांयलें या गोष्टीचं उत्तर देता नाई आलं.
7जवा त्यानं पायलं कि ज्यायलें आमंत्रण
देलेलें होते ते लोकं मुख्य मुख्य जागा निवडून
घेऊ रायलें होते तवा त्यानं त्यांयलें एक
कथादृष्टान सांगतला. 8जवा तुले कोणी
लग्नालें बलावीन,तवा मुख्य जागी नोको
बसू,असं नाई व्हावं कि तुह्यावाल्या पयले
कोण्या मोठ्या एका अतिथी ले बलावलं
असीन. 9अन् जवा ज्यानं तुले अन् त्यालें
दोघांना आमंत्रण देलं असीन, तो येऊन
तुले मनीन कि ह्याले जागा दे अन् तवा
तू लाजशीन अन् सऱ्यातं खालची जागा
घ्यालें लागसीन. 10पण जवा तुले आमंत्रण
देलं जाईन,तवा सर्व्यात खालच्या जागी
बसजोकं,ह्यासाठी कि ज्यानं तुले आमंत्रण देलं
हाय,तो येऊन तुले मनीन हे मित्रा समोर
जाऊन बस तवा तुह्यासंग बसलेल्यांय मध्ये
तुह्याल्या मान होईन. 11अन् जो कोणी
आपल्या स्व:ताले मोठा समजीन,त्यालें लहान
केलं जाईन,अन् जो कोणी आपल्या स्व:ताले
लहान समजीन त्यालें मोठं केलं जाईन.
12तवा त्यानं आपल्याले ज्यानं आमंत्रण देलं
होतं त्यालें म्हणलं,जवा तू दिवसां किंवा
रात्रीची पंगत ठेवशिन,तवा आपल्या मित्राय्लें
अन् भावाय्लें अन् नातलगांय्लें किंवा धनवान
शेजाऱ्यालें नोको बलाऊ,जर बलाव्वलं
त..ते पण तुले बलावंतीन व तुह्यी फेड हून
जाईन. 13पण जवा तू पंगत ठेवशीन,तवा
गोरगरिबांना, व्यंगांना,लंगड्यानां फुटक्यांना
बलावं. 14तवा तू आशीर्वादित होशीन,कावून
कि ज्याच्यां पासी परत फेड कऱ्यालें काई
नाई,तवा तुले जे धर्मीलोक हायत त्यांयच्या
पुनरुत्थानाच्या वाकती त्याचं फळ देलं
जाईन. 15तवा त्याच्या संग जे जेव्यालें बसले
होते त्यांयच्यातून कोण्या एकानं ह्या गोष्टी
आयकून त्यालें म्हतलं,जो देवाच्या राज्यांत
भाकर खाईल ते आशीर्वादित हायत. 16तवा
येशूनं त्यालें म्हतलं,कोण्या एका माणसानं
खूप मोठी पंगत ठेवली अन् बऱ्याचं झणाय्लें
बलावलं. 17अन् जवा जेवण तयार झालं,तवा
त्यानं आपल्या दास ह्याले पाठवून ज्यायलें
आमंत्रण होतं त्यांयलें बलाव्यां साठी पाठवलं.
18तवा ते सगळे एकसारखेचं निमित्त सांगून
रायले,पयल्यांन त्यालें म्हतलं,म्या वावर

ईकत घेतलं हाय,अन् ते मले जाऊन पायले
पाईजे,म्या तुले विनंती करतो मले क्षमा कर.
19 अजून दुसऱ्यानं म्हणलं,म्या बैलांच्या पांच
जोड्या ईकत घेतल्या हायत,अन् त्यांयची
परीक्षा पाह्याले जातो;म्या तुले विनंती करतो
मले क्षमा कर. 20 अजुक एकानं म्हणलं,म्या
लग्न केलं हाय माह्यी बायको घरी हाय म्हणून
मले येता नाई येत नाई. 21 मंग तो दास
आपल्या मालकाले ह्या गोष्ठी जाऊन सांगते,
तवा घरमालक रागांत येऊन आपल्या दासाले
म्हणतें नगराच्या रस्त्यांत अन् गल्ल्यांईत
लवकर जाऊन,गोरगरिबांना व व्यंगांना अन्
फुटक्यांना अन् लंगड्याय्लें इकडे आंत आण.
22 नंतर दास मालकाले म्हणें, हे स्वामी जसं
तू म्हणलं होतं,तसचं म्या केलं हाय,तरी
अजुक पण जागा हाय. 23 मंग मालक त्या
दासाले म्हणे,माह्यावालं घर भरलं पायजे
म्हणून तू रस्त्यांईत व कुंपणांमध्ये जाऊन
लोकांय्ले अंदर ईयाले लावं. 24 कावून कि म्या
तुमाले सांगतो,ज्यांयलें म्या आमंत्रण देलं
होतं त्याच्यातून एकही माणूस माह्याल्या
जेवणांतले काई चाखणार नाई. 25 अन् जवा
मोठी लोकांची गर्दी त्याच्या संघ जाऊ
रायली होती, तवा त्यानं मांग फिरून त्यांयलें
म्हणाला. 26 जो कोणी माह्यावाल्यां पासी
येईन,अन् आपला बाप अन् माय व बायको
लेकरं अन् भाऊ बहीण अन् आपल्या स्वताच्या
जिवाचाहि व्देष करत नाई तर तो माह्याला
शिष्य होऊ शकत नाई. 27 अन् जो कोणी
स्व:ताचा वधस्तंभ उचलून,माह्यावाल्यां मांग
येत नाई, तो पण माह्याला शिष्य बनू शकत
नाई. 28 तुमच्याईला असा कोण हाय,बुरुज
बांधण्याची इच्छा करीत असतां तो पुरा
करण्यापुरती ऐपत आपल्यापासी हाय कि
काय, याबद्दल पयल्यांन बसून खर्चाचा
हिशोब करीत नाई. 29 नाई तर त्यानं पाया
घातल्यावर त्यालें पुरा करतां आला नाई,तर
सगळे पाह्यनारे त्याची मजाक करतीन.
30 अन् हे म्हनतीन ह्या माणसानं बांधुं त..
लागला,पण त्यालें ते पुरं करता आलं नाई.
31 असा राज्या कोणता हाय,कि दुसऱ्या
राज्या संग लढाई कऱ्यालें जाते,पण पयले
बसून विचार करत नाई, कि जे वीस हजार
घेऊन आपल्यावर लढाई कऱ्यालें येऊ रायले
हाय,त्यांयच्या सामना कऱ्यालें दहा हजारांना
घेऊन जाता येईन काय. 32 जर जाता येत
नशीन,त तो दूर राऊन,दूतांना पाठवीन
मेलमीलाप करून घेईन. 33 जर ह्या प्रकारे
तुमच्याईतला जो कोणी आपल्या सर्वस्वाचा
त्याग करत नाई, तो माह्याल्या शिष्य हु
शकत नाई. 34 मीठ तर चांगलं हाय,पण जर
मिठाची बेचव झालें तर ते कायनं रुचकर
करता येईन. 35 ते तर वावरां साठी अन् खता
साठी पण कामांच नाई,त्या मिठाले लोकं
बायर फेकून देतात,ज्यायचें आयक्यालें कान
हायत,तो आयको.

# 15

1 सगळे जकातदार अन् पापी लोकं
त्याच्या पासी त्याचं आयक्यालें
येऊन रायले होते. 2 तवा परुशी अन्
शास्त्रीलोक कुरकुर करु रायले होते , अन्
म्हणू रायले होते,हा त..पापी लोकायंच्या
संग बसते अन् त्यांयच्या संग जेवते. 3 मंग
त्यानं त्यांयलें हा दृष्टातकथासांगतला.
4 तुमच्याईतून असा कोणता माणूस हाय
ज्याचे शंभर मेंढर असून त्यांतून एक हारोपलं
तवा नव्याण्णव जंगलात सोडून देऊन, त्या
हारोपलेलं मेंढरु जत परंत ते सापडत नाई
तत.परंत त्याचा शोध करत नाई. 5 अन्
जवा ते सापडते तवा त्यालें तो मोठ्या
हरिकानं खांध्यावर उचलून घेते. 6 अन् घरी
येऊन दोस्ता मित्राले अन् शेजारच्यांय्लें
एखठ्ठा करून बलावून, म्हणतें माह्यावालं

हारोपलेलं मेंढरू मले सापडलं म्हणून
माह्यावाल्या संग आनंद करा. 7 म्या तुमाले
सांगतो,ह्याचं प्रमाणे ज्यायलें पश्चातापाची
गरज नाई अशा नव्याण्णव माणसांयच्यान
जो आनंद हरिक होते,त्याच्याहूनहि
पश्चाताप करणारा एक पापी माणसां च्यानं
स्वर्गातअभायातत्याच्याहूनहि अधिक आनंद
हरिक होते. 8 किंवा अशी कोणती बाई हाय
कीं,जिच्या पासी दाहा नाणे असून त्याच्यातून
जर एक नाणी हारोपली तवा ती दिवा लाऊन
व घर झाडून ते सापडे परंत पाह्यतं रायत
नाई. 9 अन् जवा तिले ते सापडते तवा बाई
आपल्या मैत्रीनीले अन् शेजारीणलें एखठ्ठा
बलावून म्हणते,जे नाणी हारोपली होती ते
मले सांपडली,म्हणून माह्याल्या संग आनंद
करा. 10 म्या तुमाले सांगतो,ह्याचं प्रकारे
पश्चाताप करणाऱ्या एक पापी माणसांच्यानं
देवाच्या दूतांसमोर आनंद होते. 11 अजुक तो
मने कोणत्या एका माणसाचे दोन पोरं होते.
12 त्याच्यातून लायन्यांन आपल्या बापाले
म्हणलं,बापाबाबामालमत्तेचा जो काई
वाटा माह्याला हाय, तो मले दे,तवा त्यानं
आपली संपत्ती वाटून देली. 13 अन् थोडंसेंक
दिवसं झाले होते,की तोचं लायना पोरगा
सर्व काई जमा करून,दूरच्या देशांत गेला,
अन् तती कुकर्मात मोजमजात आपली धन
संपत्ती गमाऊन ठाकली. 14 अन् त्यानं सरं
खर्चन ठाकल्यावर तवा देशांत मोठा दुष्काळ
पडला,तवा तो पूर्ण कंगाल झाला होता.
15 तवा त्यानं तथल्यां एका रायणाऱ्याजवळ
जाऊन त्याचा आश्रय घरला,त्या माणसानं
त त्यालें वावरात डुकरं चाऱ्यालें पाठवलं.
16 अन् त्यालें असं वाटे डुकरं जे टरफले खात
असत,त्यानं तरी आपलं पोटं भरावं,पण
तेहि त्यालें भेटत नोतं. 17 मंग तो शुद्धीवर
येऊन म्हणला,माह्यावाल्या बापाच्या घरी
कईक मजूरांय्लें जेवण भेटते तेहि ऊर-पुर
भेटते,पण म्या अति भूकीनं मरून रायलो
हाय. 18 म्या उठून आपल्या बापाच्यापासी
जाईन अन् म्हणीन.बापा बाबा म्या स्वर्गाच्या
अन् तुह्या विरोधात पाप केलं हाय. 19 म्हणून
म्या ह्या योग्य पण नाई कि तुह्यावाल्या
पोरगा व्हावं म्हणून,मले आता एक मजूरां
सारख ठेव. 20 तवा तो उठला अन् आपल्या
बापाच्या पासी वापस आला,अन् जवा तो
दूरचं होता,तवा त्याच्या बापानं त्यालें पाऊन
कळवळा ठाकला,अन् पयत जाऊन त्याच्या
गयात मिठी मारली अन् मुकें घेऊ लागला.
21 तवा पोरांन बापाले म्हणलं,बापाबाबा म्या
स्वर्गाच्या विरोधात तुह्यावाल्या नजरीत
पाप केलं हाय,आता म्या तुह्या पोरगा व्हावं
म्हणून ह्या योग्य पण नाई. 22 पण बापानं
आपल्या दासांना म्हणलं,लवकर जाऊन
चांगले कपडे काढून याले घाला.अन् त्याच्या
हातात आंगठी अन् पायांत जोडे घाला.
23 अन् पोसलेलं वासरू आणा अन् कापा ते
आपुन खाऊ हर्ष आनंद करू. 24 कावून कि
हा माह्यांवाला पोरगा मेलेला होता,अन् तो
आता जिवंत झाला हाय,हारोपला होता,आता
सापडला हाय तवा ते सरेझण हर्ष आनंद
करू लागले. 25 त्या वाकती त्याच्या मोठा
पोरगा वावरांत होता,अन् जवा तो घराच्या
जवळ पोचला,तवा त्यानं गाणं गायाच्या
अन् नाच्याचां आवाज आयकलां. 26 तवा
त्यानं नौकरांय पैकी एकालें बलावून पुसलं,हे
काय हून रायलं हाय. 27 तवा त्यानं त्यालें
म्हतलं,तुह्यावाला भाऊ आला हाय,अन् तुह्या
बापानं पोसलेलं वासरू कापलं ह्या साठी तो
सुखरूप भेटला म्हणून. 28 हे आयकून त्याले
रांग आला,अन् तवा अंदर गेला नाई,तवा
त्याच्या बाप बायर येऊन समजाऊ लागला.
29 पण त्यानं त्याच्या बापाले उत्तर देऊन

म्हणलं,पाह्य म्या कईक वर्षापासून तुह्यावाली
सेवा करून रायलो हाय,अन् कधीपण तुह्यी
आज्ञा तोडली नाई,तरीपण त्या माह्यासाठी
कधीपण एक बकरीचं पिलू पण देलं नाई,कि
म्या माह्याल्या दोस्तामित्राय संग हर्ष आनंद
करू. 30 अन् जो पोरगा ज्यानं तुह्याली संपत्ती
वेश्याईत गमाऊन ठाकली,अन् तो आल्यावर
त्याच्या साठी पोसलेलं वांसरू कापलं.
31 तवा त्यानं त्यालें म्हणलं,बाळापोरांतू त..
नेहमी माह्यावाल्या संग हायसं,अन् जे काई
मालं हे तुह्यालंच हाय. 32 पण आता हर्ष
आनंद कर्ण योग्य हाय,कावून कि हा तुह्या
भाऊ मेलेला होता,अन् तो परत जिवंत झाला
हाय,हारोपलेला होता सापडला हाय.

16 1 आजुक त्यानं आपल्या शिष्यांय्लें
म्हतलं,कोण्या एका धनवान्
माणसाचा, एक कारभारी दिवाणजी
होता,अन् लोकाईनं धनवान माणसाच्या
पासी जाऊन, त्याच्या कारभाऱ्यावर हा
आरोप लावला,कि हा तुह्यावाली सारी
संपत्ति गमावून टाकू रायला हाय. 2 तवा
त्यानं त्याच्यां कारभाऱ्यालें बलाऊन
म्हणलं,तुह्यावाल्या बद्दल म्या काय आयकू
रायलो हाय.? तू आपल्या कारभारी पणाचा
हिशोब कितोब दे ;कावून कि तू आतां
कारभारी रायणार नाई. 3 तवा तो कारभारी
आपल्या मनांत विचार करते,आता म्या
काय करू?कावून कि माह्यालां घरधनी
आता कारभारी पणाचं काम माह्यापासून
हिसकावून घेऊ रायला हाय,माती त..
मले खणतां येत नाई,अन् भीक मांग्याची
लाज वाटते. 4 पण आता मले सुचलं कि
काय करावं,जवा मी कारभारी पणाच्या
कामावरून काढला जाईन,पण लोकायन
मले आपल्या घरांत घ्यावं. 5 तवा त्यानं
आपल्या धन्याच्या देणेकऱ्याय्लें एकाएकाले
बलावून,पयल्याले त्यानं विचारलं कि
तुह्याल्या इकडे माह्यावाल्यां धन्याचं काय
काय येतें. 6 तवा तो म्हणें,शंभर मण तेल,तवा
त्यानं त्यालें म्हतलं,तुह्याली खातावही घे
अन् बसून लवकर पन्नास लिवून ठेवं. 7 मंग
अजुक त्यानं दुसऱ्यालें म्हतलं,तुह्यावर काय
काय येतें?तो म्हणें,शंभर मण गहू,तवा
त्यानं त्यालें म्हणलं,तुह्याली खातावही
घेऊन अस्सी लिवून ठेवं. 8 हे पाऊन
घरधन्यानं त्याअधर्मी कारभाऱ्याची वाहवा
केली,कावून कि त्यानं चतुराईन काम केलं
हाय,कावून कि ह्या संसाराचे लोकं आपल्या
काळाच्या रितीनं व्यहारात प्रकाशाच्या
लोकांयपेक्षा हुशार असतात. 9 आणखी म्या
तुमाले सांगतो,अनीतीच्या धनानं आपल्या
साठी मित्र बनवा,यासाठी कि जवा ते
नाहीसें होतीन तवा ते तुमाले सर्वकालच्या
वस्त्यांमध्ये घ्यावें. 10 अन् जो थोड्यातल्या
थोड्यात खरा हाय,तो बऱ्याचं विषयी
खरा हाय,अन् जो थोड्यातल्या थोड्यात
अधर्मी हाय, तो बऱ्याचं विषयी अधर्मी
हाय. 11 म्हणून तुमी जर अधर्माच्या धनात
खरे नसाल, तवा तुमाले खरं धन कोण
सोंपवून देईन. 12 अन् जर तुमी दुसऱ्याच्या
धनात खरे नाई ठरले,तवा जे तुमचं हाय,ते
तुमाले कोण देईन? 13 कोणताही दास दोन
स्वामीची सेवा नाई करू शकत, कावून कि
तो एकाचा राग करीन,अन् दुसऱ्यावर प्रेम
करीन,नाईतर एका संग मिडून राईन,अन्
दुसऱ्याले तुच्छ मानीन,तुमाले देवाची अन्
धनाची दोनांची सेवा करता येत नाई. 14 अन्
परुशी जे धनाचे लोभी होते ते ह्या सऱ्या
गोष्टी आयकू रायले होते,अन् त्याची थठ्ठा
करत होते. 15 तवा त्यानं त्यांय्लें म्हणलं,तुमी
माणसांयच्या समोर स्वताले धर्मी करता,पण
देव बाप तुमचे मन ओळखते,कावून

कि जे गोष्टी माणसाच्या नज्रीत महान
हायत,त्या देवाच्या नज्रीनं घृणित हायत.
16 नियमशास्त्र अन् भविष्यवक्ता योहाना
परेंत रायले,त्याचं वाक्ती पासून देवाच्या
राज्यांचा सुसमाचार सांगतला जात हाय,अन्
हरएक झन प्रभलतानं अंदर जाऊन रायला
हाय. 17 आकाश अन् पृथ्वीचं मिटून जाणं,
नियमशास्त्राच्या एका बिंदूच्या मिटून
जाण्याच्या पेक्षाहि सोफं हाय 18 अन् जो
कोणी आपल्या बायको ले सोडून दुसरी
संग लग्नं करते,तो व्यभिचार करते,अन् जो
कोणी नवऱ्यानं टाकून देलेल्या बाई संग लग्नं
करते,तो पण व्यभिचार करते. 19 एक धनवान
माणूस होता,जो जांभळया रंगाचे मलमलीचे
कपडे घालतं होता,अन् हरएक दिवसी
सुखानं आनंदान अन् धुमधामानं रायतं
होता. 20 अन् लाजर नावांचा कंगाल गरीब
माणूस,जो फोडांनी भरलेला होता,त्याच्या
दरवाज्यापासी टाकण्यात आला होता. 21 अन्
त्याची अशी इच्छा होती,कि धनवानाच्या
मेजावरून जे चुरा खाली पडीन,त्यानं आपलं
पोट भरावं,पण कुत्रे पण येऊन त्याचें फोडं
चाटत जात. 22 अन् असं झालं, कि तो कंगाल
गरीब माणूस मरून गेला, तवा स्वर्गदूत
त्यालें घेऊन अब्राहामाच्या गोदीत नेऊन
ठेवलं,अन् मंग तो धनवान पण मेला अन्
रोऊन ठाकला. 23 अन् अधोलोकात त्याले
यातना होतं होत्या तवा त्यानं आपले डोये
वरते केलें,तवा दुरून अब्राहामाच्या गोदीत
लाजराले पायलं. 24 तवा तो हाका मारून
म्हणू लागला,हे बापा अब्राहामा, माह्यावर
दया करून लाजराले पाठून घ्या,ह्याच्यासाठी
कि त्यानं आपल्या बोटाचें टोंक पाण्यांत
भिजून माह्याल्या जीभिले थंड कऱ्याले कावून
कि म्या या आगीत तडपू रायलो हाय. 25 पण
अब्राहामान म्हणलं,हे पोरां याद कर,कि तू
आपल्या जीवनांत चांगल्या वस्तुं घेतल्या
हायत,अन् तसेंच लाजर बेकार वस्तुं,पण
तो अतिसाक शांति पाऊ रायला अन् तू
तडपून रायला हाय. 26 अन् ह्या साऱ्या गोष्टी
सोडं,पण आमच्या अन् तुमच्या"मधात" एक
मोठी दरी स्थापलेली हाय,कि ज्यांय्लें अतून
तुमच्या पासी जायालें पायतात त्यांय्लें असं
नाई करता यावं म्हणून,अन् तिकडून आमच्या
पासी नाई यावं म्हणून. 27 मंग तो म्हणलां,हे
बापा म्या तुलें विनंती करतो,कि तू त्यालें
माह्याल्या बापाच्या घरी पाठवं. 28 कावून कि
माह्याले पांच भाऊ हायत,तो त्यांयच्या पासी
जाऊन ह्या गोष्टी ची साक्ष दे,असं नाई व्हावं
कि ते पण या यातनेच्या जागी यावं. 29 तवा
अब्राहामान त्यालें म्हणलं,त्यांयच्या पासी त.
मोशेचे अन् भविष्यवक्त्यांचे पुस्तकं हायत
त्यांयचं त्यांयनं आयकावं. 30 त्यानं म्हणलं,
नाई, हे बापा अब्राहामा पण जर मेलेल्यांतून
कोणी त्यांयच्या पासी जाईन तर ते पश्चात्ताप
करतीन. 31 त्यानं त्यालें म्हणलं,कि जर मोशे
अन् भविष्यवक्त्यांच आयकत नाई ,तवा जर
मेलेल्यातून कोणी जिवंत होऊन जाईन तरी
त्याचं मानतीन नाई.

## 17

1 मंग त्यानं आपल्या शिष्याय्लें
म्हणलं,हु शकत नाई कि अडखळनं
येणार नाई ,परंतु "हायहाय"त्यालें जे
ज्या माणसा पासून येतात. 2 जो या
लायण्यायंपयकी कोण्या एकाले अडखळनं
बनते,त्याच्या साठी हे चांगलं होतं कि
जात्याचां पाट त्याच्या गयात लटकून
समुद्रात टाकून देला जावां. 3 सचेत राहा,जर
तुह्यावाल्या भावानं अपराध केला असीन, तर
त्यालें समजावं,अन् जर तो पश्यताप करत
असीन तर त्यालें क्षमा करं. 4 जर त्यानं दिवसं
भऱ्यातून सात वेळा,तुह्या अपराध केला
असीन,अन् सातही वेळां तुह्यावाल्या पासी

येऊन म्हणीनं कि मले पश्चात्ताप आला हाय,
तवा त्यालें क्षमा करं. 5 मंग प्रेषित प्रभूला
म्हणाले आमचा विश्वास वाढवा. 6 तवा प्रभूनं
म्हणलं,जर तुमचा मोवरीच्या दाण्यांएवढा
जरी विश्वास असता,तवा तुमी या तुतीच्या
झाडाला,म्हणलें असते कि बुडापासून उपटून
समुद्रात लागून जाय,तरी त्यानं तुमची आज्ञा
मानली असती. 7 तुमच्याईत असा कोण
हाय,कि ज्याचां दास नांगर जुतू रायला,
किंवा मेंढर चारू रायला असीन,अन् जवा
तो वावरातून आल्यावर तवा तो त्यालें
मनीन,लवकर ये अन् जेव्यालें बसं. 8 अन्
उलट तो असं नाई म्हणीन, कि माह्यावाल्या
साठी जेवण तयार कर,अन् जत-लग म्या
जेवत-खावत नाई,तथ-लग कमर बाधून
माह्याली सेवा कर,मंग याच्या बाद तू जेवण
करजोक. 9 सांगतलेले काम दासानं केलें
म्हणून तो त्याचा उपकार मानीन काय.
10 अशाचं प्रकारे तुमीहि,जवा त्या कामांना
करसान ज्याची आज्ञा तुमाले देली गेली
होती,तवा कुठें, आपण निक्कमे दास हाय,कि
जेंजें आपल्यालें कऱ्याचं होतं तेच आपुन केलं.
11 अन् असं झालं कि,तो यरुशलेमेत जाऊ
रायला होता,तवा शोमरोन व गालीलाच्या
मधून जाऊ रायला होता. 12 अन् कोण्या
एका गावातून तो जाऊ रायला असता,त्या
वात्ती त्यालें दाहा माहारोगीकुष्ठरोगी माणसं
भेटलें. 13 अन् तवा त्यांयनं दुरवरचं उभे
राऊन,मोठ्या आवाजानं म्हणलं,हे येशू,हे
स्वामी,आमच्यावर दया कर. 14 त्यानं
त्यांयलें पावून म्हणलं,तुमी जाऊन आपल्या
याजकाले दाखवा,अन् जवा ते जाऊ रायलें
होते तवा जाताजाताचं शुद्ध होऊन गेलें.
15 तवा त्यायच्यातून एकानं पायलं कि म्या
चंगा झालो हाय,तवा तो मोठ्या आवाजानं
देवाची स्तुती करत माघं वापस आला. 16 अन्
येशूच्या पायाजवळ उभडा पडून,त्याच्या
धन्यवाद करू लागला,अन् तो शोमरोनी
होता. 17 ह्यावर येशूनं म्हणलं,काय दहाहि
जण शुद्ध केलें गेलें नाईत काय,तर ते नऊ जण
कुठ्साक हायत? 18 काय ह्या परदेशी ले सोडं
आणखी कोणी नाई निगाला,जो देवाची स्तुती
करत.? 19 तवा त्यानं त्यालें म्हणलं उठून
चालां जाय,कावून कि तुह्यावाल्या विश्वासानं
तुले शुद्ध केलं हाय. 20 तवा परुशायनं त्यालें
पुसलं,कि देवाचं राज्य कवा येईन?तवा
त्यानं त्यांयलें उत्तर देलं,कि देवाचं राज्य
प्रगट रुपात येणार नाई. 21 अन् लोकं हे नाई
म्हणतीन,कि पाहा, अतिसाक हाय,नाईतर
तथीसाकं हाय,कावून कि पाहा,देवाचं राज्य
तुमच्याईत हाय. 22 अन् त्यानं शिष्याय्लें
म्हणलं,असे दिवस येतीन,ज्यांच्यात तुमी
माणसाच्या पोराच्या दिवसांत एका दिवसाले
पाह्याची इच्छा ठेवसान पण नाई पायसांन.
23 लोकं तुमाले म्हणतीन,पाहा,अतिसाकं
हाय,किंवा तथीसाकं हाय,परंतु तुमी जाऊ
नका,अन् त्यांयच्या मांग होऊ नका.
24 कावून कि जसी बिजली अभायाच्या
एका इकडून चमकून अभायाच्या दुसऱ्या
इकून चमकते,तसाचं मनुष्याचा पोरगा पण
आपल्या दिवसी प्रगट होईन. 25 पण पयले हे
जरुरी हाय,कि त्याला खूप दु:ख सोसावी,अन्
या काळाच्या लोकांच्या पासून तुच्छ मानला
जावां. 26 अन् जसं नोहाच्या दिवसांत
झालं होतं,तसचं मनुष्याच्या पोराच्या
दिवसात पण होईन. 27 ज्या दिवसा लग
नोहा जहाजावर चढला नोता,त्या दिवसा
लग लोकं खाऊन पिऊन रायत होते,अन्
त्यांयच्यात लग्न करून घेत होते अन् लग्न
करून देत होते,अन् तवा जलप्रलय आला अन्
सर्वाचा नाश झाला. 28 अन् जसं लोटाच्या
दिवसात झालं,कि लोकं खाऊन पेऊन देणे

घेणे करत जात,झाडे लावत, जात अन् घर
बनवत जात. 29 परंतु ज्या दिवसी लोट
सदोमातून निंगला,त्याचं दिवसी आग अन्
गंधक अभायातून बरसले अन् सर्वाचा नाश
करून ठाकला. 30 मनुष्याचा पोरगा प्रगट
होईन तवा त्या दिवसी पण असचं होईन.
31 त्या दिवसी जो धाब्यावर असीन,अन्
त्याचं सामान घरात असीन,तवा तो
नेण्यासाठी खाली नाई यावां ,अन् तसाचं जो
वावरांत हाय,अन् मांग रायलेल्या गोष्टीकडे
माघारें फिरुं नये. 32 लोटाच्या बायकोची
आठवण ठेवा. 33 अन् जो स्वताचा प्राणजीवं
वाचव्यालें पाहीन तो त्यालें गमाविन,अन्
जो कोणी आपला जीव गमाविन तो त्यालें
वाचविण. 34 म्या तुमालें सांगतो त्या रात्री
एका बाजीवर दोघं माणसं असतीन,तवा
एकाले घेतलं जाईन अन् दुसऱ्यालें सोडलं
जाईन. 35 दोघी बायास्त्रियाएकत्र दळण
दयत असतीन,तवा एकीले घेतलं जाईन,अन्
दुसरी ले सोडलं जाईन. 36 दोघ जण वावरांत
असतीन,तवा एकाले घेतलं जाईन,अन्
दुसऱ्यालें सोडलं जाईन. 37 हे आयकून त्यांयनं
त्याले पुसलं,हे प्रभू हे कुठसाकं होईन?तवा
त्यानं त्यांयलें म्हणलं, जती शरीर हाय तती
गिधाडे एकत्रित होतीन.

18 1 आणखी त्यानं याच्या बाऱ्यात
सर्वदा प्रार्थना करा,अन् हिम्मत नाई
सोडली पायजे,ह्या साठी त्यानं त्यांयलें हा
दृष्टान सांगतला. 2 तो म्हणाला कोण्या एका
नगरात एक न्यायाधीश रायत होता,जो ना
देवाले भेत होता, अन् ना कोण्या माणसाची
पर्वा करत नोता. 3 अन् त्याचं नगरांत एक
विधवा पण रायत होती, तवा ते त्याच्या
पासी जाऊन मने कि माह्याल्या विरोधकाच्या
संबंधी माह्याला न्याय कर. 4 त्यानं कईक
समया परंत त.. मानलंचं नाई,पण आखरीले
मनांत विचारकरून म्हणलं, जरी म्या देवाले
भेत नाई,अन् ना माणसाची पर्वा करत
नाई. 5 तरी पण हे विधवा मले त्रास देत
रायत हाय,म्हणून म्या तिचा न्याय करूनचं
टाकतो,नाई तर असं नाई व्हावं कि ते पुन्हा
पुन्हा येऊन आखरीले माह्याल्या नाकात
दम करून टाकीन. 6 तवा प्रभूनं म्हणलं,
आयका,कि हा अधर्मी न्यायाधीश काय
म्हणतो. 7 तवा काय देवानं ज्यायलें निवडले
हाय, त्यांचा न्याय नाई करणार काय,जे
रातदिवसा त्याला हांक मारतात,अन् काय
तो त्यांयच्या साठी उशीर लावीन काय.
8 म्या तुमालें सांगतो, तो लवकरचं त्यांयचा
न्याय करून टाकीन,तरी मनुष्याचा पोरगा
जवा येईन,तवा त्याले पृथ्वीवर विश्वास
सांपडीन का 9 अन् त्यानं कईकांना जे आपल्या
स्व:ता वर भरोसा ठेवत होते,कि आमी धर्मी
आहो,अन् दुसऱ्यांना तुच्छ मानत होते,
त्याच्या साठी हा दृष्टात सांगतला. 10 कि
दोन माणसं मंदिरात प्रार्थना कऱ्यासाठी
गेले,त्याच्यात एक परुशी होता,अन् दुसरा
जकातदार होता. 11 परुशी उभा राऊन
आपल्या मनांत हे प्रार्थना करू लागला,कि
हे देवा,म्या तुह्याला धन्यवाद करतो,कि
म्या दुसऱ्या माणसासारखा अन्यायी अन्
व्यभिचारी नाई अन् नाहि या जकातदारा
सारखा आहो. 12 म्या हप्तातून दोन खेफ
उपवास करतो,म्या आपल्या कमाईचा
दहावा भाग पण देतो. 13 परंतु जकातदार
दूरवरचं उभा राऊन,स्वर्गाच्या इकडे डोळे
लावावं हा सुद्धा पण विचार नाई केला,पण
तो आपली छाती पिटून पिटून म्हणला,हे
देवा मी पापी हाय दया करा. 14 म्या तुमालें
सांगतो,कि तो दुसरा नाई,परंतु हाचं माणूस
धर्मी होऊन आपल्या घरी गेला,कावून
कि जो कोणी स्व:ताले मोठं समजीन,तो

लायना केला जाईन,अन् आपल्या स्व:ताला
लायना समजीन,तोचं मोठा केला जाईन
15 मंग लोकं आपल्या लेकराय्लें त्याच्या
पासी आणू लागले,कि तो त्याच्यावर हात
ठेवावं म्हणून,पण शिष्यायनं हे पाऊन
त्यांना दटावलं. 16 तवा येशूनं लेकरांना
आपल्या पासी बलावून म्हणलं,लेकरांना
माह्याल्या पासी येऊ द्या,अन् त्यांयलें मना
करू नका,कावून कि देवाचं राज्य यायच्याचं
सारखं हाय. 17 म्या तुमाले खरखर सांगतो,
कि जो कोणी देवाचं राज्य लेकरा समान
ग्रहण करत नाई,तो त्यांत कधी प्रवेश करणार
नाई. 18 तवा कोण्या एका अधिकाऱ्यान
त्यालें पुसलं,कि हे उत्तम गुरु,सार्वकालिक
जीवनाचा अधिकारी होण्यासाठी म्या
काय करू.? 19 तवा येशूनं त्यालें म्हणलं,तू
मले उत्तम कावून म्हणतो? देवावाचून
कोणी उत्तम नाई. 20 तूले आज्ञा त माईत
हायत,कि व्यभिचार करू नको,खोटी साक्ष
देऊ नको,आपल्या बापाचा अन् मायचा आदर
करजोक. 21 तवा त्यानं म्हणलं,मीतं ह्या सर्वा
आज्ञा लहानपणा पासून मानत आलो हाय.
22 हे आयकून,येशूनं त्यांलें म्हणलं,तुह्यात
आजूक एका गोष्टीची कमी हाय,ते हे कि
आपलं सगळं काई इकून गरिबांना वाटून
दे,तवा तुले स्वर्गात धन भेटनार, अन् येऊन
माह्याल्या मांग येऊन जाय. 23 तो हे ह्या
गोष्टी आयकून खुपचं नाराज झाला, कावून
कि तो लय धनवान होता. 24 तवा येशूनं
त्यालें पाऊन म्हणलं,धनवानाय्लें देवाच्या
राज्यांत प्रवेश कर्ण लय कठीण हाय.?
25 देवाच्या राज्यांत धनवानांना प्रवेश करणे
ह्यापेक्षा उटालें सुईच्या नाकातून आंत जाणं
अधिक सोफं हाय. 26 जे आयकून रायले
होते त्यांयनं म्हणलं,तर कोणाचं तारण होऊ
शकते?. 27 त्यानं म्हणलं,जे माणसाच्यानं
होऊ शकत नाई, ते देवाच्यानं होऊ शकते.
28 तवा पेत्राण म्हणलं,पाहा,आम्ही घर
दार सोडून तुह्यावाल्या मांग आलो हाय.
29 मंग त्यानं त्यांला म्हणलें,म्या तुमाले
खरंखर सांगतो,असा कोणी नाई कि ज्यानं
देवाच्या राज्यासाठी घर दार या बायको
या भाऊ या माय बाप या लेकरं बाकर
सोडली हायत. 30 अन् या समयातकाळीकईक
गुणा अधिक व पुढल्या काळी सर्वकाळचे
जीवन मिळनार नाई, असा कोणीचं नाई.
31 तवा त्यानं त्या बारा झणांना जवळ घेऊन
त्यांना म्हणलं,पाहा,आपुन येरुशलेमात
जाऊ,अन् जेवळया गोष्टी मनुष्याच्या
पोराच्या बद्दल भविष्यवक्त्याच्या व्दारा
लिवल्या गेल्या हायत त्या सर्व्या पुऱ्या
होतीन. 32 कावून कि तो अन्यजातीयांच्या
हातांत सोपला जाईन,अन् ते त्यांची थट्ठा
करतीन, अन् त्याच्या अपमान करतीन,अन्
त्याच्यावर थुंकतीन. 33 अन् त्यालें फटकेकोड़े
मारतीनं,अन् त्यालें जीवांन मारून
टाकतीन,अन् तो तिसऱ्या दिवसी परत
जिवंत होऊन जाईन. 34 अन् त्यांयलें ह्या
गोष्टीतून,कोणतीचं गोष्ट समजली नाई,अन्
ह्या गोष्टी त्यांयच्यात गुप्त रायली,अन् जे
सांगतल्या गेलं ते त्यांयच्या लक्षात आलं नाई.
35 जवा तो यरीहोच्या जवळ पोहचला,तवा
एक फुटका माणूस सडकीच्या बाजूनं बसून
भीख मांगू रायला होता. 36 अन् तो त्या
गर्दीचा आवाज आयकून विचारू लागला,हे
काय होऊ रायलं हाय.? 37 त्यांयनं त्यालें
सांगतलं,कि येशू नासरेथकर जवळुन जात
हाय. 38 तवा त्यानं मोठ्या आवाजानं
म्हणलं,हे येशू,दाविदाच्या पोरां माह्यावर
दया करा. 39 जे समोर जात होते ,ते त्यालें
धमकावत कि चूप राहा म्हणून,पण तो
आजुकचं मोठ्यानं कल्ला करून म्हणे,हे

दाविदाच्या पोरां माह्यावर दया करा. 40 तवा
येशूनं उभं राऊन त्यालें आज्ञा देली,कि त्यालें
माह्याल्या पासी आणा,अन् जवा तो जवळ
आला तवा येशूनं त्यालें विचारलं 41 तूले
काय वाटते, कि म्या तुह्यासाठी करावं?
त्यानं म्हणलं हे प्रभू हेचं कि मले दिसावंदृष्टी
मिळावी. 42 तवा येशूनं त्यालें म्हणलं,तुह्याली
दृष्टी घे,तुह्यावाल्या विश्वासानं तुले चांगलं
केलं हाय. 43 अन् त्यालें एकदमचं दिसू
लागलं,अन् तो देवाचा गौरव करत त्याच्या
मांग चालूं लागला,अन् सर्व्या लोकांय्न हे
पाऊन देवाची महिमा केली.

19 1 अन् तो यरीहोंत आला अन्
समोर जाऊ लागला. 2 अन्
पाहा,जक्कय नांवाचा एक माणूस होता,जो
जकातदारायंच्या प्रमुख होता अन् लय
धनवान होता. 3 अन् येशू कोण हाय
बा..हे पाह्याले तो प्रयत्न तो करत होता?
परंतु गर्दीच्या कारणाने पाहू शकत नोता
कावून कि तो डूमनाबुटका होता. 4 तवा
येशुले पायण्यासाठी तो समोर धावून एका
उंबराच्या झाडावर चढला,कावून कि येशू
त्याचं रस्त्यांन जाणार होता. 5 तवा येशू
त्या जागी पहुचला,तवा वरते पाहून त्यालें
म्हणलं,हे जक्कय लवकर खाली उतर,कावून
कि आज मले तुह्यावाल्या घरी रायले
पायजे. 6 मंग तो तवरुत खाली उतरून
आनंदानं येशूला आपल्या घरी घेऊन
गेला. 7 हे पाऊन सगळे लोकं कुचुर बुचुर
करून म्हणू लागले,तोत..त्या एका पापी
माणसाच्या घरी गेला हाय. 8 जक्कयांन
उभें राऊन प्रभू ले म्हणलं,हे प्रभू, पाहा
म्या माह्यावाली अर्धी संपती गरिबांना
देतो,अन् जर कोणाचं पण अन्यायान घेतलं
असीन,तर चौपट परत देतो. 9 तवा येशूनं
त्यालें म्हणलं,आज ह्या घरांत तारण आलं
हाय,कावून कि हा पण अब्राहामाचा एक
पोरगा हाय. 10 कावून कि मनुष्याचा पोरगा
हारोपलेल्यांना शोधण्यासाठी अन् त्यांच
तारण करण्यासाठी आला हाय. 11 जवा ते
ह्या गोष्टी आयकून रायले होते,तवा त्यानं हा
दृष्टात सांगतला,कारण कि तो यरुशलेमाचा
जवळ होता,अन् त्यांयलें असं वाटे कि देवाचं
राज्य आताचं प्रगट होणार हाय. 12 यामुळे
तो म्हणाला,एक धनवान माणूस दूरच्या
देशात गेला,ह्यासाठी कि राज्यासन मिळुन
परत यावे म्हणून. 13 तवा त्यानं आपल्या
दहा दासांना बलावून त्यांयलें दहा मोहरे
देली,अन् त्यांयलें म्हणलं म्या येई परंत या
वर लेन-देन करजाक. 14 परंतु त्याच्या
नगरातले लोकं त्याचा रागव्देष करत,अन्
त्याच्यावाल्या मांग वकिलांना पाठवून
सांगतले,कि आमाले ह्याचं राज्य पायजे
नाई असी आमची इच्छा हाय. 15 जवा तो
राज्यासन मिळुन वापस आला,तवा असं
झालं,कि त्यानं आपल्या दासांना ज्यांयलें
त्यानं पयसा देला होता,त्यांयलें आपल्या
पासी बलावलं ह्यासाठी कि त्यांयच्यातून
प्रत्येकान व्यापारातून काय काय कमावलं
हाय. 16 तवा पयल्या येऊन म्हणलं,हे स्वामी
तुह्यावाल्या ज्या मोहरे घेतल्या होत्या
त्याच्या पासून दहा मोहरे कमावल्या हायत.
17 तवा स्वामी ने त्यालें म्हणलं,शाबास तू
धन्य हायस दास, तू धन्य हाय,तू अगदी
लायण्या गोष्टीविषयी विश्वास योग्य झालास
म्हणून तू आता दहा नगरांचा अधिकारी हो.
18 मंग दुसऱ्यानं येऊन म्हणलं,हे स्वामी, तुह्या
मोहरे पासून पांच अजुक मोहरे कमावल्या
हाय. 19 तवा स्वामी ने म्हणलें,तू पण पांच
नगरावर अधिकारी हो. 20 मंग तिसऱ्यानं
येऊन म्हणलं,हे स्वामी, पाहा,तुह्यावाली
देलेली मोहर हे हाय जे म्या,माह्याल्या

रुमालात बांधून ठेवली होती. 21 कावून कि
म्या तुले भेत होतो, कारण तू कठोर माणूस
हायसं,जे तू ठेवलं नाई ते उचलून घेतो,अन् जे
तू पेरलं नाई त्याची कटाई करतो. 22 तवा
स्वामी नं म्हणलं,हे दृष्ट दास,म्या तुह्यावाल्या
तोंडानं तुले दोषी ठरवतो,तु मले ओळखलं
होतं कि म्या कठोर माणूस हाय,जे म्या नाई
ठेवलं, ते उचलून घेतो,अन् जे म्या नाई पेरलं
त्याची कटाई करतो हे तुले ठाऊक होतं काय.
23 तर त्या माह्याल्या पयसा पेटीत का नाई
ठेवला,कि माह्याल्या येण्याच्या वाक्ती म्या
व्याजा सगट वसूल केला असता.? 24 अन् जे
लोकं जवळ उभें होते,तवा त्यानं त्यांयलें
म्हणलं,ते मोहर त्याच्यावाल्या पासून घेऊन
घ्या अन् ज्याच्या पासी दहा मोहरे हायत
त्यालें घ्या. 25 तवा त्यांयनं त्यालें म्हणलं,हे
स्वामी,त्याच्या पासी दहा मोहरे हायत.
26 म्या तुमाले सांगतो,कि ज्याच्या पासी
हाय,त्यालें देल्या जाईन,अन् ज्याच्या पासी
नाई,त्याच्या पासून ते पण त्याच्या पासी हाय
वापस घेतलं जाईन. 27 परंतु माह्याल्या त्या
विरोधीयांना ज्यांयलें वाटत जाय कि म्या
त्यांयच्या वर राज्य नाई करावं,त्यायच्या
अती माह्याला समोर मारून टाका. 28 ह्या
गोष्टी सांगतल्यावर येशू यरुशलेमाच्या इकडे
त्यायच्या समोर चालला होता. 29 अन् जवा
तो जैतुन नांवाच्या पहाडा पासी बैथफगे व
बेथानी याच्या जवळ आल्यावर,तवा त्यानं
आपल्या शिष्यायं पयकी दोघांना हे सांगून
पाठवलं. 30 कि समोरच्या गावांत जा,अन्
तती गेल्यावर एक गधीशिंगरू दिसीन
ज्याच्यावर कोणी कधीचं बसलेलं नसीन,ते
बांधलेलं तुमाले दिसीन,त्यालें सोडून आणा.
31 अन् जर कोणी तुमाले विचारतीन कावून
बा.. खोलता,तवा हे सांगजाकं,कि प्रभूले
याची गरज हाय. 32 ज्यायलें पाठवलं
होतं,त्यांयनं जाऊन जसं त्यानं त्यांयलें
सांगतलं होतं,तसचं केलं. 33 जवा ते गद्याले
खोलू रायलें होते,तवा गद्याचा मालकाने
त्यांयलें पुसलं,या गधशिंगरूले कावून
बा..सोडता? 34 तवा त्यांयनं म्हणलं,प्रभू ले
याची गरज हाय. 35 ते त्या गध्यालेशिंगरूले
येशूच्या पासी घेऊन आले,अन् आपले कपडे
त्या गद्यावर टाकले येशुले त्याच्यावर बसवलं.
36 जवा तो जाऊ लागला,तवा त्यांयनं
आपआपले कपडे रस्त्यांवर आतरू लागले.
37 अन् तो जैतुनाच्या पहाडाच्या ढलानाच्या
पासी पोचंल्यावर,तवा शिष्याच्या साऱ्या
समुदाय त्या सर्व्या सामर्थ्याच्या कामांचा
बद्दल जे त्यांयनं पायले होते,आनंदित होऊन
मोठ्या आवाजानं देवाची स्तुती करु लागले.
38 कि धन्य हाय तो राज्या,जो प्रभूच्या नावांन
येते,स्वर्गात शांती असो अन् आकाश मंडलात
महिमा हो. 39 तवा गर्दीतल्या कईक परुशांनी
त्यालें म्हणलं,हे गुरु आपल्या शिष्यांना
धमकावं. 40 तवा येशूनं उत्तर देलं,कि तुमाले
सांगतो कि,जर ते चूप रायले तर गोटेदगड
ओरडतीन. 41 जवा येशू यरूशलेमाच्या
जवळ आला,तवा त्या नगराला पाऊन तो
रडला. 42 अन् तो म्हणला,जर तू होय
तुच,निदान आज शांतीच्या गोष्टी ओळखल्या
असत्या तर किती बरं झालं असतं, परंतु
आता तुह्या दृष्टीपासून गुप्त केल्या हायत.
43 कावून कि असें दिवस तुह्यावर येतीन,कि
तुह्याले शत्रू तुह्यावाल्या भोवती लाकडी कोट
बांधून तुले वेधतीन,अन् तुले चवंभवंताल
कोंडतीन. 44 अन् तुले अन् तुह्या लेकरांना
जे तुह्यात हायत,मातीत आदळतीन,अन्
तुह्यात गोट्यावर गोटा सुद्धा राहूं देणार
नाईत,कावून कि तू तो अवसर जवा तुह्यावर
कृपा दृष्टी केली गेली पण त्या ओळखली नाई.
45 तवा तो मंदिरात गेला अन् जे विक्री करत

होते त्यांयलें तो बायर हकालु लागला. 46 अन्
त्यांयलें म्हणू लागला,लिवलेलं हाय,कि
माह्यावालं घर हे प्रार्थनाचं राईन,परंतु तुमी
त्याला डाकूंची गुफा बनवली हाय. 47 अन्
तो दररोज मंदिरात उपदेश करत होता,अन्
महायाजक अन् शास्त्री अन् प्रमुख लोकं
त्याच्या नाश कऱ्याचा अवसर पायत होते.
48 परंतु कोणताचं उपाय नाई काडू शकले,हे
त्यांना सुचेना,कावून कि सगडे लोकं मोठ्या
हर्ष उल्लासाने त्याचं आयकत होते.

20 1 एक दिवस असं झालं,कि जवा
तो मंदिरात लोकांय्लें शिकवन अन्
सुवार्ता सांगू रायला होता,तवा महायाजक
अन् शास्त्री वडीलानं बरोबर त्याच्यावाल्या
पासी आले. 2 अन् त्याच्यावाल्या संग बोलू
लागले,कि आमाले सांग,तू हे काम कोणत्या
अधिकारानं करतो,अन् तो कोण हाय,ज्यानं
तुले हा अधिकार देला हाय.? 3 तवा येशूने
त्यांयलें उत्तर देलं,कि म्या पण तुमाले एक
गोष्ट विचारतो,अन् ते तुमी मले सांगा?
4 योहानाचा बाप्तिस्मा स्वर्गाचा व्दारे
होता,कि माणसाच्या इकडून होता.? 5 तवा
ते आपआपसांत म्हणू लागलें,जर आपुन म्हणू
स्वर्गाचा इकून,तवा तो मनीन,तर मंग तुमी
त्याच्यावर विश्वास का केला नाई.? 6 अन्
जर आपुन म्हणू,माणसाच्या इकून,तवा सगडे
लोकं आपल्याला गोट्मार करतीन ,कावून
कि त्यांयलें खरोखर मालूम होतं,कि योहान
हा भविष्यवक्ता होता. 7 तवा त्यांयनं उत्तर
देलं,आमाले नाई माईत कि तो कोणत्या इकून
होता. 8 मंग येशूनं त्यांयलें म्हणलं, ह्या गोष्टी
म्या पण नाई सांगत,कि मी हे काम कोणत्या
अधिकारानं करतो? 9 तवा त्यानं लोकांना
हा दृष्टात सांगतला लागला,कि कोण्या
एका माणसानं अंगुराची वाडी लावली,अन्
शेतकऱ्यालें सोपुन देऊन तो स्वत: बऱ्याचं
दिवसासाठी प्रदेशात निघून गेला. 10 मंग
हंगामाचा वाक्ती मालकाने शेतकऱ्याच्या
पासी एक दास पाठवला,ह्यासाठी कि ते
अंगुराच्या वाडीतून काई फळांना त्याच्या
साठी द्यावें म्हणून,पण शेतकऱ्यानं त्यालें
झोडपून रिकाम्या हातानं लावून देलं.
11 मंग आणखी एका दासाले पाठवलं,अन्
त्यांयनं त्यालें झोडपून अन् त्याच्या अपमान
करून रिकाम्या हातांच वापस केलं. 12 मंग
आणखी त्यानं तिसऱ्यालें पाठवलं,अन्
त्यांयनं त्यालें पण घायल करून टाकून
देलं. 13 तवा अंगुराच्या वाडीच्या मालकांन
म्हणलं,म्या आता काय करू?म्या आपल्या
प्रिय पोरांला पाठवतो,म्हणजें ते त्याच्या
आदर करतीन. 14 जवा शेतकऱ्यानं त्यालें
पायलं,तवा आपआपसांत विचार करून म्हणू
लागलें हा तो वारीस हाय,या,आपुन त्यालें
मारून टाकू,तवा मिरास आपली होऊन
जाईन. 15 अन् तवा त्यांयनं त्यालें अंगुराच्या
वाडीतून बायर काढलं अन् मारून टाकलं,तर
अंगुराच्या वाडीचा मालक त्यांयच्या संग
काय करणार? 16 तवा तो येऊन शेतकऱ्याय्लें
नाश करून टाकीन,अन् अंगुराची वाडी
दुसऱ्यालें सोपून देईन,हे आयकून त्यांयनं
म्हणलं,देवानं असं नाई करावं. 17 तवा
येशूनं त्यांयच्या इकडे पाऊन म्हणलं,मंग
ते काय , लीवलेलं हाय,कि ज्या गोट्यालें
राजमिस्त्री यांनी निकम्मा ठरवलं पण तो
कोपऱ्याचा मुख्य झाल. 18 जो कोणी ह्या
गोट्यावर पडीन,तो चुरचुर हून जाईन, अन्
ज्याच्यावर तो पडीन,त्यालें तो भुगा करीन.
19 त्याचं वाक्ती शास्त्री अन् महायाजकांनी
त्यालें पकडण्याचा प्रयत्न केला,कावून कि
त्यांयलें समजलं कि,त्यानं आपल्यावर हा
दृष्टात सांगतला हाय,पण ते लोकांना भेले.
20 तवा त्यांयनं त्याच्यावर टपून राऊन,आपण

न्यायी आहो असें सोंग घेतलेलें हेर त्याच्या
कडे पाठवले,ह्या साठी कि त्यांयनं त्यालें
बोलण्यात धरून त्यालें सुभेदाराच्या हातांत
अधिकाऱ्यास ध्यावे. 21 त्यांयनं येशुले हे
विचारलं,कि हे गुरु,आमाले ठाऊक हाय,कि
तुमी बरोबर बोलता, अन् शिकवण पण
देता,अन् कोणाचाहि पक्षपात नाई करता,तर
देवाचा मार्ग खरोखर सांगता. 22 काय
आपल्याले कैसरला "कर" देणं उचित हाय,
किंवा नाई.? 23 तवा येशूनं त्यांयचा कपट
ओळखून त्यांयलें म्हणलं,एक रुपयाएक
दिनार मले दाखवा. 24 यावर कोणाची मूर्ती
अन् नाव लिवलेलं हाय?त्यांयनं म्हतलं
कैसरचं. 25 तवा येशूनं म्हतलं, जे कैसरचं
हाय,ते कैसरला ध्या,अन् जे देवाचं हाय,ते
देवाले ध्या. 26 तवा त्यांच्या च्यानं लोकांच्या
समोर बोलण्यात धरु नाई शकले,तर त्याच्या
उत्तरावून अचम्भित होऊन चूपच्याप रायले
27 मंग सदुकी जे म्हणत होते कि,मेलेल्यायचं
पुनरुस्थान हि नाई असे,म्हणणाऱ्यायनं
कित्येकांनी येशूच्या पासी येऊन विचारलं.
28 कि हे गुरुजी,मोशेने आपल्या साठी हे
लिवलं हाय,कि जर कोणाचा भाऊ आपल्या
स्वता:ची बायको असून हि बिना लेकरांचा
मरून जाईन,तवा त्यांचा भाऊ त्याच्यावाल्या
बायको संग लग्न करणार,अन् आपल्या
भावासाठी वंश उत्पन्न करणार. 29 तर कोणी
सात भाऊ होते,पयला भाऊ लग्न करून
बिना लेकरांचा मरून गेला. 30 मंग दुसऱ्यानं
अन् तिसऱ्यानं पण तिच्या संग लग्न केलं.
31 असाचं प्रकारे सातही बिना लेकराचे
मरून गेलें. 32 त्यानंतर ते बायको पण मरून
गेली. 33 तर पुनरुस्थानांत ती त्यांयच्यातून
कोणाची बायको होईन,कावून कि ती त्या
सातही झणायंची बायको झाली होती.
34 येशूनं त्यांयलें म्हणलं,या काळात पोरं मुलं
लग्न करून घेतात अन् लग्न करून देले जातात.
35 पण जे लोकं या योग्य ठहरतीन,कि
या काळात मेलेल्यातून पुनरुस्थान प्राप्त
करतीन,त्यांच्यात लग्न करून घेणं अन् लग्न
करून देनं रायणार नाई. 36 अन् ते कधीही
मरतीन नाई,कावून कि ते स्वर्गदूतांच्या
समान होतीन,अन् पुनरुस्थानंचे लेकरं हायत
म्हणून ते देवाचे पण लेकरं होतीन. 37 परंतु
ह्या गोष्टी ले कि मेलेलें उठवले जातात,मोशेने
पण झुडूपाविषयी प्रगट केलं हाय,कि तो प्रभू
अब्राहामाचा देव,अन् इसहाकाचा देव,अन्
याकोबाचा देव असे म्हतलें होते. 38 तर
देव मेलेल्याचा नाई,परंतु जीवंताचा देव
हाय,कावून कि त्याचा जवळ सगडे जिवंत
हायत. 39 तवा हे आयकून शास्त्रीयांयतून
कित्येकांन म्हणलं,हे गुरुजी तू तर ठीक
बोलतोस. 40 अन् त्यांयलें मंग त्यालें आणखी
काई विचाराला हियाव झाला नाई 41 मंग
त्यानं त्यांयलें पुसलं,ख्रिस्त हा दाविदाचा
पोरगा हाय,असं कावून बा.. म्हणता?
42 दावीद स्वत:स्तोत्रांचा पुस्तकांत म्हणतें,कि
प्रभूने माह्यावाल्या प्रभूले म्हटले. 43 माह्या
उजवे कडे बसं जतलग,कि म्या तुह्या शत्रूस
तुह्याल्या पायाच्या पादासन करत नाई.
44 दावीद तर त्यालां प्रभू म्हणतो,तर मंग
तो त्याचा पोरगा कसा होईन. 45 जवा सरे
लोकं आयकून रायलें होतें,तवा येशूने आपल्या
शिष्यांना म्हणलं. 46 शास्त्रांय पासून चौवकसं
रायजांक,जे लंबे लंबे झगें घालून फिरनं त्यानां
चांगल वाटते ,ज्यांना बजारात नमस्कार,अन्
सभास्थानात मुख्य आसन,अन् पंगतीत
मुख्य जागा प्रिय वाटते. 47 ते विधवांचे घर
घरे खाऊन टाकतात,अन् ढोंगाने लंबी लंबी
प्रार्थना करतात,त्यांयले दंड होईन.

21 1 मंग त्यानं आपली दृष्टी वर करून
धनवानांना आपलं आपलं दान

भांडारात टाकतांना पायलं. 2 अन् त्यानं एका
गरीब विधवेला पण भांडारात दोन दमळ्या
टाकतांना पायलं. 3 तवा येशुनें म्हटलें,म्या
तुमाले खरोखर सांगतो,कि या गरीब विधवेन
सर्व्या पेक्षा अधिक टाकलं हाय. 4 कावून कि
त्या सर्व्यानं आपल्या विपुलतेतून दानांत
टाकलं,परंतु हीने आपल्या कमाईतून आपली
जे उपजीविका होती ती टाकली 5 जवा कईक
लोकं म्हणत होते कि मंदिर सुंदर गोट्यांनी
अन् भेट वस्तूंनी सजवल्या गेलं हाय,तवा
त्यानं म्हणलं. 6 असे दिवस येतीन,कि ज्यांत
हें जे तुमी पायतां, त्यांयच्यातून अति
कोणता गोट्यांवर गोटा पण सुटणार नाई
जो पाडला जाणार नाई. 7 त्यांयनं येशूले
विचारलं हे गुरुजी, हे सगळ कवा होईन?
अन् ह्या गोष्टी कवा पुऱ्या होतीन,तर त्या
समयाचं चिन्ह काय होईन.? 8 तवा येशूनं
म्हणलं,तुम्ही फसू नये म्हणून जपा,कावून
कि बरेचं झण माह्यावाल्या नांवाने येऊन
म्हणतीन,कि मीचं तो,अन् असा पण काळ
जवळ आला हाय,म्हणून तुमी त्यांयच्या
मांगे जाऊ नका. 9 अन् जवा तुम्ही लढाया
अन् दंग्याच्या बद्दल आयकंसान, तवा
घाबरूं नका,कावून कि याचं पयले होणं
आवश्य हाय,परंतु त्या वाक्ती तुरंत अंत नाई
होणार. 10 मंग त्यानं त्यांयलें म्हतलं,तवा
जातीवर जाती अन् राज्यावर राज्य चढाई
करीन. 11 अन् मोठं मोठे भूकंप होतीन,अन्
जागो जागी अकाल,मऱ्या पडतीन,अन्
अभायातून भयंकर उत्पात व मोठं मोठे चिन्ह
प्रगट होतीन. 12 परंतु ह्या सर्व्या गोष्टीच्या
आगोदर,ते माह्याल्या नावांचा बद्दल तुमाले
पकडतीन,अन् सतावंतीन,अन् पंचायत मध्ये
अन् जेलात टाकतीन,अन् राज्यानं पासी
अन् अधिकाऱ्याच्या पासी नेतीन. 13 तर हे
तुमच्या साठी साक्ष द्याची अवसर होईन.
14 म्हणून आपल्या आपल्या मनांत हा निर्धार
करा,कि उत्तर कसं घ्यावं याची चिंता करू
नका. 15 कावून कि मी तुमाले असा बोलण
अन् बुद्धी देईन,कि तुमचे सगडे विरोधी तुमचा
सामना खंडन करू शकतीन नाई. 16 अन्
तुमचे माय-बाप अन् भाऊ अन् परिवार, अन्
मित्र पण तुमाले पकडून देतीन,अतलग कि
तुमच्या पैकी कित्येकांना मारून टाकतीन.
17 अन् माह्यावाल्या नावांच्या मुळे सगडे
लोकं तुमचा व्देष करतीन. 18 परंतु तुमच्या
डोक्शांच्या एका केसाचा पण नाश होणार
नाई. 19 तुम्ही आपल्या धीराने आपले जीवं
मिळवून घ्यालं. 20 जवा तुम्ही यरुशलेमाले
सैन्यांन घेरलेलं पायसानं,तवा ओळखुन
जाजाकं ते ओसाड होणं जवळ हाय. 21 तवा
जे यहुदिया असतीन त्यांयनं पहाडावर
पयत जावं,अन् जे यरूशलेमात असतीन
त्यांयनं बायर निघून यावं,अन् जे आसपास
च्या गावांत असतीन त्यांयनं तती जाऊ
नयें. 22 कावून कि हे बदला घेयाचे असे
दिवस असतीन,ज्यांच्यात लीवलेल्या सर्व्या
गोष्टी पुऱ्या हून जातीन. 23 त्या दिवसात जे
गरोधर जे दुध पाजू रायली असीन,तिच्या
साठी हायहाय कावून कि देशात मोठे संकट
अन् या लोकांन वर मोठी आपत्ति होईन.
24 तवा ते तलवारीच्या धारीने पडतीन,अन्
सगळ्या देशाच्या लोकाईत बंधित होऊन
पहुचले जातीन,अन् जत परंत परराष्टींयांच्या
समय पुरा नाई होईन,तथ-लग यरुशलेम
परराष्ट्रीयांचे लोकं तुडवून ठाकतीन.
25 अन् सूर्य व चंद्र व तारे यांच्यात चिन्ह
दिसून येतीन,अन् पृथ्वीवर देशा देशाच्या
लोकांईत संकट हून जाईन,कावून कि
ते समुद्रांच्या गर्जनेने अन् लाटांच्या
कोलाहटीने घाबरून जातीन. 26 अन्
भयाच्या कारणांन या पृथ्वीवर येणाऱ्या

गोष्टीची वाट पायत-पायत,लोकांच्या जीवांत
जीवं रायणार नाई,कावून कि अभायांतल्या
शक्तीया हालवली जाईन. 27 तवा ते
मनुष्याच्या पोराला सामर्थ्याने अन् मोठ्या
महिमेत ढगांवर येतांना पायतीन. 28 जवा
ह्या गोष्ठी होतीन,तवा सरळ हून आपले
मुंण्ड़के वर करा,कावून कि तुमचं तारण
जवळ असेन 29 तवा त्यानं त्यांयलें एक
दृष्टात पण सांगतला,तो हा कि अंजिराच्या
झाडाले पाहा अन् सगळया झाडांना पाहा.
30 जवा त्यांयले पालवी फुटू लागते तवा ते
पाऊन तुमचे तुमी ओळखता कि उन्हाळा
जवळ आला हाय. 31 तसीचं तुम्ही ह्या
गोष्ठी होतांना पायसानं,तवा ओळखून जा
कि देवाचं राज्य जवळ आलं हाय. 32 म्या
तुमाले खरोखर सांगतो,कि जवा ह्या सऱ्या
गोष्ठी नाई होतीन,तोपर्यंत या पीढीचा
कधापी अंत नाई होईन. 33 आकाश अन् पृथ्वी
नाहीसी होईन,परंतु माह्यावाले वचन कधीही
नाहीसे नाई होईन. 34 म्हणून सावधान
राहा,असं नाई व्हावं कि तुमचे मन खुमार
अन् दारूबाजी,अन् संसाराच्या चिंतेने
सुस्त हून जाईन,अन् तो दिवस तुमच्यावर
पासासारखा अचानक येईन. 35 कावून कि
सर्व्या पुर्थ्वीच्या सगळया रायणाऱ्यावर
तसाच येईन. 36 म्हणून जागी रायजाक अन्
हर वेळी प्रार्थना करत राहा,कि तुमी या
सर्व्या येणाऱ्या घटनांन पासून वाचून अन्
माणसाचा पोराच्या समोर उभं हून योग्य
असावें. 37 अन् तो दिवसाले मंदिरात उपदेश
करत होता,अन् रात्रीच्या वात्की बायर
जाऊन जैतून नावाच्या पहाडावर रायत
होता. 38 अन् मोठ्या पायटीचं सगडे लोकं
त्याचं आयक्यासाठी मंदिरात त्याच्या पासी
येत असत.

# 22
1 अखमीरी भाकरीचा सण,जो
वल्हांडाचा म्हणतात तो जवळ
आला हाय. 2 अन् महायाजक अन् शास्त्री
ह्याविषयी विचार करत होतें,कि त्याच्या
घात कसा करावा, पण ते लोकांना भेत होते.
3 तवा सैतान यहूदा च्या अंदर घुसला,जो
इस्कर्योत म्हटलेला,जो बारा शिष्याईत पैकी
एक होता. 4 तवा तो जाऊन महायाजकांच्या
अन् पहरुहे च्या सरदाराच्या संग गोष्ठी
करू लागला,कि येशू ला त्यांयच्या हाती
त्यालें कसे धरून देतो. 5 तवा त्यांयलें
आनंद झाला,अन् तवा त्यांयनं त्यालें पयसे
देण्याचं वचन देलं. 6 त्यानं ते मान्य केलं,अन्
संधी पाऊ लागला,कि बीना उपद्रवाणे
त्यालें त्यांयच्या हाती कसं पकडून द्यावं.
7 तवा अखमीरी भाकरीचा सणाचा दिवस
आला,ज्यांच्यात वल्हांडनचं मेंढरु बलीदान
कर्ण अवश्य होतं. 8 तवा येशूनं पेत्र अन्
योहानाले हे सांगून पाठवलं कि,जाऊन
आपल्या साठी खायाले वल्हांडनफसह तयार
करा. 9 त्यांयनं त्यालें विचारलं,तुह्याली
इच्छा कुठसाकं हाय,कि आमी तयार करावं.
10 त्यानं त्यांयलें सांगतलं,पाहा नगरात आंत
गेल्यावर एक माणूस पाण्याची घागर घेऊन
तुमालें भेटीन,अन् ज्या घरांत तो जाईन,तवा
तुमी त्याच्या मांग जाजाकं. 11 अन् त्या
घरच्या घरधन्यालें सांगा,गुरुजी तुमाले
म्हणतो कि ,ते पाहुण्यांची खोली कुठसाकं
हाय,ज्यांच्यात म्या आपल्या शिष्यायं बरोबर
वल्हांडाचे भोजन खाऊ.? 12 तो तुमाले एक
सामानाने सजवलेली मोठी खोली दाखविन
तती ते तयार करजाकं. 13 त्यांयनं जाऊन,जसं
त्यानं त्यांयलें सांगतलं होतं,तसेच त्यांयलें
आढळले,अन् त्यांयनं वल्हांडाचे जेवण
तयार केलें. 14 मंग ते घटका आली,तवा तो
प्रेषितांच्या सोबत जेव्यालें बसला. 15 अन्

त्यानं त्यांयलें म्हणलं,माह्याली फार इच्छा
होती,कि दु:ख भोग्ग्यांच्या पयले हे वल्हांडाचे
जेवण खावं. 16 कावून कि म्या तुमालें
सांगतो,कि जत-लग ते देवाच्या राज्यांत
परिपूर्ण होईन,तोपर्यंत म्या पुन्हा हे जेवण
करणार नाई. 17 तवा त्यानं प्याला घेतला
अन् धन्यवाद देलावर, म्हणाला,हा घ्या अन्
आपल्याईत वाटून टाका. 18 कावून कि,म्या
तुमालें सांगतो,कि जत-लग देवाचे राज्य नाई
येईन,तोपर्यंत अंगुराचा रस पिणारच नाई.
19 मंग त्यानं भाकर घेतली,अन् धन्यवाद
देऊन तोडली,अन् त्यांयलें हे म्हणून देली,कि
हे माह्यावालं शरीर हाय,जे तुमच्या साठी
देलं हाय,माह्यावाल्या आठवणीत हेचं करत
जा. 20 मंग जेवल्यावर त्यानं त्याप्रमाणे
प्यालाहि घेतला अन् म्हणलं,कि हा "प्याला"
म्हणजे माह्याले रक्त जे तुमच्या साठी
ओतले जात हाय,त्याच्यात नवा करार हाय.
21 पण पाहा,मले धरून देणाऱ्याच्या हात
माह्याबरोबर मेज्यावर हायत. 22 कावून कि
मनुष्याचा पोरगा जसं त्याच्या साठी ठरवल्या
प्रमाणे जातो खरा,पण "हायहाय" त्या
माणसावर,ज्यांच्या च्यानं त्याला पकठल्या
जातो. 23 तवा ते आप आपसात विचारपूस
करू लागलें,कि आपल्याईत कोणता हाय जो
असं काम करीन.? 24 आणखी त्यांयच्याईत
हा वाद-विवाद पण झाला,कि आपल्याईत
कोण मोठा समजला जातो.? 25 तवा त्यानं
त्यांयलें म्हतलें,अन्यजातीचे राजे त्यांयच्या
वर चढाई करतात,अन् जे त्यांयच्या वर
अधिकार ठेवतात,परोपकारी म्हणवले
जातात. 26 परंतु तुमी त्याप्रमाणे असूं
नका,तर जो तुमच्याईत मोठा हाय,तो
लायण्या सारखा होवो,अन् जो प्रधान हाय,तो
सेवा करणाऱ्यासारखा होवो. 27 कावून कि
मोठा कोण हाय,तो जो जेव्यालें बसलेला
या जो सेवा करत हाय?काय तो नाई जो
जेव्यालें बसणारा?परंतु मी तर तुमच्या
मध्ये सेवा करणाऱ्यासारखा हाय. 28 परंतु
तुमी ते आहा,जे माह्याल्या परीक्षेत लगातार
माह्याल्या संग रायले हा. 29 अन् जसं
माह्याल्या बापानं माह्याल्या साठी एक राज्य
नेमून देले. 30 तसेच मी हि तुमच्या साठी
नेमून ठेवला हाय,यासाठी तुमी माह्याल्या
राज्यांत माह्याल्या मेजावर खावें प्यावें,अन्
तुमी सिहासनावर बसून इस्राएलाच्या
बारा वंशाच्या न्याय करो. 31 हे शिमोना
हे शिमोना पाह्य,सैतानान तुमा लोकांना
मांगतलं हाय,कि गव्हासारखे चाळावें.
32 परंतु तुह्यावाल्या विश्वास खचुं नये म्हणून
म्या तुह्या साठी विनंती केली हाय,अन् एकदा
तू फिरलास म्हणजे तू आपल्या भावांना स्थिर
कर. 33 तवा त्यानं येशूला म्हटलें,हे प्रभू,म्या
तुह्यासंग जेलात जायाले अन् मरण्यालें पण
तयार हाय. 34 येशुनें म्हणलें,हे पेत्रा म्या
तुले सांगतो,आज कोंबडा बांग दियाच्या
पयले, तोपर्यंत तू तीन वेळा मले नाकरशीन,
कि म्या यालें ओळखत नाई. 35 अन् त्यानं
त्यांयलें म्हणलं,कि जवा मी तुम्हालें पिशवी
अन् झोई व वायना यांवांचून पाठवलं,तवा
काय तुमालें कोण्या वस्तू ची घटी झाली
होती?त्यांयनं म्हणलं,कोण्याचं वस्तूची
नाई. 36 तवा त्यानं त्यांयलें म्हणलं,परंतु
आता ज्यांच्या पासी पिशवी हाय त्यांन ते
घ्यावी अन् त्याचंप्रमाणे झोयीहि घ्यावी,
अन् ज्यांच्या पासी तलवार नाई त्यानं
आपले कपडे ईकून घ्यावी. 37 कावून
कि म्या तुमालें म्हणतो,हे जे लिवलेलं
हाय,कि तो अपराध्यांमध्ये गणला जाईन,ते
माह्यात पूर्ण होणं अवश्य हाय,कावून कि
माह्याविषयाच्या गोष्टीचा शेवट येत हाय.
38 तवा त्यांयनं म्हणलं,हे प्रभू,पाहा यती

दोन तलवारा हायत,तो म्हणला पुरे हाय.
39 तवा तो बायर निघून आपल्या रितीच्या
प्रमाणे जैतुनाच्या पहाडावर गेला, त्याचें
शिष्य त्याच्या मागोमाग गेलें. 40 तवा त्या
जागी गेल्यावर त्यानं त्यांयलें म्हणलं,प्रार्थना
करा,कि तुमी परीक्षेत नाई पडावं. 41 अन् तो
स्व:ता त्यांयच्या तून अलग एका गोट्याच्या
टप्प्याइतका दूर गेला,अन् घुटनें टेकून प्रार्थना
करू लागला. 42 तो म्हणला,हे बापा,तुह्याली
इच्छा असीन तर ह्या प्याला माह्याल्या
पासून दूर कर,तरी माह्याली इच्छा नाई
पण तुह्याली इच्छा पूर्ण होवो. 43 तवा
स्वर्गातून एक देवदूत त्याला दिसला जो
त्यांस सामर्थ्य देत होता. 44 मंग अत्यंत
विव्हळ होऊन त्यानं अधिक आग्रहाने प्रार्थना
केली,तवा त्याच्या घाम" जसा रक्ताच्या मोठं
मोठ्या थेंबा सारखा जमिनीवर पडत होता.
45 तवा तो प्रार्थना झाल्यावर उठला,अन्
आपल्या शिष्यांच्या पासी आल्यावर त्यांयलें
उदाशीन तेनं झोपलेलं पायलं,अन् त्यांयलें
म्हणलं,कावून बा.. झोपता? 46 उठा,प्रार्थना
करा,कि तुमी परीक्षेत नाई पडावं. 47 तवा
तो बोलत असतांनाच,पाहा,एक मोठी
लोकांची झुंबड आली ,अन् त्यां बारा
शिष्यायं पैकी यहूदा नावांचा त्या झुंबड
समोर समोर येऊन रायला होता,तवा तो
मुका घीयालें येशूच्या पासी आला. 48 अन्
येशूनं त्यालें म्हणलं,हे यहुदा,काय तू मुका
घेऊन मनुष्याच्या पोराला पकडून देतोस
काय? 49 तवा हे येशूच्या साथीदारांनी हे
पायलं, कि काय होणार हाय,म्हणून त्यांयनं
म्हणलं,प्रभू,काय आम्ही तलवार चालवावी.
50 तवा येशूच्या साथीदारा पैकी कोण्या
एकानं महायाजकाच्या दासावर तलवार
चालवली अन् त्याच्या उजवा कान कापून
टाकला. 51 तवा येशून म्हणलं,एवढेंच
होऊ घ्या,अन् त्याच्या कानाले स्पर्श करून
चांगलं केलं. 52 तवा येशूनं महायाकांना अन्
मंदिराच्या पहरुये यांना अन् सरदारांना
अन् वडिलांना जे त्याच्यावर चालून आले
होते,त्यांयलें म्हटलं, जसें तुमी मले लुटारू
समजून, तलवारा अन् काड्या घेऊन निघून
आले हायत काय? 53 जवा म्या मंदिरात
हर दिवसी तुमच्या बरोबर होतो,तवा तुमी
माह्यावाल्या विरुद्ध हात पुढें केला नाई,पण
हे तुमची घटका हाय,अन् अंधाराच्या
अधिकार हाय. 54 मंग ते त्यालें पकडून घेऊन
गेलें,अन् महायाजकाच्या घरी आणले,तवा
पेत्र दुरून दुरून त्यांच्या मांग मांग चालला.
55 अन् जवा आंगणात शेकोटी करून एकत्र
बसलें होतें,तवा पेत्र पण त्यांयच्यात बसला.
56 अन् कोण्या एका दासीने त्यालें शेकोटीच्या
पासी उजीळात पायलं, अन् त्याच्या इकडे
पाऊन म्हणू लागली,हा पण त्याच्यावाल्या
संग होता. 57 परंतु पेत्राण नाकारून म्हणलं,हे
बाई, म्या त्यालें ओळखत नाई. 58 थोड्याचं
वेळा नंतर,कोण्या एकाने त्यालें पाऊन
म्हणलं,तू पण त्यांयच्यातला हायस,तवा
पेत्राण म्हणलं,हे माणसा म्या त्यांयच्यातला
नाई. 59 मंग एका तासा नंतर,एका आणखी
माणसाने खात्रीनें म्हटलें, खरोखर हा पण
त्याच्यावाल्या संग होता,कावून कि हा
गालीली हाय. 60 पण पेत्राने म्हंटले,हे
माणसा तू काय बोलतोस ते मले ठाऊक
नाई,तो बोलतचं असता तवा लगेचं कोंबडा
ने बाग देला. 61 तवा प्रभूनं वळून पेत्राच्या
इकडे पायलं,अन् पेत्राले प्रभूचे ते शब्द
गोष्ट आठवली जे त्यानं सांगतली होती,कि
कोंबडा बांग दियाच्या पयले,तू तीन वेळा
माह्या नाकार करसीन. 62 मंग तो बायर
निघून येऊन,फार दु:खी होऊन रडू लागला.
63 अन् ज्या लोकांनी येशुले पकडले होते,ते

येशूची थठ्ठा करत,अन् मारत होते. 64 अन्
त्याचें डोये बंध करून त्यालें म्हणत,कि
भविष्यवाणी करून सांग कि तुले कोण
मारलं. 65 अन् त्यांयनं बऱ्याचं निरनिराळ्या
गोष्ठी करून त्याच्यावाली निंदा केली.
66 जवा दिव उगवल्या बरोबर लोकांचे वडील
अन् महायाजक अन् शास्त्री एकत्र झाले,अन्
येशुले आपल्या न्यायसभेत आणून विचारू
लागले. 67 जर तू ख्रिस्त असल्यास,तर
आमाले सांग,तवा येशूनें त्यांयलें म्हणलं,जर
म्या तुमाले सांगतले तर तुमी विश्वास
धरणारचं नाई. 68 अन् जर म्या विचारले
तर तुमी उत्तर देणारचं नाई. 69 परंतु यापुढे
माणसाच्या पोरगा सर्वशक्तिमान देवाच्या
उजव्या बाजूने बसलेला राईन. 70 मंग ते सर्व
झण म्हणाले,तू काय देवाच्या पोरगा हायसं
काय?त्यानं त्यांयलें म्हणलं,तुमी म्हणता
तो मी हाय. 71 तवा त्यांयनं म्हणलं,आता
आमाले साक्षीची काय गरज हाय,कावून कि
आपण स्वत:याच्याच तोंडचे आयकले हाय.

# 23

1 तवा ते सर्व मंडली उठली,त्यालें
पिलाताच्या पासी घेऊन गेली.
2 अन् ते त्याच्यावर असा आरोप लाऊ
लागले,आम्ही याले लोकांना बयकवंताना
अन् कैसराले कर दियाच्या बद्दल,मना
करतांना,अन् स्वत:ख्रिस्त राज्या हाय,असे
म्हणतांना आयकलं. 3 तवा पिलातानं त्यालें
विचारलं,काय तू यहुदियांच्या राज्या हायसं?
तवा येशुनें उत्तर देलं, तू म्हणतोस तसचं.
4 तवा पिलाताने महायाजक अन् लोकांना
म्हटलें,मले या माणसात काईचं दोष दिसत
नाई. 5 पण ते दृढताने म्हणू लागले,हा
गालीला पासून तर या ठिकाणा प्रयत्न,सर्व्या
यहुदियात उपदेश देत देत लोकांना उकसवतं
हाय. 6 तवा हे आयकून पिलातानं विचारलं,
काय हा माणूस गालीली हाय.? 7 अन् त्यालें
हे समजलं कि तो हेरोदाच्या अधिकारांतला
हाय,तवा त्यानं त्यालें हेरोदाच्या पासी
पाठून देलं,कावून कि तो पण त्या दिवसात
यरुशलेमेत होता. 8 मंग येशुले पावून
हेरोदाले खुपचं,आनंद वाटला,कावून कि तो
बऱ्याचं दिवसांपासून त्यालें पाह्यासाठी
इच्छुक होता,अन् त्यानं त्याच्या बाऱ्यात
आयकलं होतं,कि तो चमत्कार करते हे
पाह्याला मिळेल अशी त्यालें आशा होती.
9 तवा त्यानें त्याला बरेचं प्रश्न विचारले,पण
त्यानं त्यालें काईचं उत्तर देलं नाई. 10 अन्
महायाजक अन् शास्त्री उभे राऊन,आवेशाने
त्यांच्यावर आरोप लाऊ लागले. 11 तवा
हेरोदाने आपल्या शिपायांसुद्धा त्याच्यावाला
अपमान करून त्याची थठ्ठा केली,अन् अंगावर
भडकीया रंगाचे कपडे घालून पिलाताच्या
इकडे परत पाठवलं. 12 अन् त्याचं दिवसी
पिलात अन् हेरोद दोस्त मित्र झाले,याच्या
आगोदर ते एका मेकाचे वैरी होते. 13 तवा
पिलाताने महायाजक अन् सरदारांना
अन् लोकांना बलावून त्यांयलें म्हणलं.
14 तुमी या माणसाले लोकांना बयकवंनारा
म्हणून, माह्यावाल्या पासी घेऊन आलें,अन्
पाहा,म्या तुमच्या समोर त्याच्यावाली
चौकशी केली,पण ज्या गोष्टीचा तुमी
त्याच्यावर दोष लावता,त्या गोष्ठीविषयी
मले त्याच्यावर काईचं दोष सांपडला नाई.
15 नाही हेरोदाला सांपडला,कावून कि त्यांन
त्यालें आमच्यापासी परत पाठवलें,अन्
पाहा,त्यानं मरण दंडास योग्य असे काईचं
केलं नाई. 16 म्हणून त्यालें मी झोडपे देऊन
सोडून देतो. 17 पिलास सणाच्या दिवसाला
त्यांयच्या साठी एका कैदाला सोडण्यात
विवश होता. 18 तवा सगळे मिळून ओरडून
बोललें,कि याचं काम काढून टाकं,अन्
आमच्या साठी बरब्बाला सोडून दे. 19 अन्

तो नगरात झालेला दंग्या मध्ये खुनाच्या
आरोपात त्यालें जेलात टाकण्यात आलं
होतं. 20 मंग पिलाताने येशूला सोडण्याच्या
इच्छाने लोकांना परत समजावले. 21 परंतु
त्यांयनं ओरडून म्हणलं,कि त्यालें वधस्तभावर
चढवा वधस्तभावर चढवा. 22 आणखी
पिलाताने तिसऱ्यांदा त्यांयलें म्हतलं,कावून
बा..यानं असा वाईट केलं हाय?म्या त्याच्यात
मरणाच्या दंडा योग्य कोणताचं दोष पायला
नाई,म्हणून म्या त्यालें झोडपे देऊन सोडून
देतों. 23 परंतु ते आजूनचं ओरडून ओरडून
म्हणत,कि त्यालें वधस्तभावर खिडून
टाका,अन् त्यांयच्या ओरडण्यालें यश आले.
24 तवा पिलाताने आज्ञा देली,कि त्यांयच्या
मांगण्याप्रमाणे व्हावें. 25 तवा त्यानं त्या
माणसाले जो दंग्यातल्या खुनाच्या प्रकरणात
जेलात ठाकण्यात आला होता ,त्यालें ते
मांगत होतें,सोडून देलं,अन् येशुले त्यांयच्या
इच्छाच्या अनुसार सोपून देलं. 26 जवा
ते त्यालें घेऊन जाऊ रायलें होते,तवा
त्यांयनं शिमोन नावांच्या एका कुरेशी ले जो
वावरातून येऊ रायला होता,त्यालें धरलं
कि वधस्तभ घेऊन येशूच्या मांग मांग चलें.
27 अन् लोकांची मोठी गर्दी त्याच्या मांगोमाग
चालली,अन् बऱ्याचं बाया पण,त्याच्या साठी
छाती पिटून पिटून शोक करत होत्या. 28 तवा
येशुनें त्यायच्या इकडे फिरून पाऊन म्हणलं,हे
यरुशलेमाच्या पोरीहो,माह्याल्या साठी रडू
नका,परंतु आपल्या अन् आपल्या लेकरांच्या
साठी रडा. 29 कावून कि पाहा,असे दिवस येत
हायत,कि ज्यांत लोकं म्हणतीन,धन्य हाय,ते
वांजोती,अन् जो गर्भ प्रसवली नाईत अन्
ज्या स्तनांनी पाजले नाईत ते सुखी. 30 त्या
वात्ती ते पहाडालें म्हणतीन,कि आमच्या वर
पडून जा,अन् टेकड्यालें म्हणतीन,आमालें
झाकून टाका. 31 कावून कि जवा ते हिरव्या
झाडाच्या संग असं करतात,तवा वायल्या
झाडाच्या संग काय नाई करतीन.? 32 त्यांयनं
अजून दोन माणसाय्लें,पण जे अपराधी होते
त्याच्यावाल्या संग जीवानं मारण्याले नेलें
33 जवा ते त्या जागी आलें ,ज्यालें कंवटी ची
जागा असं म्हनतात,..तवा त्यांयनं तती त्यालें
अन् अपराध्यांना पण एकाले उजवीकडे अन्
एकाले डावीकडे वधस्तभावर चढवलं खिडून
टाकलं. 34 तवा येशूनं म्हटलं,हे बापा,त्यांयलें
क्षमा कर,कावून कि त्यांयलें ठाऊन नाई कि
ते काय करत हाय?अन् त्यांयनं चिठ्ठी टाकून
त्याच्यावाले कपडे वाटून घेतले. 35 अन् हे
सर्व लोकं उभे राऊन पायत होते,अन् सरदार
हि थट्टा करत करत म्हणत होते,कि यानं
दुसऱ्यांना तारलं,जर हा देवाचा ख्रिस्त हाय,
अन् निवडलेला हाय,तर स्वत:चा बचावं
कर. 36 अन् शिपायांनीहि त्याच्यावाल्या
जवळ येऊन त्याले आंब दाखवून त्यांची
थट्टा करत होते. 37 जर तू यहुदियांच्या
राज्या हायसं,आपल्या स्वत:चा बचावं कर.
38 अन् त्याच्यावर एक पत्र पण लिवून
ठेवलं कि हा यहुदियांचा राज्या हाय, 39 जे
अपराधी चढवले होतें,त्यांयच्यातून एकानं
त्याच्यावाली निंदा करून म्हटलं,काय
तू ख्रिस्त नाई?तर स्वत:ले अन् आमाले
वाचवं. 40 यावर दुसऱ्याने त्यालें दटावून
म्हणलं,काय तू देवाले पण भेत नाई?तू पण
तोचं दंड सोचत हाय. 41 अन् आमी तर
न्यायानुसार दंड सोचत हाय,कावून कि
आमी आमच्या कामाच्या अनुसार प्रतिफल
पायत हाय,पण यानें कोणतचं अयोग्य काम
केलं नाई. 42 तवा त्यानं म्हणलं,हे येशू,जवा
तू आपल्या राज्यांत येशीन,तवा माह्याली
आठवण काडजोकं. 43 तवा येशूने त्यालें
म्हणलं,म्या तुले खरोखर सांगतो,कि आजचं तू
माह्याल्या संग स्वर्गलोकात असशील. 44 अन्

तवा सुमारे दो पहर पासून तर तिसऱ्या
पहरा परेंत साऱ्या देशात अंधार पडला
होता. 45 अन् सूर्याचा उजिडजात गेला,अन्
मंदिराचा पर्दा मधात फाटला. 46 तवा येशूने
मोठ्याने आरोडी ठोकून म्हणलं,हे बापा,म्या
आपला आत्मा तुह्या हातांत सोपून देतो,अन्
हे म्हणून जीवं सोडून देला. 47 सुभेदाराने
जे काई झाले होते ते पाऊन देवाची बडाई
केली,अन् म्हणलं खरोखर हा माणूस धर्मी
न्यायी होता. 48 अन् जो जनसमुदाय हे
पाह्याले एकत्र झाला होता, तवा हि घटना
पाऊन आपली छाती पिटून पिटून वापीस
गेली. 49 अन् त्याच्या ओळखीचे सर्व जण व
ज्या बाया गालीलातून त्याच्यावाल्या मांगून
चालत आल्या होत्या,त्या दूर उभ्या राहून
ह्या गोष्टी पायत होत्या. 50 अन् पाहा,योसेफ
नावाच्या एक चांगला,न्यायी मंत्रीसभेचा
सभासद होता. 51 अन् त्यांयच्या विचारांना
अन् त्यांयच्या या कामाच्या पासून प्रसन्न
नोता,अन् यहुदियाच्या अरीमतीया नगराचा
रायणारा होता,अन् देवाच्या राज्याची वाट
पायत होता. 52 तवा त्यानं पिलाता पासी
जाऊन येशूचे मेलेले शरीर मांगतली. 53 अन्
ते शरीर खाली उतरून मलमलच्या चादरीत
गुंडाऊन,एका कबरेत ठेऊन देलं,जे एका
टेकतीत खोदलेली होती,अन् त्याच्या आगुदर
तती कोणालेचं ठेवलं नोत. 54 तो तयारी
करण्याच्या दिवस होता,अन् शब्बाथाच्या
दिवस सुरु होणार होता. 55 अन् त्या बाया
जे त्याच्या संग गालीलातून आल्या होत्या,ते
मांगून मांगून हे पायत होत्या,कि त्याच्यावालं
लोथशरीर कसी ठेवतात हे पायत होत्या.
56 अन् तवा त्या वापस जाऊन सुगंधित वस्तुं
अन् इत्र तयार करून,शब्बाथाच्या दिवसी
त्यांयनं आज्ञा च्या अनुसार विश्राम केला.

# 24

1 पण हपत्याच्या पयल्या
दिवशी लय लवकर त्या सुगंधित
सामानाइले ते त्याईन तैयार केलत्या,ते घेऊन
कब्रेवर आली. 2 अन् त्याईन गोट्याले कब्रेऊन
लोटलं आहे, असं त्याईन पायल. 3 व अंदर
जाऊन प्रभू येशूचं शरीर नाई सापडलं.
4 जवा ते या गोष्टीवर भात्री होऊन रायली
होती,कि पा दोन माणस नरम कपडे घालून
त्याईच्या पाशी येऊन उभे झाले. 5 जवा ते
भेली, अन् जमिनीच्या ईकळे तोंड लपून
रायली,तवा तीन त्याईले म्हटलं कि तुम्ही
जीत्याले मेलेल्यात कायले पायता? 6 तो अति
नाई ,पण जिवंत झाला आहे आठवण करा,
कि त्यान गलीलात रायतांना तुम्हाले काय
म्हटलं, 7 कि ते निश्चय आहे कि माणसाचा
पोरगा पापीयाईच्या हाती पकळल्या जाईन
अन् क्रूसावर चढवल्या जाईन अन् तिसऱ्या
दिवशी जिवंत उठीन. 8 तवा त्याच्या गोष्टी
त्याईच्या ध्यानात आल्या. 9 अन् कब्रेतून
वापस येतांना त्याईन त्या अकरा झनायले
अन् त्या सगळयाइले हे गोष्टी सांगतल्या
10 ज्याईन प्रेषितांस ह्या गोष्टी सांगतल्या ते
मरियम मग्दालिया योहान्ना अन् याकुब ची
आई मरियम अन् त्याईच्या संगच्या बाया पण
होत्या, 11 पण त्याईच्या गोष्टी त्याई कथेतून
समजल्या'अन् त्याईन त्याले मानलं नाई,
12 तवा पेत्र उठून कब्रेवर पयत गेला,अन्
लोउन त्यान फक्त कपडे पडलेले पायले,अन्
जे झालं त्यांच्या उन ते हापचप होऊन
आपल्या घरी चालले गेले. 13 पा त्या दिवशी
त्याच्यातून दोन झन इमाउस नावाच्या
गावात चालले होते,तो येरुसलेमातून सात
कोस दूर होता. 14 अन् ते या सगळ्या
गोष्टीवर जे झाल्या होत्या आपसात गोष्टी
करून जाऊन रायले होते, 15 अन् जवा ते
आपसात गोष्टी अन् विचार-पूस करून रायले

होते,अन् येशू स्वतः त्याईच्या पाशी येऊन
त्याईच्या संग चलत गेला. 16 तरी पण
त्याईचे डोये असे बंद केले होते,कि त्याले
वयक्ल नाई पायजे बावा, 17 त्याईन त्याईले
विचारलं ,कि हे कोणत्या गोष्टी हात जे तुम्ही
रसत्यान चलता-चलता एक-दुसऱ्या संग
करून रायले?अन् ते नाराज उभे रायले. 18 हे
आयकून ,त्याच्यातून कि्लयुपासनावाच्या
एका माणसान म्हटल,कि काय तू येरुशलेमात
एकटाच बायरचा हाच काय ज्याले
मालूम नाई,कि या गोष्टीन त्यान काय
झाल? 19 त्यान त्याईले विचारलं,कि
कोणत्या गोष्टी?त्याईन त्याले विचारलं येशू
नासरेथकर च्या विषयात जे देव अन् सगळ्या
लोकाय-च्या जवळ काम अन् वचन शक्तिमान
भविष्यवक्ता होता. 20 अन् महायाजकाईन
अन् आमच्या सरदारांयनत्याले पकडून
देल,कि त्याच्यावर मरण दंडाची आज्ञा देली
पायजे अन् त्याले क्रूसावर टांगलं पायजे.
21 पन आम्हाले आशा होती, कि हाच
इस्रायेलाले मुक्त करणार,अन् या गोष्टीच्या
अलावा या घटनेले झाला तिसरा दिवस आहे.
22 अन् आमच्यातून काई बायान्न आम्हाले
टेन्शनमध्ये आचरयातटाकलं,जे सकाळीच
कब्रेत गेलत्या. 23 अन् जावा त्याच शरीर नाई
सापडलं त ते अस म्हणत आली, कि आम्ही
देवदूतच दर्शन झाल,त्याईन म्हटलं, कि तो
जिवंत आहे. 24 तवा आमच्या दोस्ताईतून
एक कबरेच्या ईकळे गेला,अन् जस बायाईन
म्हटलं होत,तसचं पायल,पण त्याले नाई
पायल. 25 तवा त्याईले त्यान म्हटल, कि
हे निर्बुद्धी अन् भविष्यवक्ताच्या गोष्टीवर
विश्वास काणारे मतीमंदानो, 26 काय आवश्य
नोत,कि ख्रिस्त हे उचलून आपल्या महिमेत
प्रवेश करीन,? 27 तवा त्यान मोसे पासून
अन् सगळया भविष्यवक्ताय पासून सुरवात
करून सगळया पवित्र शास्त्रात तून आपल्या
विषयात केलेल्या गोष्टीचा अर्थ त्याईले
समजून सांगतला. 28 एवंळयात त्या गावच्या
पाशी पोचले जती ते चालले होते,अन्
त्याच्यातून बोलण्यातून अस मालूम पड्ल
कि,तो पुडे मोठी ईच्या हाय. 29 पण त्याईन
त्याले हे म्हणून थांबवल,कि आमच्या संग
राय कावून कि रात होऊन रायली,अन् दिवस
पुरा आता डूबला तवा तो रायले त्याईच्या
संग अंदर गेला. 30 जवा तो त्याईच्या संग
जेवाले बसला तवा त्यान भाकर घेऊन
आशीर्वाद देला,अन् तिले तोडून त्याईले देऊन
रायला होता. 31 तवा त्याईचे डोये उघडले
अन् त्याईन त्याले वयखल अन् तो त्याईच्या
डोया पासून लपून गेला. 32 त्याईन एका-मेका
संग म्हटलं, कि जावा तो रस्त्यान आपल्या
संग गोष्टी करून रायला होता, अन् धर्म
शास्त्रातला अर्थ आपल्याले समजून रायला
होता, तवा कावून आपल्या अंतकरणात
प्रोत्साहन उत्पन्न झालं ? 33 ते तवाच वेळी
ऊठून यरुशलेमात चालले गेले,अन् त्या
अकराईले अन् त्याईच्या दोस्ताईले एकटा
पायल. 34 ते म्हणत कि गुरजी खर जिवंत
झाले,अन् शिमोनालेत दिसला . 35 तवा
त्याईन रस्त्याच्या गोष्टी त्याईले सांगतल्या
अन् हे पण केल्या त्याईन त्याले भाकर
तोड्याच्या वात्ती कावून वयखल. 36 तो हे
गोष्टी सागुनच रायला होता,कि तो स्वतःच
त्याईच्या मन्धात उभा झाला,अन् त्याईले
म्हटलं,कि तुम्हाले शांती असो. 37 ते घाबरून
गेले, अन् भेले अन् त्याईले अस वाटलं, कि
आम्ही कोण्या भूताले पावून रायलो. 38 त्यान
त्याईले म्हटलं, कि काऊन भिऊन रायले?अन्
तुमच्या मनात कावून तर्क-वितर्क काऊन
उठतात ? 39 माह्या हाताले अन् माह्या
पायाले पा,कि मी तोचं आहो,मले हात लाऊन

पा,कावून कि आत्म्याले हड्डी मासं नसते,अस
माह्यात पाऊ शकता. 40 हे म्हणून त्यान
त्याईले आपले हात पाय दाखवले. 41 मंग ते
आनंदानत्याईले ते खर नाई,वाटून ते आचर्य
करत असतांना त्याइले त्यान म्हटलं,कि
अति तुमच्या पासी काई जेवाले हाय काय?
42 त्याईन त्याले मंग भाजलेल्या मासोईचा
तुकळा देला. 43 त्यांन घेऊन तो त्याईच्या
समोर खालला. 44 मंग त्यांन त्याईले
म्हटलं,कि हे माह्या थे गोष्टी हात जे म्या
तुम्हच्या संग रायतांना, तुम्हाले सांगतल्या
होत्या माये वचन् हेच हात जेवळया गोष्टी
मोशाचे नियम-शास्त्र अन् भविष्यवक्ता अन्
स्तोत्रे च्या पुस्तकात, जे माह्या विषयात
लीव्लेल आहे'सर्व पूर्ण होण आवश्यक आहे.
45 तवा त्यांन धर्मशास्त्राचा बोध झाला पायजे
म्हणून त्याईचे मन उघळले . 46 अन् त्यान
म्हटलं,कि लीव्लेल आहे, कि ख्रिस्त दु;ख
उचलीन ,अन् तिसऱ्या दिवशी मेलेल्यातून
जिवंत होईन, 47 अन् येरुश्लेमा पासून सगळया
जातीत मन फिरावंचा पश्याताप अन्
पापाच्या क्षमेचा संदेस त्याच्याच नावान
केल्या जाईन, 48 तुम्ही या सगळया गोष्टीचे
साक्श तुम्ही आहा. 49 अन् पा, जे प्रतिज्ञा
माह्या बापान केली होती,मी तिले तुमच्यावर
उतरविण,अन् जत-पर्यंत स्वर्गातली सामर्थ न
भेटीन तत पर्यंत तुम्ही त्याचं गावात थांबेल
रायजा, 50 तवा तो त्यांयलें बैतनिय्याह पर्यत
बायर घेऊन गेला,अन् आपले हात वर करून
त्यांयलें आशीर्वाद देला. 51 अन् त्यांयलें
आशीर्वाद देताना,तो त्यांयच्या पासून अलग
झाला.अन् स्वर्गात घेतल्या गेल्या. 52 अन् ते
त्याले नमस्कार करून ते मोठ्या आनंदाने
येरुशलेमात वापस आले. 53 अन् हरवेळी
मंदिरात येऊन देवाचा गौरव करत होतें.

# JOHN

# युहन्ना

1 1 प्रारंभी शब्द होता, अन् शब्द
देवाबरोबर होता, अन् शब्द चं देव
होता. 2 अन् तोचं प्रारंभी देवाबरोबर होता.
3 संगळ काई त्याच्याचं द्रारें उत्पन्न निर्माण
झालं अन् जे काई उत्पन्न झालं,त्याच्यातून
कोणती वस्तू त्याच्या शिवाय उत्पन्न नाई,
झाली. 4 त्याच्या-तचं जीवन होत, अन् तेचं
जीवन माणसाचा उजीळ होता. 5 अन् उजीळ
अंधारात चमकते, अन् अंधारान त्याले ग्रहण
नाई, केलं . 6 एक माणूस देवाच्या इकून आला
अन् उपस्तीत झाला त्याचं नाव योहान होत.
7 तो हे साक्षी द्यायले आला, कि उजीळाची
साक्षी द्याय्ले,यासाठी कि,सगळे त्याच्याच
पासून विश्वास धरावा. 8 तो सोताः तो उजीळ
नोता,पण तो उजीळाची साक्षी द्याय्ले आला
होता. 9 खरा उजीळ यो हर एक माणसाला
उजवडीत प्रकाशित करते, ते जगात येऊन
रायल होती. 10 तो जगात होता,अन् जग
त्याच्या द्वारे उत्पन्न झालं,अन् जगन त्याले
वयखलं नाई. 11 तो त्याच्या घरी आला अन्
त्याले त्याईच्यानचं त्याले शिकारल नाई .
12 पण जेवढ्याईन त्याले स्वीकार केलं,त्यान
त्याले देवाचे लेकर होण्याचा अधिक म्हणजे
त्याईन त्याच्या नावावर विश्वास ठेवतात.
13 अन् ते नाई,त रक्ता पासून, नाई अंगाच्या
इच्छान,नाई माणसाच्या इच्छेन, पण ते
देवापासून उत्पन झाले हात. 14 अन् शब्द
देहधारी झाला,अन् कुपा अन् सत्य यांनी
परिपूर्ण असून त्यान आपल् वस्ती केली,अन्
आम्ही त्याचा असं गैरव पायला, कि जसं
बापान आपल्या एकुलत्याचं गैरव. 15 योहान
न त्याच्या विषयी साक्ष देली,अन् मोठ्या
आवाजान म्हणतो,कि हा तोचं आहे.ज्याच्या
बाऱ्यात म्या वर्णन सांगतल,कि जो माया
मांगून येऊन रायला,तो माह्याउन चांगला
मोटा आहे.कावून कि,तो माह्या पयले होता.
16 कावून कि त्याची परिपूर्णताण आपल्या
सगळयाईले भेटली,म्हणजे कुपेवर-कुपा
17 याच्यासाठी व्यवस्था त मोशापासून
देल्या गेली,पण कुपा अन् सत्य येशू ख्रिस्ता
द्वारा आलं; 18 देवाले कोन कधीचं पायल
नाई,एकलउता पोरगा जो देवाच्या कडीस
आहे,त्यान प्रगट केल. 19 योहानाची साक्षी हे
आहे,जवा यहुद्यानी येरूशलेम मातून याजक
अन् लेवी याईन हे विचारले पाठवलं,कि तू
कोण हास? 20 तवा त्यान मानलं,अन् मना
नाई केलं पण मानलं कि मी ख्रिश्त नाई,
21 तवा त्याईन त्याले म्हटल,कि त मंग तू
कोण हास ?काय तू एलिया हास काय?
त्यान म्हटल कि मी नाई आहो,त तू काय
भविष्यवक्ता हास काय?त्यान उत्तर देल कि
नाई, 22 तवा त्याईन त्याले विचारल,कि मंग
तू कोण हास ? कावून कि आम्ही आमच्या
पाठवणाऱ्याईले उत्तर देणारं,तू आपल्या
विचारात काय म्हणत ? 23 त्यान म्हटल
कि मी जसं यशया भविष्यवक्ता न म्हटल,
कि जंगलात एक आवज देणाऱ्याचा शब्द
आयकू येऊन रायला होता.कि तुम्ही प्रभूचा
मार्गरस्ताचांगला करा . 24 हे फरेशी याईच्या
इकून पाठवले होते, 25 त्याईन त्याले हा प्रश्न

विचारला कि,जर तू ख्रिस्त नाई हास,अन् न
यलीया अन् न भविष्यवक्ता हास त मंग तू
बाप्तिस्मा कायले देत, ? 26 योहानान त्याले
उत्तर देल, कि मी त पाण्यान बाप्तिस्मा
देतो,पण तुमच्या मंदात एक माणूस उभा
आहे,त्याले तुम्ही नाई वळखत. 27 म्हणजे-तो
माह्या मागून बाद ईन त्याच्या बुटाची लेस
खोलण्याचा पण योग्य नाई. 28 हे गोष्टी
येरदनच्या टिकून बेथानीत झाल्या,जती
योहान बाप्तिस्मा देत जाय. 29 दुसऱ्या
दिवशी त्यान येशुले त्याच्या ईकळे येतांना
पायलं अन् म्हटल,कि पाहा हा देवाच
मेंढरू आहे,ते जगाचे पाप उचलून घेऊन
जाते. 30 तो हाच आहे,ज्याच्या बाप्तीत म्या
सांगतल होत,कि एक माणूस माह्या मागून
येत आहे.तो मायाऊन क्षेष्ट आहे,कावून
कि थो माह्या पयले होता. 31 अन् मी त
त्याले वयखत नोतो,पण यांच्या साठी मी
पाण्यान बाप्तिस्मा देतचं आलो,कि 32 तो
इस्रायेलारव प्रगट झाला पायजे. 33 अन्
यहूंनान हे साक्षी देली. कि म्या आत्म्याले
खबूतरा सारखं अभायातून उतरतांना
पायल,अन् तो त्याच्यावर थांम्बला. 34 अन्
मी त त्याले वयकत नतो,पण ज्यांन मले
पाण्यान बाप्तिस्मा दयाय्ले पाठवलं,त्यान
माले म्हटलं, ज्याच्यावर तू आत्म्याले उतरत
अन् थांबलेलं पायशीन, तोचं पवित्र आत्म्यान
बाप्तिस्मा दारा आहे. 35 अन् म्या पायल,
अन् साक्षी देली, कि हाच देवाचा पोरगा
आहे. 36 दुसऱ्या दिवशी योहान अन् त्याचे
शिष्यायतून दोग झन उभे झाले. 37 अन् त्यान
येशूवर तो जो चालला होता,त्याच्या ईकळे
पुन म्हटल,कि हा देवाचा मेंढरू आ 38 येशून
कलटून व त्याईले मांग येतांना पाहून त्याईले
म्हटल,कि तुम्ही कोणाले पाहून रायले,त्याईन
त्याले म्हटलं,कि मनजे-हे गुरुजीतू कुटी रायत
?त्यान त्याले म्हटल,कि चलसान, त पायसन.
39 तवा त्याय्न येऊन त्याची रायाची जागा
पायली. अन् त्याच दिवशी ते त्याच्या संग
रायले,अन् ते दहा घंट्याच्या जवळ पास
होत. 40 त्या दोघायतून जे योहांनाची गोष्ट
आयकून येशूच्या मांग चलू लागले,एक त
शिमोन प्रेत्राचा भाऊ आंद्रियास हा एक
होता. 41 त्यान पाय्ले आपल्या संग भाऊ
शिमोनले भेटून त्याले म्हटलं,कि आम्हाले
ख्रिस्त म्हणजे-मसीहा सापडला. 42 त्यान
त्याले येशूच्या जवळ आणल,येशून त्याच्या
ईकले पावून म्हटलं, कि तू योहानाचा पोरगा
शिमोन हास तू केफा म्हणजे-प्रेत्र म्हणतीन
43 दुसऱ्या दिवशी येशून गलीलले जायाच
सोचल, अन् फिलीपूस ले भेटून म्हटल, कि
माह्या मांग चल. 44 फिलीपूस व आंद्रियास
अन् पेत्रराच्या नगर बैतसैदा चे राय्णारे
होते, 45 फिलीपुसन नतनियेलले भेटून
त्याले म्हटल,कि त्याच्या बाऱ्यात मोशान
नियम-शास्त्रात अन् भविष्य-वक्ताईन जे
केल,ते आम्हाले भेटलं, तो योसेफचा पोरगा
येशू नाजरी नासरीआहे. 46 नातनएल न
त्याले म्हटल, कि काय कोणती चांगली
वस्तू चीज नासरत मधून निगु शकते,काय
फिलीपूस न त्याले म्हटल,कि चल पावून
घे. 47 येसून नतनएल ले आपल्या ईकळे
येतांना पायल,त्याच्या विषयात म्हटल,कि
पाहा,हा खरच इस्राएली हाय, त्याच्यात
कपट नाई, 48 नतनएलन त्याले म्हटल, कि
तू माले कधी पासून जाणत,? येशून त्याले
उत्तर देल कि, त्याच्या पयले फिलीपुसन
मले सांगतल,जवा तू अंजिराच्या झाडाच्या
खाली होता,तवा म्या त्याले पायल होत.
49 नतन एल त्याले म्हटल,कि गुरुजी तूम्ही
देवाचा पोरगा आहे,तुम्ही इस्रायेलचे राजे
हात. 50 येशून त्याले म्हटल,कि म्या जे

काई तुले म्हटलं,कि म्या तुले अंजिराच्या
झाडाच्या खाली पायल,म्हणून तू विश्वास
करत?तू याच्याउन मोठे-मोठे काम पायशिन.
51 मंग त्यान म्हटल कि मी तुम्हाले खर-खर
सांगतो, कि तुम्ही स्वर्गाले उघलेलं ,अन्
देवाच्या दुतायले माणसाच्या पोराच्या वरते
उतरतांना अन् वरत जासांना पायसान.

2 1 मंग तिसऱ्या दिवशी गालील च्या
कानाएथे लग्न होत,अन् येशूची आई पण
ततीच होती. 2 अन् येशू व त्याचे शिष्य पण
त्याचं लग्नाचं आमंत्रण होत, 3 अन् द्राश्नरस
सरला तवा येशूच्या आईन त्याले म्हटलं,कि
त्याईच्या पाशी द्राक्षरस नाई रायला, 4 येशून
तिले म्हटल, कि अ बाई मले तुया संग
कोणत काम?आताच माई वेळ नाई आली.
5 त्याच्या आईन नवकराइले काम वाल्याईले
म्हटल, कि जे काई तो तुम्हाले म्हणीन, तेच
करजा. 6 तती यहुदी याईचे शुद्ध करण्याच्या
रिती प्रमाण गोट्याईच्या सहा राजन पडलेले
होते, ज्याच्यात दोन दोन तीन तीन मन
पाणी बसत जाय, 7 येशून त्याईले म्हटल
,कि राजनाइत पाणी भरा त्याईन लवकरच
भरलं. 8 तवा त्यान त्याईले म्हटलं,कि आता
काढून कारभाऱ्याकळे न्या अन् ते घेऊन
गेले. 9 जवा जेवण कारभाऱ्यान ते पाणी
चाकल,ते दाक्षरस बनल होत,अन् त्याले
मालूम नोत कि कुटुन आल बावा पण ज्या
काम वाल्यायन पाणी भरलं होत, त्याईलेच
मालूम होत,तवा जेवणकारन नोवरदेवाले
बलावून म्हटलं, कि 10 पयले सगळे माणस
चांगला द्राक्षरस देतात,जवा लोक पिऊन
यथेच्छ जातात्त,तवा मध्येम रायते,पण त्या
चागला द्राक्षरस आता परेनत आहे, 11 येशून
गलीलच्या काना त आपला हे पहिलं गौरव
प्रगट केलं,अन् त्याच्या शिष्याईन त्याच्यावर
विश्वास केला. 12 त्याच्या बाद तो आणि
त्याची आई अन् भाऊ व शिष्य कफरनहुम ले
गेले,अन् तती की दिवस रायले 13 मंग अखमेरी
चा पर्व जवळ आला,अन् येशू येरुशलेमात
गेला. 14 अन् त्यांन मंदिरात बैल अन् मेंढर
अन् खबुतर इकनारे व सराफा ले बसलेल
पायल. 15 अन् दोऱ्याईचा एक फटका बनवलं
अन् सगळ्या मेंढराइले व बैल, खबुतर अन्
सराफाचे पैसे फेकून देले,अन् पलंग उलटे केले.
16 अन् खबुतर इकणाऱ्याइले म्हटल कि' याईले
अतून घेऊन जाय,माह्या बापाच्या घराले
व्यापाऱ्याचे घर बनवू नका. 17 तवा त्याच्या
शिष्याइले आठवण आली, कि लीवलेल आहे,
कि तुह्या घराची धुनीत मले खाऊन टाकीन
. 18 याच्यावर यहुदियाईन त्याले म्हटल,कि
तू जे हे करतत तू आम्हाले कोणत चिन्न
दाखवतो,? 19 येशून त्याले उत्तर देल,कि या
मंदिराले पाडून टाका,अन् मी त्याले तीन
दिवसांत उभं करीन, 20 यहुदियाईन म्हटल कि
या मन्दिर बांध्याले छेचाळीस वर्ष लागले,अन्
काय तू त्याले तीन दिवसात उभं करशीन
काय? 21 पण त्यान आपल्या शरीराच्या
मंदिराच्या विषयात म्हटल होत. 22 जवा तो
मुरद्यातून जिवंत झाल्यवर त्याच्या शिष्याइले
आठवण आलं कि त्यान अस म्हटल होत, अन्
त्याईन शास्त्रात व त्या वचनात जे येशून म्हटलं
होत.त्याच्यवर विश्वास ठेवला 23 जावा तो
येरुशलेमात अखमेरीचा वेळी पर्व होता, तवा
ली झनायन जे चीन्न तो दाखवत होता,ते पाहून
त्याच्यावर विश्वास केला. 24 येशून स्वताले
त्याईच्या भरोशावर नाई, सोडलं कावून कि
तो सर्व्याइले वयखत होता, 25 अन् त्याले
मालूम नोत कि माणसाच्या विषयात कोणी
साक्षी दिन बा,कौन कि त्यालेच मालूम होत
कि माणसाच्या मनात काय आहे ,

3 1 फरेसीयातून निकदेमुस नावाचा एक
माणूस होता,तो यहुदियाचा सरदार

अधिकारी होता, 2 त्यांन रात्री येशूच्या पाशी
येऊन त्याले म्हटल, कि हे गुरुजी आम्हाले
मालूम आहे, कि तू देवाच्या इकून शिक्षक
आहा,आले आहे.कावून कि या चिन्हाले जे तू
दाखवत,जर देव त्याच्या संग नाई आहे त
नाई दाखउ शखत . 3 येशून त्याले म्हटलं, कि
मी तुम्हाले खर -खर सांगतो, जर कोणी
नव्यान नाई जल्मीन तो देवाच राज्य पाऊ
शकत नाई. 4 निकदेमुस न त्याले म्हटल, कि
माणूस जवा बुडा झाला त तो कसा जल्म गेऊ
शकतो,? 5 येशून त्याले म्हटलं,कि मी तुम्हाले
खर -खर सांगतो, कि जत परेंत कोणताच
माणूस पाण्यान अन् आत्म्यान न जल्मे त तो
देवाच्या राज्यात प्रवेश नाई, करू शकत.
6 कावून कि जो शरीरान जल्मलेला आहे,
ते शरीर आहे,अन् जो आत्म्यान जल्मलेला
आहे,तो आत्मा आहे. 7 अचंम्भा आचर्य नको
करू, कि म्या तुम्हाले म्हटलं,कि तुम्हाले
नवीन रितीन जल्म घेण आवश्य आहे. 8 हवा
जीकळे पायजे तिकले वायते,अन् तू त्याच्या
आवाज आयकत,पण नाई जाणत कि ते,कुठून
येते अन् कुकळे जाते,?जो कोणी आत्म्यान
जल्मला आहे,तो असाच आहे. 9 निकदेमुसन
त्याले म्हटलं, कि हे गोष्टी कशा होतीन
बावा,? 10 ते आयकून येशून त्याले म्हटल
,कि तू इस्रायेली याईचा गुरु असून पण तुले
या गोष्टी मालूम नाई, 11 मी तुले खर -खर
सांगतो,कि आम्हाले जे मालूम आहे,तेच
सांगतो;अन् ज्याईले आम्ही पायल त्यांचीच
साक्ष देतो,अन् तुम्ही आमची साक्ष आयकत
नाई. 12 जवा म्या तुम्हाले पुर्थ्वीवरच्या गोष्टी
सांगतल्या, तुम्ही विश्वास नाई, करत त जर
म्या तुम्हाले स्वर्गातल्या गोष्टी सांगतल्या,त
मंग तुम्ही कसा विश्वास कारसान.? 13 " अन्
कोणीचं स्वर्गावर नाई, चढ्ला""फक्त तोच
जो स्वर्गातून उतरला,म्हणजे -माणसाचा
पोरगा जो स्वर्गात आहे." 14 अन् ज्या पधतीन
मोसेन जंगलात सर्फाले वरत केलत,त्याच
पधतीन आवश्य आहे, कि माणसाचा पोरगा
पण वरत चडवल्या जाईन . 15 या साठी
जो कोणी विश्वास करीन त्याले सर्वकालिक
जीवन भेटीन. 16 कावून कि देवबापानं
जगतावर इतकं प्रेम केलं कि,त्यानं आपला
एकुलता पोरगा देला,याच्यासाठी कि जो
कोणी त्याच्यावाल्यावर विश्वास करीन,तो
नाश नाई होईन पण त्यालें सर्वकाळाचे
जीवन मिळीन. 17 देवान आपल्या पोराले
जगात यासाठी नाई पाठवलं ,कि जगात दंडा
ची आज्ञा दे पण यासाठी ,कि जगत त्याच्या
पासून तारण व्हावे, 18 जो त्याच्यावर
विश्वास ठेवतो,त्याच्यावर दंडा ची आज्ञा नाई
होत,पण जो त्याच्यावर विश्वास नाई, ठूट
तो दोषी अपराधी होऊन गेला,कावून कि
त्यान देवाच्या एकलोवत्या पोराच्या नावावर
विश्वास नाई,ठेवला. 19 अन् दंडा ची आज्ञाच
कारण हे आहे,कि उजीळ जगात आला,अन्
माणसानं अंधारले उजीळाउन चांगल
समजलं,कावून कि त्याईचे काम बेकार होते.
20 पण जो कोणी बेकार करते, तो उजीळाचा
तिरस्कार करते, अन् उजीळाच्या जवळ
नाई येत,अस नाई झाल पायजे,कि त्याच्या
कामावर दोष लावल्या जाईन. 21 पण जो
खऱ्यावर चलते,तो उजीळा जवळ येते,कावून
कि त्याच्रे काम प्रगट दिसतीनहोतीन कि ते
देवाच्या ईकून होतीन. 22 हे झाल्यावर येशू
अन् त्याचे शिष्य यहुदीया देशात आले,अन्
ते तती त्याईच्या संग राऊन बाप्तिस्मा करत
होता. 23 अन् योहान पण शालिमा-जवळचे
एनोन मध्ये बाप्तिस्मा देत होता,कावून
कि तती लय पाणी होत,अन् लोक येऊन
बाप्तिस्मा घेत होते. 24 कावून कि योहान
त्या वाक्ती जेलात टाकल्या गेला नोह्ता.

25 तती योहान च्या शिष्यईच कोण्या यहुदी
संग शुद्धीकरणाच्या विषयी वाद-विवाद
झाला. 26 अन् त्याईन योहानच्या पाशी येऊन
त्याले, 'म्हटलं कि,हे गुरुजी जो माणूस यरदन
च्या तीकून होता,अन् ज्याची त्या साक्षी
देली, पाय तो बाप्तिस्मा देते, अन् सगळे
त्याच्या पाशी येतात. 27 योहान न उत्तर
देल, कि जवा परेंन्त मानसाले स्वर्गातून न
देल्या जाईन, तथ परेंन्त तो काहीच नाई पाऊ
शकत. 28 तुम्ही त स्वतःच साक्ष व्हा, कि
म्या म्हटल'कि मी ख्रिस्त नाई,पण त्याच्या
पुढे पाठवलं . 29 ज्याची नवरीन आहे, तोच
नवरा आहे,पण नोवरदेवाचा दोस्त जो उभा
आहे, तो आयकते, नवरदेवाच्या शब्दन लय
आनदित होतात,अन माया हा आनद पूर्ण
झाला . 30 आवश्य आहे कि,तो वाडे अन्
मी घटू लहान हु. 31 जो वरतून येते,तो
सर्वोत्तम सर्वांच्यावरआहे,जो पुर्थ्वीउन
येते,तो पुर्थ्वीचाच आहे अन् पुर्थ्वीच्याच गोष्टी
सांगते,जो स्वर्गातून येते,तो सगळयाईच्या वर
आहे. 32 जे काई त्यान पायल,अन् आयकल
त्याचीच साक्ष देते,अन् जो कोणी त्याची
साक्ष स्वीकारत नाई, 33 ज्यांन त्याची साक्ष
स्वीकारली त्यान या गोष्टीवर शिक्का छाप
देली, कि देवबाप खरा आहे. 34 कावून कि
ज्याले देवाण पाठवलं,तो देवाच्याच गोष्टी
करते,कावून कि आत्मा मोजून मापून देत
नाई, 35 बाप पोरावर प्रेम प्रीती करते,अन्
त्यान सगळ काही,त्याच्या हातात देल. 36 जो
पोरावर विश्वास ठेवतो,सर्वकालिक जीवन
त्याचच आहे,अन जो पोराची नाई, आयकत
तो जीवनाले नाई, पाईन पण देवाचा क्रोध
त्याच्यावर रायते.

4 1 मंग ज्वा प्रभूले मालूम झाल,कि
फरेशीयाईन आयकल,कि येशू
योहानाऊन लय शिष्य बणऊन ,अन त्याईले
बाप्तिस्मा देते. 2 तरी असचं येशू स्वता नाई,
पण त्याचे शिष्य बाप्तिस्मा देत होते. 3 तवा
यहुदियाले सोसून मंग तो गलीलात चालला
गेला. 4 अन् त्याले सामरीया ऊन जन जरुरी
होत. 5 मंग तो सुखार नाव सामरीयाच्या
एका गावाप्ररेयेण्त आला, जे त्या वावरा
जवळ आहे,ज्या याकोबान आपल्या पोराले
योसेफ ले देल होत. 6 अन् याकुबची ईरपण
ततीच होती,अन् येशू रसत्यान ठाकला होता,
त्या ईरी वर असाच बसला होता,अन् ते गोष्ट
सह्व्या घंट्याच्या जवळ पास होती. 7 तेव
ळयात सामरी बाई पाणी भऱ्याले आली,येशून
तिले म्हटलं,कि मले पाणी पाज, 8 कावून कि
त्याचे शिष्य नगरात इकत घ्याय्ले, गेले होते,
9 त्या साम्रीन त्याले म्हटलं, कि तू यहुदी
आसून तू समरी बाईले पाणी कायले मागत,?
कावून कि यहुदी समरीयासंग कोणत्याच
गोष्टीचा तालुक ठूत नोव्ते. 10 येशून तिले
म्हटलं, कि जर तू देवाच्या वर्दानाले जानल
असत, अन् हे पण जानल असत, कि तो
कोण आहे, तो तुले म्हणते कि,मले पाणी
पाज त तू त्याले मांगसीन, अन् तो तूळे
जीवनच पाणी डेल असत. 11 बाईन त्याले
म्हटल, कि हे महाराज प्रभू तुया पाशी पाणी
भऱ्याले काई, नाय अन् ईर खोल आहे, अन्
मंग ते जीवनाच पाणी तुया पाशी कसं
आल,? 12 काय तू आमच्या बाप याकुब उन
मोठा हास काय, जयान आम्हाले आम्हाले
हे ईर देली,अन् तो सोवता ,व त्याचे लेकर
,अन् आपले ढोरय न पण त्याच्यातून पेले,?
13 येशून तिले उत्तर देल,कि जो कोणी हे
पाणी पिन त्याले अजून ताहान लगीन, ?
14 पण जर कोणी त्या पाण्यातून पिन जे मी
त्याले दिन,तो मंग सार्वकालिक जीवना पर्यत
तहान लागणार नाई, पण जे पाणी मी त्याले
देईन, ते त्याच्यात एक झरा बनून जाईन तो

सर्वकालिक जीवना पर्यंत वायतच राईन,
15 बाईन त्याले म्हटल,कि हे महाराज प्रभू ते
पाणी मले पण दें,कि माले प ताण लागली
नाई पायजे,अन् न पाणी भऱ्याले एवळया दूर
येऊ, 16 येशून तिले म्हटलं कि जय आपल्या
नवऱ्याले बलून आन, 17 बाईन त्याले म्हटल,
कि मी बिना नवऱ्याची आहे,येशून तिले
म्हटल, कि तू ठीक सांगत, कि मी बिना
नवऱ्याची आहे, 18 कावून कि तू पाच नवरे
केले आहेत,अन् ज्याच्या पाशी तू आता हास
तो पण तुया नवरा नोय,हे त्या खर सांगतल.
19 बाईन त्याले म्हटलं कि हे महाराज मले
असं वाट्ते,कि तुम्ही भविष्यवक्ते आहा;
20 आमच्या पूर्वजायनी याच पहाडावर भजन
उपासना केली,अन् तुम्ही म्हणता कि त्या
जागी तती भजन केल, पायजे, य्रुश्लेमात आहे,
21 येशून तिले म्हटल कि,हे बाई माई गोष्टी
ची वाट पाय ते वेळ येईन, कि तुम्हीत या
पहाडावर ना येरुश्लेमात, 22 तुम्ही ज्याले
नाई वयक्त, त्याचं भजन करता, अन् ज्याले
आपण जाणतो त्याचच भाजन करतो, कावून
कि तारण यहुदियातून आहे, 23 पण तो
आमचा दिवस येईन,अन् आता पण हात खरे
भक्त देवच भजन आत्म्यान अन् खरे पन्यान
करतीन कावून कि बाप आपल्या साठी
असचं भजन करणाऱ्याइले पायत रायते,
24 देव आत्मा आहे, अन् हे आवश्क् आहे, कि
त्याच भजन करणारे,आत्मा अन् खरे पणान
भाजन करतीन, 25 बाईन त्याले म्हटलं,
कि मले मालूम आहे,माशीहा ज्याले ख्रिस्त
म्हणतात,येणार आहे. जवा तो येईन ,तवा
तो आम्हाले सगळया गोष्टी सांगीन. 26 येशून
तिले म्हटलं,कि मी जो तुया संग बोलून
रायलो,मी तोचं आहो. 27 तेव्हळयातच त्याचे
शिष्य आले,अन् ते हापचप झाले कि,तो त्या
बाई संग गोष्ट करून रायला होता. तरी
पण कोण काई म्हटलं नाई,कि तुय काय
म्हणन आहे,? या बावा तू कायले तिच्या संग
गोष्टी करून रायला. 28 तवा बाई आपला
माट गुंडसोडून गावात चालली गेली,अन्
लोकाईले सांगुण रायली. 29 चला,एका
मानसाले पा,ज्यांन संगळ जे म्या केलं,माले
सांगतल, कि हात ख्रिस्त नाई,? 30 तवा ते
गावातून निघून त्याच्या पाशी येन सुरु केल.
31 तेव्हळयातच येशूचे शिष्य त्याले म्हणत
कि हे गुरुजी काही, खाउन घ्या. 32 पण
त्यान त्याईले म्हटलं, कि माह्या पाशी जेवाले
अस जेवण आहे,जे तुम्हाले मालूम नाई.
33 तवा शिष्याईन एका-मेका संग म्हटल,कि
कोण त्याले जेवाले आणल काय,? 34 येशून
त्याईले म्हटल,कि माह्य जेवण हे हाय कि
मी आपल्या पाठवणाऱ्याच्या इच्छे प्रमाण
चालू. अन् त्याचं काम पूर करू. 35 काय
तुम्ही नाई,म्हणत कि सोग्याले फक्त चार
महिनेच हात,?पाहा मी तुम्हाले म्हणतो कि
आपले डोळे उचलून वावराईच्या इक्ळे नजर
टाका,कि ते काप्या-साठी पकले आहे 36 अन्
कापनाऱ्याले मजुरी भेटते,अन् सर्वकालिक
जीवना साठी पिक जमा करते, 'कावून
कि पेरणारा व कापणारा दोघई एकखटा
आनंद करतात, 37 कावून कि याच्यावर
हे म्हण बसते,कि पेरणारा अन् कापणारा
अन् , 38 म्या तुम्हाले हे वावर काप्याले
पाठवलं, त्याच्यात तुम्ही काही कष्ट नाई, केले
दुसऱ्याईन कष्ट केले, अन् तुम्ही त्याईच्या
कष्टाइच्या फळात सहभागी झाले. 39 अन् त्या
गावातल्या लय सामरी-याईनि त्या बाईच्या
म्हण -न्यावर जयान हे साक्ष देली होती ,कि
त्यान सगळ काई जे म्या केल, होत ते माले
सांगतल,विश्वास ठेवला. 40 तवा जवा हे
सामरी त्याच्या पाशी आले, तवा त्याले म्हणत
जात कि आमच्या ईती राय अन् तो तती दोन

दिवस रायला. 41 अन् त्याच्या वचनाच्यान
अजुक लय झानायन विश्वास केला. 42 अन्
त्या बाईन म्हतलं कि,आम्ही आता ताया
म्हननान नाई करत,कावून कि आम्ही स्वतः
आयकल अन् जाणतो कि कि हा खरच
जगाचा तारण करणारा आहे. 43 मंग त्या दोन
दिवसाच्या झाल्यावर ततून तो काई करून
गलीलात चालला गेला. 44 कावून कि येशून
स्वतः साक्ष देली,कि भविष्यवक्ता आपल्या
देशात त्याले मानदान नाई भेटत, 45 जवा तो
गलीलात आला,तवा गलीली आनंदान त्याले
भेटले,कावून कि जेवळे काम त्यान येरुश्लेमात
सणाच्या दिवशी केले होते, त्याईन सगळ
पायल होत, कावून कि ते सनाले गेले होते.
46 जवा मंग ते गलील काना अति आला,
तती त्यांन पाण्याचा द्राकश्वरस बनवला
होता, अन् राज्याचा सेवक होता, ज्याचा
पोरगा कफर-नुमातून बिमार होता. 47 तो
ते आयकून कि येशू यहुदियातु गालीलात
आला होता.अन् त्याच्या पाशी गेला , अन्
त्याले निवेदन करत रायला कि चलून त्याच्या
पोरले करून दे कौन कि मऱ्याले टेकला होता.
48 येशून त्याले म्हटल कि, जवा पर्येनत तुम्ही
चमत्कार अन् आचर्य काम नाई पायसान तवा
पर्येनत तुम्ही कधीच विश्वास नाई कारसान ,
49 राज्याच्या सेवकान त्याले म्हटल कि, हे
गुरुजी माह्या पोराची मरण होण्याच्या पयले
चल , 50 येशून त्याले म्हटलं कि, जाय तुया
पोरगा जिता आहे,त्या माणसाना येशूच्या
म्हण-न्यावर विश्वास केला,अन् चालला गेला.
51 तो रसत्यान चलला होता, कि त्याचे
शिष्यसेवक येऊन त्याले भेटले होते,अन्
सांगून रायले होते, कि तुया पोरगा जिता
आहे, 52 त्यान त्याले विचारलं कि कोण्या
वाक्ती तो चांगला होऊन रायला होता,?
त्याईन त्याले म्हटलं कि, काल सातव्या
ताशी त्याच्या ताप उतरला, 53 तवा बापले
मालूम पडल कि ते त्याच वाक्ती झालं जावा
येशून त्याले म्हटल होत, तुह्या पोरगा जिता
आहे,अन् त्यान व त्याच्या साऱ्या घरातल्यान
विश्वास केला. 54 हा दुसरा चमत्कार होता
जो येशून यहुदीया उन गालीलात येऊन केला.

5 1 या गोष्टीच्या मांग यहुदि-याईचा
सन होता,अन् येशू येरुशलेमात गेला,
2 येरुशमातले मेंढराईचा फाटका पाशी
एकाजागी हात तो इब्रानी भाषात त्याले
बेतसेदा म्हणतात,अन् त्याले पाच झरे हात,
3 त्याच्यात लय बिमार आंधळे ,लंगळे , अन्
सुख्या आंगाचे पाणी हाल्याची वाट पायत
जात. 4 कावून कि नेमलेल्या वेळेवर देव-दूत
तयात विरीत उतरून पाणी हालवत जात
जात पाणी हलत असतांना जो कोणी पयले
त्या तयात उतरत जाय तो चांगला होत,जाय
मंग त्याची कोणतीय बिमारी असो , 5 तती
एक माणूस होता,तो अळो तीस वर्षा पासून
बिमारीन पळला होता, 6 येशून त्याले
पडलेला पायल्यावर अन् हे जाणलं कि,तो
लय दिवसा पासून याचं हालात पळलेला
आहे त्याले विचारलं कि ,तू चांगल व्हायची
इच्छा आहे काय,? 7 त्या बिमाऱ्यान त्याले
म्हटलं, कि हे गुरुजी माह्या पाशी आतापर्यंत
कोणताच माणूस आला नाई, कि जावा पाणी
हालीन त मले त्या तयात उतरीन त मी
जायाच्या पयले, 8 येशून त्याले म्हटल,कि उठ
अन् आपली बाज उचलून चल फिर 9 तो
माणूस लवकरच चांगला झाला,अन् आपली
बाज उचलून चलून रायला व फिरून रायला,
10 तोच शब्बाथाचा दिवस होता,म्हणून
येहुदी त्याले जो तो चांगला झाला, होता
त्याले म्हणत कि आज त शब्बाथाचा दिवस
आहे,तुले बाज उचालन चांगल नाई, 11 त्यान
त्याले म्हटलं कि ज्यांन मले चांगल केल

त्यान मले म्हटल कि आपली बाज उचलून
चल फिर 12 त्याईन त्याले म्हटलं कि तो
कोण माणूस आहे,ज्यानं तुले म्हटलं कि बाज
उचलून चल फिर? 13 पण जो चांगला झाला
होता, त्याले मालूम नोह्त कि तो कोण आहे,
14 या गोष्टी झाल्यावर तो येशुले देवळात
भेटला,तवा त्यान त्याले म्हटल कि पाय तू
त चांगला हून गेला, आतापासून पाप करू
नोको अस नाई झाल पाहिजे कि कोणतभारी
संकट तुह्या वर आल पायजे 15 त्या माणसान
जाऊन येहुदी-याईले सांगतल कि ज्यांन मले
चांगल केल तो येशू आहे, 16 याच्या-च्यान
येहुदी येशुले तरास देत होते.कावून कि तो
असे असे काम शब्बाथा दिवशी करत होता.
17 याच्यावर येशून म्हटलं ,कि माह्या बाप
आता परेंत काम करून रायला, अन् मी पण
काम करून रायलो . 18 याच्यावर यहुदी
अन् अजून त्याले मारून टाक्याचा प्रेयन्त
करून रायले कि तो कि तो शब्बबथाच्या
दिवशी नियमाय्ले तोडते पण देवळे आपला
बाप म्हणून स्वतःले देवाऊन मोठ समजते.
19 याच्यावर येशून त्याईले म्हटलं कि,मी
तुम्हाले खर -खर सांगतो कि पोरगा स्वतः
काईच नाई करू शकत फक्त तो बापले
करतांना पायते,काऊन कि ज्या -ज्या कामाले
तो करते, त्यालेच पोरगा पण तसाच करते.
20 कावून कि बाप पोरावर प्रेम करते, अन्
जे जे काम तो स्वतः करते ते सगळ त्याले
दाखवते,अन् तो त्याले याच्याउन मोठे काम
त्याले दाखवते.कि तुम्ही हापचप झाले
पायजे. 21 कावून कि जसं बाप मेलेल्याईले
उठून जिवंत करते,तसचं पोरची पण इच्छा
आहे त्याईले जिवंत करते. 22 अन् बाप
कोणाचा न्याय नाई करत,पण न्याय करयाच
सगळ कांम पोराले सोपून देल. 23 यासाठी कि
सगळे लोक बापाचा आदर सम्मान करतात,
तसाच पोराचा पण आदर सम्मान कराव, जो
पोराचा आदर सम्मान नाई, करत तो बापाचा
ज्यांन त्याले पाठवलं, आदर सम्मान नाई,
करत. 24 मी तुम्हाले खर-खर सांगतो,जो
माह्य वचन आयकून माह्या पाठवणाऱ्याची
इच्छा पूर्ण करतो,सर्वकालिक जीवन त्याचच
हाय,अन् त्याच्यावर दंडाची आज्ञा नाई,
होत पण तो मरणाउन पार होऊन जीवनात
प्रवेश करून घेतला, 25 मी मुम्हले खर खर
सांगतो कि तो त्या वक्ती येते अन् जवा हाय
,ज्याच्या त मेलेले पोराची वाणी आय्कीन
अन् जे आय्कीन ते जगतील , 26 कावून कि
ज्या प्रकारे बापान आपल्या स्वतात जीवन
ठुते,त्याच प्रकारे पोरले पण हा अधिकार हाय
कि आपल्या स्वताव जीवन ठेवाव. 27 पण
त्याले न्याय कऱ्याचा पण अधिका देला हाय
याच्या साठी कि,हो माणसाचा पोरगा
हाय,, 28 याच्या उन त्यान आचर्य नका कारु
कौन कि ते वेळ येणार कि जेवले क्ब्रेत हात
त्याच्या आवाज आयकून निग्तीन 29 ज्याईन
भलाई केली हाय ते जीवनाच्या पुनुरुस्थान
त्या दिवशी उठ्तीन,अन् ज्यैन बेकार काम
केले हात ते दंडाच्या पुनुरुस्थ्यानाच्या
वाक्ती हिवंत होतीन, 30 मी स्वताऊन कायी
नाय करू शकत,जस आय्क्तो तसाच न्याय
करतो,अन् माया न्याय खरा हाय,कावून
कि आपल्या इच्छान नाय पण आपल्या
पाठवणाऱ्याच्या इच्छा न करते. 31 जर मी
स्वताच आपली साक्षी दिन त माही साक्षी
चागली नाय, 32 एक अजून हाय जो माही
साक्षी देते,ते खरी हाय 33 तुम्ही त योहानाले
विचाऱ्याले लावलं ,अन् त्यान खऱ्या ची
साक्षी देली. 34 पण मी आपल्या विषयात
माणसाची साक्ष नाय पायजे, तरी पण मी
ह्या सगळ्या गोष्टी याच्या साठी म्हणतो कि
तुम्हाले तारण भेटल पायजे, 35 तोत जयते

अन् चमक्ता दिवा हाय, अन् मी काही वेळा
परेंत त्याच्याच उजीलात मग्न होण चांगल
वाटते, 36 पण जे माह्या पाशी जे साक्षी हाय
ते योहांच्या साक्षिऊन मोठी हाय, कौन कि जे
काम बापान मले पूर कऱ्याले सोपल म्हणजेच
हेच काम जे मी करतो ,ते माहे साक्ष हाय
कि पापण मले पाठवल हाय, 37 अन् बाप
ज्यांन मले पाठवलं हाय त्याचं माही साक्ष
देली हाय,तुम्ही त न त्याचा शब्द आवज
आयक्ला अन् न तुम्ही त्याचं रूप पायल,
38 अन् त्याच्या वाच्णले मनात स्थिर नाय
ठूत कावून कि जयान त्याले पाठवल त्याले
कि त्याची प्रतीती नाई करत, 39 तुम्ही धर्म
- शास्त्रात पायता की अन् समजता कि
सर्वकालिक जीवन तुम्हाले भेट्ल अन् तो
तोच हाय जो माही साक्षी देते, 40 तरी पण
तुम्ही जीवन भेट्या साठी माह्या पाशी आय्ले
तुमची इच्छा नाई होत, 41 मी माणसा पासून
आदराची इच्छा नाई, 42 पण मी तुम्हाले
जाणतो,कि तुमच्यात देवाचं प्रेम नाई, 43 मी
आपल्या बापाच्या नवान आलो हाव,अन्
तुम्ही माले स्वीकार नाई, करत अन जर कोनो
आपल्याच नावान आला त त्याले स्वीकार
कारसान 44 तुम्ही जो एका मेकाचा मन दान
पायता अन् तो आदर जो अवेद देवाच्या
इकून नाय,कोणत्याही प्रकारे विश्वास करू
शकता,? 45 हे नोक समजू कि मी बापाच्या
समोर तुमच्या-दोष लावीन तुमच्यावर दोष
लावणारा म्हणजेच,मोशे ज्याच्यावर तुम्ही
भरोसा ठेवला होता. 46 कौन कि जर तुम्ही
मुसाची प्रतीती केली असती त माह्या -वाली
पण केली असती,म्हणून कि त्यान माह्या
विषयात काय लीवेल हाय? 47 अन जर तुम्ही
त्याच्या लीव्लेल्या गोष्टीची प्रतीती नाई
केली असती,त माह्या गोष्टी ची कायले केली
असती.

6 1 या गोष्टी नंतर येशू गालीलाच्या
तलावापाशी म्हणजेचं तीबिरीयास
तलावा- पाशी सरोवर तिकळया 2 अन् एक
मोठी गर्दी त्याच्या मांग आली,काऊन कि
जो तो आचर्य -क्रम तो बिमार लोकाय्वर
करत होता, ते पायासाठी येत होते. 3 तवा
येशू पहाडावर चढून आपल्या शिष्याय संग
बसून रायला होता, 4 यहुदी लोकायचा फसह
नावाचा सन जवळ आला होता, 5 अन् जावा
य्शून आपले डोळे वर करून येका मोठ्या
गर्दीले आपल्या पाशी येतांना पायल तवा
फिलीपुसले म्हटलं,कि लोकायच्या जेवणा
साठी कुठून भाकरी इकत आणायच्या 6 त्यान
हे गोष्ट त्याले परखण्या-साठी केली होती,कौन
कि तो स्वतां-ले मालूम होत कि,तो काय
करणार 7 फिलीपुस्न त्याले उत्तर डेल कि
दोनसे दिनारच जेवण पण त्याईच्या साठी पूर
नाय होणार,कि त्याईचातु सगळ्या लोकायले
उली उली भेटीन बावा, 8 त्याच्या वाल्या
शिष्यायतून शिमोन प्रेत्राचा भाऊ आंद्रियासले
म्हटलं कि , 9~ अति सा एक पोरगा
हाय,त्याच्यापाशी पाच भाकरी अन् दोन
मासोया हात,पण ते येवढ्या मोठ्या लोकाय
साठी ते काईच नाई. 10 तवा येशून त्याले
म्हटल कि,लोकायले जेवाले बसून द्या त्या
जागी ल्या गवत होत,?तवा लोक पाच हजार
होते,ते बसून गेले, 11 तवा येशून भाकरी
घेतल्या अन् धन्यवाद करून बसलेल्याईले
वाढून देल्या, 12 तशाच मासोया पण गेतल्या
अन् त्याईले जेवण कऱ्याले देल्या जेवळया
वाढल्या ते अजून होत गेल्या, 13 तवा त्यान
एकत्र केल्या,जे पाच भाकरीच्या जेवण
करणाऱ्या पाय्की उरलेल्या ते बारा टोपल्या
होत्या 14 तवा जे त्यान आचर्य कर्म केले होते
दाखवलं होत,ते पाहून लोक म्हणत होते
कि हात एक भविष्य वक्ता हाय जो जगात

येणारा होता खरोखर हाच हाय, 15 येशू हे
जाणून कि मले राज्या बनव्याची इच्छा हाय
म्हणून तो पाहाडावर ऐकताच चालला गेला,
16 जवा संध्याकाळ झाली,तवा त्याच्यावाले
शिष्य सरोव्रराच्या तलावाच्या काठावर
गेले, 17 अन् डोंग्यात बसून सरोवराच्या
तिकळयाबाजून कफरनुमात जाऊन रायले
हाते तवा त्या वात्ती अंधार पडला होता,तवा
परेंत येशू त्याईच्या पाशी येशू आला नोता
18 वारावाय्दनान सरोवरात लता होऊन
रायल्या होत्या, 19 मंग सुमारे पाहुणे
दोन कोस वलांडून गेल्यावर त्याईन येशुले
समुद्रावर चालतांना अन् डोंग्याच्या ईकडे
येतांना पायल,अन् तवा ते भेले, 20 तवा त्यान
त्याले म्हणलं मीच हाय भेऊ नको 21 तवा
ते त्याले दोंग्यात घ्याय्ले तईयार झाले,जती
त्याईले जायाच होत तती ते काठावर घेले~
गेले, 22 दुसऱ्या दिवशी तो समुद्राच्या
पलीकडे उभा होता, वाचल कि एका डोंग्यात
दुसरा डोंगा तनिसाच नोता,अन् येशू आपल्या
शिष्याय संग त्या डोंग्यावर बसला नोता फक्त
त्याचे शिष्य त्यात बसुन निगुन गेले,तवा
23 दुसरे डोंगे तीबिरीयास पासून त्या ठिकाणी
आले जती त्याईन प्रभूं संग भाकर खाल्ली
होती, 24 म्हणून लोकायच्या गर्दीन पायल कि
अतिसा येशू नाई, हाय अन् नाय त्याचे शिष्य
हात तवा ते पण त्याले पायाले कफरनुमात
गेले, 25 सरोवरच्या तिकडल्या बाजून जवा
त्याले भेटले तवा त्याईन त्याले म्हटल कि हे
गुरु अतिसा कधी आला, 26 येशूनत्याईले
म्हटलं कि मी तुम्हाले खर खर सांगतो,तुम्ही
माले यासाठी~ नाई पायता कि आचर्य कर्म
पायले पण याच्यासाठी पायता कि तुम्ही
भाखरी खून तुर्त्त झाले पायजे म्हणून पायता
27 नाशवान जेवणा साठी परिश्रम नोका
करू,त्या जेवणासाठी जे जे तुम्हाले अनंत
जीवना साठी तुम्हाले भेठीन ज्या माणसाच्या
पोरागा तुम्हाले देईन बाप म्हणजेच देव
याच्यावर शाप लावली हाय 28 त्यान त्याईले
म्हटलं कि ?देवाचं कार्य करयासाठी आम्ही
काय कराव 29 तवा येशून त्याईले म्हटल कि
देवाच कार्य हे हाय कि तुम्ही त्याच्यावर
ज्याले त्यान पाठवलं त्याच्यावर विश्वास
ठेवा,~ 30 तवा त्यान त्याले म्हटल कि मंग
तू कोणत चिन्ह दाखवत हास कि आम्ही
ते पाहून त्याच्यावर विश्वास करू,कि तू
कोणत काम दाखवत हास ? 31 आपल्या
बाप दाद्यांनी जंगलात मन्ना खाल्ला होता
जस लीव्लेल हाय त्यान त्याले खायासाठी
स्वर्गातून भाखर देली~ होती, 32 तवा येशून
त्याईले म्हटल कि मी तुम्हाले खरोखर सांगतो
कि मोशेन ते भाखर स्वर्गातून नाय देली होती
पण माह्या बाप तुम्हाले स्वर्गातून भाखर देत
हाय, 33 काऊन कि देवाची भाखर तेच हाय ?
जे स्वर्गातून उतरून~ जगाले जीवन देत हाय
खरी भाखर तेच हाय,? 34 म्हणून ते त्याले
म्हणाले ?गुरुजी हे भाखर आम्हाले नेहमी देत
जाय 35 तवा येशू त्याईले म्हणाला कि मीच
जीवनाची भाखर हाय जो माह्या पाशी येतो
त्याले कधीच भूख लागणार नाय अन् जो
माह्यात्रर विश्वास ठेवतो,त्याले कधीच ताहान
लागणार नाय , 36 पण तुम्ही मले पायल
असूनही मह्यात्र विश्वास ठेवत ना असल्याईले
तुम्हाले सांगतळ हाय , 37 बाप जे मले देते ते
सगळ माह्या पाशी येईन अन् जो मायाल्या
पाशी त्याले मी मुडीच घालून देईन नाय
38 काऊन कि म्या स्वताच्या इच्छान नाय पण
जयान मले पाठवलं हाय त्याच्याल्या इच्छा
प्रमाणे करतो, 39 अन् ज्यांन माले पाठवलं
हाय त्याची हेच इच्छा हाय कि त्यान मले
जे काई सर्व देलहाय त्याच्यातून मी कधीच
हरवू नाय म्हणून ते त्या शेवटच्या दिवशी

मी उठवावे, [40]कावून कि माह्या बापाची
इच्छा हे हाय कि जो कोणी पोरले पाईन अन्
त्याच्यावर विश्वास करीन तो सर्व-कालीक
जीवन पाईन ,अन् मी त्याले आखरी दिवशी
मेलेल्यातून उठवीन [41]मी स्वर्गातून उतरली
भाखर आहे अस तो म्हणाला म्हणून यहुदी
त्याच्यवल्या विषयात कुरकुर करून रायले
होते, [42]ते म्हणाले कि ज्याच्यावले माय बाप
आपल्याले ठाऊक हात तोच हा योसेफाचा
पोरगा हाय,तर मी स्वर्गातून उतरलो हाव
अस आण तो अस म्हणतो , [43]तवा येशून
त्याले म्हटल कि तुम्ही कायले आपसात
कुरकुर करून रायले हो करू नोका [44]त्यान
मले पाठवलं त्या बापाची इच्छाच्या अनुसार
कोणीपण माह्याल्या पासी येऊ शकत नाय
म्हणून मी त्याले शेवटच्या दिवशी उठवीन,
[45]भविष्य वक्ताच्या पुस्तकात लीव्लेल
हाय कि सर्व देवाण सिख्व्ल अस होईन,
जो कोणी बापापासून शिखाला हाय तोच
मायाल्या पाशी येईन [46]बापले कोण पायल
हाय अस~ नाई जो देवा पासून हाय त्याचं
बापले पायल हाय, [47]मी तुम्हाले खरोखर
सांगतो कि जो कोणी विश्वास ठेवीत त्याले
सर्व कालिक जीवन प्राप्त झाले हाय, [48]मीचं
जीवनाची भाखर हाय, [49]तुम्च्याव्ल्या
पुर्वजाईन जंगलात मन्ना खाल्ला होता तरी
ते मेले, [50]स्वर्गातून उतरली भाकर अशी
हाय कि थे जर कोण खाल्ली त मरीन नाई,
[51]स्वर्गातून उतरलेली जिवंत भाखर मीच
हाय त्या भाखरीतून जो कोणी खाईन तो
सर्वकाळ जगीन जी भाख्र मी देतो ते माह्य
शरीर हाय अन् ते जगाच्या जीवना साठी
हाय [52]अन् तवा यहुदी आजूबाजून तीतंबा
करून रायले अन् म्हणाले कि हा आपल शरीर
आपल्याले खायाले कायले देतो~ ? [53]या
वरून येशून त्याईले म्हटल कि म्हटल कि मी
तुम्हाले खर खर सांगतो की तुम्ही माणसाचा
पोराच शरीर खाल्लं नाई तर तुमच्याईत
जीवन नाय [54]जो माह्यावाल शरीर खातो
अन् रगत पेतो त्याले सर्वकालिक जीवन प्राप्त
झाले म्हणूनच मी त्याले आखारीच्या दिवशी
उठवीन, [55]कावून कि माह्य शरीर खर अन्
अन मह्य्व्ल रगत पेय हाय~ [56]जो कोणी
मायावाल शरीर खाईन अन् माह्या वळ
रगत पिन तोच मायामध्ये राईन अन् मी
त्याच्या मध्ये राईन [57]जस जिवंत बापान
मले पाठवलं हाय तसच बापाच्यान मी
जगतो तस जो मले खातो तो पण माझ्यात
जघीन [58]स्वर्गातून उतरलेली भाखर हेच
हाय तुमच्या वाल्या पूर्वजान भाखर खाल्ली
तरी ते मेले ते तस नाई हे भाखर जो खातो
तोच जगीन [59]कफरनुमात शिक्षण देत
असतांना त्यान सभास्थानत या गोष्टी
सांगतात [60]त्याच्व्ल्या शिष्याय पैकी बरेच
झन हे याय्कून म्हणाले कि हे वाचन कठीण
हाय कोण आयकून देऊ शकतो,? [61]आपले
शिष्य त्या दिवशी कुरूकुरू करत असतांना हे
मनातल ओळखून येशू त्याईन म्हणाला त्या
मुळे तुम्ही ओळखत काय ? [62]माणसाचा
पोरगा अगोदरच अतिसाच होता ततीसाच
जर त्याले चढतांना पायल तर? [63]आता हा
जिवंत करणार हाय शरीरा पशून काहीच
लाभ नाई [64]मी तरी विश्वास ठेवतो नाई
अशीन त तुमच्या मध्ये काईच हात विश्वास
न ठेवणारे अन् आपल्याले धरून देणारा कोन
हे येशुले पयल्या पशून ठाऊक होत, [65]मंग
तो म्हणाला कि,त्याच्या करण्या वास्तव
मी तुम्हाले सांगतो कि बापान कोणत्याही
माणसाला त्शिच्ग देणगी देण्यावाचून तो
माझ्या कडे येऊ शकत नाई [66]यावरून
त्याच्यावाल्या शिष्या पैकी बरेच झन वापस
गेले अन् मंग कदीच ते त्याच्या संग कधीच

गेले नाई 67 म्हणून येशू बारा शिष्याय्ले
म्हणाला तुमची पण निघाची इच्छा हाय
काय ? 68 तवा शिमोन पेत्रान उत्तर देऊन
म्हटल कि प्रभुजी आम्ही कोणाच्या पाशी
जाणार सर्वकालिक जीवनाची वचन आपणा
जवळ हायत 69 अन् आम्ही विश्वास ठेवला
हाय अन् ओड्खल हाय देवाचा पवित्र माणूस
तो आपणच हा~ 70 तवा येशून त्याले उत्तर
देल तुया बारा झानाय्ले त्या निवडून घेतल
नाई काय तरी तुमच्याईत एक झान शैातान
हाय . 71 हात शिमोन इस्कार्य याचा पोरगा
यहुद याच्या विशयी बोलला काऊन कि तो
त्या~ बाराय झनाय पैकी एक असून त्याले
पकडून देणार होता,

7 1 या गोष्टी झाल्यावर येशू गालीलात
फिरत रायला कावून कि यहुदी त्याले
मारून टाक्याचा प्रेयत्न करून रायले होते,
याच्यासाठी तो याहुदिया फिऱ्याची इच्छा
नोह्ती, 2 यहुदी याईच्या झोपड्या चा पर्व सन
जवळ होता 3 याच्यासाठी त्याच्या भावयन
त्याले म्हटल कि अतुन यहुदी यात जाय जे
काम ते करत त्याईले तुये शिष्यायन पण
पायल पाहिजे, 4 काऊन कि अस कोणी नाई
होणार जो प्राचीन होयची इच्छा हायत
लपून काम करीन जर तू अति जे काम
करतो,त स्वतले जगावर प्रगट कर 5 काऊन
कि त्याचे भाऊ भी त्याच्यावर विश्वास नाई
करत होते, 6 तवा येशून त्याईले म्हटल कि
माया वेळ आजू नाई आला,पण तू तुमच्या
साठी ली वेळ हाय 7 संसार तुमच्यावर बेर
नी करू शकत,प तो माह्या बेर करते, काऊन
कि मी त्याच्या विरोधात साक्षी देतो कि
त्याचे काम बेकार हात, 8 तुम्ही सणात जा
अन् मी आता या सनात नाई जात,काऊन
आता परेंत माह्या वेळ नाई झाला, 9 तो
त्याईले हे गोष्टी म्हणून गालीलातच रून गेला,
10 पण त्याचे भाऊ सणात चालले गेले, तवा
स्वताच परगत नाई पण तो अस म्हना की
लपून गेला. 11 यहुदी सनात त्यान हे म्हूनन
सभास्थानात पाहू रायले होते तो कुठी हाय?
12 अन् लोकाईत च्याच्या विषयात करून
करून लय गोष्टी झाल्या,काई असे म्हणत
कि तो चांगला माणूस हाय,अन् काई म्हणत
जात कि,तो लोकायले भार्मावते, 13 तरी यहुदी
याईच्या भेवाच्यानकोणीच माणूस त्याच्या
विषयात खुलं खुला नाई सांगत होता, 14 जावा
सणाच्या अर्धे दिवस झाल्यावर तवा येशू
सभास्थनात जाऊन भाषण देऊन रायला,
15 तवा यहुदी याईन हाप चप होऊन म्हटल
कि, त्य्ले बिना शिखवल्या ज्ञान कस आल,
16 येशू न त्याईले उत्तर देल, कि माह्या भाषण
माय नाई, पण माह्या पाठवणाऱ्याचा आहे,
17 जर कोणी त्याच्या इच्छा वर चाल्याची
इच्छा आहे, तो त्याच्या भाषणाचा विशेषयात
जाणून जाईन कि तो देवाच्या इकून हाय,हे
मी स्वताच्या इकून म्हणतो, 18 जो आपल्या
इकून अस महाते त तोसोताचा मोठेपणा
करतो,अन जो आपल्या पाठवणाऱ्याच मोठ्प्न
करते, तोच खरा हाय अन् त्याच्यात अधर्म
नाई, 19 काय तुम्हाले मोसेन वेवस्था नाई
देली, तरी पण तुमच्या तून कोणी व्यावसतेवर
नाई चालत, तुम्ही कौन मले मारून टाक्याच्या
करता, 20 लोकायन उत्तर डेल, कि तुयात
अशुध्य आत्मा हाय त कोन तुले मारून
टाकीन बावा, 21 येशून त्याईले उत्तर देल,
म्या एक काम केल त तुम्ही आचर्य करता,
22 याच्याच्यान मोसेन तुम्हाले खतनेची आज्ञा
देली हाय, हे नाई कि ते मोशेच्या इकून
हाय,अन् आपल्या पूर्वजायन पशून चालून
रायली अन् तुम्ही शब्बाथाच्या दिवशी खातन
करता. 23 जवा शब्बाथाच्या दिवशी खात्ना
केल्या जातो, कौन कि मोशेच्या आज्ञाचा

उलघन नाय झाल पाहिजे,तुम्ही माह्या कायले
राग करता, कि म्या शब्बाथाच्या दिवसि
एका मानसाले चांगल केल, 24 दोंड पाहून
अन्याय नोक करू पण बरोबरच न्याय करा,
25 जाव काई येरुश्लेम वाशी म्हणत कि काय
हात तो नाई,त्याले मारून टाक्याचा प्रेयत्न
केल्या जात हाय,? 26 पण पहा कि तो कुलम
खुल्ला गोष्टी करतो, अन् त्याले कोणी काईच
नाय म्हणत,काय सरदारायन खरोखर जाणून
घेतल कि हाच ख्रिस्त हाय? 27 त्याले त आम्ही
ओळखतो कि तो कुठी हाय,पण जवा ख्रिस्त
येईन त कोनालेच नाई मालेम होईन कि
तो कुठ्चा हाय , 28 तवा येशून सभास्थनात
भाषण देऊन म्हटल कि मोठ्यान आवाज
देऊन म्हटल कि तुम्ही मले ओळखता अन्
हे पन मालूम हाय कि मी कुठचा हाव मी
स्वताउन नाई आलो, पण मले पाठवणारा खरा
हाय त्याले तुम्ही ओळखत नाय, 29 मी त्याले
ओळखतो काऊन कि मी त्याच्या इकून हाव
अन् त्यानच मालेव पाठव हाय, 30 त्याच्यावर
त्याईन त्याले पकड्यच पाहिलंतरी पण कोण
त्याचावर हात नाई टाकला,कौन कि त्याची
वेळ आता प्र्रेंत नाई आला होता,~ ~ 31 तरी
गर्दी तून लय लोकायन विश्वास केला, अन्
करत रायले ख्रिस जवा इन त काय याच्याउन
आजून आचर्य काम दाखवीन काय, जे यान
दाखवलं, 32 फरेशी याईन लोकायले त्याच्या
विषयात लपून करतांना पाहिलं, अन् प्रधन
याजकायन अन् फरेशी याईन त्याले पकड्याले
सुभेदार शिपाई पाठवले, 33 याच्यावर येशून
म्हटल कि मी थोड्या वेळा प्रेयंत तुमच्या संग
हाव,तवा आपल्या पाठवणाऱ्या पाशी चालला
जाईन 34 तुम्ही मले पाय्सन पण नाई दिशीन,
अन् जती मी हाव तती तुम्ही नाई, येऊ शकत
35 याच्यावर यहुदी याईन आपसात म्हटल
कि हा कुठ जाईन, कि आपण त्याले नाई
भेटीन,?काय तो न्त्याच्या पाशी जाईन जो
युनानीत इकले- तिकले होऊन रून रायले
होते अन् युनानी याईले पण भाषण देईन,
36 हे कोणती गोष्ट हाय, कि त्यान म्हटली कि
तुम्ही मले पाय्सन पण नाई दिसणार,अन् जती
मी हाव तती तुम्हू नाई येसान , 37 सणाच्या
आखरी दिवशी जो मेन दिवस हाय,येशू उभा
झाला अन् आवाजान म्हटलं कि जर कोणी
ताहन्लेला अशीनत माह्या पासी ये अन् प्यावं,
जो माह्यावर विश्वास करीन जस धर्म-शास्त्रात
याल हाय कि त्याच्या हुद्यातून जीवनाच्या
पाण्याची नधी निघणार, 38 जो माह्यावर
विश्वास करीन जस धर्म-शास्त्रात याल हाय कि
त्याच्या हुद्यातून जीवनाच्या पाण्याची नधी
निघणार, 39 त्यान हे वचन पवित्र आत्म्या
च्या विषयात म्हटले जे त्याच्यावर विश्वास
करणारे पाया साठी होते,काऊन कि आत्मा
आता परेनत नाई, उतरला होता,काऊन ली
येशू आतापर्यंत आपल्या गौरवाले नाई पोचला
होता, 40 जावा गर्दी तू कोण कोण अशी
गोष्ट आयकून म्हटली कि खरच हाच भविष्य-
वक्ता हाय, 41 दुसऱ्यान म्हटल कि, हा ख्रिस्त
हाय,पन त्यान म्हटल कि काय ख्रिस्त हाय
प की झानायन म्हटल कि कावून?काय
ख्रिस्त गालीलातून येईन काय,? 42 काय धर्म
शस्त्रात हे नाय आल कि ख्रिस्त दाउदाच्या
वंशातून अन् बेतलेमाच्या गावातून आला.जती
दौड रायत होता, 43 अत त्याच्याच्यान
लोकाईत तिरस्कार झाला, 44 त्याच्यातून
काही त्याले पकडल्याले पायत होते,पण
कोणच त्याच्यावर हात नाई टाकला, 45 तवा
शिपायांन महायाजकाय्ले अन् फरेशानच्या
पाशी आले,अन् त्याईन त्याले म्हटल कि तुम्ही
त्याले~ काऊन नाई आणलं? 46 शिपायाईन
उत्तर देल कि कोण्या माणसान अशी गोष्ट
नाई, केली, 47 फरेशीन त्याले उत्तर देल,

कि काय तुम्ही पण फसले काय? 48 की
सरदार अन् फरेशी याईच्यातु कोण त्याच्यावर
विश्वास ठेवला, काय,? 49 पण हे लोक
ज्याईले व्यवस्था नाई मालूम ते श्रापित
हात, 50 निकदेमुस न जे पयले त्याच्या पाशी
आला होता,अन् त्याईच्यातु एक होता, त्यान
म्हटल , 51 काय आपली व्यवस्था कोण्या
मानसाले जवा प्रत्येन्त पयले त्याच आयकून
जाणून नाई,घीन तो काय करते दोषी ठरवते,
? 52 त्यान त्याले उत्तर देल, कि काय तू
पण गलीलचा हास पायत-राय अन् पाय,
ग्लीलातून कोणी भविष्यवक्ता प्रगट नाई
झाला, पाहिजे, 53 तवा सगळे आप आपल्या
घरी चालले गेले,

8 1 पण येशू ज़ैतूनाच्या पाहाडावर गेला,
2 अन् सकाळीच तो सभाथ्यानात
आला,अन् सगळे लोक त्याच्या पाशी
आले,अन्सगळे लोक त्याच्या पाशी आले,अन्
तो बसून त्याईले भाषण देऊन रायला होता,
3 तवा शास्त्री अन् फरेशीन एका बाईले आणल
थे व्याविचारात पकडल्या गेली होती,अन्
तिले मन्धात उभं करून येशुले म्हटलं , 4 हे
गुरु हे बाई व्यीचार करतांना पकडल्या
गेली, 5 व्यावसतेत मोसेन आपल्याले आज्ञा
देली,कि अशा बायले गोटे मराव ,अन् तू या
बाईच्या विषयात काय म्हणत,? 6 त्याईन
त्याले पारख्या साठी हे गोष्ट म्हटली कि
त्याच्यवर दोष लाव्यासाठी कोणती गोस्त,
पहाव पण येशू लोउन बोटान जमिनीवर
लिऊन रायला, 7 ज्वा ते त्याले विचारत होते
कि त त्यान शिध राउन त्याईले म्हटल कि
तुमच्यातून जो निष्पाप हाय तोच पहिले
तिले गोटा मारीन, 8 अन् आजून तो लोऊन
जमिनीवर बोटान लिऊन रायला,होता, 9 पण
ते हे आयुकून मोठ्या पासून लाय्न्या परेंत
एक एक करून निघून गेले,अन् येशू एकटाच
राउन गेला, होता अन् ते बाई मन्धातच
उभी रायली होती 10 येशून सरख होऊन
म्हटल कि हे बाई ते कुठ्सा गेले?काय कोण
तुयावर दंडाची आग्या नाई,देली,? 11 त्यान
म्हटल कि हे प्रभू कोनच नाई, येर्शून म्हटल
कि मी पण तुयाव्र दंडाची आज्ञा नाई देत
जय डबल पाप करू नोको, 12 येशून मंग
लोकैले म्हटल कि, जगाचा उजीळ मि हाव,
जो कोणी माह्या माग येईन,तो अंधारात
नाई,चालील पण जीवनाचा उजीळ पाईन
13 फरेशीयाईन त्याले म्हटल कि,तू आपली
साक्षी स्वता देत,तुई साक्षी बरोबर नाई,
14 येशून त्याइले उत्तर डेडल कि जर बावा मी
जर आपली साक्षी देतो, तरी पण माही साक्षी
चांगली हाय,कौंन कि मले माहित हाय कि
मी कुटून आलो अन् म्हटल कि कुठी जातो,
पण तुम्हाले नाई मालूम कि मी कुटून येतो
अन् कुठी जातो, 15 तुम्ही शरीराच्या अनुस्वर
न्याय करता,मी कोणाचा न्याय नाई करत,
16 अन् जर मी न्याय करीन त माह्या न्याय
खरा हाय,कावून कि मी एकता नाई प मी अन्
बाप हाय,जयान माले पाठवल 17 तुम्हच्या
व्यवस्थेत पण लीवालेल हाय कि दोहायची
साक्षी भेटून ठीक होते, 18 येक्त मी स्वताची
साक्षी देतो, अन् दुसरा माह्या बाप साक्षी देते
जयान मले पाठवलं, 19 त्याईन त्र्याले म्हटल
कि तुया बाप कुठ्सा हाय,येशून उत्तर देल कि
न तुम्ही मले वळखता अन् नाय माह्या बापाले
,जर मले ओळखल असतच मले पण ओळखल
20 हे गोष्टी त्यान सभास्थानात भाषण देतांनी
भंडार घरात म्हटली,अन् कोणच त्याले नाई
पकडलं,कावून को त्याची वेळ आता परेंत
नाई आली होती, 21 त्यान मंग त्याईले म्हटल
कि,मी जातो,अन् तुम्ही मले पायसान अन्
आपल्या पापातच मरसान जती मी जातो,
तती तुम्ही नाई येहू शकत, 22 याच्यावर

यहुदी याईन म्हटल कि काय तो स्वताले
मारून टाकीन,जे म्हणते जती मी जातो,तती
तुम्ही नाई येऊ शकत? 23 त्यान त्याईले
म्हटल कि,तुम्ही खालचे हा मी वद्रूरचा हाव
,तुम्ही संसारा चे हा मी संसाराचा नाई,
24 याच्यावर मह्या तुम्हाले म्हटल कि तुम्ही
आपल्या पापात मरसान जर कावून कि जर
तुम्ही विश्वास नाई,कर्षण कि मी तोच आहे त
तुम्ही आपल्या पापातच मारसान 25 त्याई न
त्याले म्हटल कि तू कोण हास येव्शून त्याईले
म्हटल कि तोच हाव, जजो प्रकारे तुम्हाले
म्हणत आलो 26 तुमच्या विषयात मले लय
सांगायचं हाय अन् निर्णय कार्याचा हाय,पणन
माया पाठवणारा खरा हाय,अन् जे म्हाय
त्याच्या पासून आयकल तेच जगले सांगतो,
27 ते त्याईले नाई समजलं कि आम्हाले
बापाच्या विषयात सांगते, 28 जन्सान कि मी
तोच हाय,आपल्या स्वता उन मी काहीच
नाई करत,पण जस माह्या बापान मले
शिखवल तसाच मी हया गोष्टी म्हणतो, तवा
येशून म्हटल कि ज्वा तुम्ही माणसाच्या
पोराले उरते उंचीवर चढावसान त 29 मले
पाठवणारा माह्या संग हाय,त्यान माले एकट
नाई, सोडल,काऊन कि मी नेहमीच तेच काम
करतो,ज्याच्या पासून तो प्रसन्न होते, 30 तो हे
गोष्टी सांगूनच रायला होता,कि लय झनायन
त्याच्यावर विश्वास केला,त खर तुम्हाले
आजाद करीन 31 तवा येशून त्या यहुदी याईले
ज्याईन त्याच्यावर विश्वास केला,होता अन्
म्हटल कि जर तुम्ही माया वचनात बनून
रायसान त खरच माहे शिष्य होसान , 32 अन्
तुम्ही खऱ्याले जानसान त खर तुम्हाले
आजाद करून देईन, 33 त्याईन त्र्याले उत्तर
देल तुम्ही त अब्राहम च्या वंशातले हा अन्
कधी कोणाचे दास नाई झाले, मंग तू कस
म्हणत कि आजाद होऊन जासान 34 येशून
त्याईले उत्तर डेल कि मी तुम्हाले खर खर
म्हणतो कि कि जो कोणी पाप करते त तो
पापाचा दास हाय, 35 दास नेहमी घरी नाई
रायन पोरगा नेहमी रायते, 36 म्हणून जर
तुम्हाले पोरगा आजाद करीन त खरच तुम्ही
आजाद होसान 37 मले मालूम हाय कि तुम्ही
अब्राहमाच्या वंशातले व्हा,तरी माह्य वाचन
तुमची हुदयात जागा नाई भेटत म्हणून तुम्ही
मुजे मारू टाक्याचा प्रयत्न करता, 38 मी
तेच म्हणतो,कि जे तुम्ही बापाच्या यती
पायल हाय तेच तुम्ही करत रायता, जे तुम्ही
आपल्या बापा पशून आयकल, 39 त्याईन
त्याले उत्तर डेल आमचा बाप त अब्राहम
हाय,येशून त्याईले म्हटल कि, जर तुम्ही
अब्राहमचे लेकर असतेत त अब्राहम सारखा
काम केल असत, 40 अन तुम्ही आता मले
जस माणसा सारख मारून टाक्याच पायता
जयान तुम्हाले हे खर वचन सांगतल,जे
देवापासून आयकल तस अब्राहमान नाई
केल, होत, 41 तुम्ही आपल्या बापा सारख
काम नाई, करत त्याईन त्याले म्हटल आम्ही
व्यवीचारान नाई जल्मलो,आमचा ये बाप
हाय म्हणजेच देव, 42 येशून त्याईले म्हटल कि
जर देव युमचा बाप असतात तुम्ही मह्यावर
प्रेम ठेवल असत,काऊन कि मी देवाच्या इकून
आलो हाव,मी स्वताऊन नाई आलो,पण त्यान
मले पाठवलं, 43 तुम्ही माई गोष्ट काऊन
नाई समजत ?म्हणून तुम्ही माह्य वचन
नाई, आयकू शकत, 44 तुम्ही आपल्या बापा
शेईताना पासून हा,अन् आपल्या बापाच्या
लालचले पर्ण कऱ्याची इच्छा ठुता तो त
आरभा पासून खुनी हाय,अन् सत्यावर तीकून
नाई रायला,काऊन कि सत्य त्याच्याइत
हायच नाई,ज्वा तो खोट बोलत होता त
आपल्या स्वभावाने बोलते,काऊकि तो खोटा
हाय, पण खोट्याचा बाप हाय, 45 पण मी

जे खर बोलतो याच्या साठी तुम्ही माह्या
विश्वास नाई करत, 46 तुमच्यातून कोन मले
पापी ठरवते,?जर मी खर बोलतो त तुम्ही
मह्या विश्वास नाई,करत, 47 जे देवाच्यान
होत्ते, तो देवाच्या गोष्टी आय्के तुम्ही
याच्यासाठी नाई आयक्त कि तुम्ही देवाच्या
ईकून नाई, हा, 48 हे आयकून यहुदीयाईले
म्हटल कि काय आम्ही बरोबर नाई,म्हणत कि
तू समरी हास अन् तुयात दुष्ट आत्मा हाय,?
49 येशून उत्तर देल कि,मायात दुष्ट आत्मा
नाई,पण मी आपल्या बापाचा मन सम्मान
करतो,अन् तुम्ही माया अपमान करता, 50 पन
मी आपली प्रतिष्टा गर्वनाई,करत,हव एक
हाये ज्याले पाहिजे,अन् न्याय करते, 51 मी
तुम्हाले खर खर सांगतो, कि जर कोनचा
माणूस वचनावर चलीन अन् तो सर्व कालिक
जीवना परेनत नाई पाहीन, 52 यहुदीयाईन
त्याले म्हटल कि आता आम्हाले मालूम झाल
कि तुयात दुष्ट आत्मा हाय,अब्राहम मरून
गेला अन् भविष्य वक्ता पण मारून गेले,अन्
तू म्हणत कि जर कोणी माह्या वाचनावर
चालीन त तो सर्व कालिक मरणाचा स्वाद
नाई चाखीन , 53 आमचा बाप अब्राहम त
मरून गेला,काय तू त्याच्याऊन मोठा हास ?
अन् भविष्यवक्ता पण मरून गेला,कु स्वता ते
काय समजत, 54 येशून उत्तर देल कि जर मी
स्वतच गौरव करीनत माह्य गौरव काहीच
नाही माह्या गौरव करणारा माह्या माया
बाप हाय,ज्याजे तुम्ही म्हणता कि तो आमचा
देव आहे, 55 अन् तुमचा बाप अब्राहम माह्या
दिवसाईत पायाच्या इच्छेन ली मग्न होता,
अन् त्यान पायल आनंद केला, 56 अन् तुमचा
बाप अब्राहम माह्या दिवसाईत पायाच्या
इच्छेन ली मग्न होता, अन् त्यान पायल आनंद
केला, 57 यहुदीयाईन त्यासले म्हटल कि
अजून तू पन्नास वर्षाचा नाई,तरी पण त्या
अब्राहमले पायल काय,? 58 येशून त्याईले
म्हटल कि मी तुम्हाले खर खर म्हणतो कि
पयले त्याच्या कि अब्राहम उत्पन्न झलो मी
हाव, 59 तवा त्याईन त्याले मारून टाक्याले
गोटे उचलले पण येशू लपून सभास्थ्यानात
तून निघून गेला,

9
1 जातांना त्यान एका मानसाले
पायलं जो जल्मा पासून फुटका झाला,
2 त्यानंतर शिष्याय्न त्याले म्हटल कि हे गुरु
कोण पाप केल होत कि हा फुटका झाला
जल्मला हाय तवा पासून त्याच्या आईन या
बापान केल, 3 येसून उत्तर देल नाय यांन
पाप केल कि त्याच्या माय बापान 4 ज्यान
मले पाठवल त्याचं काम आपल्याले त्याचं
काम दिवसाचं करायचं हाय अवसर हाय
रात्र येत हाय ज्याच्यात कोणी काम करू
शकणार नाय, 5 जत जगात आहो तत ल्गु
मीच जगाचा उजील हाय, 6 अस बोलून तो
जमिनीवर थुकला व तेच माती माती त्याच्या
डोयाले लावली, 7 अन् त्याले म्हटलं कि जाय
शिलोहात म्हणजे पाठवल्या नावाच्या तयात
धुय मंग त्यान जाऊन ते धुतले अन् तो डॉक्स
धोऊन आला, 8 याच्याउन शेजारी पाजारी
व ज्याईन त्याले पयले भिक्षा मंगतांना
पायल होत ते म्हणाले कि भिक मांगत बसून
असणारा तो हाच नाई,काय 9 कईक म्हणाले
कि तोच त होय अन् दुसरे म्हणाले कि नाय
हात त्याच्याच सारखा दिसते,तो स्वता
म्हणाला कि नाई मी तोच हाय 10 त्या गोष्टी
वरून त्यान त्याले म्हटल कि तुये डोये कसे
काय उघडलेले हात, 11 तवा त्यान उत्तर
देल कि येशू नावाच्या माणसांन वली माती
माह्या डोयाले लाऊन अन् मले सांगतल कि
जाय अन् शिलोदाव्रर जाऊन धुय म्या जाऊन
धुतले अन् तवा मले दृष्टी आली, 12 ~ तवा
त्यान त्याले म्हटल कि कि तो कुटसा हाय ?

तवा त्यान म्हटलं कि माले नाई माईत 13 मंग
तो अगोदरच फुटका होता होता त्यान त्याले
फरेशीयाईच्या इकले नेल 14 त्या दिवशी
येशून वली माती करून ज्या आंधळयांच्या
डोयाले लावली होती तो दिवस शाब्बथाचा
दिवस होता, 15 म्हणून फरशीयाईन त्याले
परत विचारल कि तुले दृष्टी कशी काय भेटली
तवा तो त्याईले म्हणाला कि त्यान माह्या
डोयाले वली माती लाऊन धुतल्यावर मले
दृष्टी आली 16 ~ यावरून फरशी म्हणल कि
हा माणूस देवाच्या इकून नाई काऊन कि
तो शब्बाथा पाडत नाय दुसऱ्या म्हणाले
कि पापी माणूस असे चीन्न चमत्कार कसे
काय करू शकतो ?अशी त्याईच्याईत फुट
पडली, 17 म्हणून परत त्या त्या माणसाईन
म्हणाले कि तुये त्यान डोये उघडले त तुय
त्याच्या विषयी काय म्हणन हाय?म्हणंत
त्यान म्हटल कि तो एक भविष्यवक्ता हाय
18 यहुदियायाईन दृष्टी प्राप्त झाल्या मानसाले
आई बापले बलून विचारल कि अगोदर
फुटका होता आता चांगला झाला आय हे खर
हाय काय, 19 त्याईन त्याले विचारल कि
जो हा पोरगा हाय तो फुटकाच जल्मलेला
हाय म्हणून म्हणतो तो हाच होय काय ?तर
आता आली दृष्टी कशी काय आली, 20 तवा
त्याच्यावाल्या आई बापान उत्तर देल किहा
आमचा पोरगा हाय तो फुटका जल्मलेला
आम्हाले ठाऊक हाय, 21 तरी आता त्याले
कशी दृष्टी आली हे आम्हाले थुक नाय अन्
त्याचे डॉये कोण उघडले ते पण आम्हाले
ठाऊक नाय त्याले विचारल त वचन आलेलं
आहे अन् तो सोव्ताच्या विषयात संगीन
22 त्याचे मायबाप यहुदिया यांना भेट होते
म्हणून त्याईन अस म्हटल कि कावून हा
ख्रिस्त हाय अस जर कोणी करीन त त्याले
सभास्थानाच्या बाहेर घालावे असं आगोदरच
निर्णय केला होता, 23 त्याच्यान च्याच्या मे
बापान म्हटल नकी कि ती वयात आलेला
हाय त्यालेच विचारा 24 म्हणून जो आगोदर
माणूस फुटला होता, त्यान त्याले दुसऱ्यांडाव
त्याले बलावल व त्याले म्हटलं देवच गौरव
कर हा माणूस पापी हाय आम्हाले ठाऊक
हाय, 25 यावरून त्याले उत्तर देल कि तो
पापी हाय कि तो नाय हे माले ठाऊक नाय
पण मले एक गोष्ट ठाऊक हाय कि मी पूर्वी
फुटका होतो अन् मले आता दिसते 26 यावर
त्याईन त्याले म्हटलं कि न्त्यान तुले काय
केल?अन् त्यान तुये डोये कसे काय उघडले
27 त्यान त्याले उत्तर देल कि आताच मी
तुम्हाले सांगतले कि तरी न्तुम्ही आयकल
नाय परत आय्कायची इच्छा राखता काय
तुम्ही त्याचे शिष्य होण्याची इच्छा हाय
काय ? 28 तवा त्यान त्याचावाली हे टाकणी
करून म्हणाले कि तू याचावला शिष्य हायस
आम्हीत येशूचे शिष्य हाव 29 तवा देव बाप
मोसे बरोबर बोलला कि हाय हे आम्हाले
ठाऊक हाय हा कुटला हाय हे आम्हाले
ठाऊक नाई, 30 तवा त्या माणसान त्याले
उत्तर देल हेत मोठ आचर्याच काम हाय
कि तो कुठला हाय हे तुम्हाले ठाऊक नाय
माहे डोये उघडले 31 आपल्याले ठाऊक हाय
कि देव पापी लोकायचं याय्क नाय त जो
कोणी देवाचा भक्त असून त्याच्यावाल्या
इच्या प्रमाणे आय्क्तो त्याचंच तो आयक्तो,
32 जल्म-म्याच्या फुटके डोये उघडले युगाच्या
आरंभे पासून कधीच आय्कण्यात आला नाय
33 हा जर देवापासून नसता त त्यान काहीच
नाय केल असत 34 त्याईले त्याले म्हटल
कि सर्वस्वी पापात जल्मला अन आम्हाले
शिख्वतो काय ?मंग त्यान त्यालें बाहेर काढल
35 तवा त्यान त्याले बाहेर पाठवल हे येशून
आयकून त्याईले सापडल्यावर तो त्याले

म्हणाला कि तू माणसाच्या पोरावर विश्वास
ठेवतो,काय? 36 तवा त्यान उत्तर देल गुरुजी
मह्या त्याचाय्व्र विश्वास ठेवावा असा तो कोण
हाय ? 37 तवा येशून त्याले म्हटल कली तू
त्याले पायल हाय काय अन् जुया संग आता
बोलत हाय काय?तोच तो हाय 38 तवा तो
म्हणाला कि प्रभुजी मी विश्वास ठेवतो अन्
त्यान त्याले नमन केल, 39 तवा येशू त्याले
म्हणाला कि मी न्याय कऱ्यासाठी या जगात
आलो आहो यासाठी कि ज्याईले दिसत नाई
त्यैले दिसल पाहिजे म्हणून ज्याले दिसल
पाहिजे त्यालेच दिसतो अन् त्यांनी फुटक
व्हाव 40 फरशी जे त्याच्या जवळ होते त्याईन
हे आय्कून त्याले म्हटल कि आम्ही पण फुटक
आहो काय? 41 तवा येशू त्याईले म्हणाला
कि, फुटके असते त तुम्ही पाप नसत पण
आम्हाला दिसते कि अस तुम्ही आता म्हणता
म्हणून तुमचे पाप तसेच राहते,

10 1 मी तुम्हाले खरोखर सांगतो कि
मेंढ्यांच्या वाड्यात दरवाज्यान न
जाता दुसरी कडून चडून जाते तो चोर
अन् लुटारू हाय 2 जो दरवाज्यातू अंदर
येते तोच मेढपाळ हाय 3 याशाठी द्रारपाल
दरवाज्याले उघडतो अन् मेंढर त्याच्यावला
आवाज आय्कतात अन् तो आपल्या मेंढरान्ना
त्याईच्या त्याईच्या नावान हाका मारतो,अन्
त्याईले बाह्र्र नेतो, 4 अन् त्यान आपले
सर्व मेंढर बाहेर काढल्यावर तो त्याईच्या
पुडे चालतो अन् मेंढरे त्याच्या वाल्या मांग
चलतात काऊन कि ते त्याच्या वाली वाणी
आय्क्तात,अन् ओळखतात . 5 ती परक्याच्या
संग कधीच जाणार नाई,तर ते च्याच्या वाल्या
पासून पाय्तीन काऊन कि ते परक्याची वाणी
आयकत नाय 6 हा दुष्टांत येशून त्याले सांगतला
पण ज्या गोष्टी तो त्याच्या बरोबर बोलला
हे काय त्याईले समजले नाई, 7 म्हणून येशून
त्याईले परत आणलं,मी तुम्हाले खर खर
सांगतो कि, मेढ्पाळच द्रोर हाव 8 अन् जे
महाया समोर आगोदर आलेले हात ते सगळे
चोर अन लुटारू हात,त्याच मेढ्पाल आयक्त
नाई, 9 मी दरवाजा हव माह्या द्व्रारे जर
कोनि अंदर जाईन त्याले तारण प्राप्त होईल
, अन् तो अंदर येईन अन् बाहेर जाईन अन्
त्याले जेवले भेटीन , 10 चोर जाव येतेत तो
चोरी अन् नाश करण्यासाठी येतो मी त त्याले
जीवन प्राप्त व्हाव् विपुलाच जीवन प्राप्त व्हावे,
म्हणून आलो, आहे 11 मीच चांगला मेढ्पाळ
हाय उत्तम मेढ्पाळ मीच हाय 12 जो मेढ्पाळ
नाई तो मोलकरी हाय त्याचं त्याचे स्वताचे
मेढर नाईट तो लांडग्याले येत असतना पाहून
मेढर सोडून पुन जातो,अन् लांडगा त्याच्यावर
झळप घालून त्याच्या वाला दाणा-दाना
करतो. 13 अन् मालक तवा मोलकरी त्याले
पाटून देतो,कावून कि तो मोलकरीच हाय अन्
त्याले मेढरायची काळजी नाय, 14 मी चांगला
मेढ्पाळ हाय,जसं बाप माले ओळखते,अन् मी
बापले ओळखतो तसे ते मह्याले हात ज्याईले
मी ओळखतो. 15 अन् जे मह्याले हात ते मले
ओळखतात अन् मेढरा साठी मी आपला जीव
देतो. 16 त्या मेढर वाड्यातली नाय, अशी
माह्याली दुसरे मेढर हात ते पण मले आणली
पाहिजे.ते मह्यावली वाणी आय्कतात,मंग एक
कळप एक मेढपाळ होईन 17 मी आपल्या
प्राण द्याले परत आलो,म्हणून बाप माह्यावर
प्रेम करते, 18 कोणीत माह्या पासून नाय तर
मी होऊनच देतो,मले ते दयायचा अधिकार
हाय,अन् परत घ्यायचा पण अधिकार हाय
हि आज्ञा माले माह्या बापा पासून भेटली.
19 या शब्दा वरून यहुदियात परत फुट पडली.
20 त्याच्यातील बरेच ज्ञन कि त्याले भूत
लागला हाय,अन् तो पागल हाय त्याच्यावाल
तुम्ही कायले आयक्ता, 21 दुसऱ्यान म्हटल हे

वचन भूत-ग्रस्तची न्होत,भूतांना फुटक्याचे
डोळे खोलता येतात काय? 22 तवा यरुश्लेम
पन्न-थापनेच्या सन असून हिवाळा होता,
23 अन् येशू मन्धीरा मधून येरुश्लेमाच्या देव्दिन
फिरत होता, 24 म्हणून यहुदियाईन त्याले
ठवल होते,अन् त्याले म्हटलं कि तू कुठपर्यंत
तू आमचा जी संनषयात 25 तवा येशून त्याले
उत्तर देल कि,मी तुम्हाले सांगतो तरी तुम्ही
विश्वास धरत नाय जे जे काम म्या माह्या
बापाच्या नावान करतो ते पण माह्या बदल
साक्ष देतात, 26 तरी पण तुम्हीं विश्वास धरत
नाई,काउन कि तुम्ही माह्या वाल्या मेढरातले,
नाई. 27 माह्या वाली मेढर माह्या आवाज
आयक्तात मी त्याईले वयखतो अन् ते माया
मांग येतात, 28 मी त्याईले सर्वकालिक जीवन
देतो,त्याचा कधीच नाश होणार नाई,अन्
त्याईले माह्या हातून कोणी हिचकावून घेईन
नाय? 29 बापान मले जे डेल ते सर्व्या उन
मोठ हाय,अन् बापाच्या हातून जो कोणी
पण हिचकावून घीन नाय, 30 कावून कि मी
अन् मह्यावाला बाप एकाच हाय , 31 तवा
यहुदी याईन त्यजे अजून दूळ मार कऱ्याले
अजून गोटे उचलले, 32 येशू त्याईले म्हणाली
कि मी बापाच्या इकून बरेचं कुत्त्य दाखवले
हात त्यातून कोणत्या कुत्यान तुम्ही मले गोटे
मारत हा, 33 तवा यहुदी याईन त्याले उत्तर
डेल कि,चांगल्या कामासाठी आम्ही तुम्हाले
गोट्याईचा मार करत नाय,तर दूर भाषणा
साठी कावून कि तुम्ही माणूस असून तुम्ही
स्वताले देव म्हणता. 34 तवा येशून त्याईले
म्हणल कि मी देव हाय हे अस म्या म्हटलं
हे तुमच्या शास्त्रात लिवल नाय काय,? 35 ~
ज्याले जर देवाचा वचन प्राप्त झाल त्याईले
जर त्यान देव म्हटलं अन् तवा जर शास्त्राचा
लेखाचा भाग होत नाई,काय? 36 जर त्याले
बापान जर पवित्र कार्या सती जर नेमून जगात
पाठवलं त्याच्यान मी देवाचा पोरगा हाय,अस
म्हटल्यावरून तुम्ही दूरभाष करता अस तुम्ही
म्हणता काय ? 37 मी जर आपल्या बापाचे
कुत्य करत नसल्यास माह्या वर विश्वास
ठेऊ नोका. 38 पण जर मी ते करतो,जर
माह्यावर जर विश्वास नाई ठेवला तर त्या
कुत्यावर विश्वास ठेवा,असासाठी कि माह्या
मध्ये बाप अन् बापा-मध्ये मी हाय हे तुम्ही
ओड्खून समजून घ्यावं. 39 तवा ते त्याले
परत धरण्या साठी पाऊन रायले पण तो
त्याईच्या हाती न लागता निघून गेला. 40 मंग
तो पुन्हा येर्द्रच्या तिकडल्या बाजून योहान
पयल्यानडाव बाप्तिस्मा करत असे त्या जागी
गेला अन् तत्तीसाच रायला . 41 तवा त्याचा
कडे लय लोक आले व ते म्हणाले कि योहांना
न कहिच् चिन्न केले नाहीत, खर तरी योहांनान
तुया विशइ जे काही सांगतले ते सगळ खर हाय
, 42 तत्ती बरेच लोकायचा विश्वास ठेवला,

11 1 तवा मरियम व तिच्यावला
तिच्यावली बहिण मार्था त्याईच्या
बेथनी गावात लाजर नावचा कोणीतरी एक
माणूस दुखाईत होता, 2 हे तेच मरियम
होती,जीन प्रभूवर इत्र टाकल त्याचावले
पायावर टाकल व आपल्या केसन पुसले
इचाच भाऊ लाजर हा बिमार होत, 3 अत्त
त्याचाव्ल्या बहिनिले निरोप पाठवला होता,
कि हे प्रभू तू ज्याच्या -वर परम करतो, तो
बिमार हाय, 4 हे आयकून येसून म्हटल कि,हे
बिमारी मार्रणाची नाय हाय,पण देवाच्या
महिमे साठी हाय,कि त्याच्यू द्व्रारे देवच
गौरव हो 5 येशू मार्था त्याच्या वाली बहिण
अन् लाजरावर प्रेम करत होता, 6 मंग ज्वा
त्यान आयकल कि ,तो बिमार हाय ज्या जागी
तो बिमार होता त्याच जागी तो होता अन्
त्ती तो दोन दिवस रायला,होता 7 त्याच्या
नंतर त्यान शिष्यायले म्हटल कि,या आपन

परत यहुदियाले जाऊ, 8 शिष्याय्न त्याले
म्हटल कि हे गुरुजी आता यहुदी तुयावर
गोटे फेकतीन अन् काय तू परत त्तीसाच
जात 9 तवा येशून उत्तर देल,काय दिवसाचे
बारा घंटे होत नाई काय?जर कोणी दिवसा
चालीन त तो ठोखर नाई खाणार,कावून कि
तो या दीवसाईत तो उजीळ पाहत हाय.
10 जो कोणी रात्रीन चालीन तवा तो ठोकर
खाईन काऊन कि त्याच्यात उजीळ नाई,
11 त्यान हे गोष्ट सांगतली त्यान त्यानंतर
त्यान म्हटल आपला मित्र झोपला पण मी
त्याले जागवतो, 12 तवा शिष्यायन त्याले
म्हटल कि हे प्रभू जर तो सोव्ता उन झोपला
तो सोव्तच उठून जाईन 13 येशून त्याच्या
मरना बद्दल सांगतल कि त्याईले वाटल कि
त्यान त्याच्या वाल्या झोपी बद्दल सांगतल
14 तवा येशून त्य्सले साप साप म्हटल कि
लाजरस मारून गेला हाय, 15 अन् मी तुमच्या
कारण आनंदि हाव मी त्तीसा नेतो तुम्ही
विश्वास करजा आता या आपण त्याच्या पाशी
जाऊ, 16 तवा ठोम जो दिखमुस म्हटल्या
जात होता,आपल्या संगच्या शिष्याय ले
म्हणाला कि या आपण त्याच्या संग मरणावर
जाऊ, 17 त्ती गेल्यावर येशुले हे मालूम झाल
कि लाजराले कबरेत ठेऊन चार दिवस
झाले होते, 18 बेत्निया यरुश्लेमाच्या जवळ
दोन कोसावर होता 19 बरेच लोक मार्था
अन् मारीय्मच्या पाशी तिच्या भावाच्या
मरणावर शांती द्याय्ले आले होते, 20 जवा
मार्थान येशूची येण्याची गोष्ट आयकली तवा
त्याची भेट घ्याय्ले गेली,पण मरियम घरात
बसून रायली. 21 मार्थान येशुले म्हटले कि हे
प्रभू जर तू अतिसा असतात माह्यावाला भाऊ
मेला नसता, 22 जे काई माले मालूम हाय,अन्
जे काई तू देवले सांगत हास ते देव बाप तुले
देतो, 23 तवा येशून तिले म्हटल कि तुयावाला
भाऊ जिवंत होऊन जाईन, 24 मार्थान त्याले
म्हटल कि, मले मालूम हाय कि तो अंतिम
दिवशी तो पुंरुस्थानाच्या वाक्ती तो जिवंत
हून जाईन , 25 तवा येशून तिले म्हटल कि
पुनरुत्थान व जीवन मीचं हाव,जो कोणी
माह्या वर विश्वास ठेवतो यो मरून त जाईन
पण जिवंत केल्या जाईन , 26 मंग जो कोणी
जिवंत हाय अन्मह्यात्र विश्वास करतो तो
अनन्त काला प्रेर्यंत मरणार नाई, काय तू
या गोष्टीवर विश्वास करतो, 27 त्यान त्याले
म्हटल कि,हो प्रभू मी विश्वास करतो,देवाचा
पोरगा जो जगात येणार होतो, तोच तूच
हाय, 28 हे म्हणून निगुन गेली,अन् आपल्या
बहिण मरियमले चुपचाप जाऊन सांगतल
अन् गुरु हेच हात, तुलू बळावल , 29 हे
आयकून ते लवकरच त्याच्या पाशी गेले,
30 येशू आता लगु गावात नाई पोचला होता,
ततीच होता, जती मार्थान भेट ली होती,
31 तवा ते येहुदी त्याच्याच घरी होते, अन्
शांती देऊन रायले होते,हे पाहून मरियम
उठून एकटीच बाहेर गेली, अन् हे आयकून
कबेवर रडून रायली होती तवा त्याच्या मांग
झाली, 32 अन् मरियम ततीसाच पोचली जती
येशू होता,त्याले पाहूनच तहाच्या पायावर
पडली, अन् हे म्हटल कि हे प्रभू जर तू अतिसा
असतात माह्या भाऊ मेला, नसता, 33 जवा
येशून तिले अन् यहुदियाईले पायल तिच्या
संग आले होते ते रडतांना पायल तवा ते लय
उदास अन् व्याकूळ झाली होती, 34 त्यान
म्हटल कि, तुम्ही त्याले कुठ्सा ठेवल, त्यान
म्हटल कि जाऊन पुन ये , 35 येशू रडला,
36 तवा यहुदी म्हणत कि तो किती प्रेम करते,
37 पण त्याच्यातून काईकांनी म्हटल कि,काय
यान फुटक्याचे डोये उघडले,हे पण नाय करू
शकत ,पण तो मारून गेला, 38 येशू मनातल्या
मनात उदास होऊन कबेंवर आला ते एक गुफा

होती, अन् एक गोता तती होता, 39 येशून
म्हस्तल कि डगळ हत्वा तव त्या मेलेल्याची
बहिण मार्थान म्हटल कि, हे प्रभू त्याच्यातून
अजून पण वास येऊन रायला, 40 येशून त्याले
म्हटल कि काय म्या तुले नाय सांगतल,होत
कि जर तू विश्वास करशीन त देवच गौरव
पाय्शीन, 41 तवा त्यान त्या गोट्याले हटवल
अन् येशून डोये उघडून पायल कि हे बापा मी
धन्यवाद देतो कि त्या माह्यावाल आयकल
हाय, 42 माले मालूम हाय कि सर्व मायावळ
आयक्त पण जे गर्दी आजू-बाजुले उभी हाय
त्याच्या बद्दल मह्या हे म्हटल कावून कि याईन
विश्वास केला पाहिजे कि त्या माले पाठवलं
हाय, 43 हे म्हणून मोठ्या आवाजान म्हटल
कि हे लाजर बाहेर ये, 44 जो मेला होता
तो काफंनान हात पाय बाधू निघाला,अन्
त्याच तोंड अंगोछ्यान झाक लेल होत,येशून
त्याले म्हटल त्याले खोल अन् जाऊ द्या,
45 जवा ते यहुदी मातीच्या पाशी येऊन रायले
होते,अन् हे काम पायल त्याच्यातून बऱ्याच
झानायन विश्वास केला, 46 त्याच्यातून
बऱ्याच झानायन फरशांन पाशी जाऊन
जाऊन येशूच्या बद्दल सुसमाचार सांगतला .
47 यावर प्रधान याजक व फरेसी महासभा
बोलावली अन् म्हटल कि आपण करतो काय?
हा माणूस लय चिंन्ह दाखवत हाय, 48 जर
आपण त्याले असचं सोडून देल त सगळे
त्याच्यावर विश्वास करतीन अन् रोमी येऊन
आपल्या जाग्यावर अधिकार करतीन, 49 तवा
त्याच्यातून काईफा नावाच्या एका माणसांन
जो त्या वर्षाचा महायाजक होता त्यान म्हटल
कि तुम्ही काई पण नाई ओळखल 50 अन्
नाई हे समजता कि तुमच्या साठी हे चांगल
हाय,कि आमच्या लोकाय साठी एक माणूस
मरीन,अन् सगळी जाती नष्ट नाई होईन,
51 हे गोस्त त्यान आपल्या इकून नाई,म्हटली
होती पण त्या वर्षाच्या महायाज्क अन्
भविष्य-वाणी कि येशू त्या जाती साठी
मरीन, 52 अन् त्या जाती साठी फक्त ह्या साठी
देवाच्या लोकांना इकले-टिकळे लेकरान्ना एक
करण्या साठी 53 अत त्याचा दिवसा पासून
त्याले मारून टाक्याचा षळयन्त्र रचू लागले,
54 म्हणून येशू त्या वात्ती पशून यहुदीया
मध्ये प्रगट होऊ नाई म्हणून फिरला पण
ततल्याच जवळ;च्या प्रदेशात फिरला,इफ्राईम
नावाचा एका नगरात चालला गेला अन्
आपल्या शिष्याय संग ततीसाच राहू लागला,
55 यहुदीया चा फसहाच सन जवळ होता अन्
बरेचसे लोक फसह सणाच्या आगोदर देहान
येरुश्लेमात गेले होते,अन् आप स्वत शुद्ध झाले,
56 तवा येशुले पाहू लागले,अन् मंदिरात उभ
राहून आप-आपसात म्हणू लागले कि तुम्ही
काय विचार करता,काय तो सनात नाई
येईन, 57 प्रधान याजक अन् फरेशी हे आदेश
देऊन रायला, कि जर कोणाले मालूम हाय
कि येशू कुठे हाय सांगा,

12 1 मंग येशू फसहाच्या साहा दिवस
पहिले बेथ्णीयात आला, जती येशू
होता जाले येशून मेमेल्यातून जिवंत केल होत,
2 तती त्याईन त्याच्या साठी जेवण तयार
केल, अन् मार्था सेवा करून रायली होती
व लाजर त्याच्यातून एक होता, जो त्याच्या
संग जेवण क ऱ्याले बसला होता, 3 तवा
मरियम न जटामासीच तेल मूल्यवान ईतर
घेऊन येशूच्या पायावर टाकल,अन् आपल्या
केसाय्न त्याले पुसलं अन् इतरांच्या वासान
घर वासान भरलं, 4 पण त्याच्या शिष्यायतून
यहुदी इस्कार्य नावच शिष्य त्याले पकडून
देऊन रायला होंता .अन् म्हणाला कि, 5 ते
ईतरशंभर दिनाराच होते, विकून गरीबाय्ले
काऊन नाई दिल ,? 6 त्यान हे गोष्ट याच्या
साठी म्हटली कि, त्याले गरिबायची काळजी

होती, याच्या साठी कि, तो चोर होता, त्याच्या
पाहसी एक झोरा होता जे काही त्याच्यात
टाकल त त तो गीउन घे . 7 येशून म्हटल
कि, त्याले माह्या रोयाच्या दिवसा साठी राहू
द्या, 8 काऊन कि कारीब तुमच्या संग नेहमी
रायतात, पण मी तुमच्या संग नेहमी नाई
राहीन, 9 यहुदी तून साधरण लोक हे जाणून
गेले कि, कि तो तती आहे, अन् ते नाई येशू
च्यान तती आले पण लाजर ले पहाव कि
तो मेमेल्यातून जिवंत झाला होता, 10 तवा
महा याज्कान लाजर ले पण मारून ताक्याची
योजना केली, 11 काऊन कि त्याच्या च्यान
लय यहुदी चालले गेले, अन् येशू ख्रिस्तावर
विश्वास केले, 12 दुसऱ्या दिवशी लय लोकायन
जे पर्वात आले होते, हे आयकून कि येशू
येरुशलेमात येऊन रायला, 13 खजुराच्या डांगा
अन् त्याले भेट्याले निघाले, अन् मोठ्यान
म्हणत कि, होशांना धन्य इस्रायलाचा राजा,
जो प्रभूच्या नावान येते, 14 ज्वा येशुले गध्याच
पिलू भेट्ल,त त्याच्यावर बसला, 15 जसं,कि
लीव्लेल आहे कि, सियोनाच्या पोरी भेऊ
नोको,पाय तुया राजा गध्याच्यापिल्ला वर
बसून चालला येते, 16 त्याचे शिष्य पहिले
समजत होते कि, पण जवा येशूची महिमा प्रगट
झाली त त्याईले आथोन आली कि, कि ह्या
गोष्टी त्याच्या विषयात लीव्लेल्या होत्या, अन्
लोकायन त्याच्या संग अशा प्रकारे व्यवहार
केला होता , 17 तवा गर्दीतल्या लोकायन
जे त्या वाक्ती त्याच्या संग होते, त्याईन
हे साक्षी डेली कि, त्यान लाजर ले कब्रेतून
बलाऊन मेमेल्यातून जिवंत केलं, 18 त्याच्या
चान लोक त्याले भेट्याले आले कि, काऊन
कि त्याईन आयकल होत कि चान चमत्कार
केला, 19 तवा फरिशायन एका मेक संग म्हटल
कि, विचार करा कि काय, त्याले काहीच
फरक नाई,पडत कि, फा संसार त्याच्या
मांग चालला, 20 जे लोक त्या सनात भजन
कराले आले होते, त्याच्यातून काही युनानी
होते. 21 त्याईन मंग गलीलाच्या बेतसेयदा
च्या रायणाऱ्यातून फिलीपूस न येऊन त्याले
विनंती केली कि, श्रीमान आम्हाले येशुले
भेट्याची इच्छा आहे, 22 फिलीपूस न येऊन
आंद्रियास ले म्हटल कि, तवा आंद्रियास व
फिलीपूस येशुले म्हटल कि, 23 याच्यावर येशून
त्याईले म्हटल कि, ते वेळ आली आहे कि,
माणसांच्या पोराची महिमा हो, 24 मी तुम्हाले
खर खर सांगतो कि, जत पर्यंत गवा चा
दाणा जमिनीवर पडून मरून नाई जात तो
एकटाच रायते,पण मरून जाते त ली फल येते,
25 जो आपल्या जिवाले प्रिय जाणते तो त्याले
गमाउन टाकीन जो या जगात आपल्या जिवाले
अप्रिय जाणतो, तो त्याले गमाउन टाकीन अन्
जो जगात आपल्या जिवाले अप्रिय जाणतो,
तो अनंत जीवना साठी त्याचं स्वर्कष्ण करते
, 26 जर किणी माही सेवा करीन त माह्या
मंग यावं, अन् जती मी आह्रो तती तो पण
राहीन, जर कोणी माही सेवां करीन त देव
बाप त्याच्या मान सम्मान करीन, 27 जवा
माह्या वाला जिंव व्याकुल होऊन रायला,
याच्याचाठी मी आता काय म्हणू ?हे बापा मले
या संकटातून वाचव,?पण मी याच्या च्यान
अति पोहचलो आह्रो, 28 ते बापा आपल्या
नावाची महिमा कर, तवा हे आकाश वाणी
झाली कि, म्या च्याची महिमा केली, अन्
करीन पण . 29 तवा लोक उभ राहून आयकून
रायले होते, त त्यान म्हटल कि आभाय
गरजल,अन् दुसऱ्यायाय्न म्हटलं,कि,कंटा तरीं
स्वर्गदूत बोलला, 30 याच्यावर येशून म्हटल
कि, हे माह्या शब्दा साठी नाई, पण तुमच्या
साठी आलो, 31 अन् आतां या जगाचा न्याय
होईन,आता या जगाचा सरदार काढून देंल्या
जाईन. 32 अन् जर म्या पुथ्वीवर चढवल्या

जाईन त सर्व्यायिले आपल्या पाशी ओडीन,
33 हे म्हणून त्याने हे प्रगत केला कि, तो
कशा मरणान मरीन. 34 याच्यावर लोकायन
त्याले म्हटल कि, आम्ही व्यवस्थाची गोष्ट
आयकली, कि ख्रिस्त नेहमी राईन,त तू
काय ले म्हणत कि माणसाच्या पोराले वरत
चढवल्या जान आवश्यक आहे. ? 35 हा
माणसाचा पोरगा कोण आहे,?येशून त्याले
म्हटल कि,उजील आता काहीच वेळे पर्यंत
तुमच्या मन्धात आहे,आता पर्यंत चलत रायले
अस नाई झाल पाहिजे कि अंधारान तुम्हाले
घेरल नाई पाहिजे.जो अंधारात चालते त्याले
मालूम नाई रायत कि तो कुठी जाते. 36 जत
पर्यंत उजीळ तुमच्या संग आहे त्याच्यावर
विश्वास करा, कि तुम्ही उजीळा चे लेकर
बणा.हे गोष्टी म्हणून येशू चालला गेला व
त्याईच्या पासून लपून रायला, 37 अन् त्याइन
च्याईच्या समोर येवढे आचर्य दाखवले कि,
तरी पण त्याईन त्याच्यावर विश्वास नाई,
केला, 38 काऊन कि यशया भविष्यवक्त्याच
वचन पूर्ण व्हाव,कि प्रभू आपल्या सुवर्तेची
कशी वात पाय्तीन,?अन् देवाची सामर्थ कशी
प्रगत होईन, 39 याच्याच्यान कि ते विश्वास
नाई करू शकले,काऊन कि यशयान आजून
म्हटल , 40 कि त्यान त्याईचे डोळे भोकने,व
मनाले पक्कं केलं,कि अस नाई झाल पाहिजे
कि डोयान पहाव व मनान समजाव अन्
मी त्याईले चांगल करीन. 41 यशयान हे
गोष्टी याच्या साठी म्हटल्या कि, त्यान त्याची
महिमा पायली,अन् त्यान त्याईच्या विषयात
गोष्ट केली, 42 तरी सरदारातून लय झानाय्न
त्याच्यावर विश्वास केला,पण फरेशी च्यान
समोर नाई मानत होते, अस नाई झाल
पाहिजे कि सभास्थानातून बाहेर नाई काढव
बावा, 43 काऊन कि मांनसाच महिमा त्याले
देवाच्या महिमेउन लय चांगल वाट्ते, 44 येशून
आवाज देऊन म्हटल कि, जो माह्यावर विश्वास
करतो,तो माह्यावर विश्वास नाई,पण माह्या
पाठवणाऱ्या वर विश्वास करते, 45 अन् जो
मले पायते,तो माह्या पाठवणाऱ्याले पायते,
46 मी जगाच उजीळ बनून आलो,काऊन कि
जो कोणी माह्यावर विश्वास करी त तो
अंधारत नाई राहीन, 47 अन् जर कोणी माह्या
गोष्टी आयकून नाई मानीन त मी त्याले
दोषी नाई ठरवणार काऊन कि जगाले दोषी
ठरव्याले नाई आलो,पण जगाच तारण कऱ्याले
आलो, 48 जो मले बेकार म्हणतो,अन् माह्या
गोष्टी स्वीकार नाई करत,त्याले त दोषी
ठरवणारा एक आहे,म्हणजे जे वचन म्या
म्हटल आहे,तो मांगच्या दिवसात त्याले दोधी
ठरवणार, 49 काऊन कि म्या आपल्या ईकून
गोष्टी सांग्ल्या आहेत, पण देव बाप जयान
माले पाठवलं,त्याचं मले आग्या देली,कि काय
झालं,कि काय काय म्हणू,?अन् काय काय
बोलू,? 50 अन् मले मालूम आहे,कि त्याची
आग्या अनंत जीवना आहे,म्हणून जे मी
म्हणतो,व जसं बापान मले म्हटलं कि तसचं
बोलतो.

## 13

1 फसह सणाच्या पयले,जवा
येशुले मालूम झाल कि,माह्या वेळ
झाला,हाय अन् जग सोडून बापाच्या पाशी
जाऊन तवा आपले लोक त जगात होते,
2 जावा शैतान शिमोनाचा पोरगा यहुदी
इस्कार्यच्या मनात हे 3 गोस्त टाकून देली
होती कि,पकडीन्त जेवणाच्या वाक्ती, 4 येशून
हे जाऊन कि बापान सगळ काही माह्या हाती
देऊन देल,अन् मी देवबापा पासून आलो,अन्
देवा पाशीच जातो, 5 तवा भांड्यात पाणी
भरून,शिष्याईचे पाय धुतले,अन् जो दुट्टा
त्याच्या कम्रीले बधून होता,अन् त्यान त्याईचे
पाय पुसले, 6 तवा तो शिमोन पेत्राच्या पाशी
आला,तवा पेत्रान त्याले म्हटल कि,हे गुरुजी

काय तू माले पाय धूत,/7 येशून त्याले उत्तर
देल कि,जे मी त्याले करतो त्याले तुम्ही आता
नाई जाणत पण त्यच्या बाद समजशील ,
8 पेत्रान त्याले म्हटल कि,तू मायले पाय
कधीच नाई धुशीन हे याय्कून त्याले म्हटलं
कि मी जर तुये पायन धुईन तर माह्या संग
तुया काहीच वाटा नाई, 9 शिमोन पेत्रान
म्हटलं कि हे प्रभुजी त माहे पायच नाई, प
हात अन् डॉक्स पण धोऊन दे, 10 येशून त्याले
म्हटल कि ज्यांन आंगोळ केली हाय,त्याले
पाया शिवाय अजून काही धुयाची गरज
नाई,पण तो पूर्ण पणे सुधा हाय,अन् तुम्ही
शुद्ध आहा,पण सगळेच्या सगळे नाई, 11 तो
त आपल्या पकडणाऱ्याइले ओळखत होता,
म्हणून त्यान म्हटल कि तुम्ही सगळे झन शुद्ध
नाई, 12 जवा त्यान त्याचे पाय धुतल्यावर
अन् आजून आपले कपडे घून अजून बसून
गेला,तवा त्याई ले म्हणून रायला होता कि
काय तुम्ही समजले कि मह्या तुमची संग
काय केल, 13 तुम्ही मले गुरुजी अन् प्रभू
म्हणता,अन् बरोबरच म्हणता,कौन कि मी
तोच हाय, 14 जर म्या प्रभू अन्गुरु होऊन
तुमचे पाय धुतले,तुम्हाले पण एका मेकाचे
पाय धुतले पाहिजे, 15 काऊन कि म्या तुम्हाले
नमुना दाखवला कि,जस म्या तुमच्या संग
केल तुम्ही पण तसचं करत जात जा, 16 मी
तुम्हाले खर खर सांगतो,कि दास आपल्या
स्वामिउन मोठा नाई, अन् नाई पाठवलेल्या
आपल्या पाठवल्या ऊन , 17 तुम्ही हे गोस्त
जन्सन अन् जर या गोष्टी वर चलसानत धन्य,
आहा, 18 मी तुम्हच्या सगळयाईच्या विषयात
नाई,म्हणत ज्याईले म्या निवडल त्याईलेच
मी जानतो,अपण हे अशा साठी कि धर्म
शास्त्रातले हे वचन पूर्ण हो जे माही भाकर
खातात,त्यैन माह्यावर लाट उचलली 19 तवा
मी त्येच्या होण्याच्या पयले तुम्हाले खचित
सांगतो,कि ज्वा हे होणार तर तुम्ही विश्वास
करजा कि मीच हाय, 20 मी तुम्हाले खर
खर म्हणतो,कि जो माह्या पाठवणाऱ्याचा
स्वीकार करतो, तो मले स्वीकार करते,अन्
जो माह्या स्वीकार करते तो माह्या
पाठवणाऱ्याले स्वीकार करतो, 21 हे गोष्टी
म्हटल्यावर येशू आत्म्यात नाराज झाला,अन्
हे साक्ष देली कि मी तुम्हाले खर खर सांगतो
कि,तुमच्यातू न टेक मले पकडून देईन,
22 शिष्य संशयात पडलेकि हा कोणाच्या
विषयात म्हणते ते एका मेकाच्या इकले पायत
रायले, 23 त्याच्या शिष्यईतून एक ज्याच्यावर
प्रेम ठेवत होता,येशूच्या छातीच्या- इकले
झुकून बसला होता, 24 शिमोन प्रेत्रान
त्याच्या इकळे सागून म्हटलं कि सांग तो
कोणाच्या विषयात म्हणते? 25 तवा त्यान
त्याच्या इकले येशूच्या शातीच्या इकले झुकून
म्हटल कि, हे प्रभू तू कोण हास,? 26 येशून
त्याले उत्तर देल कि त्याले मी हा भाकरीचा
तुकला डुबून देतो,शिमोन यहुदियाचा
पोरगा यहुदाले देला, 27 तुकडा घेतल्यावर
शौतानत्याच्या अंदर चालला गेला तवा येशून
त्याले म्हटलं,कि जे तू करत ते तू लवकर
कर 28 पण बरनबासले कोणत ओळखल
नाई, कि त्यान हे गोष्ट कोणासाठी म्हटल,
29 यहुद पासी झोरा रायत होता,म्हणून
कोण कोणाले वाटल कि,येशू त्याई ले म्हणून
रायला होता,अन् जे काई आपल्या सणासाठी
पाहिजे ते इकत आणा,अजून गरिबांना काई
तरी द्या, 30 अन् तो तुकडा घेऊन तवाच
तो बाहेर चालला गेला,अन् ते रात्रीची वेळ
होती, नवीन आज्ञा 31 ज्वा तो चलला गेला
त आणा माणसाच्या पोराचे गौरव झाले त
देवबाप पं आपल्या त्याचे गौरव अन् तवाच
करीन, 32 हे लेकराय ओ मी आजून काईच
वेळ तुमच्या जवळ हाव अन् मंग तुम्ही मले

पायसान अन् जस म्या य्हुदियाले म्हटल होत,
कि जती मी जातो तती तुम्ही नाई, जाऊ
शकत ,तसचं मी तुम्हाले म्हणतो, 33 कि जती
मी जातो तती तुम्ही नाई, जाऊ शकत ,तसचं
मी तुम्हाले म्हणतो, 34 मी तुम्हाले एक नवीन
आज्ञा देतो,कि एका मेकावर प्रेम करा,जसं
म्या तुमच्यावर प्रेम केलं,तसचं तुम्ही पण
एका मेकावर प्रेम करा, 35 जर एका मेकावर
प्रेम ठुसान त त्याचा तून तुम्हाले जन तील कि
कि, तुम्ही माहे शिष्य व्हा. पेत्र त्याचा इन्कार
करीन हे येशू पयलेच सांगतो, 36 शिमोन
पेत्रसन त्याले म्हटल कि,हे प्रभू तू कुठी
चालला,?येशून त्याले उउतर डेल कि जती
मी जातो,तती तुम्ही आता माह्या संग येऊ
नाई शकत पण हे झाल्यावर तुम्ही माया संग
येऊ शकता, 37 प्रेत्रान त्याले म्हटलं कि हे प्रभू
मी आता तुया संग कावून नाई,येऊ शकत,?
मी त आपले प्राण पण तुया साठी देऊन दिन
38 येशून उत्तर देल कि काय तू माह्या साठी
आपले प्राण देणार,?मी तुले खर खर सांगतो
कि कोंबडी बाग ह्यायच्या पयले तू तीन वळा
माह्या तिरस्कार करशीन ,

14 1 नुमचा मन नाराज नाई झाल
पाहिजे देवावर विश्वास ठेवा,अन्
मह्यात्र पण विश्वास ठेवा, 2 माह्या बापाच्या
गरि लय रायाले जागा हात,जर नसत्या त
म्या तुम्हाले सांगून देल्या असत्या, काऊन
कि मी तुम्ह्या साठी जागा तौयार करयाले
चाललो, 3 अन् मी जाऊन तुमच्या साठी जागा
करीन त परत येऊन तुम्हाले घेऊन जाईन
कि जती मी याय्तो तती तुम्ही पण राहा,
4 मी जती जातो,तुम्हाले तचचा रस्ता जाणता,
5 थोमान त्याले म्हटल कि हे प्रभू कि आम्हाले
माहित नाई,कि तू कुठी चालला,त रस्ता
कसा मालूम, 6 येशून त्याले म्हटल कि मार्ग
व सत्य व जीवन मीच हाय,माया शिवाय
कोणीच देवाच्या पाशी नाई,पोहचू शकत,
7 जर तुम्ही मले जानल अस्त त माया बापले
पण जनल अस्त,अन् आता त्याले जनल अन्
त्याले पायल पण 8 फिलीपूसन त्याले म्हटल
कि हे प्रभू बापाले आम्हाले दाखव हे तुम
च्या साठी लय हाय, 9 येशून त्याले म्हटल
कि, हे फिलीपूस मी येवड्या दिवसापासून
तुमची संग आहे, अन् काय तुम्ही मले ओळखत
नाय,?जयान मले पायल त्यान बापले पण
पायल कु कायले म्हणत कि बापाले आम्हाले
दाखव ? 10 काय तू विश्वास नाई करत,कि मी
बापट आहे, अन् बाप माह्यात राऊन आपले
काम करतो, 11 माह्या विश्वास करा कि मी
बापट हाय अन् बाप म्हयात हाय,नाईतन
माह्या कामायच्यान च माह्या विश्वास करा,
12 मी तुम्हाले खर खर सांगतो,कि जो मह्यात्र
विश्वास ठेवतो हे काम जे मी करतो,तो पण
करीन याच्याउन मोठे -मोठे काम करीन
काऊन कि,मी बापा पाशी चललो, 13 जे काही
तुम्ही माह्या नावान मागसान तेच मी करीन
कि पोराच्या पासून बापाचे गौरव होईन,
14 जर तुम्ही मले माह्या नावन मांग्सान त मी
ते करीन 15 जर तुम्ही माह्यां वर प्रेम ठेवता,व
माह्या आज्ञा माणसान त 16 मी बापले निवेदन
करीन अन् तो तुम्हाले एक साहायक देईन,अन्
तो सर्वदा तुमच्या संग राहीन, 17 म्हणजे
खऱ्याचा आत्मा त्याले शरीर ग्रहण करू शकत
नाई,काऊ न कि तो न त्याले पाय्ते अन् न
त्याले जाणते अन् तुम्ही त्याले वयखता कौन
कि तो तुमच्या संग रायते,तो तुमच्यात रायते,
18 मी तुम्हाले अन्नात नाई,सोडीन मी तुमच्या
पाशी येतो, 19 अन् उल्चाकच वेळ रायला,अन्
मंग मले हा संसार नाई, पाईन,पण तुम्ही माले
पाय्सन यासाठी मी जिता हाव,तुम्हीपण जेते
रायसान. 20 ~ त्या दिवशी तुम्ही वयकसान
कि मी माह्या बापट हाव, 21 ज्याच्या पाशी

माह्या आज्ञा हात,अन् जो त्याले मानते
तोच माह्यावर प्रेंम करते,अन् जो माह्यावर
प्रेम करते त्याच्यावर माह्या बाप पण प्रेम
ठेवते,अन् मी त्याच्यावर प्रेम करीन व स्वताले
त्याच्यावर प्रगट करीन, 22 त्या यहुदान जो
इस्काररोय्ती नोता,त्यन म्हटल कि हे प्रभू
काय झाल,कि तू आपल्या स्वताले आपल्यावर
प्रगट करशीन अन् संसारावर नाई, 23 येशून
त्याले उत्तर देल कि,जर कोणी माह्यावर प्रेम
ठेवीन,अन् आम्ही त्याच्या पाशी येऊ अन्
त्याईच्या संग रायतीन, 24 जो माह्यावर प्रेंम
नाई,करत,तो माह्य वचन नाई,मानत अन्
जे वचन तुम्ही आयक्ता ते माह्या नाई,पण
माह्या बापाचं हाय,ज्यांन मले पाठवलं, 25 हे
गोष्ठी म्या तुमच्या संग रायतांना तुमच्याच
संग केल्या, 26 पण सहायक म्हणजे पवित्र
आत्मा ज्याले बाप माह्या नवान पाठवीन
तो तुम्हाले सगळया गोष्टी शिकवीन अन् जे
काई म्या तुम्हाले म्हटल ते सर्व आठोन करून
देईन, 27 मी तुम्हाले शांती देऊन जातो,अन्
आपली शांती तुम्हाले देऊन जातो,तुमच मन
नाराज नाई झाल पाहिजे अन् भेऊ नोका,
28 तुम्ही आयकल कि म्या काय म्हटल,मी
जातो अन् तुमच्या पाशी अजून येईन,जर तुम्हीं
मायावर प्रेम ठेवता,या गोष्टी वर आनंदित
होता,कि मी बापा पाशी जातो काऊन कि
बाप माह्याऊन मोठा हाय, 29 अन् म्या जे
होण्याच्या पयले,तुम्हाले सांगतल कि ज्वा ते
होऊन तवा तुम्ही विश्वास करा, 30 मी तुमच्या
संग अजून लय गोष्ठी नाई, करीन कावून कि
या संसाराचा सरदार येणार माह्या वर त्याचा
काहिंच अधिकार नाई. 31 पण हे या साठी
होते कि संसारान ओयखल पाहिजे, कि मी
बापावर प्रेंम करतो अन् जशी बापा न मले
आज्ञा देली,तसचं करतो,उठा आतून चल,

15 1 खरा द्राक्षवेल मी हाय,अन् माह्या
बाप शतकरी हाय, 2 अन् जे डांग
माह्यात हाय अन् फळ देत नाई,त्याले तो
कापून टाकते,अन् जे फलते त्याले तो साप
सूप करते , अन् फळली पाहिजे, 3 तुम्हीं त्या
वचनान जे म्या तुम्हाले सांगतल शुद्ध व्हा,
4 तुम्ही माह्यात बनून राहा, अन् मी तुम्हास
जशी डांग जर द्राक्षवेलात बनून नाई.राईन
त स्वता नाई फळत तसच तुम्ही जर माह्यात
बनून नाई रायसांत नाई फळ देऊ शकत. 5 मी
वेळ आहे,अन् तुम्ही डांगा हा जो मायात बनून
राईन अन् मंग त्याच्यात लय फल येईन काऊन
कि माया पासून दूर रून तुम्ही काईच करू
शकत नाई, 6 जर कोणी माह्यात बनून नाई
राईन त डांगी सारखा फेकून देल्या जैन अन्
तो वाऊन जाते व लोक त्याले येचून फेकून
देतात, अन् ते जऊन जाते, 7 जर तुम्ही माह्यात
बनून रायसान अन् माह्या वचन तुमच्यात
बनून राईन त मांगसान ते तुमच्या साठी
होऊन जाईन 8 माया बापाच गौरव अस होते
कि तुम्ही ली फल आणल पाहिजे तवा तुम्ही
माहे शिष्य म्हणल्या जासन, 9 जस बापान
मह्यात्र प्रेम केल,तसच मह्या पण तुमच्यावर
प्रेंम केल, माह्या प्रेमात बनून रा, 10 जर तुम्ही
माह्या आज्ञाइले माणसान त माह्या प्रेमात
बनून रायसान,जशी म्या आपल्या बापाची
आज्ञा आयकली,अन् त्याच्या प्रेंमात बनून
रायतो, 11 म्या हे गोष्टी याच्यासाठी म्हटल्या
कि,माया आनंद तुमच्यात बनून रावो, अन्
तुमचा आनंद पुरा होऊन जावो, 12 माई
आज्ञा हे हाय कि जस म्या तुमच्यावर प्रेम
केल,तसच तुम्ही पण एक मेकावर प्रेम करा,
13 त्याच्याउन कानाचच मोठा प्रेम नाई,कि
कोणी आपल्या दोस्ताय साठी आपला जीव
देईन, 14 जे माही आज्ञा मी तुम्हाले देतो,जर
तुम्ही त्याले माणसांत तुम्ही माहे मित्र व्हा,

15 आता पासून मी तुम्हाले दास नाई,म्हणणार
काऊन कि दासाले मालूम नाई रायत कि
मालकाची ईच्या काय हाय,पण म्या तुम्हाले
मित्र म्हटल काऊन कि म्या जे गोष्टी आपल्या
बापा जवळून आयकल्या ते सगळया तुम्हाले
सांगतल्या, 16 तुम्ही मले नाई निवडलं म्या
तुम्हाले निवडलं अन् निवड पण केली,कि,
तुम्ही जाऊन फळ आणा, अन् तुमच फल
बनून राईन, कि तुम्ही माया नावान जे
काई ,बापले मागसान तो तुम्हाले देईन,
17 या गोष्टी ची आज्ञा मी तुम्हाले याच्या
साठी देतो कि, कि तुम्ही टेक मेकावर प्रेम
करा, 18 जर जग तुमचा द्वेश करीनत तुम्ही
जान्सान कि त्यान तुमच्या पयले माह्या द्वेश
केला होता,जर तुम्ही जगाचे आस्ते त जगन
तुमच्यावर प्रेम ठेवले,असतेपण यासाठी नाई
कि तुम्ही जगाचे नाई,पण म्या तुम्हाले जगातून
निवडलं म्हणून संसार तुमच्यावाला द्वेश
करते, 19 तुमच्यावर प्रेम ठेवले, तेपण यासाठी
नाई कि तुम्ही जगाचे नाई,पण म्या तुम्हाल
जगातून निवडलं म्हणून संसार तुमच्यावाला
द्वेश करते, 20 गोष्टी तुम्हाले म्या सांगतल्या
कि दास आपल्या मालकाऊन मोठा नाई,होत
जर त्याईन मले सतावल ते तुम्हाले पण
साताव्तीन जर त्याईन माई गोष्ट आयकली त
तुमची पण आय्कतीन, 21 हे पण सगळ काई
माह्या नावाचान तुमच्या संग करतीन काऊन
कि ते माह्या पाठवणाऱ्याले नाई ओळखत
22 जर मी आलो नसतो, त त्याईच्या संग
गोष्टी केल्या नसत्या त ते पापी नाई,झाले
असते,पण आता त्याईच्या पापासाठी कोणता
बायना नाई केला पाहिजे बा, 23 जो माह्या
द्वेश करतो तो माह्या बापाचा पण द्वेश करतो,
24 जर म्या हे काम त्याईच्याईत केले नसते तर
ते अजून कोण नाई केले,तर ते पापी ठहरले
नसते, पण आता त त्याईन मले अन् माह्या
बापाले दोघायले पण पायल अन् दोघाय चा
पण द्वेश केला, 25 हे याच्या साठी झालं कि
हे वचन पूर्ण हो,जे त्याच्या व्यवस्थेत लीव्लेल
हाय त्याईन मायावर व्यर्थ द्वेश केला, 26 पण
जवा तो साहायक येईन ज्याले म्या तुमच्या
पाशी माह्या बापाच्या ईकून पाठवलं म्हणजेच
खऱ्याचा आत्मा जो बापाच्या ईकून येतो,तो
माही साक्षी देईन, 27 अन् तुम्ही पण माहे साक्ष
व्हा, काऊन कि तुम्ही सुर्वात पासून माह्या संग
रायले होते,

16
1 हे गोष्टी म्या तुम्हाले याच्या
साठी सांगतल्या कि तुम्ही ठोकर
नाई खाल्ली पाहिजे, 2 अन् ते तुम्हाले
आराधनालयातून काढून देतीन,पण ते वेळ
येतीन जो कानी तुम्हाले मारून टाक्तीन तो
समजीन कि देवाची सेवा करून रायला, 3 अस
ते त्याच्या साठी करतीन कि त्याईन बापले
जानल न मले जानल, 4 पण हे गोष्ट तुम्हाले
याच्यासाठी सांगतो कि,जावा त्याचा वेळ
येईन त तुम्हाले आठवण येईन कि म्या तुम्हाले
पहिलेच सांगून देल होत,म्या सुरवाती पासून
तुम्हाले ह्या गोष्टी त्याच्या साठी सांगतल्या
कावून कि कौन कि मी तुमच्या संग होतो,
5 पण आता मी माह्या पाठवणाऱ्या पाशी
जातो,अन् तुमच्यातून कोणी नाई,विचारत कि
तू कुठी चालला,? 6 पण म्या जे हे गोष्टी
तुम्हाले सांगतल्या म्हणून तुमच मन शोकान
भरून गेल, 7 तर मी तुम्हाले खर खर सांगतो,
कि माह्य जान तुमच्या साठी चांगल हाय
कावून कि जर मी नाई गेलो त सहायक
तुमच्या साठी नाई येणार पण जर मी गेलो त
त्याले तुमच्या पाशी पाठून देईन, 8 तो येऊन
जगाचे पाप अन् धार्मिकता अन् न्यायाच्या
विषयात निरुसाह करीन 9 पापाच्या विषयात
याच्यासाठी कि कि ते माह्यावर विश्वास नाई
करत, 10 अन् धार्मिकता च्या विषयात मी

बापाच्या पाशी जातो अन् तुम्ही मले नाई
पायसान , 11 न्यायाच्या विषयात मी याच्या
साठी कि जगाचा सरदार दोषी ठरवण्यात
आला हाय, 12 मले तुम्हाले अजून गोष्टी
सांगायच्या हात पण आता तुम्ही त्याले
सहन नाई करू शकत, 13 पण जावा तो
म्हणजे सत्याचा आत्मा येईनत तुम्हाले तुम्हाले
सगळया सत्याचा मार्ग मागीन पण तो त्याच्या
इकून नाई,पण जे काई आयकिन तेच करीन व
येणाऱ्या गोष्टी तुम्हाले सांगीन, 14 तो माह्या
गौरव कौन कि तों माह्या गोष्टीतून घेऊन
तुम्हाले सांगीन 15 जे काई बापाच हाय ते
सगळ माह्य हाय म्हणून म्या म्हटल कि
तो माह्या गोष्टी तून घेऊन तुम्हाले सांगीन
16 काहीच वेळात तुम्हीं मले नाई पायसान
अन् थोड्याच वेळात तुम्ही माले पायसान
17 त त्याच्या काही शिष्यायतून एका मेक
संग म्हणत कि थोड्याच वेळात तुम्ही माले
नाई पायसान अन् थोड्याच वेळाच तुम्ही
अमले पायासान ?के त्याच्या साठी कि
मी त्याच्या पाशी चाललो, 18 तवा त्याईन
म्हटल कि हा जो थोडा वेळ जो तो म्हणते
कोणती गोष्ट हाय,?आम्हाले मालूम नाई कि
तो कोण हाय, 19 येशून हे जाणून कि ते
मले विचारात त्यान म्हटल कि तुम्ही एका
मेकाशी माह्या या गोष्टी च्या विषयात विचार
पूस करून रायले,थोड्याच वेळाच तुम्ही मले
नाई पायसान अन् थोड्याच वेळाच तुम्ही
मले पाय्सन, 20 मी तुम्हाले खर खर सांगतो
कि तुम्ही सळसान अन् विलापकरसान अन्
जग आनद करीन तुम्हाले शोक अशीन पण
तुमचा शोक आनदात बदलून जाईन 21 ज्या
वेळेस बाई जल्म देते,त्या वेळी बाईले शोक
होते,काऊन कि तिले किती दुख होते पण
जावा लेकराले जल्म देऊन देते त या आनदात
कि जगात एक माणूस उत्पन्न झाला,त्या
दुखाले मंग आठवण करत नाई, 22 तसाच
तुम्हाले आता शोक हाय पण मी तुम्हाले
अजून मंग भेटीन अन् तुम्ही आनंदान भरून
जाईन अन् तुमचा आनद कोणी घेऊ शकणार
नाई, 23 त्या दिवशी तुम्ही मले काई विचार
सान नाई,मी तुम्हाले खर खर सांगतो,कि
जर तुम्ही बापले काही मांगसान्त तो तुम्हाले
माह्या नावान देईन, 24 आता पर्यन्त तुम्ही
माह्या नावान काही नाई मांगतलं मांगसान्त
तुम्हाले भेटीन,कावून कि तुमचा आनंद पूर्ण
होऊन जाईन 25 म्या ह्या गोष्टी तुम्हाले कथेतून
सांगतल्या पण ते वेळ येणार कि मी तुम्हाले
कथेतून नाई सांगीन पण उघडून तुम्हाले
बापाच्या विषयात सांगीन 26 त्या दिवशी
तुम्ही माह्या नवान मांगसान अन् मी तुम्हाले
हे नाई ,हणीन कि ,मी तुमच्या साठी बापाले
विनंती करीन, 27 काऊन कि बाप त स्वता
प्रेम करते, यासाठी कि तुम्ही माह्यावर प्रेम
केल,अन् हा पण विश्वास केला कि मी बापां
पासून आलो, 28 मी बापा पासून जगात
आलो,मी आजून जग सोडून बापा पाशी जाईन
29 त्याच्या शिष्यान म्हटल कि पाय आता त
तू उघडून म्हणत कि अन् अजून कोणत्याच
कथेतून नाई सांगत, 30 आता आम्ही जानल कि
तू सगळ काई जाणतो अन् त्याची आवशकता
नाई,कि कोणी तुले काई विचारे याच्यावर
आम्ही विश्वास करतो कि तू देवाच्या इकून
आला, हाय 31 हे याय्कून येशून त्याले म्हटल
कि, काय तुम्ही आता विश्वास करता ,? 32 प
ते वेळ येत हाय पण आलेली हाय,कि तुम्ही
सगळ घेऊन घेसान तरी मी एकटा नाई काऊन
कि बाप माह्या संग आहे, 33 मह्या ह्या गोष्टी
तुम्हाले याच्या साठी सांगतल्या कि तुम्हाले
माझ्यात शांती भेटीन जगात तुम्हाले दुख
होणार पण हियाव बांन्धां मह्या जगले जीतल
,

17 1येशू हे गोष्ट सांगून रायला
होता,आपले डोये आभायाच्या
ईकळे पाहून म्हटल कि हे बापा तो वेळ
आला हाय आपल्या पोराचे गौरव कर कौन
कि पोरगा पण तुझे गौरव करीन, 2कावून
कि त्याले सगळ्या प्राण्यावर अधिकार
देला,कि त्याले त्या देला, त्या सगळ्याइले तो
सर्वकालिक जीवन दिन, 3अन् सर्वकालिक
जीव हे हाय कि कि ते एकमात्र खऱ्या देवाले
येशू ख्रीस्तले जयान पाठवलं त्याले जनल
पाहिजे, 4जे काम त्या मले कऱ्याले देल होत
त्याले पूर्ण करून म्या पुथ्वीवर तुय गौरव केल
, 5आता हे बापा तू आपल्या संग माय गौरव
त्या गौरवान कर जे जगाच्या सुष्टीचं पयले
माय तुया संग होत, 6~ म्या तुय नाव त्या
माणसावर प्रगट केल,जय त्या जगातून मले
देल,ते तुय होत अन् त्या मले देल,अन्त्याईन
तुया वचनाले मानलं, 7आता ते जाणून गेले
कि जे काई त्या मले देल ते सगळ तुयाच ईकून
होत, 8काऊन कि जे वचन त्या मले देल,
म्या त्याईले देल अन् त्याईन मले स्वीकारल
अन् खर खर जाणून घेतल कि, कि मी तुया
ईकून आलो,अन् विश्वास केला,कि त्याच मले
पाठवलं , 9मी त्याच्या साठी निवेद्न करतो,
कि जगा साठी निवेद्न नाई,करत पण त्याच्या
साठी त्या मले देल कौन कि ते तुये हात,
10अन् जे माय हाय ते सगळ तुय हाय अन्
जे तुय हाय ते माय हाय अन् त्याच्या तून
माहे गौरव प्रगट झाले, 11मी आता जगात
नाई राईन पण हे जगात रायतीन अन् मी
तुया पाशी येतो हे पवित्र बापा आपल्या त्या
नावान जे त्या मले देल त्याईची रक्षा कर कि
ते आपल्या सारखे एक व्हावे , 12जवा मी
त्याइ च्या संग होतो तवा म्या तुया नावान
जे त्या मले देल त्याची रक्षा कर म्या त्याची
काळजी घेतली अन् विनाश्या च्या पोराले
सोडून त्याच्यातून काही नष्ट नाई झाल
यासाठी कि धर्म-शास्त्रात जे म्हटल आहे ते पूर
हो, 13आता मी तुया पाशी येतो,अन् हे गोस्त
जगात सांगतो,कि ते माया आनंद आपल्यातच
पुरा पायसान 14म्या तुय वचन तयीच्या
जवळ पोहचून डेल,अन् संसारान त्याचा द्रेंश
केला,काऊन कि जसा मी जगाचा नाई,तसेच
पण ते पण जगाचे नाई, 15मी हे निवेदन
नाई करत,कि तू त्याईले जगातून उचलून
घे,पण हे कि त्याईले दुष्टा पासून वाचून ठेव,
16जसा मी जगाचा नाई, तसेच ते पण जगाचे
नाईत, 17सत्य पासून द्रारे त्याईले पवित्र
कर, तुय वचन पवित्र हाय, 18जस त्यामळे
जगात पाठवलं तसचं म्या पण त्याईल जगात
पाठवलं, 19अन् त्याईच्या साठी मी स्वताले
पवित्र करतो,काऊन कि ते पण खऱ्या द्रारा
पवित्र केल्या जातीन, 20मी फक्त त्याईच्या
साठी निवेद्र नाई करत,पण त्याईच्या साठी जे
या वचनाच्या द्रारे मायावर विश्वास करतात.
21कि सगळे एकच हो,जसा बाप तू माह्यात
हास अन् मी तुयात तसचं ते पण आपल्याईत
असो,म्हणून लोक विश्वास करतीन कि त्याच
मले पाठवल, 22ते गौरव त्या मले देल,म्या
त्याईले डेल कि ते तसेच एक व्हावे,जस कि
आपण एक हाव. 23मी त्याईच्याईत अन् तू
माह्यात ते मजबूत बनून वाढत जात,अन् जग
ओळखिन कि त्याचा मले पाठवल,अन् जस
त्या मायावर प्रेम केल तसचं तू त्याईच्यावर
प्रेंम कर. 24हे बापा माझी इच्छा हाय कि जे
त्या माले देल हाय जती मी हाव तती ते
पण माह्या संग रायले पाहिजात,कि ते तुय
गौरव पायतीन जे त्या मले डेल काऊन कि
त्या जगाच्या उत्पतीच्या पयले माह्यावर
प्रेम केलं. 25हे धर्मी बापा जगन तुले जाणलं
नाई,पण म्या तुले जाणलं अन् त्याईन पण
जाणलं कि त्याचं मले पाठवलं, 26म्या तुय

नाव त्याईले सांगतल,अन् सांगत राईन कि जे
प्रेम त्या मह्यावर होत ते त्याईच्याईत राईन
अन् मी त्याईच्याईत,

18 1 येशू ह्या गोष्टी सांगूनच रायला
होता,कि आपल्या शिष्याई संग
क्रीन्द्राण नाल्या पाशी गेला,तती येक वाडी
होती,ज्याच्यात तो अन् त्याचे शिष्य गेले
होते, 2 त्याले पकडणारा यहूदा पण ते
जागा ओळखत होता,काऊन कि येशू आपल्या
शिष्याई संग तती जात जाये, 3 तवा यहूदा
सैनिकांच एक दल अन् प्रधान याजक व
फरेशीयाईचा इकून प्यादो ले घेऊन दिवे
अन् मशाले घेऊन अन् अवजार घेऊन तती
आले, 4 तवा येशू त्या सगळ्या गोष्टीवर जे
त्याच्यावर येणार होती,जाणून निघाला अन्
त्यान म्हटलं कि कोनाले पायत ? 5 त्याईन
त्याले उत्तर डेल कि येशू नाजरतक्रास ले
येशून त्याले म्हटल कि, मी आहे,?त्त्याईचा
पकडणारा यहूदा पण त्याईच्या संग उभा
होता, 6 त्याले म्हणतांना मी हाय ते मागून
जामीनीवर पडले, 7 तवा त्याईन त्याले अजून
विचारलं तुम्ही कोणाले पायता ते म्हणत
कि येशू नाज्रतक्रासले 8 येशून उत्तर देल म्या
त तुम्हाले सांगतल कि मी हाव,जर मले
पायता त त्याईले जाऊ द्या, 9 हे याच्या
साठी झाल कि ते वचन पूर्ण हो,जे त्यान
म्हटल होत,ज्याईले त्या मले देल,त्याईच्यातून
येकाले पण नाई हरवलं 10 तवा शिमोन पेत्रान
जे तलवार त्याच्या पाशी होती,काढली अन्
महायाजकाच्या सेवकावर चालवून त्याचा
जेवणा कान कापून टाकला त्या दासाच नाव
मलखुस होत, 11 तवा येशून पेत्राले म्हटल कि
आपली तलवार म्यान मध्ये ठेव जो कटोरा
बापान मले देला, काय मी त्याले पिऊ,
12 तवा सैनिक अन् त्याचे शिपाई यहुदियाच्या
प्यादो लोकाईन ले घेऊन,येशुले पकडून बांधून
टाकल, 13 अन् पहिले त्याले हन्ना पाशी घेऊन
गेले कौन कि तो त्या वर्षाचा कईफाचा
सासरा होता, 14 तो तोच कईफा होता ज्याले
यहुदीयांनी सल्ला देली,होती कि आमच्या
लोकायसाठी एका मानसाच मरण चांगल
हाय, 15 शिमोन पेत्र अन् एक वेगळा दुसरा
शिष्य पण येशूच्या मांग चालून हा शिष्य
माहायाजकाचा वयखीचा होता,म्हणून तो
येशूच्या संग महायाजकाच्या आंगणात गेलता,
16 पण पेत्र दरवाज्या पाशी उभा होता,जवा
तो दुसरा शिष्य महायाजकाच्या ओळखीचा
होता तो बाहेर निघाला अन् द्व्रापालीन ले
म्हणून पेत्राले घेऊन अंदर गेला, 17 त्या दाशीन
जे द्वारपालीन होती,तीन पेत्राले म्हटल कि
काय तू या माणसाच्या शिष्यायतून नाई,?
अन् त्यान म्हटल कि नाई, हाव. 18 सेवक
अन् प्यादो थंडीच्यान ईसत्या जवळ आन्ग
शकून रायला होता,अन् पेत्र पण त्याईच्या संग
आन्ग शकून रायला होत 19 तवा महायाजकान
येशुले त्याच्या शिष्याईच्या विषयात अन्
त्याच्या भाषणाच्या विषयात विचार पूस
केली, 20 येशून त्याले उत्तर देल,म्या जगाच्या
समोर स्पष्ट गोष्ट केली म्या आराधनालयात
अन्दिरात जती सारे यहुदी एकखता नेहमी
भाषण देल,अन् लपून काहीच नाई, ठेवल.
21 तू मले कायले विचारत,?आयकनानारयाले
विचार कि मी म्या त्याले काय म्हटल पाय ते
जाणतात कि म्या काय काय म्हटल, 22 जावा
त्यान हे म्हटल तवा प्यादो शिपाईमधून एकांत
तो जवळ उभा होता,येशुले थापड मारून
म्हटल कि कि काय तू महायाजकाई ले अशा
प्रकारे उत्तर देत ,? 23 येशून त्याले उत्तर
देल कि जर म्या खराब म्हटल अशीनत मले
साक्ष दे पण चांगल सांगतल त तू काऊन
मले मारत,? 24 हन्नान त्याले बांधल अन् कैफा
महायाजका पाशी पाठून देल,? 25 शिमोन

पेत्र उभा रून अंग तापून रायला होता तवा
त्याईले त्याले म्हटल कि काय तू त्याच्या
शिष्याय तून नाई,?त्यान नाकारून म्हटल कि
मी नाई आहो. 26 महायाजकाच्या दासायतून
एक जो त्याच्या परिवारातून होता ज्याचा
कान पेत्रान कापला होता त्यान म्हटल कि
काय काय म्या तुले त्या वेलीच्या वाडीत
नाई पायल , 27 पेत्रान मंग अजून नाकारलं
अन् लवकरच कोंबड्यान बाग देला, 28 ज्वा
ते येशुले कैफाच्या किल्ल्या पाशी घेऊन
गेले,अन् सकाळचा वेळ होता पण ते स्वत
किल्याच्या अंदर नाई गेले कावून कि अशुद्ध
नाई झाले पाहिजे पण फसह खाल्ला पाहिजे
29 तवा पिलातूस त्याईच्या संग बाहेर निघून
आला,अन् म्हटल कि तुम्ही या माणसावर
कोण्या गोष्टी चा आरोप लावता, 30 त्याईन
त्याले उत्तर देल कि, हा जर बेकार नाई
असतात आम्ही याले तुया हाती सोपल असत,
31 पिलातुसन त्याले म्हटल,कि याले घेऊन
आपल्या व्यावस्तेच्या अनुसार त्याचा न्याय
करा यहुदियात त्याले म्हटलं कि आम्हाले
अधिकार नाई,कि आम्ही कोणाचा जीव घ्यावा
, 32 हे याच्यासाठी झाल कि येशूची हे गोष्ट पूर्ण
व्होवी जे त्यान सांगतली होती,कि त्याचमरण
कस होईन. 33 तवा पिलातूस अजून किल्याच्या
अंदर गेला येशुले बलाऊन त्याले म्हटल कि
काय तू यहुदियाचा राजा हाय,? 34 येशून
उत्तर देल कि काय तू हे गोष्ट आपल्या इकून
म्हणत कि दुसऱ्याईन माह्या विषयात तुले
हे म्हटल, ? 35 पिलातूसन उत्तर देल कि
काय तू यहुदी आहो?तुयाचा जाती अन् प्रधान
याजकान तुले माह्या हाती सोपून देल,त्या
काय केल,? 36 येशून उत्तर देल कि माह्य
राज्य ह्या जगाचा नाई जर माह्य राज्य या
जगच असतत माहे सेवक माया सेवकाईन
सामना केला असता कि मले यहुदियाचा हाती
नाई असतो पण माह्या राज्य अचच नाई,
37 पिलातूसन उत्तर देल कि तू म्हणत कि मी
राजा आहो,तेशून उत्तर डेल कि मी राजा
आहो म्या याच्या साठी जल्म घेतला कि
यासाठी जगात आलो सत्याची साक्ष देऊ जो
कोणी सत्याचा आहे तो माह्या शब्द आयकतो,
38 पिलातुस्न त्याले म्हटल कि सत्य काय हाय,हे
म्हणून तो यहुदिया पाशी चालला गेला अन्
तय्ले म्हनतो कि तुयात काहीच दोष नाई
पायत 39 पण तुमचा हा रिवाज हाय कि
फसह तुमच्या शाठी एका मानसाले सोडून देऊ
पण तुम्ही जानल काय कि मी तुमच्या साठी
यहुदियाईच्या राजा ले सोडून दिन,? 40 तवा
त्याईन जोऱ्यान कल्ला करून म्हटलं कि त्याले
नाई पण तुमच्या साठी बरअब्बाले सोडून द्या
अन् बरअब्बा डाकू होता,

19 1 त्याच्यावर पिलातुसन कोळे
माऱ्याले सांगतल, 2 अजून त्याईन
कट्याइचा मंगूठ बनऊन त्याच्या डोकशा
वर ठेवला अन् त्याले नर्म लच कपडे घालून
देल, 3 अन् त्याच्या पाशी येऊन म्हणत कि
हे यहुदियाचा राज्या नमस्कार अन् त्याले
झाप्पडा पण मारल्या 4 तवा तवा पिलातुसन
अजून बाहेर निघून लोकाईले म्हटल कि,
पहा तुमच्या पाशी अजून एक खेप बाहेर
आणतो काऊन कि तुम्हाले मालूम पड्ल
पाहिजे कि मी त्याच्यात काहीच देष नाई,
पायत 5 तवा येशू काट्याचा मुगुट अन्
नरम लच कपडे घालून तो बाहेर निघाला
अन् पिलातूस न त्याले म्हटल कि पाहा
माणूस, 6 ज्वा प्रधान याजक अन् प्यादोले
घेऊन शिपायाईन त्याले पायल तवा त्याईन
जोऱ्यान आवाज देऊन म्हटल कि त्याले
क्रूसावर टांगा क्रुसावर पिलातुसन त्याले
म्हटल कि तुम्ही त्यालेच घेऊन क्रूसावर
चढवा काऊन कि मी त्याच्यावर काहीच दोष

नाई पायत , 7 यहुदियान त्याले उत्तर देल कि
आमची पण व्यवस्था हाय,अन् त्या व्यवस्था
अनुस्वार तो मारण्याचा योग्य हाय,कौन
कि न्त्यान स्वताले देवाचा पोरगा बनवल ,
8 जवा पिलातुसन हे गोष्ट आयकली त तो
अजून भेला, 9 अन् अजून किल्याच्या अंदर
गेला,अन् येशुले म्हटल कि तू कुठचा आहेस
?पण येशून त्याले काहीच उत्तर डेल नाई,
10 याच्यावर पिलातुसन त्याले म्हटल कि मले
काऊन नाई सांगत ?काय तुले मालूम नाई
काय ?कि मले तुले सोडून द्यायचा अधिकार
हाय, अन् मले युले क्रूसावर चढव्याचा
अधिकार हाय, 11 येशून त्याले उत्तर डेल
कि जर उले वरतून न देल्या जाई तर तुया
मायावर काय अधिकार नाई होता या साठी
म्हणून मले तुया हाती पकडलं त्याचा पाप
अधिक हाय 12 त्याचावर पिलातुसची त्याले
सोडून द्यायची इच्छा झाली पण यहुदियाईन
जोऱ्यान म्हणत कि जर त्याले सोडून देशीन
त तुई भक्ती केसरच्या ईकून नाई,जो कोणी
स्वताले राज्या बनवतो तो केसरचा सामना
करतो, 13 हे गोष्टी आयकून पिलातूस येशुले
बाहेर घेऊन आला,अन् त्या जागी एक
चबुतरा होता,त्याले इब्रानी मध्ये गब्बता
त्याले म्हणतात अन् तो न्याया सणावर
बसला, 14 तो फसह च्या तैयारीचा दिवस
होता अन् सहाव्या घंट्याच्या जवळ पास
यहुदियाईन म्हटल कि पहा तुमच राजा ,,
15 पण ते जोर्यान कल्ला करत घेऊन जा त्याले
घेऊन जा त्याले क्रुसावर चढवा पिलातुसन
त्याले म्हटल कि काय मी तुमच्या राज्याले
क्रुसावर चढऊ ?प्रधान याज्कन उत्तर डेल कि
केसरले सोडून आमचा कोणी राजा नाई,
16 तवा त्यान त्याले त्याईच्या हाती सोपून
देल, कि तो क्रुसावर चढवल्या जाईन, 17 तवा
ते येशुले घेऊन गेले, अन् तो त्याचा क्रूस घेऊन
त्या जागे प्रेयंत बाहेर गेला, ज्याले खोपडीची
जागा म्हणतात, त्याले इब्रानी मध्ये गुलगता
18 तती त्याईन त्याले अन् त्याच्या संग दोन
माणसाइले पण क्रुसावर खिडले ऐकले ईकून
व दुसऱ्याले तिकून व मन्धात येशुले 19 अन्
पिलातूसन एक दोष पत्र लिहून क्रुसावर
लाऊन देल,अन् त्याच्यावर हे लिवल होत कि
येशू नाजरी यहुदीयाईचा राजा 20 हे दोष पत्र
ली यहुदीयांनी वाचल काऊन कि ते जागा
जती येशुले क्रुसावर चाठ्वल्या गेल होत
नगरच्या जवळ होत अन् पत्र इब्रानी, लतिनी
,अन् युनानी मध्ये लिवल होत, 21 तवा
यहुदीयाईचा प्रमुखान पिलातुसले म्हटल कि
यहुदी याईचा राजा लिऊ नको पण हे लिव
कि त्यान म्हटल होत कि मी यहुदी याईचा
राजा आहे, 22 पिलातूसन उत्तर देल कि म्हाय
जे लिवल ते लिवल, 23 तवा सैनिक येशुले
कुसावर चढवल्यावर त्याच्या कपड्याचे चार
भाग केले अन् एका एका सैनिकांले एक भाग
कुर्ते पण घेतले त्याईन दुपट्टा घेतला,अन्
त्याले शिवल नोत अन् तो उर्तून पशून त
खाली प्रेयंत लम्बा होता, 24 म्हणून त्याईन
आपसात म्हटल कि आपण त्याले नाई फाडू
पण त्याच्यावर चिट्टी टाकू कि ते कोणाचा
होते हे याच्या साठी झाल कि धर्म शास्त्रातला
लेख पुरा हो,त्याईन माहे कपडे एका मेका
संग वाटले अन् माह्या कपड्यावर चिट्टी
टाकली, 25 अन् शिपायाईन अस केल कि
येशूच्या क्रूसावर त्याची आई व तिची बहिण
क्लोपासची बायको मरियम अन् मरियम
मकदलनी उभी होती, 26 जव यीशुन आपली
माता अन् त्या शिष्याईले ज्याच्यावर तो प्रेम
करत होता त्याई ले जवळ उभ पायल तवा
त्यान आपल्या आईले म्हटल कि हे बाई पाय
हा तुया पोरगा ? 27 तवा त्यान शिष्याईले
म्हटल कि हे ताई आई होय अन् त्याच वेळे

पासून शिष्या त्याच्या घरी घेऊन गेले,
28 याच्या बाद दे जाणून कि आता सगळ काही
पूर्ण झालं म्हणून धर्म शास्त्रातजे म्हटल आहे
ते पूर्ण हो म्हटल कि मी तहानलेला आहो,?
29 तती आंम भरून ठेवलेलं एक भांड होत
म्हणून त्यान आम बरलेला स्वज यजोवाचा
काठावर बसून त्याच्या तोंडावर लावला,
30 येशून आम घेतल्यावर पूर्ण झाल आहे,अस
म्हटल अन् मस्तक लोउन आपला आत्मा
स्मरण केला 31 या साठी कि तो तैयारीचा
दिवस होता,यहुदियाईन पिलातुसले निवेदन
न्केल कि त्याच्या टांगा तोडून टाका अन्
शब्बाथाच्य दिवशी यो कुरसाव्रर नाई, याईन
काऊन कि तो शब्बाथाचा दिवस लय मोठा
होता, 32 शिपायाईन येऊन त्या माणसाच्या
पयलेच टांगा तोडल्या तवा दुसऱ्याईचे प
जे त्याच्या संग क्रुसावर चढवलेले होते,
33 पण ज्वा येशूच्या जवळ येऊन कि तो
मेला त त्याच्या टांगा नाई, तोडल्या 34 अन्
शिपायान मन्धातून येऊन एकन येऊन याच्या
कुशीत भला मारला,व रक्त अन् पाणी
त्याच्यातून निघाले, 35 ज्यांन हे पायल त्यान
साक्ष डेली,अन् त्याची साक्ष खरी हाय,अन् तो
जन त होता कि तो खरा सांगतो कि तुम्ही
पण विश्वास करा. 36 ह्या गोष्टी याच्या साठी
झाल्या कि शास्त्रातून ते म्हटलेल हाय ते
पूर झाल पाहिजे,त्याची कोणतीच इच्या
सोडल्या नाई जाईन , 37 अन् एका आजूक
जाग्यावर लीव्लेल,हाय कि त्याले त्यान
भेदल त्याच्यावर तो दृष्टी करीन, 38 ह्या
गोष्टी झाल्यावर अतिमती याचा योसेफन
जो येशूचा शिष्य होता पण यहुदियाईच्या
भेवाचाय्न तो या गोष्टीले लपून रायला
होता,अन् पिलातुस्न निवेदन केल कि त्याचिया
देह शरीर घेऊन जाऊ शकता,पिलातुस्न त्याच
निवेदन आयकल,अन् त्यान येऊन त्याचा
शरीर घेऊन गेला, 39 निकदेमुस पण जो पयले
येशूच्या पाशी गेला होता, पन्नास शेराच्या
जवळ पास भेटल गन्धरस अत्म-येलव घेऊन
गेला, 40 तवा त्यान येशुच शरीर यहुदियाच्या
रोयाच्या अनुस्वार सुगंध द्रव्याचा संग सर
बांधून ठेवलं, 41 त्या जाग्यावर जती येशू
कुसावर चढवल्या गेला होता, एक वाडी
होती त्या वाडीत एक इब्री होता त्याच्यात
कोणाले ठेवल नोत, 42 म्हणून यहुदियाच्या
तयारीच्या दिवशी त्याईन येशुले तती ठेवल
कौन कि ते जवळ होत,

20 1 ह्स्याच्याच्फिल्या दिवशी मरियम
मकदलनि पायटीच अंधार असतांना
कब्रेवरगेली अन् गोत्याले कब्रेऊन बाजून
झालेलं पाहिलं 2 तवा ते पयत शिमोन पेत्रा
अन् दुसऱ्या शिष्याय पाशी ज्याच्यावर येशू
प्रेंम कर्तव होता,येऊन म्हटल कि ते प्रभूले
कब्रेतून निघून घेऊन गेले,अन् मले नाई मालूम
कि त्याले ते कुठीसा घेऊन गेले, 3 पेत्र व दुसरे
शिष्य नुघून कब्रेच्या इकले निघाले, 4 ते दोघ
झान संग स्न्स पुन रायले होते,पण दुसरा
शिष्य पेत्राच्या पहिले कब्रेवर पोहचला, 5 अन्
लोउन कपडे पडलेले पायले तरी तो अंदर
नाई गेला, 6 तवा शिमोन पेत्र त्याच्या मांग
मांग गेला,अन् कबरेच्या अंदर गेला,अन् कपडे
पडलेले पायल, 7 अन् तो च्याच्या डोकशावर
अंगोषा होता,तो कपड्या संग पडलेले नोता
पण दुसऱ्या जागी गुडून ठेवलेला पायल
8 तवा दुसऱ्या शिष्याईन जे कब्रेवर पहिले
पोहचले होते,अंदर गेले अन् विश्वास केला,
9 ते आता परेयनत धर्म शास्त्रतातली गोष्ट
त्याईले स्मगली नाई,कि त्याले मेलेल्यातून
जीत होण होत, 10 तवा ते शिष्य आपल्या
घरी चालले गेले, 11 पण मरियम कबरेपाशी
रडतच बाहेर उभी होती अन् रडत रडत
कब्रेच्या इकले झुकून 12 दोन स्वर्ग दुतायले

पांडे फटक कपडे घातलेले शिहाने अन् पिनाने
बसलेले पायल,जती येशूचा शरीर ठेवल होत,
13 त्यान त्याले म्हटल कि हे बाई तू कायले
रडत तीन त्याले म्हटल कि हे माह्या प्रभूले
घेऊन गेले,अन् मले नाई मालूम कि ते कुठीसा
ठेवल, 14 हे म्हणून थे मांग गेली अन् येशुले
उभ पायल व ओळखल नाई कि तो येशू हाय,
15 येशून त्याले म्हटल कि हे बाई तू कायले
रडत,?कोणाले पायल ?तीन मले समजून
त्याले म्हटल कि महाराज जर त्या त्याले
उचलून नेल त मले संग त्याले कुठी ठेवल
अन् मी मंग त्याले घेऊन जाईन 16 येशून तिले
म्हटल मरियम तीन मंग पाहून तिले इब्री
मध्ये म्हटल कि रब्बुनी म्हणजे गुरु, 17 येशून
तिले म्हटल कि कि मले हात लाऊ नको
काऊन कि मी आता पर्यंत बापा पाशी वर्त
नाई गेलो, पण माह्या भवाय पाशी जाऊन
त्याईले संग कि माह्या बाप अन् तुया बाप
अन् आपला देवबाप तुमच्या देवापाशी वरत
चालला 18 मरियम मकदूनियाई न जाऊन
तीन शिष्यायले सांगतल कि म्या प्रभूले पायल
अन् त्यान मले म्हटल अन् ह्या गोष्टी सांगतल्या
19 त्याच दिवशी जो ह्पत्याचा पहिला दिवस
होता,रात्रीच्या वेळी द्व्रापाशी शिष्य होते,
यहुदी याच्या भेवान बंध होते तवा येशू आला
अन् त्याईच्या मन्धात उभा झाला,अन् अस
म्हटल कि तुम्हास शांती असो, 20 अन् त्यान
त्याचा हातचा पंजा त्याईले दाखवला तवा
शिष्य प्रभूले पाहून आनंदि झाले 21 येशून
मंग आजून त्याईले म्हटल कि तुम्हाले शांती
भेतो जस बापान मले पाठवल तसाच मी
पण तुम्हाले पाठवतो, 22 हे म्हणून त्यान
त्याच्यावर फुक मारली अन् म्हटल कि पवित्र
आत्मा घ्या, 23 ज्याईचे पाप तुम्ही शमा करा
ते त्येच्या साठी शमा होतीन ज्याईले तुम्हीं
ठेवसान ते ठूनच राईन 24 पण बारायतून एक
म्हणजे थोमा दिद्मुस म्हणतात जवा येशू
आलता त तो त्याईच्या संग नोता, 25 जवा
दुसरे शिष्य त्याले म्हणत कि आम्ही प्रभूले
पायल तवा त्यान त्याईले म्हटल कि जत पर्यंत
मी त्याच्या हाताच्या खिड्याच्या शद्र नाई
पाहीन अन् खीड्याच्या शद्रात आपले बोट
नाई टाकीन तथ पर्यंत न्त मी विश्वास नाई
करीन, 26 आठ दिवसाच्या बाद त्याचे शिष्य
एका घरात एकखट्टा झाले,अन् थोमा त्याईच्या
संग होता,अन् दरवाजा बंद होता अन् येशू
आला व त्याईच्या मन्धात उभ रून म्हटल
कि तुम्हले शांती असो, 27 तवा त्यान थोमाले
म्हटल कि तुय बोट गेऊन अत्ति ये अन् हाताले
पाय व तुया हातच बोट माया पंज्यात टाक
येक अविश्वाशी नाई,पण विश्वाशी बन, 28 हे
याय्कून थोमान उत्तर डेल,कि हे माया प्रभू हे
माया देवा 29 येशून त्याले म्हटल कि, त्या मले
पायल म्हणून त्या विश्वास केला,?धन्य हात ते
ज्याईन मले न पाहून विश्वास केला, 30 येशून
अजून चमत्कार शिष्याय समोर दाखवले,जे या
पुस्तकात लीवलेल नाई, 31 पण हे याच्यासाठी
लीवल्या गेल कि तुम्ही विश्वास करा कि येशू
देवाचा पोरगा व खिस्त हाय, विश्वास करून
त्याच्या नावान जीवन भेटो,

21 1 या गोष्टी झाल्यावर येशून स्वताले
तीबियासच्या सरोवराच्या काठावर
शिष्याईवर प्रगट केल,अन् अशा प्रकारे प्रगत
केल , 2 शिमोन पेत्र अन् थोमा जो दिख्मुस
म्हणतात,अन् गालील्च्या काना गावातला
नत्रियेल अन् जब्दीचा पोरगा अन् त्याच्या
शिष्यायतून दोग झान अजून ये खट्टा होते,
3 शिमोन पेत्राण म्हटल कि मी मासोया
पक्ड्याले चाललो, त्याईन त्याले म्हटल कि
आम्ही पण तुया संग येतो, अन् ते निगुन
डोंग्यावर चढले पण त्याईन त्या रात्री काहीच
नाई, पकडलं 4 दिवस निघतांना येशू काठावर

रेऊन उभा रायला तरी पण शिष्याईन त्याले
ओळखल नाई,कि येशू हाय, 5तवा येशून
त्याईले म्हटल कि, हे लेकर हो काय तुमच्या
पाशी काही खायाले मासोया हाय,?त्याईन
म्हटल कि नाई, 6येशून त्याईले म्हटल कि
डोग्याच्या डाव्या बाजून तुमचा जय टाका
तवा भेटतीन अन् त्याईन जय टाकल अन्
ली मोठ्या मासोया च्याईन ते जायले ओडू
शकले नाई, 7तवा त्या शिष्यान ज्याच्यावर
येशू प्रेम करत होता पेत्राले म्हटल कि हात प्रभू
हाय,शिमोन पेत्राण हे आयकून कमब्रेचा डूपट्टा
पक्का बांधला कौन कि तो भोंगया होता,अन्
पाण्यात उडी मारली. 8पण दुसऱ्या शिष्याईन
डोग्यावर मासोळयाईन भरलेलं जाय ओड्त
आले काऊन कि ते काटाच्या ज्यादा दूर नव्हते
पण कोणी दोन से हात वर होते, 9जव
ते काठावर उत्तरले तवा त्याईन कोयशाचा
ईसतो, अन् त्याचावर मासोया ठेवलेल्या
अन् भाकरी पायल्या, 10अन् येशून त्याईले
म्हटल जे मासोया आता तुम्ही पकडल्या
त्याच्यातून काही आणा, 11तवा शिमोन
पेत्रान डोंग्यावर चढून एकशे तेरेपन मोठ्या
मासोयाईन भरलेलं जाय काठावर ओड्ल अन्
एवढ्या मासोया असून जरी जाय नाईफाटलं
, 12येशून त्याले म्हटल कि ये जेवण करा
शिष्याईतून कोनालेच साहस नोता,कि त्याले
विचारावं कि तू कोण हास ?काऊन कि
त्याईले मालूम होत कि प्रभू हाय, 13येशू आला
व त्याईले भाखर देली,अन् तशाच मासोया
पण देल्या, 14हे तीसऱ्यान डाव होत कि
येशू मेलेल्यातून जिवंत उठ्ल्यावे शिष्याईले
दिसला, 15जेवण झाल्यावर येशून शिमोन
पेत्राले म्हटल कि हे सिमोन योहानाच्या पोरा
काय तू याईच्या उन माह्यावर प्रेम करत,
16त्यान मंग दुसऱ्यांनडाव त्याले म्हटल कि हे
शिमोन योनाच्या पोर काय तू माया वर प्रेम
करतो,?त्यान त्याले म्हटल कि होय प्रभू तुले
मालूम हाय कि मी तुयात्र प्रेम करतो, त्यान
त्याले म्हटल कि माया मेंढरायची रखवाली
कर, 17त्यान तिसऱ्यानडाव त्याले विचारलं
हे शिमोन योहान्नाच्या पोरा काय तू मायावर
प्रेम करतो,पेत्र उदास झाला अन् म्हटल कि
काय तू मायावर प्रेम करत ?त्यान त्याले म्हटल
कि होय प्रभू तुले त सगळ मालूम हाय,कि
मी तुयावर प्रेम करतो,येशून त्याले म्हटल कि
माया मेढराईले चार 18मी तुम्हाले खर खर
सांगतो कि जवा तू जवान होता,तवा कमर
बांधून जात जास तती भिरत जास पण जवा
तू बुडा झाला,त तुये हात लंबे करून अन्
दुसरा तुई कमर बांधून तुले जती नाई जायचं
हाय तती तुले घेऊन जाते, 19तवा त्यान
या गोस्तीऊन ईशारा केला,कि पेत्र कोण्या
मरणातून देवाचं गौरव करीन,अन् तवा त्यान
त्याले म्हटल कि माया मंग चल, 20पेत्राण
फिरून त्या शिष्यायले मांग येतांना पायल
ज्याच्यावर येशू प्रेम करत होता,अन् त्याच्या
जेवाच्या वात्ती त्याच्या शातीच्या ईकले झुकून
विचारल कि तुया पकडणारा कोण हाय,
21त्याले पाहून पेत्राण येशुले म्हटल कि कि हे
प्रभू याच काय हाय ? 22येशून त्याले म्हटल
कि जर माही इच्छा हाय कि मी ये प्रेयनत
अतीच थांब त तुले याच्यावर काय,?तू माह्या
मांग चल, 23म्हणून हे गोष्ट भावाईत पसरली
कि तो शिष्य नाई,मरीन तरी येशून त्याले हे
नाई म्हटल कि तो तो नाई मरीन पण हे कि
जर माही इच्या हाय कि मी ये परेयनत अतीच
थांब त तुय याच्याउन काय ? 24तो हाच
शिष्य जो या गोष्टीची साक्ष देते,अन् जयान या
गोष्ठी लिवल्या अन् आम्हाले मालूम हाय कि
त्याची साक्ष खरी हाय, 25अजून पण ली काम
हात जे येशून केले जर ते एक एक करून लिवले

त मी समजलो,असतो कि पुस्तक जर लिवली
असती त जगात मायली नसती,

BY SA

www.FreeBiblesIndia.com